श्रीमद्

योगीश्वर याज्ञवल्क्य

तारा चमकला

तो फाल्गुन शुद्ध पंचमीचा दिवस होता. त्या दिवशीं ब्रह्म-रातांचें घर म्हणजे आनंदानें व उत्सवानें फुलून व खुलून गेलें होतें. तेथें एक दिव्य तारा नुकताच चमकूं लागला होता. केवढा आनंद तो नि केवढा भाग्याचा दिवस होता. पुत्रदर्शन म्हणजे वैदिक आर्याला एक मोठा आनंदाचा महायोग वाटे. ब्रह्मरातांचा आनंद आतां त्रिभुवनांत मावतां मावेना. महर्षीला पुत्रदर्शन झालें आणि वैदिक भास्कराला जन्म देणारी माय माउली —सती सुनंदा देवी धन्य झाली. सनातन धर्माचा श्रेष्ठ प्रवक्ता जन्मास आला आणि वैदिक धर्माचें दिव्य तेज शाश्वत झालें. असें हें अमोलिक दिव्यरत्न म्हणजे प्रस्तुत ग्रंथाचे चरित्र-नायक याज्ञवल्क्य होत.

ब्रह्मरातांचा थोडासा मागील इतिहास सांगणें येथें जरूर असल्यामुळें, त्याविषयीं दोन शब्द लिहिणें अवश्य आहे.

ब्रह्मराताचें घराणें म्हणजे मोठें प्रसिद्ध, शुचिर्भूत, संपन्न आणि तसेंच मोठें विद्यासंपन्न असें होतें. खुद्द ब्रह्मरात हे मोठे तपस्वी असून वेदविद्येंत अत्यंत नांवाजलेले होते. त्यांस देवरात असेंहि म्हणत. प्रख्यात वैशंपायनाचे ते मेहुणे असून राजाचा त्यांस मोठा उदार आश्रय होता. ते आचरणानें अत्यंत शुद्ध व सरळ असून मनानें मोठे पापभीरु व उदार होते. अन्नदान करण्यांत त्यांचा हात सदा पुढें असल्यामुळें, त्यांना ' वाजसनि ' म्हणजे अन्नदाता ' हें टोपण नांवहि प्राप्त झालेलें होतें.

परमेश्वराची लीला अशी कांहीं अगाध व विचित्र आहे कीं, राजा असो वा रंक असो, प्रत्येकामागें तो कांहीं ना कांहीं तरी गोष्टीची विवंचना वा हुरहुर लावून ठेवीत असतो. प्रपंचांत असा मनुष्यच सांपडावयाचा नाहीं कीं जो सर्व बाजूंनीं संपन्न व सर्वतोपरी सुखी आहे. ' जगीं सर्वसुखी असा कोण आहे ' ही समर्थोक्ति अगदीं सत्य–त्रिवारसत्य–आहे. फार लांब नको; ही ब्रह्मराताचीच गोष्ट घ्या. तसें पाहिलें तर त्यांची गृहस्थिति सर्व बाजूंनीं सुसंपन्न होती. सर्व गोष्टी अनुकूल होत्या आणि योगक्षेमहि सुरळीत व सुसूत्र चालला होता. हें सर्व खरें असलें तरी त्यांच्या त्या सोन्यासारख्या सुंदर संसारांत एका गोष्टीची-फक्त एकाच एका गोष्टीची मोठी उणीव होती. घरांत कुलदीपक नव्हता. पुत्ररत्नाचा तेथें पूर्ण अभाव होता. यामुळें ब्रह्मरात मनांतून जरा उदास झालेले दिसत.

' पुत्र नसला म्हणून काय झालें, त्याला एवढें उदास होण्याचें कारण काय ? ' असा प्रश्न आधुनिक वाचक विचारतील. पण त्याचें समर्पक उत्तर द्यावयाचें तर प्राचीन कालच्या वैदिक आर्यांच्या मनोवृत्तींचा थोडासा अभ्यास केला पाहिजे. त्याशिवाय वाचकांस

त्याची यथार्थ कल्पना येणार नाहीं. पहिली गोष्ट सांगावयाची म्हणजे अशी कीं, जो वैदिक धर्मांत जन्मला, त्याच्यामागें जन्मतःच तीन ऋणें लागलेलीं असतात. एक देवऋण, दुसरें ऋषिऋण व तिसरें पितृऋण. यांपैकीं पितृऋणांतून मुक्त होण्याचा मार्ग म्हणजे शास्त्रोक्त विवाह करून पत्नीच्या ठायीं पुत्रसंतति निर्माण करणें. हें केल्याशिवाय मनुष्य हा पितृऋणांतून मुक्त झाला असें म्हणतां येत नाहीं. आणि वरील तीनहि ऋणांतून मुक्त झाल्या-शिवाय त्याचा मानवजन्म कृतकृत्य झाला असें मानण्यांत येत नाहीं. अर्थात् जो देव-ऋषि-पितृऋणांतून मुक्त झाला नाहीं त्याला सद्‌गति नाहीं– म्हणजे स्वर्गलाभ नाहीं, असें वैदिक धर्माचें निक्षून सांगणें आहे. इतकेंच नव्हें, तर निपुत्रिकाच्या घरचें अन्नसुद्धां अभिजात आर्याला वर्ज्य आहे. म्हणून वैदिक आर्यांनीं 'मा शूने अग्ने निषदाम नृणाम्'– हे अग्ने, निपुत्रि-काच्या घरीं राहण्याचा आमच्यावर प्रसंग न येवो. अशी अग्निनारायणापुढें मोठ्या कळकळीनें प्रार्थना केली आहे (ऋ. ७-१-११). त्याचप्रमाणें त्यांनी पुनः एके ठिकाणीं 'माऽवीरतायै रीरिधः' – हे अग्निदेवा आम्हांस निपुत्रिकाच्या स्वाधीन करूं नकोस, अशी करुणा भाकली आहे (ऋ.३-१६-५). यावरून निपुत्रिक असणें, ही गोष्ट वैदिक आर्यांस मोठी लाजिर-वाणी असून काळजाशीं झोंबणारी व डिवचणारी होती. याविषयीं अधिक निर्वाळा देण्याचें कारण नाहीं. सारांश, सांगण्याचा मतितार्थ हा कीं, पोटीं पुत्रसंतान नसल्यामुळें ब्रह्मरात काय, त्यांची पत्नी सुनंदा काय, दोघेंहि मनांतून फार बेचैन झालेलीं होतीं.

शिवाय दुसरी एक गोष्ट अगत्यपूर्वक सांगावयाची म्हटली म्हणजे वैदिक आर्य हे स्वभावतः आक्रमणशील व त्याबरोबरच

प्रसरणशील वृत्तीचे होते. आणि म्हणूनच वंशवृद्धि व वंश-विस्तार त्यांना आवश्यक वाटला. तसें वाटणें स्वाभाविक होतें. त्याशिवाय समाज प्रसरणशील होणें हें सहसा शक्यच नाहीं. आणि हें तत्त्व – हें प्रभावी तत्त्व त्यांनीं ऋग्वेदकाळींच पूर्ण जाणल्यामुळें, आपणांस वीरपुत्र देण्याविषयीं त्यांच्या प्रार्थना ऋग्वेदांत पदोपदीं दृष्टोत्पत्तीस येतात. प्रत्येक कुटुंबामागें निदान दहा पुत्र तरी असावेत असें सबल अनुमान 'दशास्यां पुत्रमाधेहि' या विवाहसमयीं घोषित केल्या जाणाऱ्या मंत्रोच्चारावरून किंवा निदान आठ पुत्र तरी असावेत असें अनुमान 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' या सुवासिनीस वडीलधाऱ्यांनीं द्यावयाच्या मंगल आशीर्वादावरून काढतां येतें. त्यांची वंशप्रियता केवढी दांडगी होती याची कल्पना यापुढील यजुर्वेदांतील मंत्रावरून वाचकांना सहज करतां येण्यासारखी आहे. तो मंत्र म्हणजे हा—'काण्डात्काण्डात्प्ररोहन्ति परुषः परुषस्परि। एवानो दूर्वे प्रतनु सहस्रेण शतेन च ॥' (शु. य. १३-२०) – हे दुर्वे, प्रत्येक कांडापासून व प्रत्येक पेरापासून तूं जशी अंकुरित होतेस व पसरत जातेस तद्वत् आमचा वंशहि तूं हजारो पटींनीं वाढेल असें कर. जवळजवळ याच अर्थाची भावना ऋग्वेदांतहि उमटलेली दिसून येते. 'प्रजावान्नः पशुमाँ अस्तु गातुः'— देवहो ! आमचें घर मुलाबाळांनीं व गाईघोड्यांनीं गजबजून जाईल असें करा. यावरून वैदिक आर्य हा केवढा वंशविस्तार-प्रेमी होता हें आतां स्पष्ट झालें आहे.

हें सर्व येथें सांगितलें याचें कारण इतकेंच कीं, निपुत्रिक असणें हें धर्मदृष्ट्या काय अगर समाजदृष्ट्या काय एक मोठें कौटुंबिक व्यंग समजलें जात होतें. समाजांत अशा मनुष्याला

लाभावी तशी प्रतिष्ठा लाभत नसे. प्रतिष्ठित लोक त्याच्या घरचें अन्न टाळण्याचा प्रयत्न करीत. अर्थात् निपुत्रिकाचा जन्म अशा दृष्टीनें एका परी दुःखी कष्टीच असतो, असेंच का म्हणा ना. खरोखर निपुत्रिकाचें जिणें वैदिकांच्या दृष्टीनें जवळजवळ निष्फळ व म्हणून निरर्थकच म्हटलें पाहिजे. घरांत त्रैलोक्याचें वैभव जरी नटलेलें असलें तरी तेथें पुत्ररत्नाचा मधुर प्रकाश उजळलेला नसला तर तो कुबेराचा सुंदर राजवाडाहि स्मशानाची रुक्ष छाया धारण करतो. निदान त्या निपुत्रिकाला तसा भास तरी होत असतो, हें कांहीं खोटें नाहीं. ब्रह्मराताचें घर झालें तरी आतां असेंच शुष्क व शून्य दिसत होतें !

ब्रह्मराताची सुशील पत्नी झाली तरी आतां ती ब्रह्मराताप्रमाणेंच उदास व चिंतातुर दिसत होती. दुर्दैवी बिचारी, करणार काय ? जिच्या नशिबीं पुत्रमुख पाहण्याचें सद्भाग्य लिहिलेलें नव्हतें, तिच्यासारखी दुःखी व दुर्दैवी स्त्री तिची तीच होती. स्त्रीहृदय त्यासाठीं सारखें झुरत असतें, कशाची म्हणून तिला हौस नसते, उत्साह नसतो. मन विषण्ण बनतें व जग उदास भासतें. जिच्या नशिबीं मांडीवर गोंडस राजहंस खेळण्याचें भाग्य लिहिलेलें नाहीं, तिच्यासारखी दुर्दैवी स्त्री आणखी कोण आहे ? ईशकृपेनें घरांत सर्व कांहीं अनुकूल असून, ही एकच बाब त्या ब्रह्मराताच्या पत्नीला—त्या सुनंदा देवीला—मोठी बोचक व तापदायक होऊन राहावी हें तिचें दुर्दैव होतें. पण ईशसंकेतापुढें कोण धावला आहे ? आणि कोणाचें काय चालणार आहे ? ‘ ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें ’ ही संतोक्ति गोड मानून घेऊन त्यांतच समाधान मानणें याशिवाय अशा हतभाग्य स्त्रीला दुसरा तरणोपायच नाहीं ! आणि तें वचन डोळ्यापुढें ठेवूनच ती बिचारी कशी

बशी दिवस कंठीत होती, हें सांगण्याची आतां आवश्यकता राहिली नाहीं.

बिचारी सुनंदा, दुर्दैवीच होती.अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' या मंगल आशीर्वादाचा तो चालता-बोलता काळ होता. त्या मंगल आशीर्वादानेंच आर्यस्त्रियांच्या अंगावर आनंदानें बोटभर मांस चढत असे. 'संततिनियमनाचें' खूळ डोक्यांत घेऊन, त्याचा पोवाडा गाण्यांत स्वर्ग मानणाऱ्या महिला वर्गाला त्याचें महत्त्व व त्यांतील आनंद समजणें हें शक्य नाहीं. स्त्रीजन्माला उजळा देणारा व स्त्रीहृदयाला भरती आणणारा असा जो आशीर्वाद, त्याचें महत्त्व फक्त वैदिक संस्कृतींत वाढलेल्या त्या आर्यस्त्रियांनाच माहीत असे. 'अष्टपुत्रा' व 'सौभाग्यवती' हे शब्द ऐकून बुजणाऱ्या उफराटी हृदयांच्या आधुनिक बहकलेल्या महिलांना तो आशीर्वाद विषाप्रमाणें वावडा व कडवट वाटला, तर त्यांत आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. पाशवी विषयसुखास हपापलेल्या देहतर्पणरत विषयमूढांना संततीचा अडथळा व कंटाळा वीटावा, हें ठीकच आहे. पण सुदैवानें भरतखंडांत त्या रोगाची विषारी सांथ त्या वेळीं पसरलेली नव्हती म्हणून काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत वैदिक आर्यांची एकजात वसाहत कायम राहिली, हें रहस्य आज वाचकांना सांगणें आवश्यक आहे.

तेव्हां आतां येथें सांगावयाचा मुद्दा म्हणजे तो हा कीं,वैदिक आर्य संततिनियमनाचा पोवाडा गाणारे केवळ देहसुखप्रेमी नरपशु नसून वंशविस्ताराचे मोठे अभिमानी व कैवारी होते. दांपत्यजीवनांत त्यांची दृष्टि ऐहिक व पारमार्थिक अशी उभयविध होती. 'धर्मप्रजारत्यर्थोहि विवाहः' हा त्यांचा दाम्पत्यजीवनाचा दिव्य आदर्श होता. म्हणून संततीशिवाय दाम्पत्यजीवन सार्थकीं लागलें असें ते मानीत नसत. धर्मसाधन, प्रजोत्पादन व रतिसुखलाभ ही

सूत्रत्रयी वैदिक विवाहाचें – दाम्पत्यजीवनाचें मुख्य ध्येय असल्यामुळें व प्रजोत्पादन हें दोन्हीस जोडणारें असल्यामुळें त्यासाठीं ते फार दक्ष व उत्सुक असत. ही वाण ब्रह्मराताच्या प्रपंचांत भासत असल्यामुळें ब्रह्मरात काय किंवा त्यांची पत्नी सुनंदा देवी काय, कोणी झालें तरी दुःखीकष्टीच होते, हें लपवूं म्हणतां लपण्यासारखें नव्हतें. संतति नसलेलें घर म्हणजे फूल नसलेली बाग अगर चंद्र नसलेली रात्र असा आम्हा भारतीयांचा ठाम सिद्धांत आहे.

वैदिक आर्यांचा काळ म्हणजे तो श्रद्धेचा पुण्य काळ होता. त्या वेळीं श्रद्धेच्या जोरावर त्यांनीं काय वाटेल तें केलें व काय हवें तें मिळविलें. श्रद्धाशून्य बुद्धिजीवी लोकांना हें खरें वाटावयाचें नाहीं. पण भारतीय इतिहास मात्र तसें निश्चित सांगतो. जेव्हां मानवी प्रयत्न फसतात अगर निष्फळ ठरतात तेव्हां दैवी उपायांचें-अपौरुषेय मार्गाचें-अवलंबन करून प्राचीन भारतीय लोक आपली मनीषा तृप्त करून घेत हें इतिहासज्ञांस नव्यानें सांगावें असें नाहीं. आणि तो दैवी उपाय म्हणजे यज्ञोपासना होय. वैदिक आर्यांची दिव्य कामधेनु ती हीच होती. ही यज्ञनारायणाची अनन्य उपासना होती. ब्रह्मरातांनीं आतां हाच मार्ग स्वीकारला. पुत्रप्राप्तीसाठीं त्यांनीं आतां यज्ञनारायणाची आराधना चालविली. आणि चमत्कार हा कीं, पुढें कांहीं दिवसांनीं या त्यांच्या उपासनेस सुन्दर यशहि आलें. सुनंदादेवी गरोदर झाली. आणि नवमास संपल्यावर प्रारंभीं म्हटल्याप्रमाणें फाल्गुन शुद्ध पंचमीस ब्रह्मरातांस पुत्र-दर्शन झालें. मग त्यांचा आनंद काय सांगावा! प्रत्यक्ष ब्रह्मदेवच त्यांच्या उदरीं जन्मास आले होतें (स्कंद. १–६०–४२).

बालपण

ब्रह्मरात व सुनंदा या दांपत्यास फार दिवसांनीं आणि मोठ्या नवसानें झालेलें बाळ आणि त्यांत याज्ञवल्क्यासारखें तेजस्वी नि सुंदर रत्न झाल्यावर कोण नाहीं आनंदानें नाचणार ? सुनंदादेवीच्या त्या सुखानंदास आतां त्रैलोक्य देखील अगदी ठेंगणेंच झालें होतें. तो आनंद, उत्साह नि संभ्रम यांचा कल्लोळ उसळला होता. आणि कां नये उसळूं ? आकाशांतील शेकडो मैलांवरच्या चंद्राला पाहून पृथ्वीवरील रत्नाकर जर आनंदानें उचंबळूं लागतो तर नवमास तपश्चर्या करून, असह्य प्रसववेदना सहन करून, प्रसाद रूपानें प्राप्त करून घेतलेल्या गोजिरवाण्या राजहंसाला मांडीवर घेऊन लडिवाळपणें खेळवितांना कोणती माउली आपलें भान विसरणार नाहीं ? त्या हंसतमुख बालचंद्राकडे पाहून आनंद सागरांत पोहत असतां कोणती माउली स्वर्गसुखालाहि लाथाडून देणार नाहीं. ब्रह्मरातांचें घर म्हणजे आतां प्रत्यक्ष स्वर्गच बनलें होतें.

त्या नूतन चंद्राला शुक्ल पक्ष लागला आणि तो दिवसें दिवस वाढत व खुलत चालला. तें गोजिरवाणें बालक आतां हंसूं लागलें, बसूं लागलें, रांगूं लागलें, बोलूं लागलें व हळू हळू चालूं व नाचूंहि लागलें. सुनंदादेवीला मोठा आनंद झाला. त्याला उचलून घेतां, चुंबितां, हांसवितां खेळवितां, बोलवितां मातेच्या हृदयांत जो प्रेमाचा पूर उचंबळत असतो, त्याचें यथार्थ वर्णन कोण करील ? तें माननीय मातृपद प्राप्त करून घ्यावें, तेव्हांच त्या दिव्य ब्रह्मानंदाचा मधुर अनुभव प्रत्यक्ष अनुभवास येईल.

जसजसें तें बाळ वाढूं लागलें व हंसू-खेळूं लागलें, तसतसें त्या लहानशा याज्ञवल्क्याची गोंडस व गुलजार चिमुकली मूर्ति पाहून ब्रह्मरातांचें हृदय आनंदानें उचंबळून येई; जातां येतां त्याला पटकन् उचलून घेऊन, त्या हंसऱ्या मधुर गालाचा गोड पापा घेऊन, निमिषार्धच कां होईना, त्या निर्वचनीय ब्रह्मानंदांत ते अगदीं तल्लीन होत असत. गोंडस नि गोजिरवाणें तें बाळ प्रत्यक्ष मनमोहन मूर्तीच होती. ब्रह्मरात केव्हां त्याच्याशीं बोबडें बोलत तर केव्हां नसते चाळे करून त्याला हंसवीत. केव्हां त्याच्याशीं खेळून त्याला रमवीत तर केव्हां हातानें धरून थै थै नाचवीत. केव्हां रागें भरल्याचा बहाणा करून क्षणभर रडवीत व केव्हां आपण रडल्यासारखें करून त्याला हंसवीत. केव्हां त्याला वरच्यावरच झेलत तर केव्हां त्याला डुलवून रमवीत. असे एक का दोन, अनेक तऱ्हेनें त्याला रमवून, हंसवून, खेळवून आपल्या मनाची हौस ते यथेच्छ पुरवून घेत. त्यांचा गृहस्थाश्रम आतां धन्य झालेला होता.

याप्रमाणें त्या प्रेमळ आईबापांच्या चोचल्यांत व प्रेमांत वाढतां वाढतां तें बाळ आतां सात वर्षांचें झालें. त्याचा खेळ, ती आनंदी वृत्ति, मधुर चेहरा, ते सुंदर बोल आणि तें मनोहर हास्य पाहून कोणीहि त्याचें कौतुकच करी. शेजारी-पाजारी देखील ती त्याची खेळकर वृत्ति व हंसरा चेहरा पाहून सदा त्याच्या भजनीं लागलेले असत. मग आइबापांच्या कोडकौतुकाबद्दल किती जरी सांगितलें तरी तें कमीच पडणार आहे. पुत्रवात्सल्याचा गोड अनुभव आईबापांस घरोघर असतोच असतो. तो नुसत्या शब्दांनीं सांगून कळणार नाहीं.

याप्रमाणें सातवें वर्षहि संपून गेलें आणि आठवें लागलें. ब्रह्मरातांनीं योग्य मुहूर्त पाहून त्या मुलाचा व्रतबंध केला आणि त्यास गायत्रीमंत्राचा उपदेश दिला. आतां याज्ञवल्क्याचें बालपण संपून, अध्ययनकाल लागला. तत्कालीन पद्धतीप्रमाणें ब्रह्मरातांनीं त्यास वेदाध्ययनास म्हणून त्याचे मातुल जे वैशंपायन त्यांचेकडे नेऊन ठेविलें (भारत, १२–३२३–१७ ते १९).

याज्ञवल्क्याला ब्रह्मराति असेंहि म्हणत. ब्रह्मराताचा पुत्र तो ब्रह्मराति. ब्रह्मराताला वाजसनि हें टोपण नांवहि होतें. त्या वाजसनीचा पुत्र म्हणून त्यास वाजसनेय असेंहि म्हणत. त्या वेळीं व्यक्ति ओळखावयाची म्हणजे मूळ नांवापुढें पैतृक नांव घालून ओळखीत असत. जसें उद्दालक आरुणि, राम दाशरथि, व्यास पाराशर्य, जनमेजय पारिक्षित, हिरण्यनाभ कौसल्य इत्यादि. त्या वेळीं आडनांवाची प्रथा नव्हती. त्याऐवजीं केव्हां केव्हां गोत्रनाम घालीत.

वैदिक वाङमयांत याज्ञवल्क्यांचा उल्लेख आढळून येतो. यामुळें लोकांच्या समजुतींत घोटाळा झालेला असून केव्हां केव्हां मोठे मोठे विद्वान् देखील त्याला बळी पडले आहेत. मागचा पुढचा विचार न करतां, फक्त नामसादृश्यामुळें स्वतःची फसगत करून घेऊन, याज्ञवल्क्य वाजसनेय यांच्या चरित्राविषयीं अगर काळाविषयीं संशोधनपूर्वक व सखोल अभ्यास न करतां, एखाद्या दुसऱ्या पुराण-ग्रंथाचा तुटपुंजा आधार घेऊन प्रस्तुत ग्रंथाविषयीं नसते शिंतोडे उडविण्याचा उपद्व्याप करणारे कांहीं विद्वान् आम्हांला ठाऊक आहेत. त्यांना आमची एवढीच विनंति आहे कीं, आम्ही जी विचारसरणी या ग्रंथांत सूत्रबद्ध जुळविली आहे, ती साधार प्रथम खोडून काढून, मग तुम्हांस काय म्हणावयाचें आहे तें म्हणा;

तसें न करतां उगीच दुसऱ्यावर चिखल उडविणें हें विद्वान् म्हणविणाऱ्यास शोभणार नाहीं. इतकी सौम्य व नम्र सूचना देऊन आम्ही आमच्या प्रस्तुत विषयाकडे वळतों.

वैदिक वाङ्मयांत अनेक याज्ञवल्क्यांचा उल्लेख आढळतो. पैकीं धर्मराजाच्या राजसूय यज्ञांत एक याज्ञवल्क्य अध्वर्यूच्या अधिकारावर होतें (भा. स. ३६-३४). पराशर-सत्यवती विवाहांत दुसरे एक याज्ञवल्क्य पुरोहितपदावर आरूढ झालेले होते. बाष्कलांच्या शिष्यगणांत एक याज्ञवल्क्य आढळतातच. शिवाय याज्ञवल्क्य वाजसनेय हे चौथे याज्ञवल्क्य होत. म्हणजे पुराण-ग्रंथांत एकापेक्षां अधिक याज्ञवल्क्यांचा उल्लेख आढळतो. तरी याज्ञवल्क्य या नांवानें अमर कीर्ति पावून जगप्रसिद्ध झालेले याज्ञवल्क्य म्हणजे हे वाजसनेय याज्ञवल्क्य होत. आज लोकमान्य टिळक म्हणजे बाळ गंगाधर टिळक असा जसा बोध होतो, तद्वत् योगीश्वर याज्ञवल्क्य म्हणजे ब्रह्मरातांचे चिरंजीव वाजसनेय याज्ञवल्क्य असा अर्थ ध्वनित होतो. हे कौशिक गोत्री असून, विश्वामित्र-वंशज असावेत.

विद्यासाधन

तें विसावें शतक नव्हतें, तर या वीस शतकाच्या पलीकडलें जवळ जवळ तिसावें शतक होतें. मग त्या वेळीं शाळा कोठल्या, हायस्कूल कोठलें नि कॉलेज कुठलें ? कशास काय ठाव ना पत्ता. तेव्हां पंतोजी नव्हते. मग मास्तर नि प्रोफेसर कोठून येणार? त्या वेळेला मास्तर वगैरे कोणीच नव्हते. परीक्षा नव्हती, पदवी नव्हती आणि पारितोषिकहि नव्हतें. तेव्हां पुस्तकें नव्हतीं, पाटचा नव्हत्या, पेनसिली, व नोटबुकें नव्हतीं. या दृष्टीनें आजच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे तें अंधःकारयुग होतें. तथापि वैदिक आर्यांचा प्राचीन भारतीयांचा तो दैदिप्यमान नि प्रभावी काळ होता. वैदिक ज्ञानभास्कर त्या वेळीं भरतखंडावर पूर्ण मध्यान्हीच्या प्रखर तेजानें चांगला तळपत होता. वैदिक ऋषी पवित्र ज्ञानगिरीच्या परमोच्च शिखरावर तपःसामर्थ्यानें आरोहण करून, तेथें नागाप्रमाणें परमानंदांत डोलत होते. भारतीय राजलक्ष्मीचा दिव्य मुकुट आकाशांतील पौर्णिमेच्या प्रफुल्ल चंद्राप्रमाणें वैदिक राजवटींत मोठ्या वैभवानें मिरवीत होता. आर्यक्षत्रियांचें प्रखर व प्रभावी सामर्थ्य पूर्ण कळसास पोंचून जगभर त्यांच्या यशो-दुंदुभि दुमदुमून राहिल्या होत्या. असा तो भाग्यशाली, भारतीयांचा ऐन भरभराटीचा भरीव नि वैभवकाळ होता.

ज्या तेजस्वी शिक्षणाच्या प्रभावानें याज्ञवल्क्यासारखे प्रतिभासंपन्न ज्ञानभास्कर निर्माण झाले तें ओजस्वी शिक्षण आणि तें देणारें तेजस्वी आचार्यमंडळ याची आज कल्पनाहि करवणार नाहीं. तेथें पुस्तक-पाटीचें नांव व काम नव्हतें;

फक्त विद्यार्थ्यांचा मेंदू हीच पाटी आणि आचार्यांची जिव्हा हीच पेनसिल होती. एवढ्यावरच त्यांनीं विद्यासंपन्न होऊन जगावर अध्यात्म-विद्येचें जें अधिराज्य स्थापन केलें तें आतापर्यन्त कोणालाहि उलथून पाडण्याचें धैर्य व धाडस झालें नाहीं ही खरोखर आश्चर्याची गोष्ट आहे. त्या वेळचे लोक ज्ञानांत मागासलेले व विचारांत खुरटलेले होते आणि आज शाळा कॉलेजचें उच्च व उदार शिक्षण घेऊन मोठे पुढार-लेले व सुधारलेले आहेत अशी जर कोणाची बढाई असेल तर तो निव्वळ भ्रम-सोळा आणे भ्रम-आहे असेंच आम्ही म्हणूं. आणि इतिहास पाहाल तर तो देखील तुम्हांला तोच कौल देईल.

त्या वेळीं साक्षरतेचा प्रश्न व शाळा-कालेजचें अस्तित्व नव्हतें. पण गाढ विद्यार्जनाची तीक्ष्ण लालसा व ती संपादन करण्याची प्रचंड तळमळ व धडपड यांत मात्र कोठें कमीपणा नव्हता. शिवाय सांगण्यासारखी वैदिक आर्यांची विशेष गोष्ट म्हणजे ती ही कीं, त्या वेळीं विद्यादान हें शुल्काच्या अपेक्षेनें करण्यांत येत नसून तें सर्वांना विनाशुल्क देण्यांत येत असे. तेथें गरीब व श्रीमंत हा भेद नव्हता. सर्वांनाहि एकच उच्च नि उदार शिक्षण आणि तेंहि फुकट असे. त्या अंधःकार युगांतील ही तेजस्वी व अलौकिक तऱ्हा पाहून, आजच्या सुधारणेची शेखी मारणाऱ्या मारवाडी-वृत्तीच्या कोणत्याहि सरकारला लाजेनें त्यांच्यापुढें मान लव-विलीच पाहिजे. पैशाच्या सबबीवर राष्ट्रांतील बालपिढीला पवित्र विद्यामंदिराचा महादरवाजा बंद ठेवणें यासारखें पाप नाहीं, अशी वैदिक ऋषींची स्पष्ट समजूत असून, त्यांनीं आपलीं विद्यामंदिरें गरीब श्रीमंताचा विचार न करतां सर्वांना सताड उघडीं ठेवलेलीं होतीं. त्या वेळच्या विद्यार्थ्यांनीं दीर्घ व

कडकडीत तपश्चर्या करून मोठ्या कौशल्यानें तयार केलेल्या पवित्र ज्ञानमंदिरांतील सुंदर शारदादेवीची मनोहर मूर्ति पाहून हें सुधारलेलें जग आजदेखील आश्चर्यानें तोंडांत बोट घालीत आहे! मग त्यांना निरक्षरतेच्या सबबीवर निर्बुद्धतेचा शिक्का मारण्याचें पाप कोण चांडाळ करील ? त्या निरक्षरच पण सूज्ञ व सुबुद्ध सरस्वती-भक्तांनीं एकनिष्ठ उपासना करून, त्या दिव्य शारदादेवीची पवित्र मूर्ति नाना विद्यालंकारांनीं नटवून व सजवून इतकी रमणीय व शोभिवंत केली आहे कीं, तिच्या शृंगारसाजास शोभणारा असा एखादा नवा अलंकार तयार करण्याचें भाग्य आज जगांतील थोड्या पंडितांस लाभलें आहे. म्हणून या विसाव्या शतकाला प्राचीन शिक्षणाची टिंगल व टवाळी करण्याचा अधिकार प्राप्त होत नाहीं.

वैशंपायनांचा तो आश्रम म्हणजे त्या वेळचें तें यजुर्वेदाचें महाविद्यापीठच होते. द्वैपायन व्यासांनीं मूळ व संमिश्र वेदराशींतून विषयवारीनें मंत्र निवडून त्यांच्या संहिता करून, त्यांपैकीं यजुर्वेद संहिता वैशंपायनाकडे दिली असल्यामुळें यजुर्वेदाच्या मुख्य विद्यापीठाचा मान वैशंपायानाच्या आश्रमास मिळालेला होता. त्यांच्या अध्यक्षतेखालीं हें विद्यापीठ नुकतेंच अस्तित्वांत आलें होतें त्याचप्रमाणें ऋग्वेदाचें मुख्य पीठ पैल ऋषीकडे, सामवेदाचें जैमिनीकडे व अथर्ववेदाचें सुमंतूकडे सोपवून बादरायणाचार्यांनीं आपली लेखणी इतिहास पुराणांकडे वळविली होती. (विष्णु पु. अं. ३, अ. ४, ७–९). याप्रमाणें आर्यावर्तांत चार वेदांचीं चार मुख्य विद्यापीठें नुकतींच स्थापन होऊन तेथें नवीन पद्धतीचा अभ्यासक्रम अमलांत आलेला होता. आणि या विद्यापीठांत त्या वेळच्या शिरस्त्याप्रमाणें शिक्षण घेण्यास शेंकडों विद्यार्थी एकत्र

जमले होते. त्यांपैकीं वैशंपायनाच्या आश्रमांत विद्याग्रहणार्थ म्हणून याज्ञवल्क्य हा उपनयन होतांच येऊन दाखल झाला.

(विष्णु पु. ३-५-१ व २)

याज्ञवल्क्य म्हणजे कांहीं सामान्य मूर्ति नव्हती. वय लहानच पण मुद्रा अतिशय गंभीर होती. ते लकलकणारे पाणीदार डोळे आणि तो रेखीव व तेजस्वी चेहरा पाहिला म्हणजे कोणालाहि त्यांच्या भावी भाग्योदयाची सहज साक्ष पटल्याशिवाय राहात नसे. त्यांच्या बोलण्यांत, चालण्यांत, पाहण्यांत, व एकंदरींत त्यांच्या वर्तनांत व चर्येंत अशी कांहीं एक जादू होती कीं, तिजमुळें जो तो त्यांच्यावर प्रेमवृष्टि करी व लोहचुंबकाप्रमाणें आकर्षिला जात असे. त्या लहान वयांतच त्यांच्या कुशाग्र बुद्धीची तेजस्वी लकेर मधून मधून चमकून जाऊन, त्यापासून तेथील लहान थोरांना त्याचा मोठा अचंबा आणि अभिमान वाटे. स्मरणशक्ति काय, ग्रहणशक्ति काय, पठणशक्ति काय सगळेंच कांहीं विलक्षण असे. एकदां कानानें ऐकून तोंडानें म्हटलें कीं, रुजलेंच जाऊन बुद्धींत. आणि मनानें घेतलें कीं उतरलेंच तें कृतींत. त्यांचा बाणेदार व निश्चयी स्वभाव आणि अध्ययननिष्ठा पाहून, कोणीहि त्यांची वाहवा व कौतुकच करीत असत.

वेदिक धर्मांत मनुष्याचा जागतिक जीवनाचा प्रारंभ ब्रह्मचर्याश्रमापासून होतो. हा आश्रम म्हणजे पुरुषार्थाचा मूळ व मुख्य पाया आहे. मूळ पाया म्हटलें याचें कारण असें कीं, सुख, संपत्ति, विद्या, बल, आयुष्य, आरोग्य हीं सर्व या आश्रमावरच अवलंबून आहेत. येथें पेरावें तसें पुढें उगवतें, आणि कष्टावें तसें लाभतें. म्हणून हा आश्रम सर्व पुरुषार्थाचा मूळ आधार असून, मनुष्याच्या आयुष्यक्रमांतील तो एक अत्यंत महत्त्वाचा असा भाग आहे.' शता-

युर्वे पुरुषः 'या मंत्राला सार्थत्व देणारी अशी जर कोणती किमया असेल तर तो हा ब्रह्मचर्याश्रमच होय ! येथेंच व्रतनिष्ठ राहून विद्या शिकावयाची आणि येथेंच यमनियमांचें पालन करून बलारोग्य कमवावयाचें; तरच भावी जीवन सुखमय होऊन, तें पुरुषार्थोत्कर्षास कारणीभूत होईल. ब्रह्मचर्य या शब्दांत फार मोठी शक्ति नि फार मोठा अर्थ गर्भित असून, त्याचा आम्हा भारतीयांस आज पूर्ण विसर पडला आहे ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट होय. ब्रह्म म्हणजे वेदविद्या ('ब्रह्म हि मंत्रः') आणि ब्रह्म म्हणजे बल ('ब्रह्म हि बलम्') असा ब्रह्म शब्दाचा द्विविध अर्थ असून ब्रह्मचर्य या शब्दाची व्याख्या आहे ती अशी :— 'ब्रह्म वेदस्तच्चरणं ब्रह्मचर्यम्' (गदाधर)—ब्रह्म म्हणजे वेद, त्याचा, अभ्यास, तें ब्रह्मचर्य. अर्थात् शास्त्रोक्त वेदाभ्यास करणें यास ब्रह्मचर्य असें म्हणतात.'ब्रह्म कर्म चरतीति एवं शीलो ब्रह्मचारी'— विद्या व बल प्राप्त्यर्थ कर्म करण्याची ज्याची प्रवृत्ति तो ब्रह्मचारी अशीहि ब्रह्मचारी शब्दाची व्याख्या आहे. एकंदरींत सांगावयाचें तात्पर्य हें कीं, ब्रह्मचर्य आश्रमांत – म्हणजे विद्यार्थी दशेंत – मनुष्यानें शक्य तेवढी विद्या व बल प्राप्त करून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा.

वेदकालीं इतर विद्या होत्या. पण वेदविद्येला सर्वांत महत्त्वाचें स्थान होतें, म्हणून वेदविद्येचा प्राधान्यानें उल्लेख करण्यांत आलेला आहे. आयुर्विद्या, धनुर्विद्या, ज्योतिर्विद्या, स्थापत्यविद्या इत्यादि अनेक विद्या त्या वेळीं होत्या. पण त्या मुख्य विद्या नसून आनुषंगिक विद्या मानल्या जात असत. त्या वेळीं विद्या शिकावयाची म्हणजे कांहीं सोपी गोष्ट नव्हती. पुस्तक-पाटीचा त्या वेळीं अवतार झाला नसल्यामुळें प्रत्यक्ष गुरुजवळ राहूनच ती संपादन

करावयाची असे. म्हणजे गुरुदेवतेसमोर बैठक घालून गुरुमुखाकडे एकाग्रमन लावून, सावधानचित्तानें गुरुमुखांतून वाहणारी ज्ञानगंगा वाणीद्वारा अंतःकरणांत काळजीपूर्वक सांठवून ठेवावयाची. पण हें काम बोलण्याइतकें सोपें नाहीं. ऋग्वेदासारखा प्रचंड ग्रंथ तोंडानें घोकून बुद्धींत उमटविण्याची गोष्ट सामान्य नव्हती. दहा हजार मंत्रांच्या या महाग्रंथाएवढा प्रचंड ग्रंथ जगांत दुसरा नाहीं असला महाग्रंथ चिमकुल्या मेंदूंत भरून ठेवणें हें सामान्य लोकांचें काम नव्हे. फार लांब कशाला, आज सुधारलेल्या पद्धतीनें उच्च शिक्षण घेणाऱ्या महाविद्यालयांतील चांगले प्रौढ विद्यार्थीच घ्या त्यांना कोणत्याहि पुस्तकांतील सरळ शंभर ओळी तरी तोंडानें घडघड पाठ म्हणतां येतील अशी हमी देण्यास कोणी प्राध्यापक तयार आहे काय ? आजच्या विद्यार्थ्यांचें सगळें ज्ञान काय तें पुस्तकांत असतें. परीक्षेपुरतें चार दोन महिने डोक्यांत काय राहील तेवढेंच. परीक्षा एकदाची होऊन गेली म्हणजे त्यांचा मेंदू पुनः कोरा करकरीत नि कोरडा ठणठणीतच असतो. आजच्या विद्यार्थ्याला एखादा प्रश्न विचारला तर पुस्तकासाठीं कपाटाकडे त्याला धूम ठोकावी लागेल. त्याशिवाय त्यास कांहीं सुचायचेंच नाही. पण तेंच प्राचीन विद्यार्थ्याकडे पाहा. तुम्ही त्यांना केव्हांहि मध्यरात्रीं झोपेंतून उठवून कोणताहि मंत्र म्हणावयास सांगा तो ताबडतोब म्हणत असे. त्यांची जागती विद्या कोणीकडे आणि आमचें आजचें हे ठिसूळ क्षणभंगुर पुस्तकी ज्ञान कोणीकडे ! ऋग्वेदासारखे प्रचंड ग्रंथ जिव्हाग्रीं घेऊन त्यांना थयथय नाचविणें ही कांहीं लहानसहान गोष्ट नाहीं. एक ऋग्वेदच काय, तसले चारहि वेद प्राचीन विद्यार्थी जिभेवर झेलून ते सहज लीलेनें

खेळवीत असत. एवढी त्यांची ही पठणशक्ति आणि विशाल ग्रहणसामर्थ्य होतें. त्यांचा दीर्घोद्योग नि खडतर तपश्चर्येला तर जगांत तोड नाही.

आम्ही हें कांहींतरीच लिहितों असें मात्र वाचकांनीं समजूं नये. आज या गोष्टी आश्चर्यवत् वाटतात. पण प्राचीन काळीं मात्र तशी वस्तुस्थिति होती. आणि या गोष्टीला या ग्रंथाचे चरित्र-नायकच प्रत्यक्ष साक्ष आहेत. सर्व वेद त्यांच्या जिव्हाग्रीं होते. हें तपानुष्ठान असामान्यच होय. 'दीर्घसत्रं वा एष उपैति। यो ब्रह्मचर्यं चरति ॥'– 'जो, ब्रह्मचर्याचें अनुष्ठान करतो तो महायज्ञाचेंच अनुष्ठान करतो, असें पुढें त्यांनीं शतपथांत लिहून ठेवून तत्कालीन विद्यार्थ्यांचा मोठा गौरव केला आहे, तो कांहीं उगीच नव्हे. प्राचीन वैदिक विद्यार्थ्यांचा आदर्श आजपर्यंत पृथ्वीच्या पाठीवर इतरत्र कोठेंहि पाहावयास मिळलेला नाहीं. आणि म्हणून त्यांच्या दीर्घ व दिव्य तपश्चर्येचें आणि अलोट विद्यावैभवाचें कौतुक करावें तितकें थोडेंच आहे.

तशांत याज्ञवल्क्याचा काळ म्हणजे वैदिक वाङ्मयांत व इतिहासांत अत्यंत घडामोडीचा, मोठ्या चळवळीचा, जिवंत व प्रभावी असा होता. त्या वेळीं प्रसिद्ध भारतीय युद्ध संपून सुमारें पन्नास पाऊणशें वर्षें झालीं असतील. भगवान श्रीकृष्ण नुक-तेच अंतर्धान पावलेले, पुण्यश्लोक धर्मराजाची आठवण अजून लोकांत ताजी टवटवीत असलेली, सम्राट जनमेजयांच्या सर्प-सत्राचा आतां कोठें समारोप झालेला, यज्ञसंस्थेला प्रौढ व श्रेष्ठ स्वरूप प्राप्त होऊन, ती भव्य व विशाल दिसूं लागलेली, अध्यात्मशास्त्राला खोल व सूक्ष्म विचारांचा उजळा मिळून,

विचारी लोकांची विवेकबुद्धि आस्ते आस्ते मोक्षप्रवण होत चाललेली, अशा सुमारास आर्यावर्तांत जिकडे तिकडे कर्म व ज्ञान यांचा उत्कर्ष व विकास होऊन, भारतीयांचा हा तेजस्वी इतिहास सर्व जगभर दुमदुमून राहिलेला होता.

अशा प्रभावसंपन्न काळांत याज्ञवल्क्याच्या समकालीन असणारे अनेक थोर व विद्वान ऋषी व कर्मवीर पुण्यश्लोक राजे आकाशांतील तेजस्वी नक्षत्रांप्रमाणें तेथें तेथें चमकत होते. यजुर्वेद विद्यापीठाचे कुलगुरु व महाभारताचे प्रवक्ते वैशंपायन, अध्यात्मविद्येचे प्रमुख व प्रसिद्ध आचार्य उद्दालक आरुणि, ऋग्वेदाचे पदपाठ लावणारे शाकल्यमुनि, योगशास्त्राचे महामहोपाध्याय हिरण्यनाभ, सांख्यशास्त्राचे प्रणेते कपिलमुनि, सामवेदाचे आद्य प्रचारक जैमिनी, पातिव्रत्याचा पुरस्कार करून विवाहसंस्थेला दिव्य उजळा देणारे श्वेतकेतु, प्रत्यक्ष यमाजवळ जाऊन त्याच्यापासून स्वर्गीय अमरविद्या मृत्युलोकांत आणणारे ज्ञानवीर नाचिकेत, प्रसिद्ध तत्त्ववेत्ते व सत्यवक्ते सत्यकाम जाबाल, सम्राट् जनमेजय, पुण्यश्लोक विदेही जनक, राजा अजातशत्रु, राजा अश्वपति, राजा प्रतर्दन अशीं एकापेक्षां एक दिव्य, शूर व सुन्दर भारतरत्नें त्या वेळीं जागजागीं विखुरलीं,असून त्यांच्या विविध व मनोहर प्रकाशानें ही पवित्र भूमि अधिकच रमणीय दिसत होती तें युग अशा भाग्यशाली भारतमातेच्या स्पृहणीय व वैभवाचें होतें

अशा ज्ञानवैभवसंपन्न युगांत याज्ञवल्क्य कडकडीत ब्रह्मचर्य पाळून शारदादेवीच्या एकनिष्ठ उपासनेंत अहोरात्र रंगून व गढून गेले होते. वैशंपायनांच्या आश्रमांत राहून यजुर्वेदाचें त्यांनीं यथासांग व शास्त्रशुद्ध अध्ययन केलें. या आश्रमांत त्यांनीं जवळ जवळ एक तप म्हणजे बारा वर्षें घालविलीं. पण एका यजुर्वेदा-

वरच त्यांची बौद्धिक तहान भागण्यासारखी नव्हती. तत्कालीन विद्वानांत मागेंपुढें अग्रपूजेचा मान पटकावण्याची त्यांची हौस व उमेद होती. मग एका यजुर्वेदावर तें कसें घडून येणार? म्हणून ते आतां तेथून निघून मंत्रसिद्धीचें शिक्षण घेण्यासाठीं म्हणून त्या विद्येचे प्रसिद्ध आचार्य जे मंत्रविद्याविशारद उद्दालक आरुणि त्यांच्याजवळ येऊन राहिले.

उद्दालक आरुणीचा आश्रम

या पुण्यभू भारतवर्षात प्राचीन काळीं ज्या महान् महान् व अविस्मरणीय विभूति चमकून गेल्या, त्यांत उद्दालक महर्षि यांची प्रामुख्यानें गणना होते. हे उद्दालक सुप्रसिद्ध अरुणि ऋषीचे पुत्र असून, वेदविद्येंत अत्यंत निष्णात व यज्ञकर्मात मोठे प्रवीण असे अधिकारी आचार्य होते. त्यांचा यजुर्वेदाचा अभ्यास सूक्ष्म व खोल असून मंत्रविद्येंत व अध्यात्मशास्त्रांत त्यांचा हात धरणारा असा त्या वेळीं दुसरा कोणीच नव्हता. हे आयोद धौम्य यांचे शिष्य असून, वेद व उपमन्यु यांचे सहाध्यायी होते (भारत आदिपर्व अ. ३).

ते पांचाल देशाचे राहणारे असून ज्ञानार्जनार्थ अनेक ठिकाणीं प्रवास करून त्यांनीं आपल्या ज्ञानांत अपूर्व भर घातली होती. शिवाय उत्तरेंत मद्र देशांत जाऊन तेथील पतंजल काप्य नांवाच्या विद्वान गुरूजवळ जाऊन, त्यांच्याकडूनहि त्यांनीं विद्या संपादन केली होती. साऱ्या उत्तर हिंदुस्थानांत संचार करून जेथें जेथें म्हणून नांवाजलेलीं विद्यापीठें होतीं, तेथें तेथें जाऊन त्यांनीं विद्या संपादन केलेली होती. त्यांचें सांगण्यासारखें मुख्य वैशिष्टय म्हणजे तें हें कीं, मंत्र व अध्यात्म विद्येंत त्यांचा अधिकार फार मोठा होता. त्यांचा मुलगा जो श्वेतकेतु त्याला ‘ तत्त्वमसि ’ चें महावाक्य पटवून देणारे महात्मे म्हणजे हे उद्दालकच होत. छांदोग्यावर दृष्टि फिरविली म्हणजे त्यांच्या योग्यतेची व अधिकाराची चांगली साक्ष पटते.

अशा प्रख्यात गुरूजवळ याज्ञवल्क्य हे आतां मंत्रविद्येचें गूढ ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठीं म्हणून येऊन राहिले. त्याबरोबरच अध्यात्मविद्येचा अभ्यास करण्याचाहि त्यांनीं निश्चय केला. त्यांची स्मरणशक्ति आणि ग्रहणशक्ति मोठी तीक्ष्ण व सूक्ष्म असल्यामुळें नुसतें डोळ्यांनीं पाहून व कानांनीं ऐकूनच ती गोष्ट त्यांच्या बुद्धींत शिरून तेथें रुजून बसत असे. त्यांची जिज्ञासा मोठी दांडगी असल्यामुळें इतर विद्यार्थ्यांबरोबर शुष्क गप्पागोष्टींत फुकट काळ न घालवितां फावल्या वेळीं गुरूच्या आसपास घुटमळत राहून आल्यागेल्या विद्वानांचें व उद्दालकाचें संभाषण आड उभें राहून लक्षपूर्वक ऐकून घेऊन त्यांतील ग्राह्यांश मनांत नीट जपून ठेवण्याचा त्यांनीं येथें आल्यावर परिपाठ ठेवला होता. यामुळें त्यांच्या ज्ञानांत इतर शिष्यांपेक्षां अधिक भर पडत जाऊन, त्या मानानें त्यांचें विद्यार्थी मंडळांत वजन वाढीस लागलें. चारचौघांत त्यांचा बोलबाला चालू होऊन, पुढें तो उद्दालकांचे विद्वान चिरंजीव श्वेतकेतु यांच्या कानावर जाऊन पोंचला. याचा परिणाम असा झाला कीं, पुढें त्या दोघांचा परिचय व सलोखा वाढून त्याचें थोड्याच दिवसांत स्नेहभावांत रूपांतर झालें. श्वेतकेतु हे वयानें याज्ञवल्क्यापेक्षां थोडे मोठे होते. तरी दोघांचा स्वभाव, विचार व वर्तन एकमेकांस जुळतें असल्यामुळें त्यांच्यांत लवकरच स्नेह जमून आला.

उद्दालक आचार्य यांचा त्या वेळीं अध्यात्म विद्येंतला अधिकार फार मोठा असल्यामुळें नेहमीं देशांतील नामांकित पंडित कोणी ना कोणीतरी यांच्या भेटीस येत. त्या वेळीं त्यांच्या-त्यांच्यांत महत्त्वाच्या विषयांवर भारदस्त चर्चा होत असे. ती मोठी बोधप्रद व

मननीय असे. म्हणून याज्ञवल्क्य ती संधि सहसा वाया जाऊं देत नसत. ते त्या आश्रमांत असतांना अनेक प्रतिथयश विद्वानांचा व तत्वज्ञांचा अलभ्य असा दर्शनलाभ होऊन विविध विषयांवरील त्यांच्या विचारसरणीची अंधुक अंधुक ओळखहि त्यांना होऊं लागली. वेदविद्यापारंगत असा प्राचीनशाल, सत्ययज्ञ, इंद्रद्युम्न, बुडिल, शौचेय, प्राचीनयोग्य असे महाश्रोत्रिय ब्राह्मण व त्याचप्रमाणें राजा अश्वपति, प्रवाहण जैवलि, अजातशत्रु, जानश्रुति इत्यादि तत्त्वज्ञाननिपुण राजर्षी यांच्या दर्शनाचा व वादश्रवणाचा लाभ त्यांना येथें आयताच लाभून, त्यांच्या विचारांत मोठी भर पडत चालली. तशांत राजा अश्वपति म्हणजे फार मोठा विद्वान होता. तो इतका कीं, खुद्द उद्दालक आचार्यांना देखील त्याच्याजवळ जाऊन वैश्वानर आत्म्याचें ज्ञान त्यांच्याकडून मुद्दाम शिकून घ्यावें लागलें (छां. ५– ११ ते १७). अर्थात् या उद्दालकांच्या आश्रमांत राहून मंत्रसिद्धीचें ज्ञान करून घेण्याचा उद्योग तर याज्ञवल्क्यानें झपाट्यानें चालविला. शिवाय आणखी इतर ज्ञानांत भर घालण्याच्या कामींहि त्यांनीं पुष्कळ प्रयत्न केले.

गुरुवर्य उद्दालक आरुणीजवळ राहून, मंत्रविद्या हस्तगत करून घेतल्यावर पुढें तेथून निघून, ऋग्वेदाचा अभ्यास करण्यासाठीं म्हणून ऋग्वेदाचार्य शाकल्य गुरूजवळ येऊन तेथें कांहीं काल वास्तव्य केलें व ऋग्वेदाचा पाठ घेण्यास त्यांनीं सुरवात केली. हे शाकल्य गुरु म्हणजे ऋग्वेदाचे मोठे प्रसिद्ध आचार्य होते. त्यांचें गुरु-कुल ऋग्वेद-अध्ययनासाठीं प्रख्यात असून, विद्यार्थी तेथें बहु संख्येनें उपस्थित होते. त्यांतच याज्ञवल्क्यांची भर पडली.

याज्ञवल्क्य हे शाकल्य ऋषीजवळ राहून ऋग्वेदाभ्यास करीत असतांना एक अद्‌भुत प्रकार घडला. त्याचा येथें निर्देश

करणें जरूर व युक्त आहे. हे शाकल्य ऋषि म्हणजे मोठे प्रसिद्ध आचार्य होत. आणि त्यांचा शिष्यपरिवारहि तसाच मोठा दांडगा होता. ते सुप्रिय राजाचे पुरोहित होते. तेथील प्रघात असा होता कीं, नित्य राजवाड्यांत जाऊन दैनिक पौरोहित्य कृत्यें करावयाचीं व राजास शांति अभिषेक करावयाचा. पौरोहित्य कृत्य ते स्वत: जाऊन करीत आणि शांति अभिषेकासाठी कोणा तरी एका शिष्यास सांगत. हा शिष्य मागें राहून राजास शांति अभिषेक करून मग आश्रमाकडे येई.

याप्रमाणे दररोज एकेक शिष्य या कामासाठीं क्रमाक्रमानें तेथें मागें राहून, राजास शांति अभिषेक करून, मग आश्रमाकडे परत येई. असें होतां होतां एक दिवस ही पाळी याज्ञवल्क्यांवर आली. नियमाप्रमाणें गुरुजी वाड्यांतील नित्यकर्म आटोपून, शांति अभिषेकार्थ याज्ञवल्क्याना तेथें सोडून वहिवाटीप्रमाणें ते आश्रमाकडे परतले आणि याज्ञवल्क्य तेवढेच तेथें मागें राहिले.

हा राजा म्हणजे एक विचित्र वल्ली होती. परमेश्वरानें तर–तम–बुद्धी बाजूला ठेवूनच त्याची मूर्ति तयार केली होती कीं काय न कळे. राजे हे शहाणे तर शहाणे, आणि मूर्ख तर मूर्ख, उदार तर उदार, आणि लोभी तर लोभी, रंगेल तर रंगेल आणि साधे तर साधे असत. सुप्रिय राजा म्हणजे अशांतलाच एक अर्धवट राजा होता. ही स्वारी ऐन तारुण्यांत असून मोठी रंगेल होती. तशांत त्याला रमणीविलासाचें भारी वेड असे. ‘ कामातुराणां न भयं न लज्जा ’ ही सुभाषितोक्ति त्याच्या बाबतींत अक्षरश: सार्थ होती.

याज्ञवल्क्यांनीं नियमाप्रमाणें होम करून, आपल्या मंत्र-कौशल्याचा उपयोग करून राजाच्या अभिषेकार्थ सुंदर जपतीर्थ

तयार केलें. आणि त्या दिव्यतीर्थानें त्यास अभिषेक करण्यासाठीं म्हणून ते राजमहालांत आले. तेथें त्यांना विलक्षण प्रकार दिसला. एका वारांगनेच्या प्रेमविलासांत ते अगदीं रंगून गेले होते. याज्ञवल्क्य समोर येऊन उभे राहिले, तरी दाद ना फिर्याद! याज्ञवल्क्याला पाहूनहि राजा ताळ्यावर आला नाहीं आणि त्यानें प्रेमलीला थांबविल्या नाहींत, कपडे सावरले नाहींत कीं पलंगावरून उठून स्वारी पुढें आली नाहीं, आदर दाखविला नाहीं कीं शिष्टाचारहि पाळला नाहीं. इतकेंच नव्हे तर पलंगावर पडूनच निर्लज्जपणें त्यांना म्हणाला, 'हे ब्राह्मणा, हल्लीं मी विलासांत असल्यानें तुझा तो शांति अभिषेक आज मला नको. तें तुझें तीर्थ तेथेंच कोठें तरी शिपडून चालता हो.'

केवढा हा अपमान आणि कोण ही अप्रतिष्ठा! दिव्योदकानें अभिषेक करावयास आलेल्या शिष्योत्तमाचा धिक्कार आणि तो एका वारांगनेसमोर! वेदोनारायणाचा केवढा अपमान आणि तेजस्वी पुरुषाची केवढी ही अप्रतिष्ठा! याज्ञवल्क्य मानी होते. याज्ञवल्क्य तो निर्लज्ज प्रकार पाहून, मनांत फार चिडले, संतप्त झाले; पण करतां काय, राजाशीं प्रसंग होता. मूर्ख, पाजी, उद्धट, दुष्ट, भ्रष्ट, सारांश, कसाही असला तरी राजा तो राजाच. तेथें शहाणपणाचा उपयोग होत नाहीं. शिष्टाचाराची प्रतिष्ठा, नीतीचें महत्त्व, शहाणपण, सारासार विचार, न्यायनीति, लाजलज्जा सर्व कोळून पिणाऱ्या कामांध व मदांध अशा राजांना त्याचें कांहीं वाटत नाहीं राजे–महाराज म्हणजे महामूर्ख असा जो आज उपरोधिक अर्थ मानण्यांत येतो, त्याला कारण म्हणजे त्यांच्या लहरी व विचित्र लीलाच होत.

सुप्रियानें आज्ञा केल्याबरोबर याज्ञवल्क्य तेथून मागें

वळून शेजारच्या एका खांबाजवळ आले. तेथें येऊन ब्रह्माचें ध्यान करून 'फलिनो ये' हा मंत्र जपून तें जपतीर्थ त्यानीं त्या खांबावर शिपडल्याबरोबर मोठा चमत्कार झाला! तो वाळलेला. तासून व रंधून, साफ केलेला शुष्क खांब, पण त्या दिव्य जपोदकाचा स्पर्श होतांच त्यालाच क्षणार्धात सुंदर पालवी फुटली आणि हां हां म्हणतां तो फलपुष्पांनीं सुशोभित झाला 'ततः स पतिते तोये स्तम्भः पल्लवशोभितः तत्क्षणादेव संजज्ञे फलपुष्पैर्विराजितः' स्कंद, ६–१२९–२१) !

केवढा हा मंत्रप्रभाव आणि केवढी ही अद्‌भुत गोष्ट! प्रेतामध्यें चैतन्य शिरलें, अमावास्येची पौर्णिमा झाली, लोखंडाचें सुवर्ण बनलें आणि शुष्क काष्ठाचा सुंदर वृक्ष झाला. विसाव्या शतकांतल्या वाचकांनो! ही गोष्ट तुम्हांस कशीशीच वाटेल. पण ती अपूर्व नवलाई घडली, हें मात्र खास. आपल्यांतील मंत्रसामर्थ्यं नष्ट झालें आहे म्हणून अशा गोष्टी आज काल्पनिक व चमत्कारिक वाटतात हें युक्तच आहे. पण रानांत वाढलेल्या रानवटालाहि राजधानींतील सुंदर राजवाडा म्हणजे असाच काल्पनिक वाटत असतो तसाच हा प्रकार आहे.

सुप्रियानें हा अपूर्व व अद्‌भुत प्रकार डोळयांनीं पाहिला मात्र. तो आश्चर्यानें दिपूनच गेला. क्षणमात्र तो दिङ्मूढ झाला. हें काय झालें नि कसें झालें हें त्यास समजेना. हा अननुभूत प्रकार पाहून मनांतून तो एक प्रकारें चमकल्यासारखा झाला. आणि थोडासा वरमला व नरमलाहि. शेवटीं त्यानें पलंगावरून उठून आणि नम्रपणानें हात जोडून त्या महाभागाची क्षमा मागितली.

"द्विजोत्तमा" हात जोडून तो म्हणाला, "क्षमा करा!

मला क्षमा करा! चूक झाली माझी, मला क्षमा करा ! माझ्यावर त्या तुमच्या जपतीर्थाचा मंगलाभिषेक करा तो प्रभावी मंत्र पुनः म्हणा आणि माझें मस्तक तुमच्या दिव्य अभिषेकानें पुनीत होऊं द्या ! "

सत्पुरुषाचें अंतःकरण एकदां कठोर झालें कीं, मग वज्रालाहि दाद देत नाहीं. याज्ञवल्क्याचें अंतःकरण आतां वज्रापेक्षांहि कठोर झालें होतें. राजाचा उद्धटपणा व उन्मत्तपणा पाहून ते मनांत फार चिडले व संतापले होते. ब्राह्मणाचा अपमान आणि वेदोनारायणाची थट्टा ही मानी व निःस्पृह पुरुषाला खपणें शक्य नसतें.

" नाहीं, राजा, नाहीं " याज्ञवल्क्य कडाडले, " आतां ती गोष्ट बोलूं नकोस. झालें तें होऊन गेलें. आतां त्याचें नांवहि काढूं नकोस. माझा रस्ता मोकळा आहे." असें म्हणून ते तेथून दरवाजाकडे जाऊं लागले.

राजा मध्येंच आडवा होऊन, त्यांची वाट अडवून पुन नम्रतेनें म्हणाला, " हे पुण्यपुरुषा, असे रागावूं नका. न कळत माझी चूक झाली, मला क्षमा करा. माझा अपराध पोटांत घाला. तो तुमच्या हातचा पवित्र अभिषेक मजवर करण्याची कृपा करा, हे दिव्य पुरुषा, मजवर रोज अभिषेक होत होता. पण असा दिव्य प्रकार माझ्या अनुभवांत आलेला नव्हता. आपण पुण्यपुरुष आहांत. तर आतां माझ्यावर तो दिव्य अभिषेक होऊं द्या. हे सत्पुरुषा, आपणांस सुंदर वस्त्रें देतों, मोठे अलंकार देतों, उत्तम गाई-घोडे देतों, नाना वाहनें देतों, गजान्त लक्ष्मी देतो, फार काय, आपण मागाल तें देतों पण मला आपल्या पवित्र हातचा तो पुण्य अभिषेक एकवार घडूं द्या

" नाहीं. " याज्ञवल्क्य निर्धारानें उत्तरलें, " नाहीं, राजा

नाहीं. ती गोष्ट आतां कदापि शक्य नाहीं. तें सुंदर भाग्य तुझ्या नशिबीं नाहीं. विषयमदांत व धुंदींत तूं ब्राह्मणाला अवमानिलेंस आणि वेदमाउलीस धिक्कारलेंस. आतां तुझी इच्छा सफल होण्याची आशा नाहीं. राजा, तूं म्हणशील तेव्हां असें दिव्योदक चटकन् तयार होत नसतें. त्याला अग्निनारायणाचा प्रसाद लागतो. त्याशिवाय मंत्रांत चैतन्य स्फुरत नाहीं. तू राजा झालास म्हणून काय झालें? वेद ब्राह्मणांचा अवमान करणारा तूं पापी व चंडाळच आहेस. चल, सोड माझी वाट आणि कर माझा रस्ता मोकळा. तुझ्या राजेपणाला भुलून धर्माचा बाजार मांडणारा हा याज्ञवल्क्य नाहीं, राजा मला आतां अडवूं नकोस. उशीर झाला. जाऊं दे मला. असें म्हणून राजाच्या विनंतीची पर्वा न करितां धाडधाड पाय आपटीत याज्ञवल्क्यांची स्वारी तेथून निघून चालती झाली. राजा मुखस्तंभ होऊन जेथल्या तेथेंच हा प्रकार पाहात तसाच पुतळ्याप्रमाणें उभा राहिला.

याज्ञवल्क्य अजून विद्यार्थी दशेंतच होते. तरी त्यांची सत्त्वनिष्ठा व स्वाभिमान केवढा ज्वाज्वल्य होता, हें वरील संभाषणावरून चांगलें व्यक्त होतें. मुलाचे पाय पाळण्यांतच दिसतात असें म्हणतात, तें कांहीं खोटें नाहीं. सुप्रिय म्हणजे कांहीं लहानसहान व्यक्ति नव्हती. बोलून चालून प्रत्यक्ष देशाचा अधिपति आणि त्यांत शाकल्यांचा आश्रयदाताहि होता. हें सर्व जरी खरें असलें तरी त्यांना काय त्याचें सोयरसुतक थोडेंच होतें? जेथें सत्त्वाला जखम झाली, तेथें त्रैलोक्याचें राज्य मिळालें म्हणून काय व्हावयाचें आहे? सत्त्वधीर आपल्या सत्यापासून चळले, असें कोठें झालें आहे काय? राजानें परोपरीनें विनवणी केली, हात जोडले, क्षमा मागितली, नाना तऱ्हेचें आमिष दाखविलें 'आणि

हरतऱ्हेनें त्याचें मन वळविण्याचा प्रयत्न करून पाहिला. पण कशालाच यश आलें नाहीं. सत्त्वनिष्ठ व करारी याज्ञवल्क्य कशानेंहि वितळले नाहींत. ते जे राजवाड्यांतून बाहेर पडले, ते सरळ आश्रमाच्या रस्त्यास लागले.

याज्ञवल्क्य निघून गेल्यावर तिसरें प्रहरीं राजा शाकल्यमुनीकडे आला आणि हात जोडून म्हणाला कीं, " गुरुजी, आज जो आपण अभिषेकार्थ शिष्य पाठविला होता तोच पुनः उदईकहि पाठवावा. गुरुजी कोण तो ?"

शाकल्य उत्तरले :–– तो याज्ञवल्क्य होय. मोठा प्रतापी नि मोठा तेजस्वी आहे तो. तसाच मोठा करारीहि आहे.

सुप्रिय :––त्यालाच उद्यां पाठवा.

शाकल्य :––दुसरा चालणार नाहीं का ?

सुप्रिय :––त्यालाच पाठवाल तर बरं होईल.

शाकल्य :––बरं.

शाकल्यांना नमस्कार करून सुप्रिय तेथून निघून गेला. शाकल्यांनीं राजाच्या विनंतीस होकार दिला खरा. पण त्या दिवशीं वाड्यांत घडलेला प्रकार व झालेली हकीकत याची त्यांना कल्पना नव्हती. म्हणून त्यांनीं राजास ' होय ' असें म्हटलें. आणि राजाहि त्या उत्तरानें खूष होऊन परत वाड्याकडे निघाला.

राजा निघून गेल्यावर गुरुजी याज्ञवल्क्यास म्हणाले, " मुला पुनः राजवाड्यांत उदईक शांति अभिषेकार्थ तुला गेलेंच पाहिजे. खुद्द राजा येऊन पुनः तुलाच पाठविण्यासाठीं आग्रहानें सांगून गेला आहे." मग याज्ञवल्क्य हात जोडून नम्रतेनें म्हणाला, " गुरुजी माफ करा. दुसऱ्या कोणाला तरी पाठवा."

शाकल्य :––कां बरें ? तुला काय झालें तेथें न जायला ?

याज्ञवल्क्य :—नाहीं, गुरुजी मी तेथें जाऊं इच्छित नाहीं. मला तेथें जाणें इष्ट वाटत नाहीं.

शाकल्य :—कां, मुला असं कां म्हणतोस ? अन् असं म्हणून कसें चालेल ? तो राजा आहे. शिवाय आपला आश्रयदाता आहे. त्याची इच्छा मोडून कसं चालेल ?

याज्ञवल्क्य :—गुरुजी, स्पष्टच सांगूं आपल्याला. आपण रागावूं नये. तो राजा मोठा द्वाड आहे, भ्रष्ट आहे. नष्ट आहे, पुनः सांगतों तो पापी व चांडाळहि आहे.

शाकल्य :—याज्ञवल्क्या असं कां म्हणतोस ?

याज्ञवल्क्य :—त्यानं माझा अपमान केला. एका हलकट स्त्री देखत माझा अपमान केला. तीर्थोदकानें मी त्यास अभिषेक करावयास गेलों असतां त्यानें माझा धिक्कार केला. अशा उर्मटाच्या घरीं पुनः मी पाऊलहि ठेवणार नाहीं. गुरुजी साफ सांगतों, तेथें मी जाणार नाहीं. कृपा करा, मला तेथें धाडूं नका. मी त्याचें तोंडहि पाहणार नाहीं (' नाहं तात गमिष्यामि शांत्यर्थं तस्य मंदिरे, अवलेपेन युक्तस्य श्रद्धाविरहितस्यच ' स्कंद. ६–१२९–३२).

हें वाक्य याज्ञवल्क्य इतक्या निर्धारानें बोलले कीं, त्यामुळें शाकल्य निरुत्तर झाले.

गुरुजीला आतां मोठी पंचाईत पडली. राजाचा शब्द मोडवेना आणि शिष्याला आतां जा म्हणवेना. मनुष्य एकदां अन्नाचा मिंधा झाला म्हणजे त्याचा विवेक बोथट होतो . गुरुजींचें तसेंच झालें. त्यांना शिष्याचें म्हणणें पटलें होतें. पण राजाची भीड मोडवत नव्हती. सुप्रियाचा उद्धट स्वभाव ते ओळखून होते. पण त्याचा आश्रमास मोठा आश्रय असल्यामुळें त्याला नाखूष करण्याचें धैर्य त्यांना होईना. शिवाय आपला शब्द आधींच गुंतून चुकला होता-मग आतां या पेंचांतून सुटायचें कसें? पुनः पुनः त्यांनीं

याज्ञवल्क्याचें मन वळविण्याचाच प्रयत्न केला. पण शिष्य म्हणजे काय, प्रत्यक्ष मेरूचा अवतार होता. एकदां 'ना' म्हटलें कीं, तें वज्रलेपच. प्रत्यक्ष ब्रह्मदेव आला तरी फिरावयाचें नाहीं. सत्त्वशील पुरुषांचा स्वभावच असा असतो कीं, एकदां तोंडांतून शब्द निघाले कीं त्याला मेरूचें रूप आलेंच. नाना परीनें सांगून पाहिलें, राजाचें भय घातलें आणि आपली सर्व पुण्याई खर्च केली, पण पालथ्या घागरीवर पाणी ओतल्यासारखें झालें. 'मी जाणार नाहीं.' हा त्याचा एकच हट्ट आणि शेवटीं तो त्यांनीं तडीसहि नेला. 'तुला जर आमचें ऐकावयाचें नसेल, तर आमच्या आश्रमांत राहूं नकोस.' असा शाकल्यांनीं त्यास स्पष्ट इशारा दिला. तरी मानी याज्ञवल्क्य डगमगले व डळमळले नाहींत. त्याच दिवशीं आश्रमाला त्यांनीं रामराम ठोकला. पण त्या भ्रष्ट राजाच्या दारीं पुनः पाऊल म्हणून त्यांनीं ठेवलें नाहीं. सत्याग्रह म्हणतात तो हा होय (स्कंद, ६-१२९- १ ते ५०).

याज्ञवल्क्यांना ही-जी अलौकिक मंत्रसिद्धि प्राप्त झाली होती, ती त्यांनीं उद्दालक आरुणीकडून प्राप्त करून घेतली होती. याजबद्दल बृहदारण्यकांत उपसद् व्रताचें निरूपण करतांना उल्लेख आढळतो तो असा—(' तं हैतमुद्दालक आरुणिर्वाजसनेपाय याज्ञवल्क्यायान्तेवासिन उक्त्वोवाचापि य एनं शुष्के स्थाणौ निषिञ्चेज्जायेरञ्छाखाः प्ररोहेयुः पलाशानीति ' बृ. ६–३–७). 'तो हा मंत्र उद्दालक आरुणि यांनीं आपला शिष्य जो वाजसनेय याज्ञवल्क्य यास सांगून म्हटलें कीं, हा मंत्र शुष्क खांबावर शिंपडला तर त्या खांबाला फांद्या फुटून त्याला पालवीहि फुटेल.' आणि याज्ञवल्क्यांना याचा प्रयोग सुप्रिय राजाच्या मंदिरांत करून पाहण्याची संधी मिळाली व त्याची त्यांना प्रचीतिहि आली.

योगाभ्यास

ही भारतभूमि वेद व अध्यात्म विद्येची जशी जन्मभूमि आहे तद्वत् योगविद्येचेंहि ती माहेरघर आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. प्राचीन काळीं ही योगविद्या या पुण्यभूमींत उत्कर्षाच्या अत्युच्च शिखरास जाऊन पोंचली होती, ही गोष्ट इतिहासावरून निर्विवाद सिद्ध होते. याज्ञवल्क्यांच्या काळीं महायोगीश्वर हिरण्यनाभ यांचा आश्रम या योगविद्येसाठीं मोठा प्रसिद्ध असून, तेथें अनेक विद्यार्थी योगाभ्यासासाठीं येऊन राहिले होते. त्यांत ब्राह्मणहि होते आणि क्षत्रियहि होते. त्या वेळीं भारतीयांच्या विद्यापीठांत ब्राह्मण-क्षत्रिय असले भेदभाव, जातीयता आणि आधुनिक संकुचित भेददृष्टिहि नव्हती. हेंच दुसऱ्या तऱ्हेनें सांगावयाचें म्हणजे, त्या वेळीं विद्याभ्यासांत आधुनिक अर्थाची जातीयता आड येत नव्हती. कांहीं क्षत्रियांनीं तर ब्राह्मणाइतकाच निरनिराळ्या विद्यांत उच्चांक गांठला होता. राजा जनक, राजा अश्वपति, राजा प्रतर्दन, राजा अजातशत्रु, राजा प्रवाहण, असे अनेक क्षत्रियपुंगव वेदविद्येंत, अध्यात्मविद्येंत आणि योगविद्येंत अत्यंत तरबेज झाले होते.

हिरण्यनाभ क्षत्रिय असून, प्रत्यक्ष इक्ष्वाकु कुलांत-श्री रामचंद्राच्या कुळांत त्यांनीं जन्म घेतला होता. या अवतारी पुरुषापासून ते सतरावे वंशज होते. ते विश्वसहाचे पुत्र असून (वायु. ८८-२०७) सुकर्माचेशिष्य होत (भागवत, १२-६-७७).सुकर्मा

हे व्यासशिष्य जैमिनीचे पणतू असल्यामुळें ते भारत कालांतले, अर्थात वैशंपायन, जनमेजय, उद्दालक, असित, देवल इत्यादिकांच्या समकालीन ठरतात. मिथिलेचे सुप्रसिद्ध जनक राजे हे या हिरण्यनाभाचे शिष्य असून जनक वंशांतले ते शेवटचे राजे होत. म्हणजे जनकवंशाची पिढी येथें परिसमाप्त होते. (विष्णु. पु. ४–६–१२)

प्राचीन काळीं योगविद्येला अत्यंत महत्त्वाचें व बहुमानाचें स्थान होते. कारण ही विद्या वेदविद्येसारखीच श्रेष्ठ व प्रभावसंपन्न असून ऋषिपद प्राप्त करून घेण्याला या विद्येसारखें अन्य साधन नव्हतें. या विद्येचा प्रभावच असा विलक्षण आहे कीं, थोर विभूति होण्याला व म्हणवून घेण्याला ही योगविद्याच मूळ कारणीभूत आहे. चंचल चित्त एकाग्र होणें योगाशिवाय शक्य नाहीं. एकाग्र चित्ताशिवाय आत्मज्ञान प्रभावी होणें दुष्कर असून आत्मज्ञानाशिवाय मानवजन्म सफल झाला असें म्हणता यावयाचें नाहीं. अर्थात् हें पूर्णत्व येण्यास योगसाधनाची अत्यंत जरुरी आहे.

आम्ही असें कां म्हणतों, ह्याची योगविद्येचा महिमा कळल्याशिवाय वाचकांना यथार्थ कल्पना येण्यासारखी नाहीं. म्हणून त्या विद्येचा प्रभाव काय आहे हें येथें थोडक्यांत सांगणें आम्हांस इष्ट वाटतें. या योगाचा महिमा योगतत्त्वोपनिषदांत वर्णिला आहे तो असा :- 'यथा वा चित्तसामर्थ्यं जायते योगिनां ध्रुवम् । दूरश्रुतिर्दूरदृष्टिः क्षणाद्दूरागमस्तथा ॥ वाक्सिद्धिः कामरूपत्वमदृश्यकरणी तथा । मलमूत्रप्रलेपेन लोहादेः सुवर्णता भवेत् ॥ खेगतिस्तस्य जायेत संतताभ्यास योगतः । सदा बुद्धिमता भाव्यं योगिना योगसिद्धये ॥ भावार्थः– योग्याचें चित्तसामर्थ्य जसजसें दृढ होत जाईल, तसतशी त्याला वाक्सिद्धि–म्हणजे तो बोलेल तसें होणें– लाभत जाते. त्याला दूरचें ऐकूं येतें व लांबचें दिसूं लागतें. क्षणांत लांबून येता येते. त्याला वाटेल ते रूप धारण करतां येतें. दृष्टीला न दिसणारे असे सूक्ष्म व स्थूल चमत्कार करतां येतात. मलमूत्राचें लेपन करून तो त्याचें सुवर्ण बनवूं शकतो व आकाशांत

संचार करण्यास समर्थ होतो. या व असल्या अनेक दिव्य शक्ति त्याला योगसाधनापासून प्राप्त होत असून तो मनुष्यांतला जवळ जवळ देवच बनून जातो.

अशा प्रकारची दिव्यशक्ति— ही योगविद्या— प्राप्त करून घेण्यासाठीं याज्ञवल्क्य आतां या हिरण्यनाभाच्या आश्रमांत येऊन राहिले होते. विद्येची ज्याला तहान आहे व खरी आवड आहे, तो तत्प्राप्त्यर्थ सुखसर्वस्वावर— चैन व हौसेवर पाणी सोडण्यास व कसलेहि कष्ट व हाल सोसण्यास एका पायावर तयार असतो. तेव्हां काय नि आता काय जातिवंत विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष असाच प्रकार दृष्टोत्पत्तीस येतो. 'विद्यातुराणां न सुखं न निद्रा। कामातुराणां न भयं न लज्जा ॥' ही सुभाषोक्ति त्रिकाल खरी आहे. याज्ञवल्क्यांची प्रकृति खऱ्या विद्यार्थ्यांच्या मालिकेंत मोडत होती हें उघड सांगणें नकोच. या योगाश्रमांत राहून रात्रंदिवस खपून ती कष्टसाध्य योगविद्या थोडक्याच वेळांत त्यांनीं हस्तगत करून घेतली. नंतर तेथून निघून यजुर्वेदाचें आध्वर्यवज्ञान करून घेण्यासाठीं पुनः ते मामाच्या म्हणजे वैशंपायनाच्या आश्रमांत आले.

यावेळीं याज्ञवल्क्य भर ज्वानीत— ऐन पंचवीसाच्या घरांत— आरते परते होते. त्यांचें विद्यातेजहि तसेंच मोठें प्रखर होतें. अग्नीप्रमाणें त्यांच्या मुखावर ज्ञानकांति विलसत होती. त्या सबंध आश्रमांत त्यांच्यासारखा ज्ञानसंपन्न विद्यार्थी क्वचितच होता. त्यांचें ते ज्ञानवैभव पाहून जो तो विद्यार्थी त्यांच्यापुढें कौतुकपूर्वक प्रेमादरानें नम्र होई. तेथील विद्यार्थीजगांत त्याचा बोलबाला दिवसेंदिवस वाढत चालला. वेदविद्या, मंत्रशास्त्र, योगविद्या यांत त्यांचा हात धरणारा त्या सबंध आश्रमांत कोणीच नव्हता. ते स्वभावानें सरळ, आचरणानें शुद्ध व मनानें उदार असे असल्यामुळें लवकरच आश्रमांतील शिष्यगणांत प्रमुख व मोठे शिष्यनायक होऊन बसले असल्यास त्यांत आश्चर्य तरी काय?

धर्म म्हणतां कर्म

व्यवहारांत मोठीं माणसेंहि चुकतात. कोण केव्हां नि कसा घसरेल, याचा नेम नसतो. वैशंपायन ऋषी म्हणजे मोठी विभूति. पण ते सुद्धां एका प्रसंगांत घसरलेच. तो प्रसंग पुढीलप्रमाणें होता. एकदां सर्व ऋषींनीं मिळून कांहीं कार्यानिमित्त न चुकतां एके ठिकाणीं जमण्याचें ठरविलें होतें. जो कोणी ठरलेल्या वेळीं हजर राहण्यास चुकेल त्यास ब्रह्महत्येचें पातक लागेल, असेंहि शासन प्रगट केलें होतें (वायु. ६१–१४). पुढें तो दिवस उजाडला. आणि नेमलेल्या वेळीं सर्व ऋषी संकेताप्रमाणें उपस्थित झाले. पण वैशंपायन मात्र हजर राहूं शकले नाहींत. अर्थात् त्यांनीं नियम मोडल्यामुळें त्यांना ब्रह्महत्येचा दोष लागला.

एवढ्यावरच ही आपत्ति संपली नाहीं. पुढें कर्मधर्मसंयोगानें त्यांना बालहत्येंचेहि पातक लागलें. एके दिवशीं ते पहांटेस उठून स्नान करण्याकरतां म्हणून नदीवर जावयास निघाले होते. पण या गडबडींत घरांत एका कोपऱ्यांत त्यांच्या बहिणीचें एक लहान मूल निजलें होतें. त्यांच्या अंगावर चुकून त्यांचा पाय पडला आणि तें मूल दुर्दैवानें गतप्राण झालें ('स्वस्त्रीयं बालकं सोऽथ पदा स्पृष्टमघातयत् ।' विष्णु, ३–५–५). ब्रह्महत्या व बालहत्या या जोड महापातकांतून मुक्त होण्याकरतां म्हणून प्रायश्चित्त घेणें त्यांना ओघानेंच प्राप्त झालें. यासाठीं त्यांनीं आपल्या शिष्यवृंदास जवळ बोलावून घेऊन, त्यांना घडलेली हकीकत कळविली नि आपणाकरतां प्रायश्चित्त आचरण्यास सांगितलें. या शिष्यगणांत याज्ञवल्क्यहि होते.

वैदिककाळीं प्रायश्चित घेणें म्हणजे तीर्थयात्रा करीत करीत देशसंचार करावा लागे. या पद्धतीला अनुसरून प्रायश्चित्त घेणारा परशुराम हा कार्तवीर्यास ठार मारल्यावर तद्दोषनिवारणार्थ म्हणून तीर्थयात्रा करीत हिंडत होता, त्याच वेळीं अर्जुन हा धर्म–द्रौपदीचा एकान्त पाहून लागलेल्या दोषपरिहारार्थ तीर्थयात्रा करीत हिंडत होता, ही गोष्ट ' रुचती कां तीर्थयात्रा या समयीं त्यास ती ' या सुभद्रेच्या पदानें महाराष्ट्रास महशूर आहेच. बलदेवानें रोम-हर्षणसूतास ठार मारलें म्हणून तत्पापक्षालनार्थ तो कांहीं दिवस तीर्थयात्रा करीत होता. सारांश, कोणत्याहि पापाबद्दल प्राय-श्चित घ्यावयाचें झाल्यास तीर्थयात्रेच्या द्वारा घेण्याचा तेव्हांचा परिपाठ होता.

या वेळीं याज्ञवल्क्य हे तरुण, मोठे सशक्त व सुदृढ होते. ते बुद्धीनें तीक्ष्ण, मनानें उदार, स्वभावानें सरळ व आचरणानें पवित्र असून, जरा उतावीळ वृत्तीचे होते. विद्या व धाडस यांत त्यांचा हात धरणारा तेथें दुसरा कोणीहि नव्हता. त्यांचा उत्साह म्हणजे भारी दांडगा आणि कामाची हौस तर मोठी विलक्षण होती. कसलेंहि अवघड काम असो; तें अंगावर घेऊन पार पाडून दाखविण्याचा त्यांचा बाणा होता. ते स्वतःला वैशंपाय-नाचा मोठा आवडता शिष्यहि समजत.

वैशंपायन ऋषींच्या प्रायश्चित्ताबद्दलचें भाषण ऐकून गुरु-भक्तिपरायण याज्ञवल्क्याचें अंतःकरण कळवळलें व विरघळलें. इतर शिष्यांच्या उत्तराची वाट न पाहतां ते एकदम पुढें होऊन म्हणाले, " गुरुदेवा, मीच एकटा तें तुमचें सर्व प्रायश्चित्त घेतों (' भगवन् अहमेकः करिष्यामि ' वायु, पुराण,). उगीच इत-रांना त्रास व दगदग हवी कशाला ? ते इथेंच राहोत (' तिष्ठंतु

मुनयस्त्वमे ' वायु पु.). असें म्हणून गुरुजींची आज्ञा मिळण्यासाठीं ते त्यांच्याकडे मोठ्या उल्हसित नेत्रांनीं पाहात उभे राहिले.

त्यांचें भाषण अगदीं सरळ व सच्छिष्याला पूर्ण शोभण्यासारखें होतें. त्यांत वावगें असें कांहीं नव्हतें. पण दुर्दैवानें गुरुजींस मात्र तसें वाटलें नाहीं. इतर शिष्यांना तुच्छ मानून, याज्ञवल्क्य आपली प्रौढी मिरवूं पाहतो असा त्यांनीं आपला ग्रह करून घेतला. त्यांना तो त्याचा उद्दामपणा वाटला. या त्यांच्या विपरीत समजुतीमुळें ते त्यांच्या मनांतून पूर्णपणें उतरले. त्यामुळें त्यांच्या बुद्धीचा तोल सुटला; भिवया वर चढल्या, डोळे गरगर फिरूं लागले आणि क्रोधानें सर्वांग पेटलें आणि ' अरे गर्विष्ठा याज्ञवल्क्या, केवढा रे तूं उन्मत्त झालास? तुझ्या विद्येची व तुझ्या सामर्थ्याची तुला फार घमेंड दिसते. आणि म्हणून तूं इतरांस टाकून बोलतोस. अरे ज्या विद्येनें तूं एवढा चढेल झालास आणि इतरांना तुच्छ मानतोस ती माझी विद्या मला परत दे, (' यत्त्वयाधीतं सर्वं प्रत्यर्पयस्व मे' वायु. पुराण). जा कोठेंतरी एकदाचें काळें करून व पुनः मला तुझें दर्शनहि देऊं नको (विष्णु पु. अं. ३, अ. ५, श्लो. ८ व ९).

निरपराधी याज्ञवल्क्यावर हा जणुं विद्युत्पातच झाला. त्यांच्या अंतःकरणावर धगधगीत अग्निवृष्टि झाली. तीक्ष्ण वाग्बाणानें निष्पाप काळजाचा ठाव घेऊन त्यांच्या उत्साहावर निराशेचें विरजण पडलें. अमानुष शिक्षेचा अगदीं कडेलोट झाला. त्यानें याज्ञवल्क्यांचा तो तेजस्वी चेहरा खरकन् उतरला आणि तोंड गोरेंमोरें झालें. केवढा अनर्थ, केवढी शिक्षा, केवढा अपमान? धर्म म्हणतां कर्म त्यांच्यापुढें दत्त म्हणून उभें राहिलें. दैव फिरलें आणि अमृताचें विष बनलें.

कौतुक करावयाचें तेथें सूड, बक्षीस द्यावयाचें तेथें दंड, धन्यता मानावयाची तेथें संताप, आणि आशीर्वाद द्यावयाचा तेथें भयंकर शाप मिळावा अशी त्यांची स्थिति झाली. गुरुसेवेंत तत्पर असणारा हा शिष्य सत्त्वशील नि उदार होता (शिष्यः परमधर्मज्ञो गुरुवृत्तिपरः सदा, विष्णु, ३–५–३). याज्ञवल्क्य हे धर्मज्ञ वैशंपायन ऋषींचेच प्रभावी भाचेहि होते. थोरामोठ्या विद्वानांची बुद्धीदेखील केव्हां केव्हां चळते नि भ्रम पावते असें म्हणतात, त्याचीं येथें प्रचीति आली. वास्तविक यांत संतापण्यासारखें कांहीं नव्हतें. याज्ञवल्क्यांचें तें भाषण वस्तुतः सरळ व भक्तियुक्त अंतःकरणांतून सहज बाहेर पडलें होतें. ' गुरुजी, ' आपल्यावरील भक्तीमुळें मी तसें बोलून गेलों (' भक्त्यैतत्ते मयोदितम् ' विष्णु, ३-५-१०), असें तेथल्या तेथेंच त्यांनीं बोलूनहि दाखविलें. तरी वैशंपायनांचें समाधान झालें नाहीं व त्यांची समजूतहि पटली नाहीं. आपल्या सरळ भाषणाचा असा विपरीत परिणाम होऊन एकदम भडका उडेल, हें याज्ञवल्क्यांच्या स्वप्नांतहि नव्हतें. कोणाला टोंचावें अगर दुखवावें असा त्यांचा मुळींच उद्देश नव्हता. अथवा गुरुजी त्याचा असा विपरीत अर्थ करतील, ही कल्पनाहि त्यांना शिवली देखील नव्हती. कोणतीहि गोष्ट पुढें पुढें होऊन धडाडीनें करण्याची हौस मात्र त्यांच्यांत फार मोठी होती. इतरांना टाकून बोलून आपली नुसती प्रौढी मिरवावी असा त्यांचा मुळींच उद्देश नव्हता. आपण एकटेच तें प्रायश्चित्त घेऊन गुरुजींस दोषमुक्त करून टाकूं, एवढीच त्यांची प्रामाणिक सदिच्छा होती. पण वैशंपायनांचा ग्रह झाला तो भलताच आणि रागाच्या आवेशांत ते बोलून गेले तेंहि पण भलतेंच बोलले.

याज्ञवल्क्य जात्याच फार मानी होते. वैशंपायनांची आज्ञा

म्हणजे सत्याचा व सद्भावनेचा अपमान आणि सदयतेचा खून होता. याज्ञवल्क्यांना तें मुळींच खपलें नाहीं. आपला कसलाच अपराध नसतां, अथवा असला तरी सुताचें भूत करून फर्मावलेली शिक्षा अपराधाच्या मानानें अत्यंत कडक व पूर्ण अन्यायाची आहे, असें समजून आणि कसेंहि झालें तरी गुरूची आज्ञा शिरसावंद्य मानणें हें शिष्याचें परम कर्तव्य आहे हें लक्षांत घेऊन त्यांनीं आपले डोळे मिटले आणि आपलें सर्व योगसामर्थ्य एकवटून वैशंपायनाकडून जेवढी म्हणून विद्या ग्रहण केली होती, तेवढी सर्व अक्षरन् अक्षर खडाखड म्हणून भडाभड ओकून टाकून दिली. आणि क्षणाचाहि विलंब न करतां धाडधाड पाय आपटीत ते तेथून हां हां म्हणतां वाऱ्याप्रमाणें निघून गेले. ते गेल्यानें (विष्णु. ३–५–११) सूर्याचा अस्त झाला आणि आश्रमावर स्मशानवत् छाया पसरली !

हा सर्व अकल्पित प्रकार पाहून तेथील सर्व मंडळी आश्चर्यानें थक्क झाली. शरीरांतून प्राण जसा निघून जावा, अथवा राजवाड्यांतून राजलक्ष्मीनें पाय काढावा, त्याप्रमाणें याज्ञवल्क्य त्या पुण्य आश्रमांतून विजेप्रमाणें क्षणार्धात अदृश्य झाला. वैशंपायन झाले तरी काय, रागाच्या भरांत नि विकाराच्या आवेशांत कांहीं तरी ते बोलून गेले होते. त्याचा असा विलक्षण व विपरीत परिणाम होईल, हें त्यांच्यासुद्धां स्वप्नांत नव्हतें. पण आतां करणार काय ? झाली ती गोष्ट होऊन गेली. याज्ञवल्क्य मात्र तेथून जे गेले ते पुनः कांहीं तिकडे फिरकले नाहींत.

याज्ञवल्क्यांनीं म्हणून तोंडावाटे बाहेर टाकलेली विद्या तेथें जमलेल्या शिष्यांना वैशंपायनांनीं ग्रहण करण्यास व जतन करण्यास सांगितल्यावरून, तित्तिरि नांवाच्या शिष्यांनीं तिचा

स्वीकार केला. याचा अर्थ असा कीं, याज्ञवल्क्यांनीं ज्या क्रमानें ती यजुर्विद्या बाहेर टाकिली, त्याच क्रमानें तित्तिरि या शिष्यांनीं ती ग्रहण केली. अर्थात् तो यजुर्वेद एकदां सर्वच्या सर्व म्हणून खलास केल्यावर याज्ञवल्क्यांनीं पुनः त्या वेदाचा आजन्म त्या क्रमांत व त्या स्वरांत पुनरुच्चार म्हणून केला नाहीं. त्यास त्याज्य मानलें. ही याज्ञवल्क्य यांनीं ओकून टाकलेली विद्या शिळी म्हणजे मलिन झाली असल्यामुळें तिला पुढें 'कृष्णयजुः' अशी संज्ञा प्राप्त झाली. पुढें वैशंपायनाकरतां जे शिष्य प्रायश्चित्त घ्यावयास म्हणून तीर्थयात्रेस निघाले, त्यास 'चरक' हें टोपण नांव प्राप्त झालें. म्हणून वैशंपायनांच्या शिष्यांत 'तैत्तिरीय' व 'चरक' असे मुख्य दोन भेद झाले आहेत (विष्णु. पु. अं. ३, अ. ५, १२, १३).

खग्रास ग्रहण

याज्ञवल्क्यांनीं वैशंपायनांस विद्या अर्पण करून ते तेथून निघून गेले. नि आतां ते स्वाभाविकपणें निर्विद्य निस्तेज झाले होते. म्हणूनच त्यांच्या उच्च आकांक्षेची राखरांगोळी झालेली होती आणि सगळ्या उदात्त भावना करपून गेलेल्या होत्या. त्यांच्या कोमल काळजाच्या चिंधड्या चिंधड्या उडाल्या असून सर्व जीवितहि निराशेच्या गाढ अंधःकारांत गडप झालें होतें. त्यांच्यावर दारुण आपत्ति निरपराधी असतांहि आल्यानें घरीं बसून त्यांना चैन पडेना व बाहेर जाऊन लोकांना तोंड दाखवितां येईना, अशी त्यांची कुचंबणा झालेली होती. त्यांच्या दुःखाला व मनस्तापाला आतां सीमा राहिली नव्हती. पंख तोडलेला पक्षी जसा जागच्या जागींच तडफडत असतो, मातृहीन झालेलें बालक जसें मनांतल्या मनांतच झुरत असतें, तशीच दुःखावस्था त्यांना प्राप्त झाली होती. त्यांच्या सर्व आशा, आकांक्षा, भावना, उल्हास नि उत्साह हीं सर्व पार होरपळून जाऊन, भविष्यकाळ निराशेच्या गहन व संपूर्ण अंधःकारांत गुरफटून गेला होता.

अशा निर्विद्य स्थितींत राहून कुत्र्या-मांजराप्रमाणें नीरस आयुष्य कंठण्यापेक्षां मेलेलें काय वाईट असें त्यांना वाटलें. तेजस्वी पुरुषांना दैन्यावस्थेंतील जीवन म्हणजे नरकापेक्षांहि अधिक असह्य वाटूं लागतें. याज्ञवल्क्यांना तर तें तसें खात्रीनें वाटलें. त्यांच्यावर आतां आकाशच कोसळलें होतें.

कोठे जावें आणि काय करावें असा प्रश्न त्यांच्यापुढें येऊन पडला. ती यजुर्विद्या व ती कामधेनु आतां पुन: कधीं तरी आपल्यास लाभेल काय हीच रात्रंदिवस विवंचना, हेंच ध्यान नि हाच हृद्रोग त्यांना लागला. कोण गुरु आतां आपणांस भेटेल नि कोण आपले मनोरथ पुरवील, याशिवाय दुसरा विचारच त्यांना शिवेना. अध्वर्यु म्हणून मिरविण्याची त्यांना केवढी हौस होती. पण ती आशा आतां राहिली नाही. भविष्यकाळचीं सुखस्वप्नें आतां त्यांच्या डोळयांपुढून सपशेल पुसून काढल्यासारखींच होतीं.

मात्र त्यांनीं निर्धार केला कीं, आतां पुन: गुरु करावयाचा तो सहसा मानवी म्हणून करावयाचा नाहीं. एक वेळ निर्विद्य राहिलेलें पुरवलें, पण चंचल मानवी गुरु नको. न जाणो, मानवी गुरु केला, विद्या सगळी संपादन केली आणि गुरुपणाचा हक्क गाजवून त्यानें पुन: वैशंपायनाप्रमाणेंच केलें तर काय करावें ? पुन: हीच रड होणार ना ? दिलेलें दान परत घेऊं नये असें शास्त्र सांगतें. पण वैशंपायनांनीं हा नियम पाळला नाहीं. विकाराच्या वावटळींत सांपडलेली मानवबुद्धि - ती कितीहि सुसंस्कृत व विचारवंत असो केव्हां कशी चळेल आणि झुकांडया मारील, याचा कांहींच नेम नसल्यामुळें आतां चंचल मानवी गुरूवरचा त्यांचा विश्वास अजिबात उडाला होता. ' सत्यं देवा, अनृतं मनुष्या: ' असे जे त्यांच्या तोंडून पुढें शतपथांत उद्गार निघाले आहेत, त्याच्या बुडाशीं हा मानवी चंचलपणा व धरसोडीपणाच असावा अशी आमची समजूत आहे.

याज्ञवल्क्य आतां मोठया संकटांत पडले. रात्रंदिवस ना चैन ना झोंप; कांहीं सुचेना कीं धड उमजेना. पुढें काय, हीच एक विवंचना त्यांच्यापुढें होती. जसजसे दिवस जाऊं

लागले तसतसे त्यांची मनःस्थिति वेड्यासारखी होत चालली. मूल हरवलेलें पाहून मातेचें अंतःकरण जसें रात्रंदिवस हुरहुरत असतें, हातांतील पैसा गेला म्हणजे कवडीचुंबक जसा चडफडत असतो, प्रेमळ पतीच्या दुःसह वियोगानें पतिव्रता जशी झुरणीस लागते, तद्वत् हें यजुर्विद्याधन हरवून बसल्यामुळे आणि चारचौघांत अप्रतिष्ठा पावल्यामुळें याज्ञवल्क्याची देखील अत्यंत शोचनीय अवस्था झाली होती.

अरण्यांत

काहीं झालें तरी सिंह तो सिंहच ! अन्नावांचून मरणास टेकला तरी तो गवत खाईल असें थोडेंच आहे ? याज्ञवल्क्य झाले तरी मनुष्यांतले प्रतिसिंहच होते. जात्याच मोठे तेजस्वी, धाडसी नि साहसीहि होते. निराशेचा बुरखा त्यांनीं चट्‌दिशीं झुगारून दिला. सारें मनोदौर्बल्य चटकन झाडून टाकलें. विषादबुद्धीला मूठमाती दिली. त्यामुळें त्यांचें अंतस्थ चैतन्य आतां खडबडून जागृत झालें आणि मन नवोल्हासानें स्फूरूं लागलें. या गांवांत राहून दिवस कंठणें म्हणजे व्यर्थ आयुष्याचा अपव्यय करणें अशी त्यांच्या मनाची पक्की खात्री होऊन त्यांनीं घरांतून पाय काढण्याचा निश्चय केला नि तडक अरण्याचा रस्ता धरला. पूर्वीप्रमाणें सुविद्य व सुबुद्ध झाल्याशिवाय पुन: घराचें नांवहि घ्यावयाचें नाहीं व कोणाचें तोंडहि पाहावयाचें नाहीं, अशी त्यांनीं भीष्म-प्रतिज्ञा केली.

ज्ञानोपासकाला–देवोपासकाला–अरण्यासारखें विद्यापीठ या भूतलावर इतरत्र कोठेंच नाहीं. सत्य व श्रेष्ठ ज्ञान करून देणारें सर्वोत्तम विद्यापीठ जर कोठें असेल तर तें एकान्त व निर्जन अरण्यच होय. सामान्य माणसाला तें भेडसावणारें असलें तरी जे ज्ञानोपासक आहेत, जे सत्य शोधण्याच्या मार्गास लागले आहेत, ज्यांना सृष्टि-देवतेचें हृद्‌गत जाणावयाचें आहे, अगर ज्यांना विश्वाची बीजशक्ति शोधून काढावयाची आहे, अशा सर्व महापुरुषांनीं आपली तपोभूमि–ज्ञानतीर्थ–म्हणून अरण्यच

पसंत केलें आहे. विश्वामित्रानें ब्रह्मत्व प्राप्त करून घेतलें तें अरण्यांतच. शुकांनीं तपश्चर्या केली ती अरण्यांतच. भगवान गौतमबुद्धांनीं संबोधि प्राप्त करून घेतली ती अरण्यांतच. ध्रुव बाळानें विष्णूला प्रसन्न करून घेतलें तें अरण्यांतच. ज्ञानेश्वर, रामदास इत्यादि साऱ्या साधुसंतांनीं दिव्य ज्ञान-प्राप्त्यर्थ एकान्तवास पत्करला तो अरण्यांतच. प्राचीन वैदिक ऋषींचे प्रसिद्ध व पवित्र आश्रम थाटले होते, ते सर्व अरण्यांतील पुण्यभूमींतच. अर्थात् अरण्य म्हणजे ज्ञानोपासकांची प्रत्यक्ष कामधेनु व देवभक्तांचा मंगल कल्पवृक्ष होय. तेथें जाऊन व राहून ज्ञानोपासकांनीं, देवभक्तांनीं व साधुसंतांनीं आपणांस काय हवें होतें तें सर्व पदरांत घेऊन आपला मानवजन्म धन्य व कृतकृत्य केला व जगाला ज्ञानदीप देऊन व श्रेष्ठ कल्याणमार्ग दाखवून ते इतिहासांत अजरामर होऊन राहिले.

याचें कारण असें कीं, हें अरण्यांतील पुण्य व पवित्र स्थान स्वार्थी व लोभी मनुष्याच्या प्रापंचिक खळबळी व दगदगीपासून स्वार्थ व चुरस यांच्या नित्य स्पर्धेपासून अगदीं अलिप्त असतें. येथें नितांत शांतता व गंभीर स्तब्धता अखंड नांदत असून, नयनकुशल सृष्टिदेवतेचें रमणीय सौंदर्य सर्वत्र खुलून व मोहरून राहिलेलें असतें. शिवाय मंगल देव-देवतांचा व गंधर्व किन्नरांचा शुभप्रद संचार व विहार येथें गुप्त पण अविरत चालू असतो. शिवाय विश्वात्म्यांची गूढ व सूक्ष्म शक्ति अज्ञ व अल्प अशा जिज्ञासू जीवात्म्याशीं हितगुज करण्यास व त्यास दिव्यज्ञान व अद्‌भुत सामर्थ्य देऊन व उच्च आणि उदात्त मार्ग दाखवून सामान्य जनतेचा त्यास ज्ञानदेव बनविण्यास सदैव तत्पर असते.

अरण्यवास म्हणजे खरोखर या मृत्युलोकांतील प्रत्यक्ष

स्वर्गवासच होय. शुद्ध व स्वच्छ हवा, पवित्र व शांत वातावरण, मधुर व निर्मल उदक, निरभ्र व स्वच्छ आकाश, पिठासारखे चांदणें, तेजस्वी तारा-मंडळ, गगनचुंबित वृक्षराजि, फलपुष्पादिकांनीं नटलेल्या झाडवेली, कोमल फुलांशीं मधुर क्रीडा करणारीं सुंदर फुलपांखरें, झाडांवर बसून मंजुळ कूजन करणारे विविध पक्षी-गण, एकीकडे गगनचुंबित उंच पर्वत तर एकीकडे पाताळाला जाऊन भिडलेल्या खोल दऱ्यांशिवाय या सर्वांना निर्माण कर-णाऱ्या त्या दिव्य कलावंताचें–जगत्कर्त्याचें–अगाध सामर्थ्य, अनुपम कौशल्य, अपार चातुर्य, अचिंत्य ऐश्वर्य इत्यादि मनाला मोहविणारें, अंतःकरणाला खुलविणारें व बुद्धीला उजळविणारें असें तें अपूर्व सौंदर्य व आश्चर्यकारक रचनाचातुर्य पाहून, मनु-ष्याच्या अंतरंगांत स्फुरणारी आत्मज्योत आनंदानें फुलून नागा-प्रमाणें डोलते.

आतां त्या जगत्कर्त्या परमेश्वराची मंगलमूर्ति मनुष्याच्या चर्मचक्षूला प्रत्यक्ष दिसत नसली, तरी या विश्वघडणेंत प्रतीत होणारें त्याचें विशाल स्वरूप, अगाध सामर्थ्य, अपार चातुर्य, अनुपम कौशल्य, अलौकिक सौंदर्य, दिव्य रचना, अगाध योजना, अपरमित बुद्धिमत्ता व अढळ व्यवस्था इत्यादि विस्मयकारक गोष्टींचा तीक्ष्ण व जिज्ञासु बुद्धीला मंगल साक्षात्कार होतो. साखरेची गोडी तोंडानें सांगून जशी समजणार नाही तद्वत् त्या अनंत कोटि-ब्रह्मांडनायकाचें वास्तव स्वरूप लेखणीनें लिहून अगर वाणीनें बोलून कळवितां येणार नाहीं. तें ज्याचे त्यानें आपल्या बुद्धीच्या जोरावरच अजमावून घेतलें पाहिजे. त्याशिवाय तें समजण्यास दुसरा मार्ग नाहीं.

प्रपंचांत रंगलेल्या या विषयमूढ व सुखलोलुप मानवाला

ते सूक्ष्म व दिव्य ज्ञान गहन व अचिंत्य असले, तरी तेंच अरण्य-वासी तपोनिष्ठ, ज्ञानोपासकांना व ऋषीमुनींना योगावस्थेंत सहज स्फुरतें असा ज्ञानी व तपस्वी लोकांचा अनुभव आहे तात्पर्य, परमेश्वरी ज्ञानप्राप्तीचे एकमेव मंगल व पवित्र क्षेत्र म्हणजेच विविध सृष्टि-सौंदर्यानें अखंड नटलेलें हें ज्ञानगर्भ अरण्य होय, प्रापंचिकाना ते भयप्रद व नीरस भासले तरी ज्ञानी लोकाना तो प्रत्यक्ष चिंतामणी व सुखमय स्वर्गवास वाटतो.

याज्ञवल्क्य आतां दिव्य व अपूर्व ज्ञान प्राप्त्यर्थ अरण्यात येऊन एकान्त स्थळी दाखल झाले. तेथें आल्यावर शांत, रम्य व सुरक्षित असे स्थान पाहून त्यांनीं तेथें आपली तपोभूमी केली. ते स्थान मोठें रम्य व प्रसन्न होते. सभोवती विविध प्रकारच्या वेली, फुलेंफळें आलेली झाडें, पशु-पक्षी, नदी-नालें, डोंगर-दरी इत्यादि सृष्टि देवतेचे सुंदर, अद्भूत, गंभीर, विशाल, विविध व विचित्र रूपलावण्य अफाट पसरलेले असून, तपश्चर्येस सर्व दृष्टीनीं तें स्थान अत्यंत मोइस्कर व श्रेयस्कर वाटलें. येथें आल्या वर त्यांच्या मनाला शांति लाभून, बुद्धीला स्थिरता आली. त्यांना एका नव्या जगांतच उतरल्याचा भास झाला, या नव्या तपो-भूमींतील प्रत्येक वस्तु त्यांना नवीन ज्ञान देणारी गुरुमाउलीच वाटली, झाडाच्या पानावर, फूलांच्या पाकळयावर पाखरांच्या पंखां-वर विलसणारी ती कलाकुसर, तसेंच पक्ष्यांच्या विविध जाति व रुपरंग, पर्वतांची उंचउंच शिखरें, खोलच खोल दऱ्या, गवतांचीं सूक्ष्म अग्रें, दंवाचे त्यावर चमकणारे शुभ्र मौक्तिक बिंदू, वर पसरलेलें तें निरभ्र नीलवर्ण व विशाल आकाश, रात्रीं चमकणारे ते विशाल तारा-मंडल, चंद्र-सूर्य, ग्रहनक्षत्रे, अर्थात जावे तेथें व पाहावे

तिकडे नवीन ज्ञान देणारे त्याला ते एकापरीं गुरुदेवच वाटले. सूर्याच्या किरणात, चंद्राच्या चांदण्यांत, नक्षत्रांच्या लुकलुकण्यात, वायूच्या लहरीत, विजेच्या कोरीत, मेघांच्या गर्जनेत, पावसाच्या सरीत, व सृष्टिदेवतेच्या विविध वस्तुजातांत गूढ चैतन्य-शक्तीचे गुप्त अस्तित्व, अपूर्व कौशल्य व अपार सामर्थ्य यांची त्यांस प्रचिति येऊन, त्याच्या जिज्ञासु बुद्धीवर ज्ञानाची मधुर कोर चमकून मनाला आनंदाची उसळी येऊं लागली. ज्ञानी मनुष्याच्या जागृत चित्तवृत्तीचा तो सहजस्वभावच आहे.

याज्ञवल्क्य अरण्यांत आल्यावर एक सुंदर व प्रशांत असे रम्य स्थान पाहून तेथें त्यांनी आपले प्रस्थान ठेवलें. ते पसंत केलेलें स्थान अरण्यांत मोडत असलें तरी सुखसोईच्या दृष्टीनें सोइस्कर असेच होतें. एका बाजूला उंच डोंगर, जवळच संथ वाहाणारा नदीचा निर्मळ प्रवाह, सभोंवार घनदाट वृक्षराजि, मधून मधून फुल-वेली, फळ-झाडें, होती. सराश, हें स्थान सर्व दृष्टींनी अनुकूल व सोईचे असेच होतें. येथें आल्यावर त्यांना मनस्वी समाधान झालें. त्यांचे त्रस्त मन आतां शांत झालें. भांबावलेली बुद्धी स्थिर झाली व दुखवलेला आत्मा प्रसन्न झाला.

अशा रीतीने याज्ञवल्क्य घरदार सोडून अरण्यांत आले, ते कांही मौजेखातर आले नव्हते. त्यांना वेदोपासना करून देवाला प्रसन्न करून घ्यावयाचे व नवीन विद्या मिळवावयाची होती. त्या उद्देशानेच ते तेथे आले होते. येथे आल्यावर बाकीची सर्व सिद्धता झाली. पण कोणत्या देवाला गुरुस्थानी मनावयाचे याचा विचार करणें प्राप्त झालें. जरूर ती विद्या देऊन आपलें मनोरथ पुरवील असा देव त्यांना हवा होता. इंद्राकडे धांव मारावी तर तो सामर्थ्य—

दाता, वरुणाकडे जावें तर तो न्यायमूर्ति असल्यामुळें आपल्याला हवें असलेलें साध्य मिळणार नाहीं. अश्विनी कुमारांना आळवावें तर ते फक्त वैद्यकीय शास्त्रांत निपुण, वेदविद्येंत त्यांना गति नाहीं. अग्नीला भजावें तर तो फक्त गृहपति, अशी वस्तुस्थिति असल्यानें कोणाला भजावें, कोणाची उपासना करावी, कोणाला शरण जावें, अशा विवंचनेंत ते पडून त्यांची बुद्धिहि गोंधळली.

अशा किंकर्तव्यमूढ स्थितींत कांहीं काल लोटल्यावर एके दिवशीं अशा अनिश्चित स्थितींतच सुदैवानें वर नभोमंडळांत देदीप्यमान तेजानें तळपत असलेले भगवान श्रीसूर्यनारायण सहज त्यांच्या दृष्टीस पडले. त्यामुळें त्यांचा संशयतिमिर पार वितळून गेला. या वेळीं त्यांना जो कांहीं आनंद झाला तो अनुभविल्याशिवाय कळणार नाहीं. कारण त्यांना ज्ञानदेवाचें मंगल दर्शन झालें आणि त्यांच्या डोळ्यांचें पारणें फिटलें गेलें. भक्ति-भावानें त्यांचें अंतःकरण उचंबळून येऊन त्या अखिल ब्रह्मांडनायक श्री सूर्य-नारायणावर त्यांची अनन्यसामान्य निष्ठा जडली. अर्थात् सूर्यनारायणास त्यांनीं आपला गुरुदेव केलें.

सूर्याराधना

भगवान् श्रीसूर्यनारायण म्हणजे इहलोकींचें साक्षात् दैवत आहे. इंद्र, वरुण, रुद्र, विष्णु हे सर्व देव आहेत खरे, पण ते कोणाला प्रत्यक्ष दिसत नाहींत. सूर्यनारायण सर्व प्राणिमात्रांना नित्य व प्रत्यक्ष दर्शन देणारा देव आहे. या भूमंडळावर सूर्यनारायणाचे जसे अखंड व अनंत उपकार आहेत, तसेच इतरांचे जरी असले तरी ते दिसून येत नाहींत. सूर्यनारायण आहे म्हणून जगाचे सर्व व्यवहार सुरळीत व सुसूत्र चालले आहेत. या विश्वकोशाला जी उष्णता व चैतन्य लाभलें आहे, तें त्याची कृपा म्हणूनच. ही प्राणिसृष्टि हंसत व डुलत आहे ती केवळ त्याच्या जिवावर! व उद्यां तो नाहींसा होऊं द्या, म्हणजे पाहा केवढा अनर्थ माजेल. तो जर पृथ्वीला सोडून गेला तर मग चोवीस तासांतच ही सुंदर पृथ्वी पार गारठून जाऊन, अखिल जीवसृष्टि जेथल्या तेथेंच कुडकुडून व आंखडून जाईल. एकहि प्राणी जिवंत असा सांपडावयाचा नाहीं. सूर्यनारायणाचा प्रभाव मोठा असून प्राणिमात्रावर त्याचे मोठे उपकार आहेत. जगांतील अस्सल नास्तिकांतील मोठा नास्तिक म्हणून मिरविणाऱ्या हेगलसारख्या पाश्चात्त्य शास्त्रज्ञाला देखील आधिभौतिक दृष्टीनेंच का होईना या अखिल कोटिब्रह्मांडनायकाचें देवत्व मान्य करणें अखेर भाग पडलें आहे. सूर्यदेवाचें हें अपूर्व वैभव व दिव्य प्रभाव पाहूनच सुज्ञ व भाविक वैदिक ऋषींनीं–त्याला ‘ त्वमेव प्रत्यक्षं विष्णुरसि, त्वमेव प्रत्यक्षं

ब्रह्मासि, त्वमेव प्रत्यक्षं रूद्रोऽसि ' अशा अर्थपूर्ण सुंदर स्तोत्रांनीं आळविलें आहे, तें अक्षरशः सत्य व शास्त्रशुद्ध आहे.

भारतीयांच्या दृष्टीनें सूर्यदेव म्हणजे प्रत्यक्ष ज्ञानदेव आहे. सर्व ज्ञानाचा सांठा त्याच्याजवळ असून, त्याजपासून मनुष्याला ज्ञानप्राप्ति होते व सत्कर्मप्रेरणा लाभते अशी वैदिक ऋषींची ठाम समजूत असून, ते नेहमीं त्याच्याजवळ सत्यज्ञान देण्याविषयीं त्याची प्रार्थना करीत असलेले दिसून येतात. आपणामध्यें ज्ञानतेज स्फुरविण्याबद्दल विश्वामित्रानें सूर्यदेवाची मोठ्या कळकळीनें प्रार्थना केली असून, ज्या मंत्रानें ती करण्यांत आली आहे तो मंत्र आज गायत्रीमंत्र म्हणून प्रसिद्ध आहे. त्या मंत्रानेंच आम्ही सर्व वैदिक आर्य आज देखील संध्योपासनेच्या वेळीं सूर्यनारायणाची ज्ञानदानार्थ नित्य प्रार्थना करीत असतों. सर्व प्राणि-मात्रांच्या हृदयांत राहून त्यांना कर्म करण्यास प्रेरणा करणारा म्हणून सूर्याला सविता हें नांव प्राप्त झालें आहे. प्रेरणा या शब्दांत 'गति' हा अर्थ गर्भित असून, 'सर्वे गत्यर्थाः ज्ञानार्थाः' या न्यायानें गतिवाचक शब्द हे ज्ञानाचे अर्थबोधक असतात असें समजण्यांत येतें. अतएव सूर्यदेवता ही वैदिकांची ज्ञानदेवता आहे असें गायत्रीमंत्रावरून स्पष्ट होतें. याज्ञवल्क्यांची देखील हीच भावना होती; म्हणून सूर्यदेवाचें दर्शन होतांच ती भावना खडबडून जागृत झाली. अर्थात् त्यांनीं त्या देवाला गुरुस्थानीं मानून त्याची एकनिष्ठ उपासना करण्याच्या ते उद्योगास लागले.

वैदिक लोकांची तपश्चर्येवर व देवोपासनेवर विलक्षण श्रद्धा असलेली दिसून येते. आजचें युग श्रद्धेचें नसल्यामुळें लोक थोडेफार उदासीन आहेत, ही गोष्ट निराळी. पण प्राचीन काळीं

ज्ञानी लोक झाले तरी मोठे श्रद्धावान् होते. वैदिक काळचा श्रद्धेचा अर्थ आज बरोबर ध्यानीं येत नाहीं, म्हणून श्रद्धेची टवाळी होते. पण हा समज आतां फार दिवस टिकणार नाहीं. 'श्रत्नाम सत्यं यस्यां धीयते सा श्रद्धा' 'सत्य ज्यामध्यें गर्भित आहे ती श्रद्धा' असा आम्हां वैदिकांचा श्रद्धा शब्दाचा अर्थ आहे. आणि या श्रद्धेच्या अंध नव्हे डोळस श्रद्धेच्या योगानेंच सत्यवस्तूचें ज्ञान होतें. 'श्रद्धया सत्यमाप्यते' असें शतपथांत स्पष्ट घोषित केलें असून, भगवान श्रीकृष्णानें त्याचाच अनुवाद 'श्रद्धावाँल्लभते ज्ञानम्' या सुप्रसिद्ध गीतावचनांत केलेला आहे.

तपश्चर्या ही वैदिकांची कामधेनु. तिच्या जोरावर भारतीयांनीं काय हवें तें मिळविलें. तपश्चर्या करून दरिद्री, राजे बनले; तपश्चर्या करून मूर्खांचे ज्ञानी झाले. तपश्चर्या करून क्षत्रियाचे ब्राह्मण बनले. तपश्चर्या करून नराचे नारायण झाले! अशी ही दिव्य कामधेनु वैदिक आर्यांनीं शोधून काढली आणि तिच्या साहाय्यानें त्यांनीं आपलें साध्य तडीस नेलें. 'तपसा वै लोकं जयति' 'तपाच्या योगानेंच मनुष्य दिव्य लोक प्राप्त करून घेतो' असें याज्ञवल्क्यांनीं पुढें शतपथांत नमूद करून ठेविलें आहे. तें प्रत्यक्ष आपल्या अनुभवाच्या जोरावरच केलें. याज्ञवल्क्याचें युग हें तपश्चर्येचें युग होतें. त्या वेळीं कांहीं अडलें अगर नडलें तर बसलेच मांडी घालून तपश्चर्येला! मग तेथें तहान नाहीं, भूक नाहीं, ऊन नाहीं, वारा नाहीं, थंडी नाहीं, पाऊस नाहीं, रात्र नाहीं, दिवस नाहीं, एकच ध्यान नि एकच व्रत. अरण्यवास आणि जवळ जवळ उपवास; खायला आहे तर आहे, नाहीं तर नाहीं, पांघरायला आहे तर आहे, आणि नाहीं तर नाहीं; पण या असल्या क्षुद्र बाह्य उपाधींकडे उपासकाचें मुळीं लक्षच नसतें. या

सर्व गोष्टी तो मोठ्या आनंदानें सहन करावयास तयार असतो. एवढेंच नव्हे तर त्यांतच तो आनंदहि मानतो. श्रम केल्याशिवाय, कष्ट सोसल्याशिवाय कोणालाच देव पावत नाहीं. 'नाश्रांतस्य सख्याय देवा: '- श्रमल्याशिवाय देवांचें सख्य लाभत नाहीं असें श्रुतिमाउलीनें स्पष्ट बोलून दाखविलें आहे. पाहा, श्रम करूनच, प्रजापतीनें ही सृष्टि निर्माण केली. तप करूनच देवांनीं स्वर्ग मिळविला आणि तपाच्या दिव्यांतून बाहेर पडूनच विश्वामित्र हा क्षत्रियाचा ब्राह्मण झाला आणि तप करून, श्रम करून, कोण काय झाले नाहींत? 'श्रमेण ह वै तद्देवा जयन्ति यदेषां जय्यमास'- तप व श्रम करूनच देवांनीं आपणास जें काय मिळवावयाचें होतें तें मिळवून घेतलें. अर्थात् ही तपश्चर्या म्हणजे वैदिकांची कामधेनु व प्रत्यक्ष कल्पवृक्ष आहे.

राजा जनमेजय

राजा जनमेजय म्हणजे भारतीय इतिहासांतील एक अत्यंत थोर व अविस्मरणीय असा प्रख्यात सम्राट् होय. त्याच्या कर्तृत्वा-मुळेंच जगाला भारताचा पराक्रम विश्रुत झाला, नि भारतीय इतिहासाला नवीन वळण लागलें. हा धनुर्धारी अर्जुनाचा पणतू असून पुण्यश्लोक परिक्षित राजाचा ज्येष्ठ पुत्र होय. तो मोठा सद्‌गुणी, शूर, पराक्रमी व सद्वर्तनी असून शत्रूचा कर्दनकाळ होता. क्षात्रतेजांत त्याला मागें हटवणारा असा क्षत्रिय भरत खंडांत त्या काळीं दुसरा कोणी झाला नव्हता. हा सम्राट् राज-धर्मात जसा निष्णात होता तसाच विद्येचाहि तो मोठा चाहता आश्रयदाता व पुरस्कर्ता होता.

परिक्षित राजाचा सर्पदंश होऊन शोचनीय दुःखद अन्त झाल्या-वर त्याच्या पश्चात् पांडवांच्या पुण्यश्लोक गादीवर विराजमान होऊन, जनमेजयानें हस्तिनापूरचा राजदंड हातांत धारण केला. त्या वेळीं बाप सर्पदंश होऊन मरण पावला, इतकेंच त्यास माहीत होतें. त्याच्या मागचा इतिहास त्यास ठाऊक नव्हता. पुढें कांहीं दिवसांनीं त्याच्या मंत्र्याकडून तो त्यास कळला. परिक्षित राजा एकदां मृगया करावयास म्हणून अरण्यांत गेला असतां एका हर-णाला बाण मारून त्यास त्यानें घायाळ केलें. पण तें हरिण तेथून तसेंच निसटून गेलें. राजा त्याच्या शोधार्थ निघाला असतां वाटेंत त्यांस शमीक मुनी दिसले. ते त्या वेळीं ध्यानस्थ असल्यामुळें त्यांना बाहेरच्या जगाचें कांहींच भान नव्हतें. राजा त्यांच्या जवळ जाऊन हरिण कोठें गेलें असें विचारतां त्या मुनीनें

त्यास कांहींच उत्तर दिलें नाहीं. पुन: त्यानें त्यास तोच प्रश्न विचारला. तरी ते मुग्धच ! डोळे वर करून शमीकांनीं त्या राजाकडे पाहिलें नाहीं, कीं तोंड उघडून त्यास सरळ उत्तर दिलें नाहीं. त्या मुनीची ही बेमुर्वतखोर वृत्ति पाहून राजा जरा चिडला, व जवळच एक साप मरून पडला होता, तो हळूच धनुष्याच्या टोकानें उचलून, त्या शमीकाच्या गळ्यांत अडकवून स्वारी तेथून निघून पुढें चालती झाली (भारत. आदि. ४०).

ही हकीकत नंतर शमीकाच्या मुलास म्हणजे श्रृंगीस कळली. हे श्रृंगी म्हणजे मोठे कडक तपस्वी होते. तसेच तेजस्वी व सत्त्वसंपन्न होते. शमीक जितके शांत तितके हे तापट होते. त्यांचें तपःसामर्थ्य इतकें पचंड नि इतकें प्रभावी होतें कीं, ते बोलतील तसें हटकून घडून येई. अर्थात् त्यांची वाणी म्हणजे ती देववाणीच होती. ती कधीं खोटी पडायचीच नाहीं. आपल्या पूज्य पित्याची, ते ध्यानस्थ असतां, कुचेष्टा व अपमान करणाऱ्या त्या उन्मत्त राजाचा त्यांना फार संताप आला व त्या भरांत त्यांनीं परिक्षितास तूं सात दिवसांत सर्पदंश होऊन मरशील असा शाप दिला. त्याप्रमाणें सातव्या दिवशीं संध्याकाळीं तो सर्पदंश होऊनच मरण पावला. सर्प म्हणजे दुसरा तिसरा कोणी नसून प्रत्यक्ष नागराज तक्षकच होता (महाभारत आदिपर्व ४१).

आतां या नागराज तक्षकानें परिक्षितास दंश कां केला हा इतिहासहि तितकाच मोठा मनोवेधक व मननीय असाच आहे. हा पांडवकाळांतला इतिहास असून त्याचीच ही उत्तरकथा आहे.

एका मोठ्या सत्रांत अग्नि तूप पिऊन पिऊन पांढरा फटफटीत झाला. त्याला उपाय म्हणजे पशूंचा अलोट मेध भक्षण करावयाचा. पण हें घडावयाचें कसें ? तितका मेध मिळणार कोठून

नि देणार तरी कोण ? अग्नीला मोठी चिंता पडली. पण सुदैवानें त्यांस धनुर्धर पार्थाची आठवण झाली. मग उशीर कसला ? चटकन् तो त्याजपाशीं गेला व झालेली हकीकत सांगून आपणास खांडववन भक्षणार्थ मिळेल तर आपला रोग जाईल, सबब तें आपणांस मिळवून देण्याविषयीं त्यानें त्याची प्रार्थना केली. कारण त्या वनांत हरतऱ्हेचे पुष्कळसे प्राणी वास करून होते. शिवाय नागलोकहि तेथें वास करून असत. त्यांचा तक्षक हा राजा होता.

अर्जुनानें अग्नीची ती मनीषा मान्य करून मागचा पुढचा विचार न करतां तें खांडववन त्यास देण्याचें अभिवचन दिलें. अर्थात् अर्जुनाचें वचन म्हणजे तें देववचनच ! प्रत्यक्ष काळ आला तरी तें फिरणारें नव्हे! अर्थात् तें अन्यथा करण्याची कोणाची प्राज्ञा नव्हती. तशांत नागलोकांची तर मुळीं नव्हतीच नव्हती. आतां तेथें राहणें म्हणजे आपला आपणच घात व नाश करून घेणें, अशा थरास गोष्ट येऊन पोंचल्यामुळें आपला बचाव करण्यासाठीं म्हणून ते नाग तेथून आपलें बिऱ्हाड उचलून बाहेर पडले व मजलदरमजल करीत उत्तरेकडे तक्षशिला येथें जाऊन त्यांनीं आपलें बिऱ्हाड ठोकलें. अग्नीनें तें खांडववन समस्त भक्षण करून त्याची राखरांगोळी करून टाकली ! त्यांत असंख्य प्राणी प्राणास मुकले आणि असंख्य झाडाझुडपांची पार राखरांगोळी झाली ! हा अनर्थ पाहून त्या नागांना फार दुःख झालें व संतापहि आला. पण करणार काय ? अर्जुनापुढें त्यांचें काय चालणार ? वेळ अनुकूल नसल्यामुळें त्या वेळीं स्वस्थ बसणें यापलीकडे त्यांना कांहींच करतां येणें शक्य नव्हतें. पण सुप्त ज्वालामुखीप्रमाणें ते वरून शांत दिसत होते तरी आंतून सारखे धुम-

सत राहिले. केव्हां फावेल नि केव्हां सूड घेऊं याची ते डोळयांत तेल घालून वाट पाहात होते.

पुढें पांडव निजधामास गेल्यावर हस्तिनापूरच्या गादीवर अर्जुनाचा नातू परिक्षित हा आला. पुढें मृगयेकरितां तो अरण्यांत गेला असतां वर सांगितल्याप्रमाणें त्याच्या हातून प्रमाद घडून त्याचा परिणाम पुढें त्या शृंगीच्या शापांत झाला. तक्षकाचें नशीब उघडलें. आणि आजाचा सूड त्यानें नातूवर उगवून घेतला. असा हा पूर्वीचा थोडक्यांत इतिहास असून तो ऐकून जनमेजयास अत्यंत दुःख झालें. त्याला आपल्या पित्याचा कपटानें प्राण घेणाऱ्या तक्षकाचा मनस्वी राग आला. त्या रागाच्या भरांत तक्षकाचाच नव्हे तर सर्व नाग जातीचा निःपात करण्याची घोर प्रतिज्ञा करून त्याप्रमाणें त्यानें नागांच्या तक्षशिलेवर स्वारी केली आणि त्यांचा पराभव करून असंख्य नागांस पकडून आणलें व तेथें सर्पसत्र प्रारंभून त्यांचा त्या सत्रांत बळी देण्याचा सपाटा चालविला.

हा सर्व इतिहास येथें सांगण्याचें कारण इतकेंच कीं, प्रस्तुत चरित्रग्रंथांत आम्हांस हा पांडवांचा पणतू परिक्षित, जनमेजय व आमचे चरित्रनायक वाजसनेय याज्ञवल्क्य यांचा परस्पर संबंध व समकालीनत्व सिद्ध करून दाखवावयाचें आहे. म्हणून ही सर्पसत्राची कथा आम्हास मोठी पुष्टि देणारी आहे.*

* हा संबंध ग्रंथाच्या प्रथम आवृत्तींतच स्पष्ट दाखविला होता. पण तो संदर्भ तितकासा साधार असल्याचें श्री ज. स, करंदोकर, पुणें, प्रा. वि. ब. आठवले, अहमदाबाद, पं. वारेशास्त्री नाशिक, वगैरे कांहीं विद्वानांना वाटत नाहीं. म्हणून या ग्रंथाच्या प्रथमावृत्तीच्या वेळीं हा टीकेचा विषय झाला होता.

योगीश्वर याज्ञवल्क्यचरित्राचें महावस्त्र विणण्यापूर्वी प्रथम त्याचे शतपथांत, महाभारतांत, वायु-विष्णु-भागवतस्कंध, मत्स्य इत्यादि अधिकृत ग्रंथांत इतस्ततः विखुरलेले सुटे धागेदोरे काळजीपूर्वक एकत्र करण्याचा प्रयत्न करणें अत्यंत जरूर आहे. त्याशिवाय वाजसनेय याज्ञवल्क्यांची यथार्थ ओळख पटायचीच नाहीं. नुसता एखाद दुसरा ग्रंथ चाळून त्याच्या आधारें याज्ञवल्क्य चरित्र रंगविणें म्हणजे तो प्रयत्न हास्यास्पद झाल्याशिवाय राहणार नाहीं. पुराणांत इतिहासाची संगति लागते, हें खरें असलें तरी तें मोठ्या परिश्रमाचें, दीर्घ अभ्यासाचें, व सूक्ष्म चिकित्सक बुद्धीचें काम आहे. योगीश्वर याज्ञवल्क्याच्या चरित्रावर झगझगीत प्रकाश पाडणारा असा महत्त्वाचा प्रसंग महाभारतांत आढळत असून त्याचा संबंध जनमेजयाच्या सर्पसत्राशीं अगदीं निकटचा येतो आणि म्हणून आम्ही जो कथाभाग वर दिला आहे त्याचें कारणहि हेंच आहे.

जनमेजयाच्या सर्पसत्रांत कोण कोण सदस्य होते याची एकदां निश्चिति झाली म्हणजे मग त्यांचा व वाजसनेय याज्ञवल्क्यांचा कोठें व कसा संबंध आला हें दाखवून अर्जुनाचे पणतू परिक्षित जनमेजय व आमचे चरित्रनायक वाजसनेय याज्ञवल्क्य यांचें समकालीनत्व निःसंशय व निर्विवाद सिद्ध होण्यास पुष्कळच मदत होते. म्हणून आतां सर्पसत्रांतील सदस्यांची ओळख म्हणून महाभारतांतील मूळ वचनच येथें उद्धृत करून देण्यांत येत आहे.

‘ **सदस्याश्चाभवद्व्यासः** पुत्रशिष्यसहायवान् ।
उद्दालकः शमठकः **श्वेतकेतुश्च** पंचमः ॥७॥
असितो **देवलश्चैव नारदः** पर्वतस्तथा ।
आत्रेयः कण्डजठरो द्विजः कुटिघटस्तथा ॥८॥

वात्स्यः श्रुतश्रवा वृद्धस्तपः स्वाध्यायशीलवान् ।
कहोडो देवशर्मा च मोद्गल्यः शमसौभरः ॥९॥
एते चान्येच बहवो ब्राह्मणाः संशितव्रताः ।
सदस्या अभवंस्तत्र सत्रे **पारिक्षितस्य** ह ॥१०॥
(आदि. ४८, ७-१०)

वरील वचनांत ज्या सदस्यांचा उल्लेख करण्यांत आलेला आहे, त्यांपैकीं व्यास, उद्दालक, श्वेतकेतु, देवल, नारद, कहोड, तसेंच पारिक्षित म्हणजे परिक्षिताचा मुलगा जनमेजय व व्यास-शिष्य म्हणजे वैशंपायन हीं नांवें महत्त्वाचीं असून त्यांचा व याज्ञवल्क्यांचा संबंध कोठें व कसा आला आहे हें आम्ही प्रसंगा-प्रसंगानें पुढें दाखवीत जाऊं. याकरतां आणखी शतपथाची चांगली ओळखहि असावयास पाहिजे, तें निराळेंच. त्याशिवाय याज्ञवल्क्यांची ओळख नीटशी पटावयाची नाही. कारण तेथेंहि त्यांचा संबंध असलेल्या अनेक व्यक्तींचा उल्लेख सांपडतो. म्हणून तोहि आम्ही योग्य ठिकाणीं देत जाऊं.

जनमेजयाच्या सर्पसत्रांतील वरील जाड टाइपांत दाखविलेले सदस्य आमच्या संविधानास अत्यंत महत्त्वाचे असून वाचकांनीं त्यांची आठवण जरूर ठेवावी अशी त्यांना अगत्याची व कळकळीची विनंति आहे.

ग्रहण सुटलें

श्रावण शुद्ध पौर्णिमेच्या मंगल दिवशीं पहाटेस नित्याप्रमाणें स्नान करून सूर्यास अर्घ्य देऊन, सूर्योपस्थान केल्यावर याज्ञवल्क्य जपास ध्यानस्थ होऊन बसले. सूर्य मध्यान्हीवर आला; उन्हाचा ताप चांगला जाणवूं लागला, वाऱ्याची गति मंद झाली, पक्षी व पांखरें झाडवेलींचा आश्रय धरून बसलीं, जिकडे तिकडे अगदीं सामसूम झालेली होती. इतक्यांत याज्ञवल्क्यांनीं ध्यानयोग आवरून आपले नेत्र सूर्यनारायणाकडे लावले. त्यांनीं उभे राहून दोन्ही हात जोडून पुढीलप्रमाणें सूर्यनारायणाची प्रार्थना केली. ते म्हणाले, "देवा, भक्तवत्सला, दयाघना, अजून तूं माझा अंत पाहणार ? दीनोद्धारा, नको, नको माझा अंत पाहूंस आतां. शरणागतवत्सला, या दीनावर दया कर. दीनोद्धारा, तुला माझा नमस्कार असो ! सद्गुरो, मी आतां थकलों भागलों आहें. माझ्यानें आतां देवा, धीर धरवत नाहीं. दयाघना, ज्ञानमूर्ते, मला अपूर्व असें ज्ञानतेज दे. हा दीन शिष्य, तुझा नम्र भक्त तुझ्याजवळ विद्याधनाची याचना करीत आहे. तर देवा, माझ्या गुरूजवळ नाहीं असा अपूर्व यजुर्वेद मला दे. माझ्यांत तुझ्या कृपेनें ती दिव्य शक्ति स्फुरण पावूं दे. तूं शरणागतवत्सल म्हणवितोस. मग माझा अंत अजून तूं किती पाहणार ? ब्रह्मांड-नायका, नको नको माझा अंत पाहूंस आतां. भगवन् ! मजवर कृपा कर. तुझ्याशिवाय मला आतां दुसरा आश्रय नाहीं, दुसरा त्राता नाहीं, नि दुसरा गुरु नाहीं. तूंच माझा गुरु, पिता,

बंधु आणि त्राता. देवा, माझ्या बुद्धींत पुनः दिव्य ज्ञानोदय होईल, मेधाशक्ति स्फुरण पावेल, प्रतिभा तेज चमकेल असें कर. देवा, मला पदरांत घे आणि माझा उद्धार कर" असें म्हणून त्यांनीं सूर्यास साष्टांग नमस्कार घातला.

भक्तोद्धारक प्रभु श्री सूर्यनारायण प्रत्यक्ष ज्ञानदेव. त्याला आतां या दीन याज्ञवल्क्याची दया आली. त्याची दीर्घ तपश्चर्या व अनन्य भक्ति पाहून सूर्यनारायण परम आनंदित झाला आणि त्याला भक्तवात्सल्याचा पान्हाहि फुटला! याज्ञवल्क्य हे पवित्र गंगेच्या निर्मळ उदकाप्रमाणें केवळ निष्पाप व निर्दोषी असून कृपाकटाक्षास पूर्ण पात्र आहेत असा विचार करून भक्ताच्या इच्छेप्रमाणें याज्ञवल्क्याच्या गुरूजवळ नव्हता असा शुद्ध (शुक्ल) यजुर्वेद भगवंतांनीं वाजीचें रूप धारण करून त्यांच्या बुद्धींत बिंबविला! त्या वेळीं सूर्याचें रूप याज्ञवल्क्याला अश्वाप्रमाणें भासलें म्हणून पुराणांत सूर्यानें वाजीरूप धारण करून त्यांना शुक्ल यजुर्वेद पढविला असें अलंकारिक भाषेंत म्हटलें आहे.

आतां येथें थोडी शास्त्रीय चर्चा करणें जरूर आहे. पुराणांत पुष्कळ भाकड कथा सांगण्यांत आल्या आहेत असा आधुनिक सुशिक्षितांचा एक मोठा आरोप आहे. पण तो सर्वस्वी निराधार असून, सुशिक्षितांचें वेदांविषयींचें गाढ अज्ञान आहे, हेंच त्यास प्रमुख कारण आहे. कांही सुशिक्षित असा आक्षेप घेतात कीं, पुराणकर्त्या व्यासांनीं हें कांहीं तरीच खूळ माजविलें आहे. सूर्यानें घोडा होऊन याज्ञवल्क्याला वेद पढविला या विधानावर कांहींचा विश्वास बसत नाहीं. हें विज्ञानयुग आहे. जंगलांत राहणाऱ्यांचें युग नव्हे. त्यामुळे घोडा कसा मनुष्यवाणी बोलेल अशी बुद्धिवादी लोकांची शंका आहे. आधुनिक विज्ञान

शास्त्र व प्राचीन वेदवचन यांच्या आधारें थोडक्यांत खालील-प्रमाणें त्याचें उत्तर आहे.

प्रथम आधुनिक विज्ञान दृष्टीनें याचा थोडासा ऊहापोह करून त्या रोखानें वेदवचनाच्या आधारें वरील गोष्ट तत्त्वत: कशी शक्य आहे, हें दाखविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पृथ्वीला उष्णता व प्रकाश सूर्यापासून लाभला आहे याविषयीं कोणाचें दुमत होईल असें आम्हांस तरी वाटत नाहीं. आणि हा प्रकाश नि ही उष्णता आम्हांस सूर्यापासून किरणद्वारां लाभते, ही गोष्टहि विज्ञानशास्त्रास सम्मत आहे. सूर्यप्रकाशाविषयीं आम्हांस अधिक मीमांसा करावयाची आहे.

सूर्यापासून सूक्ष्म, अत्यंत सूक्ष्म, अशा तेजाच्या ज्या केश-सदृश रेषा निघतात त्याला किरण अशी संज्ञा आहे. हे किरण दिसावयास साध्या डोळ्याला शुभ्र दिसतात, पण त्यांचें पृथक्करण केल्यास त्यांत तांबडा, हिरवा, पिवळा, नारिंगी, जांभळा, पारवा व निळा असे निरनिराळे सात रंग असलेले दिसून येतात. सारांश, सूर्यापासून निघणारे किरण सात रंगांचे असून, त्यांच्या मिश्रणानें शुभ्र प्रकाश झालेला आहे. हे सर्व किरण जसे कांति-मान आहेत तसेच ते गतिमानहि आहेत. त्यांचा दर सेकंदाला वेग १,८६,००० मैल असतो असें आज शास्त्रज्ञांनीं ठरविलें आहे. तसेच ते मोठे प्रभावी व भेदक आहेत. या प्रत्येक रंगाच्या किर-णाचें रसायन व वैद्यकीय शास्त्रदृष्टचा एकेक वैशिष्टय फार मोठें आहे. त्यांत जे गडद नीलवर्णाचे (Ultraviolet) किरण आहेत त्यांचा येथें अधिक विचार करणें आहे. हे नीलवर्ण किरण शरीरभेदक असून, ते कातडीच्या सूक्ष्म रंध्रांतून रक्तवाहिन्यांत शिरून तेथून ते चिच्छक्तिरूपानें सर्व शरीरभर पसरून राहतात.

अर्थात् या सूर्यप्रकाशाचा एवढा मोठा प्रभाव आहे कीं त्यापासून जगाचें प्रत्यक्ष ज्ञान होतें. बुद्धिचैतन्य स्फुरतें, अनेक व्याधींचें निरसन होतें. क्षयरोगासारखे दुःसाध्य रोगहि बरे होतात. असो. या सूर्यप्रकाशाचा मानवशरीरावर व जीवनावर शरीरशास्त्र-दृष्टया, जीवनशास्त्रदृष्टया, आरोग्यशास्त्रदृष्टया व वैद्यकशास्त्र-दृष्टया इतका महत्त्वाचा परिणाम झाला आहे. जगाला हें जें चैतन्य व प्रेरणाशक्ति लाभली आहे ती सूर्यदेवाची कृपाच होय. ही मीमांसा विज्ञानशास्त्रदृष्टीनें आम्ही करीत आहोंत. अजून हें शास्त्र अपूर्ण व आंधळें आहे! त्याला अद्याप अध्यात्मदृष्टि लाभलेली नाहीं. सूर्य हा किरणद्वारां मनुष्याच्या शरिरांत शिरून त्याला चैतन्य व स्फूर्ति देऊं शकतो असा आमचा मात्र ठाम सिद्धान्त आहे.

अध्यात्मदृष्टि असलेले आमचे वैदिक ऋषी काय सांगतात याची मीमांसा करणेंहि जरूर आहे. वैदिक ऋषींना विज्ञानदृष्टिहि होती. वैदिक ऋषींचें हें वैशिष्टय आहे. 'सूर्य आत्मा जगत-स्तस्थुषश्च' सूर्य हा स्थावर-जंगम सृष्टीचा प्रत्यक्ष आत्माच आहे (ऋ १-११५-१). येथें सूर्य याचा अर्थ विश्वाचा प्रेरक (सर्वस्य प्रेरकः) असा अर्थ सायणाचार्य करतात. भूतमात्राच्या अंतर्यामीं राहून त्यांना प्रेरणा करणारा असा जो परमेश्वर तो सूर्य, असा वैदिकांचा सूर्य शब्दाचा अर्थ आहे.

आतां ही पुढील ऋचा विचारांत घेऊं. 'सदा त्वा हरितः रथे वहन्ति देव सूर्य। शोचिष्केश विचक्षण। (ऋ.१-५०-८) येथें 'हरितः' हा शब्द मननीय आहे. 'हरितः' याचा अर्थ साय-णाचार्य 'अश्वाः रश्मयो वा'- अश्व किंवा रश्मि ऊर्फ किरण असा करतात. त्याचप्रमाणे 'शोचिष्केशः' याचा अर्थ ज्याच्यामध्यें

किरण केंसाप्रमाणें दिसतात तो ' (तेजांसि एव यस्मिन् केशा इव दृश्यन्ते सः), असा अर्थ करण्यांत येतो. वरील मंत्राचा भावार्थ असा आहे–हे सूर्यदेवा, हे किरणकेशा, विश्वप्रकाशका, रथांत बसलेल्या तुला सात किरणरूपी अश्व ओढून नेतात. येथें सप्त हा संख्यावाचक शब्द अर्थपूर्ण आहे, सात किरण म्हणजे वर जे विज्ञानशास्त्रांत सांगितलेले सात निरनिराळ्या रंगाचे किरण तेच हे होत. वरील ऋचेंत ' हरितः ' या शब्दाचा घोडा ऊर्फ रश्मी असा अर्थ करण्यांत आला आहे. या ऋचेचें महत्त्व येथें असें आहे कीं, सूर्याचे किरण हे सांत रंगी आहेत आणि किरण म्हणजे सूर्याचे तेजस्वी केस होत. अर्थात् सूर्यापासून किरण निघतात आणि ते सप्तरंगी असतात. ही गोष्ट प्राचीन ऋषी ओळखून होते असें यावरून सिद्ध होतें.

पुनः आणखी, ही दुसरी एक महत्त्वाची ऋचा पाहा– ' भद्रा अश्वा हरितः सूर्यस्य चित्रा एतग्वा अनुमाद्यासः । ' (ऋ. १-११५-३) या ऋचेंत प्रत्यक्ष अश्व शब्द आला असून त्याचा अर्थ ' वाहणें ' असा आहे. तसेंच, ' हरितः ' व ' चित्रा ' हे शब्दहि मननीय आहेत. येथें ' अश्वा ' याचा अर्थ घोडे असा नसून जलद धावणारा (व्यापनशील) असा आहे. ' हरितः ' याचा अर्थ ' अश्वाः रश्मयो वा ' असा असून ' चित्रा ' याचा अर्थ निरनिराळ्या रंगाचा असा आहे. आणि ' एतग्वाः ' याचा अर्थ शबलवर्ण असलेले सूर्याचे घोडे असा होतो. ' हरितः याचा अर्थ हिरवा अगर पिवळा किंवा पिंवळट हिरवा घोडा (' हरिद्वर्णानश्वात् ' ऋ. १-११५-३, सायणभाष्य) असा अर्थ ऋ १-११५-३ या ऋचेच्या भाष्यांत करण्यांत आलेला आहे.

याला पुष्टिकरणार्थ आणखी एक ऋचा खालीलप्रमाणें आहे. ' उदुत्यं जातवेदसं देवं वहन्ति केतवः । दृशे विश्वाय

सूर्यम् ।' (ऋ. १-५०-१). येथें 'केतवः' हा शब्द विचारार्ह आहे. 'केतवः' याचा अर्थ 'प्रज्ञापकाः सूर्याश्वाः यद्वा सूर्य रश्मयः' असा करण्यांत आलेला आहे. आतां वरील मंत्रांत 'अश्वः' 'केतवः' 'हरितः' 'रश्मयः' या सर्वांचा सामान्य अर्थ किरण असा असून अलंकारिक भाषेंत त्याच किरणाला कोठें अश्व, कोठें हरित्, कोठें रश्मि तर कोठें केतु असें म्हटलें आहे. तेव्हां सूर्याचा घोडा म्हणजे चार पायांचा पृथ्वीवरचा जलद धावणारा प्राणी नसून, तो प्रत्यक्ष सूर्यदेवाचा अंशभूत असा तेजस्वी किरणच होय. पृथ्वीवरचे घोडे प्रचंड तेजस्वी सूर्याच्या रथाला जोडणें आणि ते अंतराळांतून सूर्याला पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत बारा तासांत वाहून नेणें, हें केवळ प्रतीकात्मक वर्णन आहे. असो. इतक्यानें आमच्या वाचकांची समजूत पटेल असें आम्हांस वाटतें.

इतकी भूमिका तयार झाल्यावर आतां पुढील प्रक्रिया काय, इकडे वळूं. हे जे सूर्याचे किरण आहेत, ते मनुष्याच्या शरिरांत शिरूं शकतात. ऋग्वेदांत ही गोष्ट स्पष्ट सांगण्यांत आली आहे. 'अन्तश्चरति रोचना अस्य' (ऋ. १-१८३-२) या सूर्य देवाचें तेज हृदयाकाशापर्यंत जाऊन पोंचू शकतें! 'तत्सवितुर्वरेण्यं भर्गोदेवस्य धीमहि । धियो यो नः प्रचोदयात्' त्या सवितादेवाच्या सर्वश्रेष्ठ ज्ञानमय तेजाचें आम्ही ध्यान करतों. तो आमच्या बुद्धीला प्रेरणा देवो! या गायत्री मंत्रावरून बुद्धीला प्रेरणा देणारा देव म्हणजे सूर्यदेवच! प्रेरणाशक्ति ही सूर्यापासूनच स्फुरण पावते. याचें कारण असें कीं, तो आपल्या अंशभूत किरणरूपानें मनुष्याच्या बुद्धींत शिरून तिला योग्य

स्फुरण देऊं शकतो, हें विज्ञानशास्त्राला देखील सिद्ध करतां येईल. तेव्हां याज्ञवल्क्यांना त्यानें अश्वद्वारां म्हणजे किरणद्वारां पशुद्वारां नव्हे नवीन वेदाची रूपरेखा स्फुरविली असें म्हटलें, अथवा अलंकारिक भाषेंत व्यासांनीं तसें सांगितलें, असें म्हटल्यास तें अप्रस्तुत होणार नाहीं, वैदिक देव हे उपासकाला काय सांगावयाचें तें त्याच्या बुद्धींत स्फुरवीत असतात. ‘ न देवा दंडमादाय रक्षन्ति पशुपालवत् । यं रक्षितुमिच्छन्ति बुद्धया संयोजयन्ति तम् ॥ ’ हा वैदिक देवांचा भक्तांशीं बोलण्याचा नेहमींचा पायंडा आहे. या सर्व विवेचनावरून याज्ञवल्क्याला सूर्यदेवानें नवीन वेद दिला, याचा अर्थ शास्त्रीय दृष्टीनें कसा लावावयाचा व तो कसा सुंदर नि सयुक्तिक लावतां येतो, हें दिसून येईल.

सुकवीन्द्रो भव !

भगवान श्रीसूर्यनारायणांनीं याज्ञवल्क्यांना त्यांच्या इच्छे-प्रमाणें त्यांचे माजी गुरु जे वैशंपायन यांच्याजवळ नसलेला असा अभिनव शुक्ल यजुर्वेदाचा आराखडा त्यांच्या बुद्धींत बिंबविला व तो तेथें स्थिर होऊन राहण्यासाठीं म्हणून वैदिक आर्यांची विद्याधिष्ठात्री देवता जी सरस्वती, तिचें मंगल स्तुतिस्तोत्र गाऊन तिला प्रसन्न करून तिचा वरप्रसाद संपादन करण्यास सांगून, भगवान तेथून अंतर्धान पावले. पुढें त्या देवाच्या सूचने-प्रमाणें आपणांस मिळालेला नवीन शुक्ल यजुर्वेद बुद्धींत रुजून स्थिर व्हावा, एतदर्थ सकल विद्येची प्रधान देवता जी सरस्वती, तिला प्रसन्न करून घेण्याच्या उद्योगास ते उदयोन्मुख योगीराज उत्साहभरित अंतःकरणानें लागले.

या विश्वाच्या विविध कार्यक्षेत्रांसंबंधानें जी परमेश्वरी योजना आखण्यांत आली आहे, त्यांत विश्वांतील ज्ञाननिधीचे श्रेष्ठ विश्वस्त म्हणून सूर्य व सरस्वती यांची नेमणूक झाली आहे, असें वैदिक धर्माचें सांगणें आहे. त्यांपैकीं सूर्यदेवाला उपासना-द्वारा प्रसन्न करून घेणेचा जो एक लहानसा पण अत्यंत अर्थपूर्ण व महाप्रभावी असा दिव्य मंत्र वैदिक आर्यांत प्रसिद्ध व प्रचलित आहे त्यास गायत्री मंत्र असें नामाभिधान असून, त्याची मांडणी आहे ती अशी:—' **ॐ तत्सवितुर्वरेण्यं भर्गोदेवस्य धीमहि । धियो यो नः प्रचोदयात् ।** ' हा महामंत्र महातपस्वी विश्वामित्राच्या योगस्थ मनांत सूर्याच्या प्रेरणेनें स्फुरला असून त्याचा भावार्थ

पुढीलप्रमाणें आहे. 'त्या त्रैलोक्यप्रसिद्ध सूर्यमंडलस्थ विश्वव्यापी परमेश्वराच्या परममंगल अशा ज्ञानतेजाचें आम्ही योगस्थ मनानें ध्यान करतों. तो महादेव आमच्या बुद्धीला सत्कर्मद्वारां दिव्य ज्ञान मिळविण्यास प्रेरणा करो.' आणि या महामंत्राचा शास्त्रशुद्ध जप करून अनेक महाभागांनीं आपल्या दुर्लभ मानव जन्माचें उदंड कल्याण करून घेतलें आहे. गय म्हणजे प्राण त्या प्राणाचें रक्षण करणारा जो मंत्र त्यास गायत्री मंत्र असें म्हणतात. ('प्राणा वैगयास्तत्प्राणांस्तत्रे तस्मांद्गायत्रीनाम' श. प. १४-८-१५-७) तो वैदिक ज्ञानोपासनेचा महामंत्र असून, प्रत्येक वैदिक आर्य त्याचा संध्योपासनेच्या वेळीं नित्य जप करीत असतो.

त्याचप्रमाणें सरस्वतीचाहि एक मंत्र ऋग्वेदांत प्रसिद्ध असून, तोहि अर्थपूर्ण व मोठा मननीय आहे. '**पावका नः सरस्वती वाजेभिर्वाजिनीवती । यज्ञं वष्टुं धियावसुः ॥ १-३-१० चोदयित्री सूनृतानां चेतन्ती सुमतीनाम् । यज्ञं दधे सरस्वती ॥ १-३-११ ॥ महो अर्णः सरस्वती प्रचेतयती केतुना । धियो विश्वा विराजति ॥ १-३-१२॥** भावार्थः- उपासकांना पावन करणारी, ज्ञानसामर्थ्यानें सुसंपन्न असलेली, बुद्धिवैभवानें नटलेली अशी ही सरस्वतीदेवी आमचा हा ज्ञानयज्ञ दिव्य विबुधाप्रत नेऊन पोंचवो. सत्य भाषणाला प्रेरणा करणारी व सद्बुद्धीला चेतना देणारी अशी ही शुभमंगल सरस्वती असून ती आमच्या या ज्ञानात्मक यज्ञोपासनेचा स्वीकार करती झाली.

ऋग्वेदांत सरस्वती देवीचें नदी व देवता रूपानें हें असें थोडक्यांत पण यथार्थ वर्णन असून ती सकल हिंदुमात्रांची ज्ञान-देवता आहे. आणि म्हणून सूर्यनारायणानें अंतर्धान पावतांना या

सरस्वतीचें स्तवन करून घेण्याचा उपदेश केला, तो झाला तरी तितकाच योग्य आहे.

भगवान श्री सूर्यनारायणाच्या उपदेशाप्रमाणें याज्ञवल्क्य आतां सरस्वतीला प्रसन्न करून घेण्याच्या कार्याकडे वळले. देवांना प्रसन्न करून घेण्याचा वैदिक आर्यांचा अमोघ मार्ग म्हणजे त्या त्या देवतेची एकनिष्ठ उपासना. हा व्यक्तिगत मार्ग आहे. इतरांचें सहाय्य न घेतां स्वतःच्या आत्मविश्वासावर व कडक तपानुष्ठानावर प्रत्येक व्यक्तीला आपल्या इष्ट देवतेला प्रसन्न करून घेऊन तद्द्वारां आपले मनोरथ सत्यसृष्टींत प्रतिबिंबित करून घेतां येतात, असा भारतीयांचा दृढ विश्वास व खास अनुभव आहे. मात्र तशी प्रखर श्रद्धा व अढळ निश्चय पाहिजे. याज्ञवल्क्य काय, विश्वामित्र काय, गौतमबुद्ध काय, महावीर काय, झोरोष्ट्रर काय, किंवा येशू ख्रिस्त काय या सर्वांनीं श्रद्धा व तपश्चर्या यांची कास धरूनच आपली इष्टसिद्धि प्राप्त करून घेतली. हे सर्व महात्मे मानवसृष्टींत अजरामर होऊन राहिले आहेत, इतकेंच नव्हे तर सकल मानवमात्राचे मार्गदर्शक असे शाश्वत दीपस्तंभ होऊन राहिले आहेत.

याज्ञवल्क्य आतां सरस्वतीच्या ध्यानपूजनेंत अखंड तल्लीन होऊन गेले. एके दिवशीं सहज स्फूर्ति होऊन, त्यांनीं सरस्वतीची एकाग्र चित्तानें अनन्यभावें खालील प्रार्थना केली. ती अशीः—

कृपां कुरु जगन्मातर्मामेवं हततेजसम्
गुरुशापात् स्मृतिभ्रंष्टं विद्याहीनंच दुःखितम् ६
ज्ञानं देहि स्मृतिं देहि विद्यां विद्याधिदेवते
प्रतिष्ठां कवितां देहि शक्तिं शिष्य-प्रबोधिकाम् ७
ग्रन्थनिर्मितिशक्तिं च सच्छिष्यं सुप्रतिष्ठितम्
प्रतिभां सत्सभायां च विचारक्षमतां शुभाम् ८

लुप्तां सर्वां दैववशान्नवां कुरु पुनः पुनः
यथांकुरं जनयति भगवान्योगमायया ९
ब्रह्मस्वरूपा परमा ज्योतिरूपा सनातनी
सर्वविद्याधिदेवी या तस्यै वाच्यै नमोनमः १०
यया विना जगत्सर्वं शश्वज्जीवन्मृतं सदा
ज्ञानाधिदेवी या तस्यै सरस्वत्यै नमोनमः ११
यया विना जगत्सर्वं मूकमुन्मत्तवत्सदा
वागाधिष्ठातृ-देवी या तस्यै वाण्यै नमोनमः १२
स्मृतिशक्ति–ज्ञानशक्ति–बुद्धिशक्ति–स्वरूपिणी
प्रतिभा–कल्पना–शक्तिर्या च तस्यै नमोनमः १३
त्वं संस्तुता पूजिता च मुनींद्रमनुमानवैः
दैत्येंद्रैश्च सुरैश्चापि ब्रह्माविष्णुशिवादिभिः १४
जडीभूतः सहस्रास्यः पंचवक्त्रश्चतुर्मुखः
यां स्तोतुं किमहंस्तौमि तामेकास्येन मानवः १५

(ब्रह्मवैवर्त पुराण प्रकृति खंड अ. ५, ६– १५)

याज्ञवल्क्य म्हणाले, ‘ हे जगदंबे ! हे ज्ञान–देवते ! कृपा कर ! जगज्जननी ! मजवर कृपा कर ! मी तुला अनन्यभावें शरण आलों आहें. हे देवि ! गुरूच्या अवकृपेमुळें मी हतविद्ध होऊन निस्तेज बनलों आहें. ज्ञानहीन झालों आहें. स्मृतिभ्रष्ट बनलों आहें, अर्थात् या सर्व आपत्तींमुळें मी सर्वस्वी दुःखसागरांत बुडून सारखा धडपडत आहें. तर हे शारदांबे! मला श्रेष्ठ ज्ञान दे. स्थिर स्मृति दे. तेजस्वी विद्या दे. दिव्य काव्य-शक्ति दे. ग्रंथ निर्माण करण्यास सामर्थ्य दे. सच्छील व सुप्रतिष्ठित असा शिष्यवृंद दे. सभेंत प्रभाव गाजविण्याची सर्वोत्तम प्रतिभाशक्ति दे. सूक्ष्म विचार करण्याची दिव्य शक्ति दे. हे माते हे विद्याधि-

देवि ! काय सांगूं माझें संकट, आणि किती सांगू माझें दुःख ! दुर्दैवानें घेरल्यामुळें माझी विद्या जणु कांहीं लुप्तप्राय झाली आहे. तर हे महामंगल देवते ! योगमायेनें भगवान ज्याप्रमाणें वृक्षांची अंकुरोत्पत्ति करतो तद्वत् तूंहि माझी नष्टप्राय झालेली विद्या पुनः सजीव व सतेज कर. हे सरस्वति ! हे शारदांबे! प्रत्यक्ष तूं ब्रह्मरूपिणी आहेस, तशीच ज्योतिरूप आहेस. सनातन असून अखिल विद्यांची अधिष्ठात्री देवता आहेस. अशा तुला--मंगल वाग्देवतेला–माझा नमस्कार असो. हे ज्ञानमाउली, काय सांगूं तुझा महिमा ! मनुष्य जिवंत असूनहि तुझ्याशिवाय तो मेल्यासारखाच आहे. हें सर्व जग तुझ्या अनुग्रहाशिवाय केवळ मूक व मूढ आहे. हे देवि, तुला माझा नमस्कार असो. हे सरस्वति, किती वर्णूं तुझा महिमा ? प्रत्यक्ष तूं स्मृतिशक्ति आहेस. प्रतिभाशक्तीहि तूंच, आणि ज्ञानशक्तीहि पण तूंच आहेस. हे जगन्माउली, मुनीजनांनीं तुझें स्तोत्र गाइलें आहे. तसेंच मन्वादि मनुष्यांनीं व देव-दानवांनीं तुला मुक्तकंठानें आळविलें आहे. फार काय ब्रह्मा–विष्णु–शिव यांसारख्या देवश्रेष्ठांनीं देखील तुझा दिव्य महिमा मोठ्या आवडीनें गायन केला आहे. मग वर्णूं वर्णूं असा मी तरी किती वर्णूं तुझा महिमा ? पाहा हजार मुखांचा तो शेष ! तो सुद्धां तुझा महिमा गातां गातां अखेर जडमूढ बनला. त्या पंचमुखी शंकराचीहि तीच कथा. आणि तो चतुर्मुख ब्रह्मा झाला तरी काय ? बिचारा तोहि अखेर थकलाच कीं नाहीं ? मग एकच तोंडाचा मजसारखा अल्प मनुष्य तुझा तो अनंत महिमा गा गा गाईल तरी किती ? आणि तो संपणार तरी कसा ! हे परमेश्वरि, प्रसन्न हो. मज दीनावर कृपा कर. मला पुनः ज्ञान व प्रतिभासंपन्न कर. माझी विद्या स्थिर व

जागृत राहो, व ज्ञान सामर्थ्य अभंग व अजिक्य बनो. हे मंगल माते, माझा नमस्कार असो.'

याप्रमाणें सरस्वती देवतेचें मंगल व सुंदर स्तोत्र गाऊन याज्ञवल्क्यांनीं तिला नमस्कार केला ! पुनः पुनः केला. भक्त-वत्सल शारदांबाच ती ! जगन्माउली ! याज्ञवल्क्याची ती आतापर्यंतची अनन्य उपासना, व एकनिष्ठ भक्ति पाहून व हें वरील सुंदर स्तुतिस्तोत्र ऐकून परम संतुष्ट होऊन प्रत्यक्ष त्या भक्तश्रेष्ठाच्या मस्तकावर तिनें आपला वरदहस्त ठेविला; व 'सुकवीन्द्रोभव' असा मंगल आशीर्वाद देऊन ती अंतर्धान पावली; धन्य झाले याज्ञवल्क्य. आनंदानें आतां त्यांचा आत्मा फुलला. बुद्धि उजळली ! मन प्रसन्न झालें. मुखावर दिव्य तेज खुललें व नेत्रांत अपूर्व चैतन्य चमकूं लागलें ! त्यांची तपश्चर्या फळास आली व जीवितहेतु साध्य झाला. सूर्यनारायण व सरस्वती देवी यांचा वरप्रसाद मिळवून ते आतां कृतार्थ झाले.

सवता सुभा !

याज्ञवल्क्य अरण्यांत जाऊन, सूर्याराधना करून दिव्य ज्ञान मिळवून परत घरीं आले. ही बातमी ऐकतांच सर्व जण त्यांना भेटून त्यांचे क्षेम-समाचार घेऊं लागले. जे कोणी त्यांच्या दर्शनास येत, ते त्यांची ती दिव्य व तेजस्वी मूर्ति पाहून आनंदाश्चर्यानें भारले जाऊन, त्यांच्या अलौकिक साहसाचें व धाडसाचें कोड-कौतुक करीत. त्यांच्या अंतर्बाह्य स्थितींत व रूपांत मोठी क्रांति झाली असल्यामुळें लोकांना ती एक नवीन विभूतीच वाटूं लागली. त्यांच्या चेहऱ्यांत, बांध्यांत, दृष्टींत, आवाजांत, भाषणांत व वर्तनांत आमूलाग्र फरक पडला होता. त्यांच्या त्या प्रफुल्ल चेहऱ्यावर दिव्य तपश्चर्येचें मधुर तेज चमकत असून, मुद्रा शांत व प्रसन्न दिसत होती. त्यांची अंतर्ज्योति चांगली उजळली असल्यामुळें तिची साक्ष त्यांचे नक्षत्राप्रमाणें चकाकणारे पाणीदार डोळे स्पष्ट देत होते. त्यांच्या मधुरवाणींत प्रत्यक्ष सरस्वतीच अवतरल्यामुळें तें मोहक व प्रेमळ भाषण ऐकून श्रोतृवर्ग मंत्रमुग्ध होऊं लागला. त्यांच्याशीं भाषण करतांना जी काय त्यांच्या मुखांतून शब्दसंपत्ति बाहेर पडे, ती कांहीं अपूर्व असून ते जे विचार प्रगट करीत तेहि अलौकिक असत. त्यांची निगर्वीवृत्ति, साधा, सरळ स्वभाव, विनयपूर्ण भाषण व आदरपूर्ण वर्तन पाहून जो तो त्यांना कौतुकपूर्वक धन्यवाद देई.

त्यांना भेटणारा प्रत्येक जण प्रथम त्यांच्याकडे औत्सुक्यपूर्ण दृष्टीनें टक लावून पाही. पण जों जों पाही तों तों त्याचें मन

तेथें मधावरील माशांप्रमाणें आकर्षून राही. प्रेक्षकांच्या डोळ्यांची संपूर्ण तृप्ति झाली असें सहसा होत नसे.

त्यांना भेटून गेल्यावर जो तो मनांत म्हणे कीं, याज्ञवल्क्य हे आपलेच आहेत पण दुसऱ्या क्षणीं त्यांस वाटे कीं, ते आपलेच असले तरी आपल्यापेक्षां कांहीं निराळेच दिसतात. कोणाला असें वाटे कीं, ते आपल्यासारखेच आहेत, पण आपल्यापेक्षां खात्रीनें श्रेष्ठ आहेत. एकंदरींत त्यांचें दर्शन घेऊन त्यांच्याशीं संभाषण केल्यावर ज्याला त्याला असें वाटे कीं, आपण अगदीं सामान्य आहोंत, पण ते म्हणजे कोणी अद्वितीय, महाज्ञानी, श्रेष्ठयोगी, महान् तपस्वी, आणि दिव्य विभूति आहेत.

याप्रमाणें ते मिथिलेंत आल्यावर तेथें व तिच्या आसपासच्या गांवांत याज्ञवल्क्य म्हणजे लोकांच्या कुतूहलाचा व कोडकौतुकाचा एक विषयच होऊन बसला. जसजशी ही बातमी बाहेर पसरत चालली, तसतसे त्यांचे दूरदूरचे स्नेही सोबती चाहते व सहाध्यायी त्यांना मुद्दाम येऊन भेटून जाऊं लागले. त्यांच्याशीं ते बोलूं लागले.प्रदीर्घ भाषण करून ते आपला अरण्यांतला अनुभव, तपश्चर्येचा प्रभाव, सूर्यनारायणाचा प्रसाद, सरस्वतीचें वरदान इत्यादि आश्चर्यकारक व अलौकिक गोष्टी सांगत असत. अतिथींची गर्दी एवढी झाली कीं नेहमीं दहा पांच मित्रमंडळीचा घोळका त्यांच्या शेजारीं आसन घालून बसलेला दिसूं लागला. सुनंदेचा मुलगा अरण्यांत जाऊन देव होऊन आला, ही बातमी स्त्री समाजांत पसरतांच कित्येक जणींनीं सुनंदेस भेटून तिला धन्यवाद दिला.

रोज संध्याकाळीं मित्रमंडळीस बरोबर घेऊन त्यांच्याशीं आपण अभ्यासिलेल्या नवीन वेदावर विद्वत्तापूर्ण व मनोरंजक

विचारविनिमय ते करीत असत. सूर्यप्रेरणेनें आपण तयार केलेला शुक्ल यजुर्वेदाचा प्राथमिक कांहीं भाग आपल्या मधुर वाणींतून सुस्वर म्हणून दाखवून ऐकणारांची मति गुंगवून त्यांना नागाप्रमाणें ते डोलावयास लावीत. त्यांचा तो वेद ऐकण्याचें कांहींना तर वेडच लागलें होतें. उद्दालक, हिरण्यनाभ, वैशंपायन व शाकल्य यांच्या आश्रमांतील त्यांचे कांहीं चाहते व स्नेही सोबती तर घरदार सोडून त्यांच्या जवळच कायमचा तळ देऊन राहिले होते. एवढी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची मोहिनी आसमंतांत पडली होती. त्यामुळें त्यांच्यावर सर्वांचा लोभ व भक्ति जडून शेजारी-पाजारी त्यांचे मोठे चाहते व कैवारी झाले, ते त्यांचें चांगलें आदरातिथ्य करीत. थोड्याच वेळांत या उदयोन्मुख जगद्‌गुरूचा बोलबाला देशांत सर्वत्र पसरून जनता त्यांच्याकडे प्रेमादरानें पाहूं लागली. ते बाहेर निघाले म्हणजे लोक तेथें तेथें जमा होऊन त्यांच्याकडे टक लावून पाहात व भक्तिपूर्वक नमस्कार करून आपला आदर व्यक्त करीत. सारांश, अगदीं अल्प वयांतच याज्ञवल्क्य म्हणजे एक महान् विभूति म्हणून चमकूं लागली.

त्यांनीं जो शुक्ल यजुर्वेद श्री सूर्यनारायणापासून प्राप्त करून घेतला—अर्थात् त्यांच्या दिव्य प्रेरणेनें व प्रसादानें मूर्त स्वरूपांत आणला—तो वैशंपायनांच्या जुन्या वेदापेक्षां सर्वस्वी निराळा व स्वतंत्र असून, तो सुव्यवस्थित व सुसंगत असा होता व आहे. तसाच म्हणावयास सुलभ व ऐकावयास सुश्राव्य असा आहे. अतएव या वेदाच्या प्रसारार्थ व प्रचारार्थ स्वतंत्र असा एक पक्ष निर्माण करून, तद्द्वारां लोकोपकारार्थ व लोकहितार्थ या

शुद्ध वेदाचा जगांत प्रसार व प्रचार करावा असें त्यांना वाटे. याबाबत त्यांना सर्वांचा संपूर्ण पाठिंबा होता.

शुक्ल यजुर्वेदाचा वाढदिवस श्रावण शुक्ल पौर्णिमेस असतो. त्या दिवशीं भगवान् सूर्यनारायणानें प्रसन्न होऊन याज्ञवल्क्यांस शुक्ल यजुर्वेदाचा स्फूर्तिरूपानें पाठ दिला होता. त्या दिवशीं याज्ञवल्क्यानें श्रावणी आटोपल्यावर सूर्यनारायणाचें ध्यान करून व सरस्वतीचें स्मरण करून 'श्री शुक्ल यजुर्वेदीय वाजसनेय शाखा' या नांवाची स्वतंत्र संस्था स्थापन केली व त्याचें धुरीणत्व पत्करून त्या कार्याच्या प्रसारार्थ व उत्कर्षार्थ आपणांस आजन्म वाहून घेतलें. त्या दिवसापासून याज्ञवल्क्य हे शुक्ल यजुर्वेद-शाखाप्रवर्तक आद्य व मुख्य गुरुदेव झाले.

गृहस्थाश्रमांत पदार्पण

वैदिक धर्माची सर्व मदार गृहस्थाश्रमावरच अधिष्ठित झालेली आहे. किंबहुना गृहस्थाश्रम म्हणजेच वैदिक धर्म. आणि म्हणून सर्व आश्रमांत त्या आश्रमालाच प्रामुख्यानें अग्रस्थान देण्यांत आलेलें आहे. अर्थात् हा आश्रम साध्य झाल्याशिवाय मानवजन्म सफल व कृतकृत्य होत नाहीं. तो साध्य व्हावयाला एकट्या पुरुषालाच शक्य नाहीं. स्त्रीचें साहचर्य व सहकार्य लागतें. अतएव स्त्रीशिवाय पुरुष हा या बाबतींत असहाय, अपूर्ण नि अर्धवट आहे. तिच्या सहवासानेंच तो पूर्ण होतो.

वैदिक धर्म स्पष्ट सांगतो कीं, 'अर्धो ह वाऽएष आत्मनो यज्जाया तस्माद्यावज्जायां न विन्दते नैव तावत्प्रजायतेऽसर्वो हि तावद्भवसि अथ यदैव जायां विन्दतेऽथ प्रजायते तर्हि हि सर्वो भवति' (श. प. ५-२-१-१०). पत्नी ही पुरुषाची अर्धांगी आहे. म्हणून जोंपर्यंत तो जाया मिळवीत नाहीं, तोंपर्यंत तो प्रजोत्पत्ति करूं शकत नाहीं आणि म्हणून तोंपर्यंत तो अपूर्णच असतो. जेव्हां तो जाया मिळवून तिच्या ठायीं प्रजोत्पादन करील तेव्हांच तो पूर्ण होतो. यावरून वैदिक धर्मात स्त्रीचें स्थान किती उच्च आहे व तिचें सहकार्य किती जरूर आहे याची कल्पना सहज येईल. 'गृहस्थ' या शब्दांतील 'गृह' या शब्दाचा अर्थच 'जाया' 'पत्नी' 'गृहिणी' असा असून, तो ऋग्वेदांत तसा स्पष्ट बोलून दाखविण्यांत आलेला आहे. 'जायेदस्तं' जाया म्हणजेच घर असें तेथें स्पष्टच म्हटलें असून, तोच भाव 'न गृहं गृहमित्याहुः गृहिणी गृहमुच्यते' या मनूजीच्या वचनांत प्रतिबिंबित झाला आहे. तेव्हां गृहस्थाश्रमांत ज्यास शिरावयाचें आहे त्याला विवाह करून स्त्रीचें सख्य व सहकार्य मिळविणें अपरिहार्यच आहे.

तेव्हां, जो वेदोपासक आहे–ज्याची वैदिक धर्मावर श्रद्धा आहे–त्याला ब्रह्मचर्याश्रमांतील संपूर्ण ध्येय साध्य करून घेतल्यावर गृहस्थाश्रमी बनणें हें ओघानेंच प्राप्त होतें. कारण मानवजन्म कृतार्थ व्हावयाचा, कृतकृत्य व्हावयाचा तो या गृहस्थाश्रमांतच होय. प्रपंच व परमार्थ साधण्याचें हेंच एकमेव स्थान होय. आणि ज्यानें ते दोन्ही साधले, तोच कृतकृत्य झाला असें मानणारा वैदिक धर्म असून, स्वर्गाची दिव्य दौलत त्यासाठींच आहे, असें त्याचें स्पष्ट सांगणें आहे. जो वैदिक आर्यकुलांत जन्मतो, तो जन्मत:च तीन ऋणें घेऊन जन्मतो. देवऋण, ऋषिऋण व पितृऋण. हीं तीन ऋणें जन्मल्याबरोबर त्याच्या मागें लागलेलीं असून तीं फेडल्याशिवाय तो कृतकृत्य झाला असें धर्मदृष्टया मानतां व म्हणतां येत नाहीं. आणि या ऋणांतून मुक्त झाल्याशिवाय त्याला स्वर्गाचा दरवाजा उघडला जाणारहि नाहीं! म्हणून प्रपंच व परमार्थ, इहलोक व परलोक हे दोन्ही साधण्यासाठीं म्हणून गृहस्थाश्रमाचा अवतार आहे. शिवाय देवोपासना, यज्ञोपासना, ही फक्त या आश्रमाचीच मिरासदारी आहे हें विसरून भागावयाचें नाहीं.

हें सर्व सांगण्याचें कारण कीं याज्ञवल्क्य ब्रह्मचर्याश्रमांतील आपलें ध्येय साध्य करून घेऊन, घरीं परत आल्यावर गृहस्थाश्रमांत पदार्पण करणार हें ठरल्यासारखेंच होतें. या वेळीं त्यांचें वय जवळ जवळ तीस बत्तीस वर्षांचें असावें. याज्ञवल्क्य गृहस्थाश्रमी होऊं पाहतात ही बातमी बाहेर पसरतांच जो तो त्यांना जामात करून घेण्यास पुढें येऊं लागला. अखेर कात्यायनी त्यांची गृहलक्ष्मी झाली! कात्यायनी सुंदर तर होतीच, पण नुसत्या सौंदर्यावर याज्ञवल्क्य भुलणारे प्रेमवेडे नव्हते.

तिचें शील व स्वभाव याला महत्त्व देऊन स्त्रीचें मूल्य वाढविणारे तीनहि गुण तिच्यांत पूर्णत्वानें वास करीत असल्यामुळें तिला त्यांनीं आपली गृहिणी केलें.

'धर्मप्रजारत्यर्थोहि विवाहः' हें वैदिक विवाहाचें श्रेष्ठ व सुंदर ध्येय पूर्ण त्यांच्या दृष्टीसमोर असल्यामुळें त्या रोखानें आतां संसारचक्रें हलूं लागलीं. वरील वचनाकडे दृष्टि दिल्यास देहतर्पणार्थो हि विवाहः' व 'रामा रमणाय' हें जें आधुनिकांचें विवाहसूत्र आहे, त्यापेक्षां वरील वैदिकाचें सूत्र किती तरी सरस, समंजस व सयुक्तिक आहे. याज्ञवल्क्यांच्या एकाकी जीवनाला आतां निराळें वळण लागलें. तरुण तरुणीचा नवा संसार म्हणजे तो एक त्यांना नवें जगच असतो. स्त्रीपुरुषांच्या सांसारिक जीवनांत विविध भावनांचें नंदनवन आपोआपच खुलतें. मग तो राजाचा राजवाडा असो वा गरिबाची चंद्रमौळी झोपडी असो! कोठें झालें तरी दाम्पत्यजीवनांतून उठणारे प्रेमाचे फवारे व आनंदाच्या लहरी एकच व सारख्याच! प्रेमाच्या नंदनवनांत व आनंदाच्या साम्राज्यांत श्रीमंत गरीब हा भेदच नाहीं. सर्वांना एकच माप.

स्त्रीपुरुषांचा जीव—पतिपत्नींचा आत्मा—एक अखंड होण्याचा खराखुरा मार्ग म्हणजे सुशील पत्नीची अनन्य पतिभक्ति व सालस पतीची निर्भेळ पत्नीनिष्ठा हा एवढाच आहे. सती कात्यायनी तर आपल्या पतिरायाला साक्षात् देव मानीत असे. आणि देव म्हणजे तरी काय? देणारा तो देव. 'देवो दानात्' अशी देव शब्दाची व्याख्या असून, स्त्रीला इच्छित गोष्टी देऊन तिचें मनोवांछित पूर्ण करून तिला सुखांत व खुषींत ठेवणारा तो तिचा देवच. याच अर्थानें पतीला देव समजून आर्य स्त्रिया

त्याला पूज्य मानीत व मानतात. या बाबतींत सीतेनें अरुंधतीला दिलेलें उत्तर मोठें मार्मिक आहे. मी माझ्या पतीला श्रीरामचंद्राल देवाप्रमाणें पूज्य कां मानतें, याचें तिचें उत्तर फार नामी असून तें पुढील वचनांत आहे तें असें; 'मितं ददाति हि पिता मितं भ्राता मितं सुतः। अमितस्य हि दातारं भर्तारं का न पूजयेत्॥ बाप काय, भाऊ काय, मुलगा काय स्त्रीला जें काय देतो तें मित म्हणजे मर्यादितच असतें. पण अमित देणारा, ती मागेल तें सर्व देणारा, तिचे सर्व मनोरथ पूर्ण करणारा तिचा पति हा एकटाच असून, तशा पतिदेवाला पूज्य कां मानूं नये ? असें तिनें सांगितलें आहे.

सीतेच्या या वचनांत स्त्रीचें सर्व अंतःकरण पूर्ण भरलेलें असून, तें सांसारिक स्त्रियांना खात्रीनें मननीय आहे.

आणि हें वचन डोळ्यापुढें ठेवूनच भारतीय आर्य महिलांनीं गृहिणींच्या श्रेष्ठ व पवित्र कर्तव्याला जागून, गृहस्थाश्रमाला सुंदर उजाळा देऊन झोपडीचा स्वर्ग बनवून दाखविला आहे. तसा प्रकार जगाच्या इतिहासांत क्वचितच पाहावयास मिळतो. 'अस्मिन् गृहे गार्हपत्याय जागृहि' ही वेदवाणी सतत डोळ्यापुढें ठेवून याज्ञवल्क्यांच्या त्या गृहलक्ष्मीनें आपल्या नूतन संसाराची मांडणी व थाटणी इतक्या चातुर्यानें व दक्षतेनें केली कीं त्या साध्या संसारांत तिनें प्रत्यक्ष स्वर्गच उभारून दाखविला.

स्त्रीपुरुषांचा संसार सुखाचा व यशस्वी होण्याची गुरुकिल्ली वेदनारायणानें यापुढील मंत्रांत ठेवून दिली आहे. ती ज्याला सांपडली त्याचा संसार सुखाचा झालाच म्हणून समजावा. विवाहप्रसंगीं वर वधूला उद्देशून म्हणतो कीं (यदेतद् हृदयं मम तदस्तु हृदयं तव। यदेतद् हृदयं तव तदस्तु हृदयं मम)। हे वधू ! माझें जें मन आहे तसेंच तुझेंहि असावें व तुझें जें आहे

तसेंच माझेंहि असेल. गृहस्थाश्रम सुखी व आनंदमय होण्याचें मर्म काय तें इथें आहे. स्त्री-पुरुष हें विवाहरज्जूनें बद्ध झाल्यावर हा वरील मंत्र अहर्निश डोळ्यापुढें ठेवून त्याप्रमाणें वागूं लागतील तर संसार गाडा सुरळीत चालून ' कल्याणं तत्र वै ध्रुवम् ' ही मनूक्ति मूर्तिमंत अवतरली म्हणून खास समजावें. सांगण्याचें तात्पर्य असें कीं, योगीश्वर आतां विवाह करून गृहस्थाश्रमी झाले आणि धकाधकीच्या जागतिक जीवनांत त्यांनीं उडी घेतली.

जनक-याज्ञवल्क्य भेट

याज्ञवल्क्य गृहस्थाश्रमी झाल्यावर पुढें एके दिवशीं श्वेतकेतु व सोमशुष्म हे त्यांच्या भेटीस आले. तेव्हां त्यांच्या–त्याच्यांत कांहीं विचारविनिमय होऊन इष्ट साधनार्थ दौऱ्यावर निघाले. वाटेंत त्यांना जनक राजा भेटला. तो रथांतून चालला होता. या तिघांना पाहून त्यानें आपला रथ थांबविला. त्यांना अग्निहोत्रासंबंधीं माहिती हवी होती म्हणून ते म्हणाले. "आपण अग्निहोत्र कसें करतां, हें मला सांगाल काय ?"

श्वेतकेतु–सूर्य व अग्नि या दोन देवतांप्रीत्यर्थ धर्माच्या म्हणजे तापविलेल्या दुधाच्या दोन आहुती आहवनीय अग्नींत आम्ही नित्य देत असतों. आदित्य हा उष्णदुग्ध (धर्म) आहे. त्या दुधाची आहुती सूर्य देवाला उद्देशून मी संध्याकाळीं अग्नींत देऊन हवन करतों. त्याचप्रमाणें अग्नि हा सुद्धां उष्ण आहे. त्याला उद्देशून घर्माची आहुती आदित्यामध्यें हवन करतों.

जनक–असें केलें म्हणजे काय होतें ?

श्वेतकेतु–याप्रमाणें जो करतो, त्याची अखंड भरभराट होते. त्याचप्रमाणें त्याचा लौकिकहि वाढतो. इतकेंच नव्हें तर त्याचें आदित्य व अग्नि यांच्याशीं सख्य जुळून, अखेर तो सूर्य व अग्नि लोकांत जाऊन राहतो.

नंतर जनक राजा सोमशुष्माकडे वळून म्हणाले "सोमशुष्मा आपला अग्निहोत्राचा प्रकार कसा आहे ?"

सोमशुष्म–मी तेजच तेजामध्यें हवन करतों..

जनक–तें कसें ?

सोमशुष्म–आदित्य हा तेज आहे. त्याला उद्देशून सायंकालीन अग्नींत हवन करतों. आणि अग्नि हा सुद्धां तेजच आहे. त्याला उद्देशून सकाळीं आदित्यामध्यें आहुती देतो.

जनक–म्हणजे काय होतें ?

सोमशुष्म–जो याप्रमाणें अग्निहोत्र करतों, तो मोठा तेजस्वी होतो. तसाच मोठा लौकिकवान होतो आणि चांगला भोक्ताहि होतो. आणि मरणोत्तर सूर्य व अग्नि या देवतांचें सायुज्य व सालोक्य प्राप्त करून घेतो.

जनक राजा याज्ञवल्क्यांना म्हणाला, 'अग्निहोत्राचा आपला प्रकार कसा आहे ?'

याज्ञवल्क्य–माझा प्रकार कांहींसा निराळा आहे. मी अग्नि हा गार्हपत्यांतून वर काढून घेतों. असें करणें हेंच अग्निहोत्र होय. आतां सूर्य जेव्हां अस्तास जातो, तेव्हां सर्व देवहि त्याबरोबरच निघतात आणि ते जेव्हां मी अग्नि बाहेर काढलेला पाहतात, तेव्हां ते परत वळतात. नंतर यज्ञपात्रें स्वच्छ धुऊन, ती वेदीवर यथास्थान ठेवून धार काढल्यावर ते देव जेव्हां मजकडे पाहतात व मी त्यांजकडे पाहतों तेव्हां त्या दुधानें मी आहुती देऊन त्यांना संतुष्ट करतों. असा माझा अग्निहोत्र विधि आहे.

जनकाला हें निवेदन ऐकून हर्ष झाला. तो म्हणाला, अग्निहोत्राविषयीं अधिक सूक्ष्म व अधिक खोल आपण विचार केलेला आहे. आपला हा विधि ऐकून मला आनंद झाला. याबद्दल मी आपणांस शंभर गायी बक्षिस देतों. या विधीसंबंधींची संपूर्ण माहिती अद्यापहि मला मिळत नाहीं. अग्निहोत्र म्हणजे त्या दोन आहुतींची उत्क्रांति, प्रगति, आधार, तृप्ति, त्यांचें पुनरागमन

वगैरे संबंधीं संपूर्ण ज्ञान आपणांस झाल्यासारखें दिसत नाहीं. असें म्हणून राजा रथांत बसून निघाला.

राजा निघून गेल्यावर या तिघांत विचारविनिमय झाला. जनक हा क्षत्रिय आहे व आम्ही ब्राह्मण आहोंत. त्यामुळें या विधीसंबंधीं आपणच अधिकारी आहोंत. या संबंधीं त्याच्याशीं वादविवाद करावा म्हणून पुढें लागलीच ते त्याच्या भेटीस निघाले. राजानें रथ थांबविला. त्याला त्यांचा उद्देश ध्यानीं आला. तो म्हणाला, 'ठीक आहे. आतां अग्निहोत्राच्या आहुतींची उत्क्रांति व प्रगति वगैरेसंबंधीं स्पष्ट खुलासा करतों. अग्निहोत्रांत ज्या दोन आहुति देण्यांत येतात त्या यथाविधि दिल्यावर प्रथम त्या अंतरिक्षांत प्रवेश करतात. आणि त्या अंतरिक्षालाच आहवनीय (अग्नि) करतात. वायूला समिधा व किरणाला शुद्ध आहुती करून त्या अंतरिक्षाला संतृप्त करतात. नंतर त्या वर आकाशांत जातात. त्यावेळीं आकाश हाच आहवनीय अग्नि केला जातो. आणि सूर्य हा समिधा आणि चंद्र हा शुद्ध आहुति होतो. या आहुतीनें आकाश संतृप्त झाल्यावर मग तेथून त्या आहुति पृथ्वीवर येतात आणि या पृथ्वीला आहवनीय अग्नि करतात. तेव्हां अग्नि हा त्याच्या समिधा आणि वनस्पति या शुद्ध आहुति होतात. या आहुतीपासून पृथ्वी संतृप्त होते. नंतर त्या मनुष्यांत शिरतात आणि त्याचें मुख हें त्याचें आहवनीय, जिव्हा ही समिधा आणि अन्न हें त्यांचें शुद्ध अन्न होतें. याप्रमाणें त्या मनुष्याला तृप्त करतात. हें जाणून जो अन्न भक्षण करतो त्यानें अग्निहोत्र केलें असें होतें. या नंतर त्या पुढें तेथून निघतात व त्या स्त्रीमध्यें शिरतात. तेव्हां तिचें उपस्थ हें आहवीय, तिचें उदर समिधा आणि रेत हें शुद्ध आहुति करण्यांत येते आणि खरोखर

हें जाणून जो आपल्या स्त्रीजवळ जाईल त्यानें अग्निहोत्र केल्यासारखें होतें आणि त्यापासून जो मुलगा होईल तो लोकोद्धारकर्ता होतो. या क्रियेस अग्निहोत्र म्हणतात.

जनकराजाचें हें विवेचन ऐकून याज्ञवल्क्यांस परम समाधान व अति आनंद झाला. नंतर त्यांनीं जनकास वर दिला. तेव्हां जनक म्हणाला, 'मला आतांच त्याची गरज नाहीं. मला जेव्हां इच्छा होईल तेव्हां आपणांस मनमुराद प्रश्न विचारण्याची संपूर्ण मुभा असावी.' 'तथास्तु' असें याज्ञवल्क्यांनी म्हटल्यावर जनक तेव्हांपासून ब्राह्मण झाला. (श. प. ११।६।२)

गुरु-शिष्यांचा खटका

शुक्ल यजुर्वेदाची आंखणी व घटना आतां चांगली तयार झालेली असून, त्याच्या प्रचार–कार्यासहि प्रारंभ झालेला होता. याज्ञवल्क्य आपल्या शिष्य व सहकारी मंडळीस बरोबर घेऊन जनतेला शुक्ल यजुर्वेदाचें महत्व, मर्म व मोठेपणा समजाऊन देण्यासाठीं म्हणून मिथिलेच्या आसपासच्या पंचक्रोशींत भेट देण्याच्या उद्योगास लागले. लोकांवर त्यांच्या भाषणाची छाप पडत जाऊन, शुक्ल यजुर्वेदाविषयीं त्यांच्या मनांत कुतूहल जागृत होऊन तें दिवसेंदिवस वाढीस लागले. कोणी त्यांचें स्वागत करीत, कोणी तारीफ करीत, तर कोणी त्याविषयीं अधिक खुलासा विचारीत.

याच सुमारास जनकराजाच्या वडिलांनीं एक मोठा यज्ञ करण्याचें ठरवून, त्याप्रमाणें सिद्धता चालविली होती. या यज्ञांत वैशंपायन यांजकडे अध्वर्यूचें काम होतें. ऋग्वेदाचे प्रमुख आचार्य पैल यांजकडे होत्याचें काम असून, सामवेदाचे कुलगुरु जैमिनी हे उद्गता व अथर्वदाचे मुख्य गुरु सुमंत हे ब्रह्मा झाले होते. याप्रमाणें या यज्ञांत मोठमोठ्या ऋषींनीं भाग घेतला होता. शिवाय इतर जे उप-ऋत्विज लागतात, ते त्या त्या आचार्यांचे शिष्य झाले होते. यज्ञ समारंभ जनक राजाच्या घरचाच असल्यामुळें त्याला एकप्रकारचें महत्व प्राप्त होऊन, लोकांत त्याविषयीं मोठें औत्सुक्य, कुतुहल व दर्शनलालसा उप्तन्न झाली होती.

याज्ञवल्क्यादि या समारंभांत उपस्थित होते. पण ऋत्विज

म्हणून नव्हते. तो मान त्यांना अद्याप मिळालेला नव्हता. अजून शुक्ल यजुर्वेदाला मिळावी तशी लोकमान्यता व राजमान्यता मिळालेली नव्हती. खासगीरीतीनें लोक तिकडे सहानुभूतीनें व चिकित्सक दृष्टीनें पहात. पण उघडपणें त्याला मान्यता देण्याचें धाडस करण्यास अजून लोक धजत नसत. याज्ञवल्क्यांची योग्यता व विद्वत्ता त्यांना पटली होती. पण त्यांच्या नवीन कलाकृतीकडे श्रद्धा-युक्त आदरभावानें पहाण्याची मनोवृत्ति अद्याप त्यांच्यांत व्हावी तशी जागृत झालेली नव्हती. म्हणून प्रतिष्ठित लोकांत त्यांना आचार्याचा मान क्वचितच मिळे. येथे ते जे हजर होते ते एक सामान्य प्रेक्षक म्हणून होते. आचार्य जरी होते तरी ' सुधारक आचार्य ' अशा दृष्टीनें लोक त्यांच्याकडे पहात.

या यज्ञांत अध्वर्यूचें काम वैशंपायनाकडे होतें. पूर्व-संकेताप्रमाणें यज्ञकार्यास प्रारंभ झाला व पुढें कांहीं दिवस चालून तो आटोपण्याच्या बेतांत आला. येथपर्यंत सर्व कांहीं सुरळीत व सुसूत्र चाललें. आतां फक्त प्रायश्चित्तविधि तेवढा शिल्लक राहिलेला होता. हा विधि अध्वर्यूनें करावयाचा असतो. यज्ञानुष्ठानांत अध्वर्यूकडून जी काय खोटी होते अगर प्रमाद घडतात, त्यांबद्दल प्रायश्चित्त घ्यावयाचें असतें. आणि हा विधि यथाशास्त्र झाला तरच यज्ञ सफल होतो, नाहीं तर नाहीं. प्रायश्चित्तविधि घ्यावयाचें काम अध्वर्यूचें असल्यामुळें तो प्रसंग वैशंपायनावर येऊन पडला. त्यांनीं प्रायश्चित्तविधि केला, पण तो साधावा तसा साधला नाहीं. वैशंपायनांनीं खूप खटपट केली पण ती कांहीं शास्त्रशुद्ध साधण्याचा रंग दिसेना. अतएव यज्ञांत वैगुण्य उद्भवून तो निष्फल होण्याचा प्रसंग ओढवला.

त्यामुळें सर्वजण मोठ्या विवंचनेंत पडले. वैशंपायनहि हतबुद्ध झाल्यासारखे दिसूं लागले. जनकाचें मन गोंधळांत पडलें. जनतेंत खळबळ सुरू झाली. फजितीची वेळ येऊन ठेपली. आतां पुढें काय असा पुरोहित मंडळीला प्रश्न पडला.कोणास कांहीं सुचेना कीं कांहीं उमजेना. वेळ तर मोठी आणीबाणीची येऊन ठेपली.

याप्रमाणें सर्व चिताक्रांत असतां कर्मधर्मसंयोगानें जनकांची दृष्टि अकस्मात् याज्ञवल्क्यांकडे वळली. त्यांना पहातांच त्यांचें कर्मकौशल्य,मंत्रसिद्धि व ज्ञानसामर्थ्य यांची जनक राजास आठवण होऊन ते तडक त्यांच्याकडे निघाले व वैशंपायनहि मागोमाग तेथें आले. जनकराजे हात जोडून त्यांच्यापुढें उभे राहिले व वैशंपायनहि असहाय्य मुद्रेनें त्यांच्याकडे पाहूं लागले. जनकांनीं यज्ञकार्य सुधारून तो सफल करण्याची त्यांना विनंति केली आणि वैशंपायनांनीं त्यास आपली मूकसंमति दिली. थोर नि उदार मनाच्या याज्ञवल्क्यांना त्यांची दया आली आणि मागचे सर्व विसरून ते चटकन् तेथून उठले. आपल्या नूतन शुक्लयजुर्वेदांतील सुधारलेल्या पद्धतीप्रमाणें प्रायश्चित्तविधि त्यांनीं यथाशास्त्र करून दाखविला. त्यामुळें मोठा चमत्कार झाला. हा विधि उरकल्याबरोबर तो यज्ञ परिपूर्ण होऊन सफल झाला.जनक आनंदभरित झाले.वैशंपायनांच्या तोंडावर हास्य झळकलें आणि प्रेक्षकांनीं आनंदानें जयजयकार केला. जनकांनीं या प्रसंगीं ऋत्विजांस यथायोग्य दक्षिणा दिली.

वैशंपायन व याज्ञवल्क्य या उभयतांमध्यें दक्षिणेबद्दल मात्र वाद उत्पन्न झाला. दक्षिणेपैकीं सगळीच जरी नाहीं तरी योग्य हिस्सा मिळालाच पाहिजे असा आग्रह याज्ञवल्क्यांनीं धरला. अध्वर्यूला जी दक्षिणा मिळावयाची तिच्यावर आपण अध्वर्यूचें काम केल्यामुळें आपलाच पूर्ण अधिकार आहे,असा वैशंपायनांचा

दावा होता. यज्ञ सफल झाला तो कांहीं अध्वर्यूंच्या करामतीनें नसून आपल्या कौशल्यामुळें झाला, असें याज्ञवल्क्यांचें त्यास प्रत्युत्तर होतें. अर्थात आपणहि त्यांत बरोबरीनें वाटेकरी आहोंत, असा त्यांचा आग्रह होता. जनक राजे तो प्रकार पहात तटस्थ उभे होते. पण त्यांना या वादांत कांहींच करतां येईना. वाद तर हट्टास पेटत चालला आणि प्रकरण वाढत वाढत हातघाईवर येऊन ठेपलें !

वैशंपायनहि कांहीं सामान्य पुरोहित नव्हते. प्रत्यक्ष अध्वर्यू होते. यज्ञांतील सर्व व मुख्य कामगिरी ही त्यांनींच पार पाडली होती. मग त्यांना तरी कसा दोष द्यावा ? इकडे याज्ञवल्क्यांकडे पहावें तर न्यायाची बाजू त्यांचीच होती. तेथेंहि बोलण्याची सोय नव्हती. यज्ञ सफल झाला तो त्यांच्या कौशल्यामुळे नि त्यांच्या मंत्रसिद्धीमुळें ! वैशंपायनांचा केवळ दुराग्रह होता. प्रकरण भडकण्याचा संभव दिसताच देवल ऋषि या वादांत पडले. आणि मध्यस्थी करून अर्धी अर्धी दक्षिणा दोघांत वाटून दिली आणि वाद मिटविला.

याज्ञवल्क्यांचा हा त्यांच्या सार्वजनिक जीवनांतील पहिला नि प्रचंड विजय होय. (भा. शां. ३२३, १८–२०)

या अपूर्व विजयामुळें याज्ञवल्क्यांचा बोलबाला होऊन जिकडे तिकडे तो वाढीस लागला. जनक राजाची या नूतन विजयामुळें त्यांच्यावर विशेष भक्ति व श्रद्धा जडली. मागेंच त्यांना त्यांच्या विद्येची चमक दिसून आलेली होती आणि या विजयानें तर तिच्यांत विशेष भर पडली. या प्रसंगानें शुक्ल-यजुर्वेदाचा प्रभावहि त्यांच्या प्रतीतीस आला. त्यामुळें या वेदाकडे ते सहानुभूतीनें पाहूं

लागले. जनक राजाचा वेदविद्येंत व तत्त्वज्ञानांत फार मोठा अधिकार होता. ते मोठे धर्मनिष्ठ व विद्याव्यासंगी असे राजे होते. अशा श्रेष्ठ व विव्दान राजपुरुषानें याज्ञवल्क्यांची प्रशंसा व कौतुक करावें, यावरूनच याज्ञवल्क्यांची अलौकिक बुद्धिमत्ता व प्रचंड कर्मकौशल्य याची साक्ष सर्वांना पटली.

जनक राजाच्या यज्ञांतील या अपूर्व विजयामुळें याज्ञवल्क्यांच्या भावी जीवनास फार मोठें उत्तेजन मिळून तरुण मंडळींत त्यांचा जम चांगला बसत चालला. तरुण हे कोठेंहि व केव्हांहि नव्या जमान्याचे मोठे चाहते असतात. हा अनुभव जसा आज आहे तसाच तो याज्ञवल्क्यांच्या काळींहि दिसून आला. याज्ञवल्क्यांचें यज्ञांतील तें अपूर्व कौशल्य व अजब कर्तबगारी पाहून अनेक तरुणांचा त्यांच्या सभोंवती घोळका जमला आणि त्यांचे तोंडून कांहीं ऐकावयास मिळेल व त्यांचा सहवास प्राप्त होईल या उद्देशानें ते त्यांना म्हणाले 'याज्ञवल्क्यजी ! आम्हांस बोधपर अशी कथा अगर गोष्ट सांगण्याची कृपा करा.' याज्ञवल्क्यांनीं त्यांचें म्हणणें कबूल केलें व म्हणाले, 'मी सांगणाऱ्या गोष्टींत एक मोठें तत्त्व गर्भित असून, शहाण्यांना तें मार्गदर्शक होईल असें मी समजतों. देव व असुर हे दोघेहि एकाच प्रजापतीचे मुलगे. पण दोघांच्या स्वभावांत जमीन अस्मानाचा फरक. वर्चस्वासाठीं त्यांच्यांत मोठी स्पर्धा सुरू झाली. त्यांत उन्मत्त असुरांना मोठा गर्व झाला होता. शिवाय ते मोठे स्वार्थी व कंजुष होते. आपल्या नखांतील माती देण्यास देखील ते तयार नव्हते. ते म्हणत कीं, आपण श्रम करून मिळविलेल्या कमाईतला अंश दुसऱ्याला फुकट काय म्हणून द्यावा ? आमच्याहून थोर, श्रेष्ठ व ज्ञानी-असे देव आहेत तरी कोण ? थोरपणांत; श्रेष्ट-

पणांत तसेंच ज्ञानांतहि आम्हींच त्यांच्यापेक्षां सरस आहोंत. अशा चढेल वृत्तीनें ते बेहोष होऊन आपल्या प्राप्तींतील एक कणदेखील ते दुसऱ्यास द्यावयास तयार नसत.

देव कांहीं निराळ्या प्रकृतीचे होते. ते या असुरासारखे कांहीं चढेल व कंजुष वृत्तीचे नव्हते. त्यांच्यांत विचार होता,औदार्य होतें नि सत्प्रवृत्ति होती.त्यांचा सांगण्यासारखा मुख्य गुण म्हणजे त्यागवृत्ति हा होय. आपल्यांतील सुखाचा कांहीं अंश इतरांसहि देऊन राहिलेल्याचा ते उपभोग घेत असत. आपण अन्न शिजवून त्यांतीलहि कांहीं भाग ते दुसऱ्यांस देत असत. ही त्यांची त्यागवृत्तिच त्यांच्या अभ्युदयास कारण झाली होती.

त्यावेळीं प्रजापतीची मदत दोघांनाहि अवश्य वाटली. प्रजापति जिकडे जाईल म्हणजे ज्यांचा पक्ष घेईल, त्यांचा विजय ठरल्यासारखा होता.म्हणून ते दोघेहि प्रजापतिकडे जाऊन आपल्यास मदत करण्याबद्दल त्यास विनवूं लागले. तेव्हां प्रजापति त्यांना म्हणाला, ‘ तुम्हांमध्यें गुणानें जो श्रेष्ठ असेल त्याच्याकडे मी येईन.आपली प्रौढी दाखविण्यासाठीं स्वार्थवृत्तीचें व अहंकारबुद्धीचे तिखटमीठ लावून असुरांनीं मोठा डोलारा उभा केला. प्रजापतीनें त्यांचें सर्व म्हणणें शांतवृत्तीनें ऐकून घेतलें. देव म्हणाले, ‘ पिताजी ! असुरांप्रमाणें आमच्याजवळ तसें सांगण्यासारखें कांहीं नाहीं. फक्त एकच गोष्ट आम्हीं आपल्यापुढें ठेवूं इच्छितों, ती म्हणजे दुसऱ्यांस संतोष देऊन त्यांत आम्हीं आनंद मानतों. आमचा आनंद त्यागवृत्तींत आहे. स्वार्थांत नाहीं. आम्हांला विनय आवडतो. अहंकार आवडत नाहीं. आम्हांस सत्य व न्याय आवडतो. कपट मात्र आवडत नाही. ’

प्रजापतीनें दोघांचें म्हणणें ऐकून घेतल्यावर देवांचें म्हणणें त्याला पटल्यामुळें व आवडल्यामुळें तो देवांस जाऊन मिळाला. अर्थात त्यानें आपलें देवाला सर्वस्व देऊन टाकलें. त्याचा परिणाम असा झाला कीं, त्या देवासुर स्पर्धेत देवांचा विजय होऊन असुरांचा पराभव झाला. देवांचा जो विजय झाला, तो त्यांच्या त्यागवृत्तीमुळें आणि असुरांचा जो पराभव झाला तो त्यांच्या ताठर व उन्मत्तवृत्तीमुळें होय. (श. प. ५-१-१-१ व २)

सारांश ताठरवृत्ति व अहंकारवृत्ति हें पराभवाचें मूळ आहे. ('पराभवस्येतन्मुखं यदतिमानः' श. प.) मनुष्य तिच्या आहारीं गेला म्हणजे त्याची नेहमी अशीच फसगत होते.

शुक्ल यजुर्वेदाची उभारणी

शुक्ल यजुर्वेदाला नीट व व्यवस्थित असें मूर्तस्वरूप देऊन त्याची सुसंगत व सुव्यवस्थित अशी कायमची उभारणी करण्याची आतां वेळच येऊन ठेपली होती. जनक राजाच्या यज्ञानंतर अनेक ठिकाणीं याज्ञवल्क्यांनीं आपल्या जबाबदारीवर लहान मोठे यज्ञ हातीं घेऊन त्यांत आपण तयार केलेल्या पद्धतीप्रमाणें मंत्र म्हणून व कार्यक्रम आखून, तें सर्व यज्ञ समारंभ अथपासून इतिपर्यंत यथासांग व पूर्ण यशस्वी करून दाखविण्याचें श्रेय संपादन केलें. त्यामुळें लोकांत त्यांचा जम हळुहळूं बसत जाऊन, त्यांचें पाऊल आस्ते आस्ते पुढें पडत चाललें होतें.

शिवाय त्यांच्या सभोंवती तरुण, उत्साहि, विद्वान व होतकरू अशा कर्तबगार मंडळींचा जमाव दिवसेंदिवस फुगतच चाललेला होता. सूर्य व सरस्वती यांचा दिव्य व मंगल वरप्रसाद त्यांना लाभला असून मंत्रविद्या व योगविद्या यांत त्यांचा हातखंडा आहे, ही गोष्ट लोकांच्या नजरेंत भरत चाललेली होती. त्याकाळीं त्यांच्या तोडीचा दुसरा विद्वान नाहीं, अशी त्यांची सर्वत्र प्रसिद्धी होऊन याचीं प्रचीति पाहण्यासाठीं मोठमोठे विद्वान व पंडित देखील त्यांच्या दर्शनास येऊं लागले होते. याज्ञवल्क्यांच्या विद्यापूत व मधूर वाणींत अशी कांहीं विलक्षण मोहिनी भरली होती कीं, जो जो त्यांच्या भेटीस म्हणून येई, तो तो त्यांच्या विद्वत्ताप्रचुर, मुद्देसूद व विनययुक्त भाषणानें मंत्रमुग्ध होऊन त्यांच्याविषयीं त्यांच्या अन्त:करणांत प्रेम व आदर उत्पन्न होत असे.

गुणी जनांना जगापुढें येण्यास कोठेंहि व केव्हांहि कांहीं कालावधि लागतोच. मधून मधून त्यांच्या कामांत अडथळे हे उत्पन्न होतात आणि मत्सरी लोक नाहीं तसल्या अफवा पसरवून त्याची टिंगल व टवाळी करूं लागतात ! अर्थात गुणी जनांच्या सत्त्वाची ही एक प्रकारची परीक्षाच असते. यांतून तावून सुलाखून जो बाहेर पडेल त्याचें यश मग चंद्राप्रमाणें वाढीस लागते, असा इतिहासाचा अनुभव असून याज्ञवल्क्यहि त्याला अपवाद नव्हते. तथापि त्यांची बुद्धिमत्ता व कर्तृत्वशक्ति अचाट व अफाट असल्यामुळें त्यांचा जम बसावयास फार अवधि लागला नाहीं. रोज त्यांच्या आश्रमांत धार्मिक विषयावर व तत्त्वज्ञानावर व्याख्यान व चर्चा होत असल्यामुळें जिज्ञासु श्रोतुवृंदाची तेथें चिकार गर्दी जमूं लागली. त्यामुळें थोड्याच कालावधींत त्यांची छाप चांगली बसत चालली आणि त्यांचा लौकिक देशभर चन्दनाप्रमाणें पसरत चालला. त्यांच्या सभोंवती जमलेल्या प्रभावळींत कण्व, माध्यंदिन, जाबाल इत्यादि शिष्यगण विशेष उल्लेखनीय आहेत. भगवान बुद्धाचा लौकिक व मान वाढविण्यास त्याचे शिष्य मोग्गलायन व सारीपुत्र हे जसे कारणीभूत झाले, तद्वत याज्ञवल्क्यांचें विभूतितत्त्व व नांवलौकिक वाढविण्यास कण्व व माध्यंदिन हे शिष्यद्वयच मुख्यांशानें कारणीभूत झाले होते.

शुक्ल यजुर्वेदाचा महिमा व प्रभाव दिवसेंदिवस लोकांच्या निदर्शनास येत जाऊन त्या वेदाला आतां व्यवस्थित, सुटसुटीत व एकसूत्री संहितेचें रूप देऊन, त्याची शाश्वत उभारणी करण्याची अगदीं निकडीची वेळ येऊन ठेपली. सूर्यनारायणाच्या कृपेनें लाभलेल्या दिव्य स्फूर्तीनें व सरस्वतीच्या

मंगल वरप्रसादानें त्यांनीं तेव्हांच शुक्लयजुर्वेदाची घडी मनांत बसवून ठेविली होती. तिला मूर्त स्वरूप देण्याच्या उद्योगास ते आतां लागले. या कामीं त्यांना कण्व व माध्यंदिन यांची चांगली मदत झाली.

शुक्लयजुर्वेदाचें संहितीकरण करण्याच्या वेळीं त्यांच्या बुद्धीची ठेवण कशी होती याचा थोडासा कानोसा घेतला पाहिजे. त्यांनीं वैशंपायनांच्या मागणीवरून त्यांचा वेद टाकून दिला होता. तथापि बुद्धीवर त्याचा उमटलेला संस्कार मात्र पुसला गेला नव्हता. याज्ञवल्क्यांची कृष्ण यजुर्वेदाची जाणीव पूर्ण बुजली नव्हती. शिवाय त्यांना ऋगृवेदाचेहि पूर्ण ज्ञान होतें. उद्दालकाजवळ राहून तत्वज्ञान व मंत्रसिद्धी यांचें त्यांनीं पूर्ण शिक्षण घेनलें होतें. हिरण्यनाभाजवळ राहून योगाभ्यासहि केलेला होता.

त्यांनीं रोमहर्षणाकडून इतिहास व पुराणाचें ज्ञान संपादन केलें. या सर्वांचा उपयोग त्यांनीं शुक्ल यजुर्वेद तयार करतांना करून घेतला. अथर्ववेदाचा अभ्यासहि त्यांनीं केला होता.

याज्ञवल्क्यांनीं शुक्लयजुर्वेद नवीन तयार केला म्हणजे काय केलें, याची यथार्थ कल्पना सामान्य जनतेला नाहीं. महाराष्ट्र जनता तरी या बाबतींत संपूर्ण अज्ञानांत व अंधकारांत चांचपडत आहे. याज्ञवल्क्यांनीं प्राचीन वैदिक वाङमयांत कांही तरीं नवीन वाङमयसृष्टि निर्माण केली कां आणखी काय केलें, हें नक्की कळल्याशिवाय त्यांचें खरें वैशिष्टच व योग्यता यांचे मनांत यथार्थ प्रतिबिंब उमटणें हें सहसा शक्य नाहीं. त्यांची खरी योग्यता व श्रेष्ठत्व अजमावयाचें झाल्यास त्यांचा शुक्लयजुर्वेद व त्याबरोबरच शतपथ ब्राह्मण या दोन्ही अमर कलाकृतीचें संपूर्ण

ज्ञान व्हावयास पाहिजे, त्याशिवाय याज्ञवल्क्यांचें वैशिष्ट्य ओळखूं येणार नाहीं.

याज्ञवल्क्यांनीं नवा यजुर्वेद कसा तयार केला, हें समजण्यासाठीं प्रथम मूळ यजुर्वेद कसा होता याचें ज्ञान असणें जरूर आहे. म्हणजेच शुक्ल यजुर्वेदाची उभारणी कशी करण्यांत आली याची यथार्थ कल्पना येण्यासाठीं याज्ञवल्क्यांची अपार विद्वत्ता, चातुर्य, प्रतिभा, विशाल कल्पकता, विलक्षण योजकता आणि अलौकिक ज्ञानसामर्थ्य इत्यादि अष्टावध्यांनी लोकोत्तर दैवी संपत्तीचा विचार करणें जरूर आहे. याज्ञवल्क्यांनीं शुक्लयजुर्वेद जो तयार केला तो कांहीं नव्यानेंच डोक्यांतून स्वतंत्र असा काढला नाहीं. त्यावेळीं विद्यमान असलेल्या कृष्णयजुर्वेदाच्या मूळ मांडणींत व क्रमांतच आमूलाग्र फरक करून, त्याचप्रमाणें त्यांतील मंत्रांत, स्वरांत व पठणांतहि आपल्या मनाजोगती मुरड देऊन, त्याची रचना केली. केवळ कृष्णयजुर्वेदावरच अवलंबून न राहतां त्याच्या जोडीला ऋग्वेद व अथर्ववेद यांचेंहि भरपूर सहाय्य त्यांनीं घेतलें. शिवाय स्वतंत्र असें कांहीं मंत्रहि त्यांत समाविष्ट करण्यांत आले. सारांश, कृष्णयजुर्वेदाचें स्वरूप सर्वस्वीं बदलून, शुक्लयजुर्वेदाला सुंदर व बाळसेदार असें नवीन सुटसुटींत रूप देण्यांत त्यांनीं आपली अलोट विद्वत्ता व प्रतिभा खर्ची घातली आहे. शिवाय त्यांचें शतपथांतील अप्रतिम व अतुल ज्ञानभांडार विद्वानांना आश्चर्यचकित करीत आहे. कृष्णयजुर्वेद व शुक्लयजुर्वेद याचें येथें थोडक्यांत साम्य व विरोध दाखवून व इतर कांहीं महत्त्वाची माहिती देऊन शुक्लयजुर्वेदाची उभारणीं कशी करण्यांत आली, याची थोडक्यांत ओळख पुढें करून देण्यांत येणार आहे,

कृष्णयजुर्वेद असावा तसा व्यवस्थित नाही. त्याची रचना ओबडधोबड असून मांडणी गुंतागुंतीची व अस्वाभाविक अशी आहे. तेथें मंत्र व ब्राह्मण यांची सरभेसळ झाली असल्यामुळें विषयमांडणीला अवश्य असणारा सुसंगतपणा व सुटसुटीतपणा यांचा त्याच्यांत अभाव दिसून येतो. मंत्रभाग स्पष्ट व सुगम नाहीं. विषयाची भेसळ झाल्यानें त्याची रचना क्लिष्ट व बोजड झाली आहे. त्याचप्रमाणें विषय प्रतिपादनांतहि सलगपणा व स्वाभाविकपणा दिसून येत नाहीं. या सर्व गोष्टी याज्ञवल्क्यांच्या पूर्ण नजरेंत भरल्यामुळें त्यांतील सर्व गोंधळ, अव्यवस्थितपणा, अस्वाभाविकपणा व विसंगतपणा मोठ्या चातुर्यानें त्यांनीं काढून टाकला आहे. शुक्लयजुर्वेदाच्या उभारणींत सकृतदर्शनींच मंत्रभाग व ब्राह्मणभाग असे दोन स्वतंत्र व पृथक् पृथक् भाग पाडून, त्या त्या भागांत त्या त्या विषयांचीच मांडणी करून, तो तो विषय समजण्यांस सुबोध व सुलभ करून ठेविला आहे. प्रत्येक विषय सुव्यवस्थित, सुसंगत, व सलग मांडून शुक्लयजुर्वेद ऋग्वेदाप्रमाणें व्यवस्थित करण्यांत आला आहे. शुक्लयजुर्वेदाची उभारणी करतांना कृष्णयजुर्वेदाचें अस्वाभाविक व अशास्त्रीय रूप सबंध बदलून टाकून त्यास अभिनव, रेखीव, सरळ व सहजसुंदर असें एकसूत्रीपणाचें गोंडस रूप दिलें आहे.

कृष्ण व शुक्ल यजुर्वेदांतील साम्य-विरोध

योजनेंत फरक

कृष्णयजुर्वेदाची ग्रंथयोजना कांड, प्रपाठक, अनुवाद व मंत्र अशा पद्धतीची असून, शुक्ल यजुर्वेदाची अध्याय व मंत्र अशी आहे. ऋग्वेदाची मांडणी अष्टक, अध्याय, सूक्त व ऋचा किंवा मंडल, सूक्त व ऋचा अशी द्विविध आहे. तिन्हीं वेदांची रचना स्वतंत्र व वैशिष्टचपूर्ण आहे असें दिसतें. कृष्णयजुर्वेदाच्या रचनेचा थोडक्यांत तपशील असा:-

कृष्णयजुर्वेदाची योजना

कांड	प्रपाठक	अनुवाक	मंत्र	ब्राह्मण	मिश्र
१ लें	८	१४६	११४	२३	९
२ रें	६	७५	११	६४	०
३ रें	५	५६	१८	१९	१९
४ थें	७	८२	८२	०	०
५ वें	७	११९	४४	६८	७
६ वें	६	६६	०	६६	०
७ वें	५	१०७	५२	५५	०
७	४४	६५१	३२१	२९५	३५

वरील कोष्टकावरून कृष्णयजुर्वेदाचे ७ कांड, ४४ प्रपाठक, ६५१ अनुवाक, ३२१ मंत्र, २९५ ब्राह्मण आणि ३५ मंत्र व ब्राह्मण, असें मिश्र अनुवाक अशी एकंदर ग्रंथरचना आहे.

शुक्ल यजुर्वेदाची योजना आहे ती अशी. त्याचें एकंदर चाळीस अध्याय असून मंत्रसंख्या १९७५ आहे. तिचा तपशील:–

शुक्ल यजुर्वेदाची योजना

अध्याय	मंत्र	अध्याय	मंत्र	अध्याय	मंत्र	अध्याय	मंत्र
१	३१	११	८३	२१	६१	३१	२२
२	३४	१२	११७	२२	३४	३२	१६
३	६३	१३	५८	२३	६५	३३	९७
४	३७	१४	३१	२४	४०	३४	५८
५	४३	१५	६५	२५	४७	३५	२२
६	३७	१६	६६	२६	२६	३६	२४
७	४८	१७	९९	२७	४५	३७	२१
८	६३	१८	७७	२८	४६	३८	२८
९	४०	१९	९५	२९	६०	३९	१३
१०	३४	२०	९०	३०	२२	४०	१७
१०	४३०	१०	७८१	१०	४४६	१०	३१८

1975

क्रमांत फरक

कृष्ण व शुक्ल यजुर्वेदाची ठेवण

दोनहि संहितात निरनिराळ्या वेदविहित कर्माकरितां मंत्र सांगितले आहेत. त्या कर्माच्या क्रमांत देखील फरक आहे तो थोडक्यांत पुढें दर्शविला आहे.

कृष्ण		शुक्ल	
	विषय संहितास्थान		विषय संहितास्थान
१	पुरोडाशीय १–१–१ ते १–१–१४	१	दर्शपौर्णिमास १–१–३१ ते
२	अध्वर १–२–१ ते १–३–१४		२–१–२८
३	ग्रह १–४–१ ते १–४–४२	२	पिंडपितृयज्ञ २–२९ तें ३४
४	हवन १–४–४३ ते १–४–४६	३	अग्न्याधेय ३–१ ते ८
५	पुनराधेय १–५–१ ते १–५–४	४	उपस्थान ३–९ ते ४३
६	अग्नि-उपस्थान १–५–५ ते	५	चातुर्मास्य ३–४४ ते ६२
	१–५–११	६	अग्निष्टोम ४–१ ते ३७
७	ऐष्टिक याजमान १–६–१ ते		,, ५–१ ते ४३
	१–६–६		,, ६–१ ते ३७
८	ऐष्टिक याजमान विधि १–६–७		,, ७–१ ते ४८
	ते १–७–६		,, ८–१ ते ३२
९	वाजपेय १–७–७ ते १–७–१३	७	वाजपेय ९–१ ते ३४
१०	राजसूय १–८–१ ते १–८–२२	८	राजसूय ९–३५–४०
११	काम्यपशु २–१–१ ते २–१–११		,, १०–१ ते ३०
१२	काम्य इष्टयः २–२–१ ते २–	९	अग्निचयन ११–१ ते ८३
	४–१४		,, १२–१ ते ११७
१३	दर्शब्राह्मण २–५–१ ते २–५–४		,, १३–१ ते ५८
	व २–६–१ ते २–६–६		,, १४–१ ते ३१
१४	दर्श होत्र २–५–५ ते २–५–१२		,, १५–१ ते ६५
१५	द्रव्य होत्र २–६–७ ते २–६–१२		,, १६–१ ते ६६
१६	औपानुवाक ३–१–१ ते ३–५–११		,, १७–१ ते ९९
१७	अग्नि ४–१–१ ते ४–६–५	१०	वसोर्धारा १८–१ ते २९.
	४–७–१ ते ४–७–१५	११	सौत्रामणि १९–१ ते ९५.
	५–१–१ ते ५–६–१०		,, २०–१ ते ९०
	५–७–१ ते ५–७–१०		,, २१–१ ते ६१

२८	अश्वमेध ४-६-६ ते ४-६-९	१२	अश्वमेध २२-१ ते ३४
	५-६-११ ते ५-६-२३		,, २३-१ ते ६५
	५-७-११ ते ५-७-२६		,, २४-१ ते ४०
	७-२-११ ते ७-२-२०		,, २५-१ ते ४७
	७-३-११ ते ७-३-२०	१३	खिल अध्याय २६ ते
	७-४-१२ ते ७-४-२२		अ.४० पर्यंत खिलसंज्ञक मंत्र.
	७-५-११ ते ७-५-२५		
२९	अध्वर विधि ६-१-१ ते		
	७-१-२०		
३०	सत्रायण ७-२-१ ते ७-२-१०		
	७-१-१ ते ७-३-१०		
	७-४-१ ते ७-४-११		
	७-५-१ ते ७-५-१०		

ही अशी कृष्ण व शुक्ल यजुर्वेदाची ठेवण आहे.

मांडणींत फरक

कृष्णयजुर्वेदाची मांडणी

इषे त्वोर्जे त्वा वायवः स्थोपायवः स्थ देवो वः सविता प्रार्पयतु श्रेष्ठतमाय कर्मण आ प्यायध्वमघ्निया देवभागमूर्जस्वतीः पयस्वतीः प्रजावतीरनमीवा अयक्ष्मा मा वः स्तेन ईशत माऽघशँ्सो रुद्रस्य हेतिः परि वो वृणक्तु ध्रुवा अस्मिन्गोपतौ स्यात बह्वीर्यजमानस्य पशून्पाहि ॥ १-१-१ ॥

शुन्धध्वं दैव्याय कर्मणे देवयज्यायै मातरिश्वनो धर्मोऽसि द्यौरसि पृथिव्यसि विश्वधाया असि परमेण धाम्ना दृहस्व माह्वार्वसूनां पवित्रमसि सहस्रधारँ्हुतः स्तोको हुतो द्रप्सोऽग्नये बृहते नाकाय स्वाहा द्यावापृथिवीभ्याँ्सा विश्वायुः सा विश्वव्यचाः सा विश्वकर्मा सं पृच्यध्वमृतावरी रूर्मिणीर्मधुमत्तमा मन्द्रा धनस्य सातये सोमेन त्वा ऽ ऽ तनच्मीन्द्राय दधि विष्णो हव्यं रक्षस्व ॥ १-१-३ ॥

शुक्ल यजुर्वेदाची मांडणी

इषे त्वोर्जेत्वा वायव स्थ देवो वः सविता प्रार्पयतु श्रेष्ठतमाय कर्मणऽआप्यायध्वमघ्न्याइन्द्राय भागं प्रजावतीरनमीवाऽअयक्ष्मा मा व स्तेनऽईशत माघशँ्सो ध्रुवाऽअस्मिन् गोपतौ स्यात बह्वीर्यजमानस्य पशून्पाहि ॥ १-१ ॥

वसोः पवित्रमसि द्यौरसि पृथिव्यसि मातरिश्वनो धर्मोऽसि विश्वधाऽअसि दृँ्हस्व मा ह्वार्मा ते यज्ञपतिर्ह्वार्षीत् ॥ १-२ ॥

सा विश्वायुः सा विश्वकर्मा सा विश्वधायाः । इन्द्रस्य त्वा भागँ् सोमेनातनच्मि विष्णो हव्यं रक्ष ॥ १-४ ॥

प्रत्युष्टँ् रक्षः प्रत्युष्टाऽअरातयो निष्टप्तँ रक्षो निष्टप्ताऽअरातयः । उर्वन्तरिक्षमन्वेमि ॥ १-७ ॥

धूरसि धूर्व धूर्वन्तं धूर्व तं योऽस्मान्धूर्वति तं धूर्व यं वयं

कर्मणे वां देवेभ्यः शकेयं वेषायत्वा प्रत्युष्टँ रक्षः प्रत्युष्टा अरातयो धूरसि धूर्व धूर्वन्तं धूर्वन्तं योऽस्मान्धूर्वति तं धूर्वयं वयं धूर्वामस्त्वं देवानामसि सस्नितमं पप्रितमं जुष्टतमं वह्नितमं देवतमम्अहृतमसि हविर्धानं दृँहस्व मा मेर्मा सं विक्था मा त्वा ॥ १ ॥ हिंसिषमुरु वाताय देवस्य त्वा सवितुः प्रसवेऽश्विनोर्बाहुभ्यामग्नये जुष्टं निर्वपाम्यग्नीषोमाभ्यम् ।

धूर्वामः। देवानामासि वह्नितमँ सस्नितमं पप्रितमं जुष्टतमं देवहूतमम् ॥ १-८ ॥

अहृतमसि हविर्धानं दृँहस्व मा ह्वार्मा ते यज्ञपतिर्ह्वार्षीत् । विष्णुस्त्वा क्रमतामुरु वातायापहतँरक्षो यच्छन्तांपञ्च॥१-९॥

देवस्य त्वा सवितुः प्रसवेऽश्विनोर्बाहुभ्यां पूष्णो हस्तभ्याम्। अग्नये जुष्टं गृण्हाम्यग्नीषोमाभ्यां जुष्टं गृण्हामि॥१-१०।

येथे कृष्णयजुर्वेदाचे म्हणजे तैत्तिरीय संहितेचे पहिले ३ अनुवाद दिले असून त्यांतील मंत्राची मांडणी शुक्ल यजुर्वेदांत कशी करण्यांत आली आहे हें समजण्यासाठीं शुक्ल यजुर्वेदाचे प्रारंभीचे कांहीं मंत्र दिले आहेत. चौथ्या एकच अनुवाकांतून कांहीं मजकूर घेऊन थोडा फार बदल करून शुक्ल यजुर्वेदाचे पहिल्या अध्यायांतील ८-९-१० हे मंत्र तयार झाले आहेत हें चाणाक्ष वाचकांच्या तेव्हांच नजरेंत येणार आहे. असा विषय प्रतिपादनांचा बदल पुष्कळशा मंत्रांतून झालेला आढळतो.

मंत्रांत फरक

नुसत्या मांडणीच नव्हें परंतु कित्येक मंत्रांतदेखील बदल झालेला आढळतो. त्याविषयीं कल्पना पुढील मंत्रावरून कळून येईल.

बदल असलेले मंत्र

कृष्ण

इषे त्वोर्जे त्वा वायवः स्थोपायवःस्थ देवो वः सविता प्रार्पयतु श्रेष्ठतमाय कर्मण आ ध्यायध्वमघ्निया देवभागमूर्ज-स्वतीः पयस्वतीः प्रजावतीर-नमीवा अयक्ष्मा मा वः स्तेन ईशत माऽघशँ सो रुद्रस्य हेतिः परि वो वृणक्तु ध्रुवा अस्मि-न्गोपतौ स्यात बव्हिर्यजमानस्य-पशून्पाहि ।। १-१-१- ।।

मनो ज्योतिर्जुषतामाज्यं विच्छिन्नं यज्ञँ समिमं दधातु बृहस्पतिस्तनुतामिमं नो विश्वे देवा इह मादयन्ताम्।।१-६-३।।

देहि मे ददामि ते नि मे धेहि नि ते दधे निहारमिन्नि मे हरा निहारम् (१) नि हरामि ते ।।१-८-४ ।।

शुक्ल

इषे त्वोर्जे त्वा वायवस्थ देवो वः सविता प्रार्पयतु श्रेष्ठतमाय कर्मणऽआप्यायध्वमघ्न्याऽइन्द्राय भागं प्रजावतीरनमीवाऽअयक्ष्मा मा वस्तेनऽईशत माघशँ सो ध्रुवाऽ अस्मिन् गोपतौ स्यात बव्हीर्यजमानस्य पशून्पाहि ।। १-१ ।।

मनो जूतिर्जुषतामाज्यस्य बृहस्पतिर्यज्ञमिमं तनोत्वरिष्टं यज्ञँ समिमं दधातु विश्वे देवासऽइह मादयन्तामोऽम्प्रतिष्ठ २-१३

देहि मे ददामि ते नि मे धेहि नि ते दधे । निहारं च हरासि मे निहारं निहराणि ते।।३-५०।।

अग्ने गृहपते सुगृहपतिरहं त्वया गृहपतिना भूयास ँ् सुगृहपतिर्मया त्वं गृहपतिना भूयाः शत ँ् हिमास्तामाशिषमा शासे तन्तवे ज्योतिष्मतीम्॥१-६-६॥

अग्ने गृहपते सुगृहपतिस्त्वयाऽग्नेऽहं गृहपतिना भूयास ँ सुगृहपतिस्त्वं मयाऽग्ने गृहपतिना भूयाः । अस्थूरि णौ गार्हपत्यानि सन्तु शतं हिमाः सूर्यस्यावृतमन्वावर्ते ॥ २-२७ ॥

मंत्र-सादृश्य

कांहीं मंत्र तसेचे तसे दोन्हीं वेदांत आढळतात. उदाहरणार्थ :-

कृष्ण

नमो मित्रस्य वरुणस्य चक्षसे महो देवाय तदृत ँ् सपर्यत दूरेदृशे देवजाताय केतवे दिवस्पुत्राय सूर्याय श ँ् सत॥१-२-९॥

गर्भो अस्योषधीनां गर्भो वनस्पतीनाम् । गर्भो विश्वस्य भूतस्याग्ने गर्भो अपामसि ॥ ४-२-३ ॥

अन्नपतेऽन्नस्य नो ह्यनमीवस्य शुष्मिणः । प्र प्रदातारं तारिष

शुक्ल

नमो मित्रस्य वरुणस्य चक्षसे महो देवाय तदृत ँ सपर्यत । दूरेदृशे देवजाताय केतवे दिवस्पुत्राय सूर्याय श ँ् सत ॥ ४-३५ ॥

गर्भोऽ अस्योषधीनां गर्भो वनस्पतीनाम् । गर्भो विश्वस्य भूतस्याग्ने गर्भोऽअपामसि ॥ १२-३० ॥

ऊर्जं नो धेहि द्विपदे चतुष्पदे ॥ ४-३-१ ॥

हिरण्यगर्भः समवर्तताग्रे भूतस्य जातः पतिरेक आसीत्। स दाधार पृथिवीं द्याम् (३) उतेमां कस्मैदेवाय हविषा विधेम ॥ ४-१-८ ॥

अयं ते योनिर्ऋत्वियो यतो जातो अरोचथाः । तं जानन्नग्न आ रोहाथा नो वर्धया रयिम् ॥ ४-७-१३ ॥

अन्नपतेऽन्नस्य नो देह्यन-मीवस्य शुष्मिणः । प्र-प्र दातारं तारिषऽ ऊर्जं नो धेहि द्विपदे चतुष्पदे ॥ ११-८३ ॥

हिरण्यगर्भः समवर्तताग्रे भूतस्य जातः पतिरेकऽआसीत् । स दाधार पृथिवीं द्यामुतेमां कस्मै देवाय हविषा विधेम ॥ १३-४॥

अयं ते योनि ऋत्वियो यतो जातोऽअरोचथाः । तं जानन्न-ग्नआरोहाथा नो वर्धया रयिम् ॥ १५-५६ ॥

पठणांत फरक

कृष्ण	शुक्ल
इषे त्वोर्जे त्वा वायवस्थ वः	इखे त्वोर्जे त्वा वायवस्थ वः
सहस्त्रशीर्षा पुरुषः	सहस्त्रशीरिखा पुरुखाः
त्र्यम्बकं यजामहे	त्र्यम्बकं जजामहे
ओषधे त्रायास्व स्वधिते	ओखधे त्रायस्व स्वधिते
धियो यो नः प्रचोदयात्	धियो जो नः प्रचोदयात्
यज्ञेन यज्ञमयजन्त देवाः	जज्ञेन जज्ञमयजंत देवाः

ऋग्वेदाशीं संबंध

यानंतर ऋग्वेदाकडे वळून त्याचा संबंध शुक्ल यजुर्वेदांत किती व कसा आला आहे हें पाहूं. खुद्द ऋग्वेदांत १०४७२ मंत्र असून त्याला जोडून असलेल्या वालखिल्यांत ८० मंत्र आहेत. दोन्हीं मिळन ऋग्वेदाची मंत्रसंख्या एकंदर १०५५२

भरते. आणि यजुर्वेदाची मंत्रसंख्या जवळ जवळ दोन हजार अगदीं नक्की म्हणजे १९७५ भरते. त्यांत ऋग्वेदांतील मंत्र कोठें थोडयाफार फरकानें व कोठें जशाचें तसे मिळून एकंदरींत ६१५ आढळतात. एक गोष्ट सांगतां येईल ती अशीं कीं; शुक्ल यजुर्वेदाचा घाट ऋग्वेदाच्या वळणावर अधिक झुकलेला आहे. ऋग्वेद, शुक्लयजुर्वेद व अथर्ववेद यांचे संहितास्वरूप जवळ जवळ सारख्यांच वळणाचें आहे असें म्हटल्यास त्यांत कांहीं वावगें होणार नाहीं. असो; ऋग्वेद व शुक्ल यजुर्वेद यांच्या मंत्रांत कोठें व कसा फरक आहे हें दोन्हीं वेदांचे तीन मंत्र नमुन्याकरता येथें उद्धृत करून दाखविलें आहे.

मंत्रात फरक

ऋग्वेद	शुक्ल यजुर्वेद
सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्षः सहस्रपात् । स भूमिं विश्वतो वृत्वाऽत्यतिष्ठद्दशाङ्गुलम् ॥ १०-९०-१ ॥	सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्ष सहस्रपात् । स भूमिं सर्वत स्पृत्वात्यतिष्ठद्दशाङ्गुलम् ॥ ३१, १ ॥
ये अग्निदग्धा ये अनग्निदग्धा मध्ये दिवः स्वधया मादयन्ते । तेभिः स्वराळसुनीतिमेतां यथावश तन्वं कल्पयस्व ॥ १०-१५-१४ ॥	ये अग्निष्वात्ता येऽअनग्निष्वात्ता मध्ये दिवः स्वधया मादयन्ते । तेभ्यः स्वराडसुनीतिमेतां यथावशं तन्वं कल्पयाति ॥ १९, ६०, ॥
मा नस्तोके तनये मा न आयौ मा नो गोषु मानो अश्वेषु रीरिषः वीरान्मा नो रुद्र भामितो वधीर्हविष्मन्तः सदमित्त्वा हवामहे ॥२-११४-८॥	मानस्तोके तनये मा नऽआयुषि मा नो गोषु मा नोऽअश्वेषु रीरिषः । मा नो वीरान् रुद्र भामिनो वधीर्हविष्मन्तः सदमित्त्वा हवामहे ॥ १६, १६ ॥

अथर्ववेदाशीं संबंध

अथर्ववेदांत एकंदर ५९८७ मंत्र असून, त्यापैकीं फक्त चाळीस बेचाळीसच मंत्र काय ते शुक्ल यजुर्वेदांत आढळतात. आणि त्यांपैकीं बहुतेक मंत्र मुळांत कमीअधिक फरक करून या वेदांत घेतले आहेत. वाचकांस त्याची थोडीशी कल्पना यावी म्हणून कांहीं मंत्र येथें उध्दृत केलें आहेत:

मंत्रात फरक

अथर्व वेद	शुक्ल यजुर्वेद
सं वर्चसा पयसा सं तनूभिरगन्महि मनसा सं शिवेन। त्वष्टा नो अत्र वरीयः कृणोत्वनु नो मार्ष्टु तन्वोऽ यद् विरिष्टम् ॥ ६–५३–३ ॥	सं वर्चसा पयसा सं तनूभिरगन्महि मनसा सं शिवेन। त्वष्टा सुदत्रो विदधातु रायोऽनुमार्ष्टु तन्वो यद्विलिष्टम् ॥ ८–१६ ॥
यदा बध्नन् दाक्षायणा हिरण्यं शतानीकाय सुमनस्यमानाः। तत् ते बध्नाम्यायुषे वर्चसे बलाय दीर्घायुत्वाय शतशारदाय ॥ १–३५–१ ॥	यदा बध्नन्दाक्षायणा हिरण्यꣳ शतानीकाय सुमनस्यमानाः। तन्म आ बध्नामि शतशारदायायुष्माञ्जरदृष्टिर्यथासम् ॥ ३४–५२ ॥
नैनं रक्षांसि न पिशाचाः सहन्ते देवानामोजः प्रथमजं ह्येऽतत्। यो बिभर्ति दाक्षायणं हिरण्यं स जीवेषु कृणुतेदीर्घमायुः ॥ १–३५–२ ॥	न तद्रक्षाꣳसि न पिशाचास्तरन्ति देवानामोजः प्रथमजꣳ ह्येतत्। यो बिभर्ति दाक्षायणꣳ हिरण्यꣳ स देवेषु कृणुते दीर्घमायुः स मनुष्येषु कृणुते दीर्घमायुः ॥ ३४–५१ ॥
द्रुपदादिव मुमुचानः स्विन्नः स्नात्वा मलादिव। पूतं पवित्रेणेवाज्यं विश्वे शुम्भन्तु मैनसः ॥ ६–११५–३ ॥	द्रुपदादिव मुमुचानः स्विन्नः स्नातो मलादिव। पूतं पवित्रेणेवाज्यमापः शुन्धन्तु मैनसः ॥ २०–२० ॥

मंत्रसाम्य

अथर्ववेद	शुक्ल यजुर्वेद
ब्रह्म जज्ञानं प्रथमं पुरस्तात् वि सीमतः सुरुचो वेन आवः । स बुध्न्या उपमा अस्य विष्ठाः सतश्च योनिमसतश्च वि वः ॥ ४–१–१ ॥	ब्रह्मजज्ञानं प्रथमं पुरस्ताद्वि सीमतः सुरुचो वेन आवः । स वुध्न्या उपमा अस्य विष्ठाः सतश्च योनिमस्तश्च विवः ॥ १३–३ ॥
स्वर्यन्तो नापेक्षन्त आ द्यां रोहन्ति रोदसी । यज्ञं ये विश्वतोधारं सुविद्वांसो वितेनिरे ॥ ४–१४–४ ॥	स्वर्यन्तो नापेक्षन्तऽआद्याँ रोहन्ति रोदसी ।यज्ञं ये विश्वतो धारँ सुविद्वांसो वितेनिरे ॥ १७–६८ ॥
इदमापः प्रवहतावद्यं च मलं च यत् । यच्चाभिदुद्रोहानृतं यच्च शेपे अभीरुणम् ॥ ७–८९–३ ॥	इदमापः प्रवहतावद्यंच मलं च यत् । यच्चाभिदुद्रोहानृतं यच्च शेपेऽअभीरुणम् ॥६–१७॥

याप्रमाणें यजुर्वेदाची स्वतंत्र, सुबद्ध व, सुसंगत मांडणी असून त्याचा तोंडवळा इतर वेदाहून कांहींसा निराळा पण वैशिष्ट्यपूर्ण आहे, हें वाचकांच्या ध्यानांत येण्यास अडचण पडणार नाहीं असो.

मुळी धरली

जनक राजाच्या वडिलांच्या यज्ञांत याज्ञवल्क्यांनीं आपल्या नवीन शुक्लयजुर्वेदाची व प्रयोग कौशल्याची जी थोडीशी चमक दाखविली, तेव्हांपासून जनतेचें लक्ष त्यांच्याकडे जास्त वेधलें. लोकांत त्यांचा लौकिक वाढत चालला. शहाणे लोक त्यांचें कौतुक करूं लागलें. नवीन वेद असलातरी तो प्रभावी आहे, असा तज्ञांचा ग्रह होत चालला. अर्थात याज्ञवल्क्यांच्या कर्तृत्वावर लोकांची श्रद्धा बसून ते या सुधारक आचार्यांकडे प्रेमादरानें पाहूं लागले.

तशांत जनक राजाची तर श्रद्धा व भक्ति त्यांच्यावर विशेषच बसली. यज्ञांतील त्यांचें कर्मकौशल्य पाहून मनांत फारच कौतुक वाटलें व आनंदहि झाला. या यज्ञाचा परिणाम पुढें असा झाला कीं, जनकांचा तेव्हांपासून याज्ञवल्क्यांशीं संबंध व स्नेहभाव वाढीस लागला. कधीं कधीं ते स्वतः याज्ञवल्क्यांच्या आश्रमाकडे येत, तर कधीं कधीं त्यांना आपल्या राजवाड्यावर बोलावून घेत. जसजसा त्यांचा या उदयोन्मुख ब्राह्मणश्रेष्ठाशीं घरोबा दृढ होत चालला व त्याच्याशीं वादचर्चा वाढत गेली, तसतसे; याज्ञवल्क्यांची अगाध विद्वत्ता, वेदविद्येवरील प्रभुत्व, यज्ञविषयक खोल व सूक्ष्म माहिती, कर्मकौशल्य, वाक्चातुर्य, विषयप्रतिपादन शैली, दैवतज्ञान इत्यादि अनेक अलौकिक गुण पाहून, जनक राजे खरोखर आश्चर्यानें चकित झाले ! हे जनक म्हणजे कांहीं हौशी व चैनी राजे नव्हतें. ते मोठे विद्यासंपन्न व विद्याव्यासंगी तसेच कर्मनिष्ठ व

ज्ञानप्रिय , राजकारणपटु व प्रजाहित दक्ष असे महान भाग्यशाली राजे होते. तत्वज्ञानांत त्यांचा अधिकार फारच मोठा होता. अशा नृपतिश्रेष्ठांच्या प्रेमादरभावास ते पात्र ठरले, या पुरती याज्ञवल्क्यांच्या योग्यतेची दुसरी साक्ष पाहिजे कशाला ?

एकदां असें झाले कीं याज्ञवल्क्य नेहमींप्रमाणें जनकाच्या भेटीस म्हणून राजवाड्यांत सहज गेले होते. तेव्हां तेथें संभाषणाच्या ओघांत अग्निहोत्रासंबंधीं प्रश्न निघून जनकांनीं त्यांस प्रश्न केला ' याज्ञवल्क्यजी ! आपण अग्निहोत्र जाणतां काय ? '

याज्ञवल्क्य – होय राजा ! मी तें जाणतों.

जनक – मग तें काय आहे ? अर्थात त्याचें हवन द्रव्य कोणतें ?

याज्ञवल्क्य – सामान्यतः दूध हें त्याचें हवन आहे.

जनक – दूध नसेल तर ? दुसरें कांहीं आहे काय ?

याज्ञवल्क्य – होय, जनका ! दुसरें हविर्द्रव्यहि आहे.

जनक – मग तें काय आहे ?

याज्ञवल्क्य – दुधाच्या अभावी भात, नाहीं तर यव, हीं हविर्द्रव्यें घ्यावींत.

जनक – भात नि यव नसतील तर ?

याज्ञवल्क्य – मग अरण्यांतील औषधि.

जनक – त्याहीं नसतील तर ?

याज्ञवल्क्य – मग उदक.

जनक – तेंहि नसल्यांस ?

याज्ञवल्क्य – मंग जगांत हवन करण्यासारखें असें कांहींच राहिलें नाहीं.

जनक – मग कसें ? अग्निहोत्र बंद पाडावें कीं; काय ?

याज्ञवल्क्य – नाही, राजा ! नाहीं. तसें करतां येणार नाहीं. हवन करण्यांस कांहींच जर मिळालें नाहीं, तर अखेर श्रद्धे-मध्यें सत्याचें हवन करावें म्हणजे झालें.

जनक (हंसून) बरोबर, याज्ञवल्क्यजी ! आपण खरोखर अग्निहोत्र काय हें जाणतां. तुमच्या ज्ञानाबद्दल मी तुम्हाला शंभर गाई देत आहे. (श. प. ११, ३, १, २, ३)

जनकांना अग्निहोत्र माहीत नव्हतें असें नव्हें. तर याज्ञव-ल्क्यांच्या ज्ञानाची खोली त्यांना अजमावयाची होती. या दिवसा-पासून जनकांनीं शुक्लयजुर्वेदाचा उघड उघड स्वीकार करून, राजवाड्यांत त्या वेद प्रक्रियांना आश्रय दिला ! व त्या वेदाचे ते पुरस्कर्ते झाले !!

आतांपर्यंत शुक्लयजुर्वेदाला राजाश्रय मिळाला नव्हता. तो आतां मिळून त्याला राजमान्यतेचा एक नवा अंकुर फुटला ! याज्ञवल्क्याचें चाहते म्हणजे जनकाचे प्रधान 'मित्र' हे अगोदरच शुक्लयजुर्वेदाचे अनुयायी बनले होते आणि आतां जनक राजानेंहि त्या वेदाचा स्वीकार केला. ही बातमी मिथिलेंत दिनेदिनें पसरत जाऊन जनताहि त्याला आश्रय देऊं लागली. या सर्वांचा असा परिणाम झाला कीं मिथिलेंत वाजसनेयांना मानाचें स्थान प्राप्त झालें !

अशा संधीस जनक राजांनीं गंगातीरीं एक अश्वमेध यज्ञ करण्याचें ठरवून त्यांत याज्ञवल्क्यांना अध्वर्यूंची मानाची जागा दिली. याज्ञवल्क्यांनीं तो महायज्ञ शुक्लयजुर्वेदाप्रमाणें अथपासून इतिपर्यंत यथासांग पुरा करून दाखविला. व शुक्लयजुर्वेदाचा महिमा व आपलें मंत्रसामर्थ्य आणि कर्मनैपुण्य जगास पटवून

दिलें. त्यांची ही कर्तबगारी पाहून जनक भारीच संतोषले व त्यांचा यथोचित मानसन्मानहि केला. या यज्ञाची हकीकत ब्रह्म-पुराणांत थोडक्यांत आढळते ती अशी :– 'अश्वमेधादिकं कर्म चकार जनको नृपः । याजयामास विप्रेन्द्रो याज्ञवल्क्यश्च तं नृपम् ।। २१ ।। गंगातीरं समाश्रित्य यज्ञान्मुक्तिमवापराट् ।।२२।। (ब्रह्म.पु. अ. ८८, २१ व २२ श्लोक) 'जनकराजानें अश्वमेध यज्ञ केला. तो विद्वत्श्रेष्ठ याज्ञवल्क्यांच्या पुरोहित्वानें गंगातीरावर पार पाडला. यज्ञामुळें राजा मुक्ति पावला.'

राजा जनमेजय व वाजसनेय याज्ञवल्क्य

याज्ञवल्क्यांचा कीर्तिपरिमळ पसरतां पसरतां तो आतां थेट हस्तिनापुरांत जनमेजयांच्या राजवाड्यांत जाऊन थडकला. त्यांची अगाध विद्वत्ता, सुप्रिय राजाच्या मंदिरांत घडलेला तो अद्‍भुत मंत्र-प्रभाव, वैशंपायनांनीं परत मागितल्याबरोबर तत्काल केलेला यजुर्वेदत्याग, अरण्यांत जाऊन केलेली कडक तपश्चर्या, सूर्याकडून मिळविलेला वरप्रसाद, नवीन वेदाची आंखणी व उभारणी, जनकराजाच्या यज्ञांत दाखविलेलें अपूर्व कर्मकौशल्य इत्यादि एकापेक्षां एक अद्‍भुत गोष्टी राजाच्या कानावर अधून मधून येत जाऊन, दिवसेंदिवस त्यांचा ग्रह याज्ञ-वल्क्याविषयीं अनुकूल बनत चालला. तशांत जनक राजाच्या यज्ञापासून तर त्यांच्या विद्वत्तेची, कौशल्याची, व पौरुषाची सर्वत्र वाखाणणी होऊन, त्यांच्याविषयींचा प्रेमादरभाव जनतेंत वाढीस लागला. जनमेजय हे गुणीजनांचे चाहते असल्यामुळें याज्ञवल्क्यांना जवळ करण्याची त्यांना बुद्धि झाली असल्यांस त्यांत नवल नाहीं.

पूर्वी कथन केलेला सर्पसत्राचा अपुरा राहिलेला थोडासा वृत्तांत येथें देणे योग्य होईल. जनमेजयानें सर्पसत्राचा मोठ्या इर्षेनें व धूमधडाक्यानें प्रारंभ केला होताच, तो जोरानें चालवून त्यांत असंख्य नागांचा स्वाहाकार केला. आतां पूर्णाहुतीचा दिवस उजाडला. पाळी खुद्द तक्षकाच्या आहुतीची होती. पूर्णाहुतीची वेळ आली.-मात्र तेवढ्यांत एक चमत्कार झाला. ऐनवेळीं तक्षक

नाहीसा झाला. आपल्या बचावासाठीं तो इन्द्राजवळ गेला होता. त्याच्या नांवाचा स्वाहाकार उच्चारण्यांचाच काय तो अवकाश, त्यास यज्ञमंडपांत येणें भाग होतें. कारण मंत्राचा प्रभावच तसा दांडगा होता ! पुरोहित त्याच्या नांवाचा स्वाहाकार उच्चारतात न उच्चारतात तों इतक्यांत आस्तिक मुनि तेथें अचानक उपस्थित झाले आणि त्यांनीं तें सत्र थांबवून तक्षकांस जीवदान देण्याविषयीं त्यांनीं राजापाशीं मोठ्या काकुळतेनें विनंति केली.

आस्तिक मुनींची ती विनंति ऐकून राजा विचारांत पडला. एकदम त्यास 'होय,' 'नाही' म्हणवेना. काय उत्तर द्यावें यात्रिषयीं त्यास कांहीं सुचेना. म्हणून त्यानें तेथील ब्राह्मणांचा सल्ला विचारला. ही गोष्ट आयतीच आस्तिकांच्या पथ्यावर पडली. या संधीचा फायदा घेऊन त्यांनीं तेथील कांहीं ब्राह्मणांची भेट घेतली आणि त्यांस आपणांकडे वळवून घेतलें. त्याचा परिणाम असा झाला कीं, अखेर त्या ब्राह्मणांनीं आस्तिकांची विनंति मान्य करण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणें राजानें तो सल्ला मान्य करून तें सत्र तेवढ्यांवरच थांबविलें व सत्राची परिसमाप्ति करण्यांत आली. अर्थात ज्याचेसाठीं एवढा खटाटोप करून तें सत्र चालविण्यांत आलें होतें, तो तक्षक मात्र त्या संकटांतून सहिसलामत सुटला ! (आदीपर्व. अ. ५६)

कांहीं दिवसांनीं राजाच्या कानांवर अशी गुणगुण येऊं लागली कीं, तें सर्पसत्र थांबविणेचा सल्ला देण्यांत ब्राह्मणांचा कांहीतरी स्वार्थ होता. प्रथम ही गोष्ट त्यास खरी वाटेना. पण आपल्या बापाच्या—म्हणजे परीक्षिताच्या—बाबतींतहि असाच कांहींसा प्रकार घडून आला होता. हा विचार त्यांच्या डोळ्या-

पुढें येऊं लागतांच त्याची मनस्थिति हळुंहळूं साशंक बनत चालली. परिक्षित सात दिवसांत सर्पदंशानें मरण पावणार, ही बातमी त्यावेळीं एका काश्यप नांवाच्या ब्राह्मणास कळल्यावरून तो आपल्या मंत्रविद्येच्या जोरावर राजाचे प्राण वांचवून त्याच्याकडून खूप संपत्ति उकळावी, या हेतूनें राजाकडे यावयास निघाला असतां तक्षकानें त्यास मधेंच गांठून, तो मागेल तितकें द्रव्य त्यास देऊन त्याला परत लावून दिलें होतें. (आदिपर्व ४३) ही गोष्ट जनमेजयास आधींच कळून चुकली होती. तो विचार आतां जागृत होऊन येथेंहि तसा प्रकार झाला नसेल कशावरून असा संशय येऊन तो बेचैन झाला.दिवसेंदिवस राजाचें मन अधिकाधिकच संशयग्रस्त होऊं लागलें आणि त्या मानानें जुन्या ब्राह्मणांवरील त्याची श्रद्धा व भक्ति ढासळत जाऊन, तेथें अविश्वास व औदासिन्य यांची दाट छाया पसरत चालली. अर्थात ही झळहि थोड्यांबहुत प्रमाणांत त्याचे पुरोहित वैशंपायनासहि लागल्याशिवाय राहिली नाही.

जनमेजय याप्रमाणें मनांतून उदास व विषण्ण बनला असतां जनकाच्या यज्ञांतील हकीगत त्याच्या कानावर आली. व तेथें याज्ञवल्क्यांनीं दाखविलेलें कर्मकौशल्य व दक्षिणेच्या बाबतींतील तेजस्वीपणा ऐकून राजाची याज्ञवल्क्यांवर श्रद्धा जडली व त्यांस आमंत्रण पाठवून आपल्या घरीं आदरानें बोलावून घेतलें.

याज्ञवल्क्य राजाचें आमंत्रणावरून मिथिलेहून हस्तिनापुरास आले. याज्ञवल्क्यांचें दर्शन होतांच राजाच्या मनांत त्यांच्या विषयीचा आदरभाव अधिक उचंबळून आला. केवढी शांत व तेजस्वी त्यांची ती मूर्ति ! याज्ञवल्क्यांची शरीरकांति व मुखसौंदर्य होतेंच

तसें आकर्षक. शांत व प्रसन्न मुद्रा, उंच नि विशाल भाल, तेजस्वी व टपोरे डोळे, सरळ नाक, भरीव गाल, शुभ्र दंत, आणि मुखावर विलसणारे दिव्य ब्रह्मवर्चस्व तेज, तशांत तेजस्वी आकृतीला अलौकिक विद्येची, दिव्य मंत्र प्रभावाची, आणि अपूर्व कर्मकौशल्याची सुंदर व स्वर्गीय जोड मिळाल्यामुळें गुणग्राहक जनमेजयाचें गुणी व उदार मन तेथें आकर्षित झालें.

या भेटीचा परिणाम असा झाला कीं, पुढें याज्ञवल्क्यांचा सहवास जसजसा होत व वाढत गेला, तसतसा वैशंपायन यांच्या विषयीचा आदरभाव ढासळत चालला. जनक राजाच्या यज्ञांत पदरीं अपयश आलें असूनहि वैशंपायनांनीं दाखविलेला स्वार्थी व संकुजितपणा जनमेजयाच्या मनास बिलकूल आवडला नाहीं. सुप्रिय राजाच्या घरीं त्यानें देऊ केलेली गजांत लक्ष्मी स्वाभिमानास डिवचल्यामुळें झिडकारून देणारे मानी याज्ञवल्क्य कोणीकडे आणि यज्ञसमारंभांत अपयश आलें तरीं दक्षिणेसाठीं डोक्यांत राख घालून नसतांहट्ट व त्रागा करणारे वैशंपायन कोणीकडे? गुरूची आज्ञा स्वतः कष्ट सोसून तडीस नेण्यांस हिरीरीनें पुढें येणारे गुरूभक्तिपरायण आज्ञाधारक याज्ञवल्क्य कोणीकडे आणि रागाच्या भरांत भलतांच ग्रह करून घेऊन, दिलेली विद्या परत मागून क्षुद्रबुद्धीचें प्रदर्शन करणारे वैशंपायन कोणीकडे? दोघेहि ऋषितुल्य महापुरुषच खरें पण उभयतांच्या अंतरंगांत केवढा फरक! अशा प्रकारचे तुलनात्मक विचार जनमेजयाच्या मनांत अधुन मधून येऊन सर्पसत्रांतील अपयशाचा दोष त्यावेळच्या दरबारांतील ब्राह्मणांवर–विशेषतः वैशंपायनावर–दिवसेंदिवस बळावत जाऊन, राजाचें मन एका परीनें त्यांच्याविषयीं उदासीन बनत चाललें.

जनमेजय राजे व याज्ञवल्क्य या दोघांमध्यें प्रेमादराचें निकट नातें वाढीस लागलें. हें दृश्य वैशंपायनांस मुळींच आवडलें नाही, अजून राजपुरोहिताचें नातें त्यांचें राजवाड्यांत कायम होतेंच. त्याचा

फायदा घेऊन व संधि साधून त्यांनीं याज्ञवल्क्याशीं संबंध ठेवणें हें बरें नाहीं,असें एकदोन वेळां सांगून पाहिलें.पण जनमेजयांनीं तिकडे कानाडोळांच केला. वैशंपायनाचें मन अधीर व बेचैन होत चाललें. पुन: एकदां राजाला गांठून त्याची चांगली कानउघाडणी करावी या हेतूनें त्यांनीं एकांतांत राजाची भेट घेतली याज्ञवल्क्याला जवळ करणें म्हणजे लोकांत गैरसमज पसरंविणें आहे, सनातन धर्माशीं द्रोह करणें आहे व आपल्या उज्वल परंपरेला खीळ घालून धर्मांत ढवळाढवळ करणें आहे. ही गोष्ट राजकर्त्यास हिताची नाहीं. लोकांच्या धर्मसमजुतींना डिवचलें म्हणजे जनताक्षोभ कोणत्या थरास जाईल, याचा नेम सांगवत नाहीं.' असें म्हणून राजाच्या हितासाठींच आपण ही भेट घेतली असें त्यांना चक्क सांगून पाहिलें.

जनमेजय राजे मोठे सूज्ञ व मोठे धोरणी होते. वैंशंपायनांचा कावा त्यांनीं चट्दिशी ओळखला. वैशंपायनाविषयीं त्यांच्या मनांत जें घोळत होतें, तेंच आतां त्यांना प्रत्यक्ष अनुभवास आलें. याज्ञवल्क्यांचा दिलदार स्वभाव व या राजपुरोहिताची असहिष्णुवृत्ति या दोहोंचें चित्र त्यांच्यापुढें चक्क उभें राहिलें. याज्ञवल्क्याविषयीं मात्र त्यांचा आदर-भाव आतां अधिकच वाढला.

पुढें त्यांनीं कांहीं दिवसानंतर एक पौर्णिमास यज्ञ आरंभून त्यांत वैशंपायनास न बोलावतां, याज्ञवल्क्यांस बोलावलें. ही बातमी वैशंपायनांस समजतांच स्वारीचें पित्त खवळलें ! रागानें लाल होऊन पाय आपटीतच ते यज्ञमंडपांत आले आणि तो यज्ञसमारंभ पाहून राजास व याज्ञवल्क्यांस अद्वातद्वा बोलून व शिव्याशाप देऊन, स्वारी तणतणतच तेथून निघून गेली ! (वायु. ९९, २५०–२५३). जनमेजय राजास हा प्रकार कसासाच वाटला नि तेव्हांपासून पुढें त्यांनीं त्या राजपुरोहिताचा नाद अजिबात सोडून दिला.

वृक्ष फोंफावत चालला

जनमेजय राजे मनाचें मोठे थोर, स्वभावानें अत्यंत उदार, बुद्धिमान व सदाचरणी असून, शिवाय राजधर्माला शोभणारे शौर्य, धैर्य, पराक्रम इत्यादि गुणांत ते सर्वांत वरचढ होते. आपल्या पित्याला कपटानें मारणाऱ्या तक्षकाचा सूड घेण्यासाठीं व सर्पजातीचा निःपात करण्यासाठीं म्हणून सर्पसत्र आरंभून त्यांत सर्पजातीचा धुव्वा त्यांनीं उडवून दिला होता. शेजारच्या सर्व राजांवरहि त्यांनीं मोठा दरारा बसविला असून त्यावेळीं ते राज-राजेश्वर सार्वभोम सम्राट झाले होते. याचा परिणाम असा झाला कीं; पुढें लवकरच त्यांनीं याज्ञवल्क्यांचें कर्मकौशल्य व अगाध विद्वत्ता पाहून अत्यंत खुष होऊन ते त्याचें पूर्ण अनुयायी व कैवारी बनले. व त्यांनीं उघड उघड शुक्ल यजुर्वेदाचा स्वीकार व पुरस्कार केला !

अद्यापपर्यंत या नववेदाला थोर थोर आचार्यांकडून व राजे लोकांकडून मिळावी तशी मान्यता मिळाली नव्हती. पण प्रत्यक्ष जनमेजय राजेच शुक्लयजुर्वेदाचे कैवारी व अभिमानी झाल्यावर मग त्या वेदाला नांव ठेवण्याचें धारिष्ट कोण कर-णार ? वैशंपायनांनीं मात्र या वेदासंबंधीं कुत्सित बुद्धीनें नाहीं नाहीं तीं किटाळें उपस्थित करून आकाशपाताळ एक केलें. पण दुर्दैवानें तीं सगळीं विरलीं जाऊन अखेर योगीश्वरांचा शुक्ल यजुर्वेद राजमान्यहि व लोकमान्यहि झाला तो झालाच !

याचा परिणाम म्हणजे मोठमोठ्यायज्ञप्रसंगीं याज्ञवल्क्यांस

अध्वर्यूचें प्रतिष्ठित स्थान मिळूं लागलें व त्यांचा शुक्लयजुर्वेद सूर्याप्रमाणें चमकूं लागला. जिकडे तिकडे राजदरबारांत राजवाड्यांत, व समाजांत वाजसनेयांचा प्रवेश होऊन, तेथें त्यांना मानमान्यता मिळूं लागली ! जनमेजयांनीं खुद्द आपल्या मुलाला म्हणजे शतानीकाला शुक्ल यजुर्वेद पढवण्यास योगीश्वरांच्या आश्रमांत नेऊन ठेविलें.

याप्रमाणें त्यांनीं पुढें अनेक मोठमोठ्या यज्ञांत अध्वर्यूचें काम करून, ते सर्व यशस्वी करून दाखविले. गोदावरी तीरावर पुण्यस्तंभ क्षेत्रांत एक मोठा यज्ञ झाला. त्यांत याज्ञवल्क्यांनींच अध्वर्यूची जागा मंडित केली होती. पुढें नर्मदातीरावर मित्रविंद गांवांत तसाच एक मोठा यज्ञ झाला. तोहि त्यांच्या दिग्दर्शनानेंच झाला. याप्रमाणें अनेक ठिकाणीं अनेक यज्ञांत प्रमुख भाग घेऊन ते सर्व लहान मोठे यज्ञ पूर्ण यशस्वीं करून दाखविलें. (आन्हिक सूत्रावलि पृष्ठ ३८५) त्यांच्या यज्ञकौशल्याची कीर्ति जगभर पसरून जो तो आतां शुक्लयजुर्वेदाची महति वर्णन व कौतुक मुक्तकंठानें करूं लागला; याचा स्वाभाविक परिणाम असा झाला कीं, वैशंपायनांच्या यजुर्वेदाला कृष्णपक्षाची कळा येत चालली आणि त्याबरोबरच याज्ञवल्क्यांच्या यजुर्वेदाला शुक्लपक्षाची कांति खुलू लागली. चंद्र निस्तेज पडत चालला व सूर्य झळकूं लागला ! कालाय तस्मै नमः हेंच तत्त्व येथेंहि खरें ठरलें.

सत्यानृताची अदलाबदल

अशाच एका यज्ञप्रसंगीं याज्ञवल्क्यांनीं एक बोधप्रद गोष्ट सांगितली, ती अशी:– देव व असुर हे प्रजापतीचे मुलगे असल्यामुळें त्याच्या जिंदगीचे म्हणजे वाणीचे वारस झाले. सत्य व अनृत यांच्या मिश्रणानें वाणी झाली असल्यामुळें प्रथम देव व असुर दोघेहि खरें खोटें बोलत असत. निर्भेळ असत्य असें दोघांच्या ठिकाणीहि नव्हतें. म्हणजे ते प्रसंगीं खरेंहि बोलत व प्रसंगीं खोटेंहि बोलत. म्हणून ते दोघेहि सारखेंच होते.

तथापि देवांचा ओढा सत्याकडे अधिक असे. असुरांची गोष्ट याच्या अगदी उलट होती. पुढें पुढें दिवस जसजसे जात चालले, जसतसा देवांना असत्याचा तिटकारा येऊं लागला व त्यांनीं असत्य टाकून देऊन संपूर्ण सत्याचीच कास धरली. असुरांनीं याच्या उलट वर्तन केलें.त्यांना सत्याचा कंटाळा आला आणि म्हणून त्याचा त्याग करून संपूर्ण असत्याचीच बाजू त्यांनीं धरली. याचा परिणाम पुढें असा झाला कीं, असुरामध्यें जें सत्य होतें, त्यानें विचार केला कीं, असुरांनीं आपणांस अजिबात टाकून दिलें असून देव मात्र सर्वस्वीं सत्यास चिकटून आहेत. ज्या अर्थी देवाकडे निर्भेळ सत्यच आहे तेव्हां आपणहि तिकडेच जावें हें बरें असें म्हणून, असुरांकडे जें सत्य होतें, तें त्यांना सोडून देवांस जाऊन मिळालें !

आतां देवांकडे जें असत्य होतें, त्यानें असा विचार केला कीं, 'असुरांनीं सत्याचा त्याग करून तें असत्यालाच पूर्ण चिकटून

आहेत. शिवाय देवांनीं आमचा त्याग केल्यामुळें, तेथें आतां अधिक राहण्यांत स्वारस्य नसून, असुराजवळ जाऊन राहणें यांतच मौज आहे ! ' यामुळें देवांकडील असत्य त्यांना सोडून असुराकडे येऊन राहिलें.

एकंदरींत देवाकडे जें राहिलें तें पूर्ण सत्यच राहिलें. अर्थात् देव सत्यच बोलूं व आचरूं लागले व असुर हें असत्यच बोलूं व आचरूं लागलें ! तेव्हांपासून देव हे सत्य व असुर हे असत्य असें म्हणण्याचा परिपाठ पडला. (सत्यं देवा अनृतं असुराः ' श. प.)

आतां याचा परिणाम असा झाला कीं, देव हे सत्यव्रत असल्यामुळें तें प्रथम क्षुद्र व दरिद्री असेंच राहिले. आणि म्हणून जो दक्ष राहून नेहमी सत्यच बोलतो, तो प्रथम क्षुद्र व दरीद्रीच राहतो, पण पुढें मात्र तो खात्रीनें योग्यतेस चढून भरभराट पावतो. देवहि पुढें मोठ्या योग्यतेस चढून तत्त्वाप्रमाणें अखेर भाग्यवान व सुखसंपन्न झाले.

आतां असुरांची गम्मत पहा. त्यांनीं फक्त असत्याचींच बाजू उचलली तरीदेखील सुरवातीस त्यांची चांगली भरभराटहि झाली. जें खोटें बोलतात त्यांचीहि प्रथम अशीच भरभराट होत असते. पण शेवटी मात्र त्यांचा अधःपात हटकून होतो. असुरांचा शेवटीं तसाच अधःपातच झाला !

बोधार्थ हा कीं, जे देववृत्तीचे आहेत ते सर्व सत्यच बोलतात व जे असुरवृत्तीचे आहेत ते सर्व असत्यच बोलतात. (श. प. ९-५-९ ते १६)

सम्राट जनमेजयांचा अश्वमेध यज्ञ

याज्ञवल्क्यांचा आतां मिथिलेंत काय अगर हस्तिनापुरांत काय जिकडे तिकडे गौरव व जयजयकार चालला असतांना जनमेजय सम्राटांनीं एक मोठा अश्वमेध यज्ञ करण्याचें योजून त्याप्रमाणें कामास सुरुवातहि केली. अर्थात ही सर्व तयारी प्रत्यक्ष याज्ञवल्क्यांच्या सल्ल्यानें व त्यांच्याच देखरेखीखालीं करण्याचें ठरविण्यांत आलें, आणि पुढें थोड्यांच अवधींत सर्व सिद्धता झाली. लागलींच अश्वमेध जाहीर करण्यांत आला. या खेपेस राजपुरोहित वैशंपायन यांस अजिबात वगळण्यांत आलें होतें.

अश्वमेध यज्ञ फक्त सार्वभौम राजालाच करता येतो; इतरांना तो करतां येत नाहीं. राजा जेव्हां पृथ्वीपति असेल अथवा महाबलाढ्य असून शत्रूवर मोठा विजय संपादन करील, अशा वेळींच तो करावयाचा असतो. हा यज्ञसमारंभ म्हणजे वैदिक लोकांची एक महापर्वणीच असते. देशांतील सर्व लहान थोर मांडलिक राजे-रजवाडे, मोठमोठे सरदार–जहागिरदार, शेट–सावकार, शास्त्री-पंडित, पाठक–पुरोहित वगैरे सर्व प्रसिद्ध लोक या समारंभांत हटकून उपस्थित असावयाचे. शिवाय चांगले गवई, नामांकित कलावंत, कुशल कारागीर, जादूगार, कलावंत इत्यादि अनेक व्यवसायांच्या व अनेक प्रकारच्या लोकांची गर्दी यावेळीं उसळलेली असते. मग प्रेक्षकांचा व इतरेजनांचा केवढा प्रचंड लोंढा लोटला असेल, याची नुसती कल्पना केलेलीच बरी.

दुर्दैवानें हा प्रचंड राष्ट्रीय महोत्सव आज आपल्यांतून अदृश्य झाल्यामुळें त्याच्या ऐश्वर्याची, वैभवाची व समारंभाची वाचकांस यावी तशी कल्पना येणें शक्य नाहीं. म्हणून प्रत्यक्ष जरी नसलीतरी निदान शब्दचित्र रेखाटून तरी त्याची अंशतः पण अंधुक अशी ओळख करून द्यावी, या उद्देशानें त्याची आम्हीं थोडक्यांत माहिती करून देत आहोंत.

वैदिक धर्मांत जशी देवोपासना आहे तशींच तेथें ऐहिक समाजकारण व राजकारण हेंहि आहेत. तो धर्म जागतिक व पारमार्थिक या दोनहि विषयावर नजर ठेवणारा असून यथा-प्रसंग त्या त्या विषयावर त्याचा विशेष भर व कटाक्ष असतो. तो विश्वव्यापी व विश्वसंग्राहक धर्म असून त्याचा तेजस्वीपणा व अष्टावधानीपणा हे गुण अद्वितीय व अतुलनीय आहेत. त्याची सर्व शक्ति व तेजस्वी वृत्ति एका यज्ञसंस्थेंत केंद्रित झाली असून अश्वमेध हा त्यांतला प्रमुख यज्ञ आहे. या वैदिक धर्मातील यज्ञसंस्थेकडे बौद्ध अगर जैन यांच्या दूषित भावनेच्या दृष्टीनें न पहातां, तेजस्वी वैदिक आर्यदृष्टीनें पहाण्यास शिकलें पाहिजे. कारण असें कीं, बौद्ध किंवा जैन धर्म हे राजकारणी धर्म नव्हेत. त्यांना राजकारण वावडें आहे. ते संन्यासवृत्तीचे, शांत व सात्विक असे धर्म आहेत. वैदिक धर्माची गोष्ट तशी नाहीं. तो अष्टावधानी व अष्टपैलू असा परिपूर्ण धर्म आहे. त्यांत प्रपंचहि आहे नि परमार्थहि आहे. त्यांत समाजकारण, राजकारण व्यक्तिगत विकास आणि सामाजिक धारणा हीं सर्व आहेत व्यक्तीच्या, समाजाच्या व राष्ट्राच्या उत्कर्षाला व उद्धाराला ज्या गोष्टींची, विचारांची व आचारांची अपेक्षा व आवश्यकता असते. त्या सर्वांचीं बीजभूत तत्त्वें या यज्ञसंस्थेंत पूर्ण सामावलेली

आहेत, हें सूक्ष्मदृष्टीनें व समतोल बुद्धीनें त्याचा अभ्यास करणाऱ्या विचारवंतांना तेव्हांच दिसून येईल. आणि म्हणूनच 'यज्ञे सर्वम् प्रतिष्ठितम्' असें वैदिक ऋषींनीं आव्हान दिलें आहे तें सार्थच आहे. याची प्रचीति पहावयाची असल्यास वाचकांनीं प्रस्तुत ग्रंथाच्या लेखकाचें याज्ञवल्क्य दर्शन (शतपथ परिचय) हा ग्रंथ अवश्य पहावा.

हा अश्वमेध वैदिक आर्यांचा इहलोकांतील सर्वश्रेष्ठ धार्मिक समारंभ व राजकीय महोत्सव होय. या महायज्ञांत राष्ट्रांतील सर्व वैभव, सर्व संपत्ति, सर्व सौन्दर्य, सर्व सामर्थ्य, सर्व कलाकौशल्य फार काय सर्व दर्शनीय व प्रेक्षणीय गोष्टी एकत्र पहावयास सांपडतात. वैदिक धर्माचें श्रेष्ठ व तेजस्वी स्वरुप प्रकट होतें ते येथेंच. अर्थात हा अश्वमेध म्हणजे वैदिक लोकांच्या विद्वत्तेचें, सामर्थ्याचें व ऐश्वर्याचें एक मनोहर प्रदर्शनच होय असें म्हणतां येईल. 'राजा वा एष यज्ञानां यदश्वमेधः' असें म्हटलें आहे तें उगीच नव्हें. हा समारंभ अेकशें चाळीस दिवस सतत चालू असतो.

या अश्वमेध यज्ञाचा मुख्य मंडप मोठा विस्तीर्ण असून तो ध्वजपल्लवांनीं सुशोभित केलेला असतो. हा मंडप अग्निष्टोम अगर सोमयज्ञ मंडपाच्या धर्तीवरच उभारलेला असून तो निरनिराळ्या प्राचीनशाळा, हविर्धान, आग्नीध्रीय व मार्जालीय अशा पांच लहान मोठ्या मंडपांचा मिळून अेक सलग झालेला असतो. प्राचीन शाळेंत आहवनीय, गार्हपत्य व दक्षिणाग्नि या तीन श्रौताग्नीच्या तीन वेदी स्थापन केलेल्या असतात. या प्राचीन शाळेच्या पूर्वेस सदोमंडप असून तेथें यज्ञपुरोहित व इतर विद्वान ब्राह्मण मंडळीस उठा बसावयाची व्यवस्था केलेली असते.

त्याच्या पूर्वेस त्याला लागूनच हविर्धान मंडप असून त्यांत यज्ञ-साहित्य वगैरे ठेवावयाचें असतें. या मंडपांतच अग्रभागीं एक सौमिक वेदि बांधलेली असून, तिलाच महावेदि अशी संज्ञा आहे. या वेदीच्या पूर्वेस जवळच सवनीय पशु बांधण्यासाठीं म्हणून पळस, खादीर अगर बिल्ववृक्ष यांचे एकवीस खांब असतात. महावेदीच्या उत्तरेस आग्नीध्रीय व दक्षिणेस मार्जालीय असें मंडप असून या शेवटच्या मंडपांत यज्ञपात्रें वगैरे धुण्याची व्यवस्था असते. ऐष्टिक वेदीवर अग्नीहोम करण्यांत येऊन, महावेदीवर पशूचें हवन होतें. अशी या यज्ञमंडपाची थोडक्यांत माहिती आहे.

भारतीय संस्कृतीला दिव्य उजाळा देऊन तिला जगांत श्रेष्ठत्व व अमरत्व प्राप्त करून दिलेली दिव्य कामधेनु म्हणजे ही वैदिकांची विशाल व उज्वल यज्ञसंस्थाच होय. यज्ञ म्हणजे हिंसा असा अर्थ केवळ न करतां या यज्ञसंस्थेमुळेंच वैदिक राजलक्ष्मीचें व सरस्वतीचें प्राचीन काळीं संरक्षण, संवर्धन व संगोपन झालें,याची दखलगिरी आम्हीं भारतीयांनीं अवश्य घेतली पाहिजे.

प्रथम दिवशीं दीक्षाविधि व ऋत्विग्वरण झाल्यावर गळयांत सुवर्णाचा कंठा घालून सकाळीं होमहवनानंतर राजा तो कंठा अध्वर्यूस अर्पण करतो. प्रातर्होम झाल्यावर ब्रह्माची परवानगी घेऊन अध्वर्यू हा दर्भाची वळून तयार केलेली एक दोरी घेऊन, श्यामकर्ण जातीचा अेक सुंदर घोडा तयार ठेवलेला असतो त्यास धरून त्याला ‘ अभिधा असि ’(शु. य.) या मंत्रानें बांधतो.

नंतर त्याला मोठ्या समारंभानें मिरवीत मिरवीत एका सरोवराकडे नेण्यांत येते. तेथें गेल्यावर त्याला पाण्यांत नेऊन सर्व ऋत्विज मिळून त्याच्या अंगावर पाणी शिपडतात आणि

अध्वर्यु हा ' प्रजापतये त्वां जुष्टं प्रोक्षामि ' (शु. य.) या मंत्रानें त्याला स्वच्छ धुवून काढतो. घोड्याच्या बरोबरच अेक कुत्रा पाण्यांत नेलेला असतो. घोडा धुवून झाल्यावर अध्वर्यूच्या आज्ञेवरून त्या कुत्र्याला खदिराच्या मुसळानें ठार मारण्यांत येऊन त्याला घोड्याच्या पायाखालीं देण्यांत येतें आणि तो घोडा त्याच्या धडावर पाय देऊन पाण्यांतून बाहेर येतो. बाहेर आल्यावर त्यास मंडपांत आणतात व 'अग्नये स्वाहा' (शु.य.) या मंत्रानें अग्नींत दहा आहुति देण्यांत येतात. नंतर प्रक्रम संज्ञक होम केला जातो.

एवढें झाल्यावर त्या अश्वास बाहेर आणून पृथ्वीवर यथेच्छ संचार करावयास म्हणून ईशान्य बाजूनें मोकळा सोडून देण्यांत येतें. मात्र त्याच्या संरक्षणार्थ शंभर राजपुत्र, शंभर क्षत्रियपुत्र, शंभर सूतपुत्र, व शंभर क्षात्रपुत्र असें चारशें लोकांचें सैन्य सशस्त्र सिद्ध करून त्याच्याबरोबर पाठविले जातें. उद्देश हा कीं, घोडा संचार करीत असतांना कोणी त्याला धरुन अटकाव केल्यास त्याच्याबरोबर युद्ध करून, घोड्याला सोडवून त्याचा पुढील मार्ग मोकळा करून द्यावयाचा. याप्रमाणें तो घोडा सतत एक वर्षभर मनास येईल तिकडे सारखा भटकत असतो.

घोडा बाहेर संचारास निघाल्यापासून परत येईपर्यंत इकडे मंडपांत निरनिराळे होमहवन व इतर कार्यक्रम नित्य चाललेलेंच असतात. ब्राह्मण दिवसा व क्षत्रिय रात्रीं याप्रमाणें दोघांचें दररोज वीणावादन व यशोगायन चाललेलें असतें. त्यांत राजाची व त्याच्या पूर्वजांची दानस्तुति व पराक्रमप्रशंसा वर्णन केलेली असते. शस्त्रपठणहि होत असतें. धृति संज्ञक होम चालू असतो. आणि लोकांस जेवणांस मुक्तद्वार असतें.

संचारार्थ सोडलेला घोडा यथेच्छ संचार करून वर्षाअखेर पुनः स्वस्थानीं परत आल्यावर अश्वमेधाच्या मुख्य अनुष्ठानास सुरवात होते. हें अनुष्ठान सत्तावीस दिवस चालतें. सुत्याह दिवशीं हा अश्वमेधांतला मुख्य दिवस—राजा सुवर्णालंकारानें शृंगारलेल्या रथांत उंची व उत्तमोत्तम वस्त्रें परिधान करून शृंगारलेल्या चार घोड्यांच्या रथात चढून बसतो. अश्वमेधीय घोडा सुवर्णालंकारानें नखशिखांत शृंगारलेला असतो. तो रथ मिरवीत पूर्वेस एका ठराविक अंतरापर्यंत जाऊन पुनः परत फिरतो.

परत आल्यावर त्यास रथापासून मोकळें करण्यांत येतें. नंतर त्या अश्वमेध घोड्यास राजाच्या राण्यांनीं तुपानें चांगलें माखून व चोळून काढल्यावर त्यास प्रोक्षण करून, त्याचें पर्यग्निकरण करण्यांत येतें. याचवेळीं इतर पशूंचेंहि प्रोक्षण व पर्यग्निकरण विधि आटपून घेण्यांत येतो. पर्यग्निकरण झाल्यावर घोड्याचें संज्ञपन करण्याच्या ठिकाणी दर्भ पसरून त्यावर सुवर्णाचा पत्रा ठेवून त्यावर वस्त्र पसरतात. आणि त्या वस्त्रावर घोड्यास आणून निजविण्यांत येतें. घोड्याला मारण्याचें शस्त्र सोन्याचें, पर्यंग पशूंना मारण्याचें रुप्याचें व इतर पशूंना मारण्याचें लोखंडाचें असतें.

यज्ञमंडपात हे सवनीय पशु बांधण्यासाठीं एकवीस खांब पुरलेलें असतात. त्यांपैकीं मधल्या खांबाला अग्निष्ठ अशी संज्ञा आहे. या अग्निष्ठ यूपास सतरा पशु बांधलेले असून बाकीच्या वीस यूपांस प्रत्येकीं सोळा सोळा याप्रमाणें एकंदर तीनशें वीस पशूंची योजना केलेली असते. या सवनीय पशूंमध्यें घोडा, बैल, बोकड, हरीण, कोल्हा, मुंगूस, हंस, बक, गरुड, चक्रवाक, तित्तिर, घुबड, बेडूक, साप, वाघ, सिंह, सुसर,

मासे, कांसव इत्यादि नाना जातीचे, नाना तऱ्हेचें व नाना रंगाचे ग्राम्य व वन्य असें अनेक प्राणी असतात. या सर्व पशूंची संख्या एकंदरींत सहाशें नऊ भरते. अश्वमेधाच्या मुख्य म्हणजे मधल्या दिवशींच एकंदर ६०९ पशूंची योजना केली जाते. तथापि त्यांना संस्कार केल्यावर त्यांतील सारे वन्य व कांहीं ग्राम्य पशू व पक्षी सोडून दिले जातात. या यज्ञास फाल्गुन शुद्ध अष्टमीस सुरवात करतात. आणि शेवटच्या दिवशीं अवभृत स्नानाचा थाटाचा समारंभ होऊन, यज्ञसमाप्ति होतें. (महीधर भाष्य).

प्रथम अश्वमेधीय घोडा प्रजापति देवतांसाठीं मारण्यांत येतो. त्याच सुमारास इतर पशूहि मागेंपुढें निरनिराळ्या देवतां-प्रित्यर्थ मारण्यांत येतात. फक्त या अश्वमेध यज्ञांतच ही एवढी पशुसंख्या आहे. इतर ठिकाणीं अगदी बेताचीच असते. इतरवेळीं अधिकांत अधिक म्हणजे सतरा पशू असतात. आणि तेंहि सर्व बोकडच (अज) असतात. बुद्धवाङमयांत तिखटमीठ लावून जें यज्ञविषयक वर्णन करण्यांत आलें आहे तें खरें नाहीं. तें सर्वच अति-शयोक्तिनें व विपरीत भावनेनें भडक रंगांत सांगण्यांत आल्यामुळें तें वैदिक यज्ञाचें यथार्थ वर्णन नव्हे. फक्त त्यावेळीं सामान्य जनतेचें यज्ञविषयक मन दूषित करून तत्संबंधीं घृणा उत्पन्न करण्याचा व बौद्धधर्माची नसती प्रौढी व महति गाण्याचा तो एक स्वार्थी व दुष्ट कावा आहे.

हा अश्वमेध यज्ञ म्हणजे सर्व यज्ञांचा राजा आहे. ' राजा वा एष यज्ञानां यदश्वमेध:' असें शतपथांत म्हटलें आहे; तें अगदीं यथार्थ आहे. हा यज्ञसमारंभ एकूण एक वर्ष व चाळीस दिवस चालतो. यावरून या यज्ञाचें विशाल स्वरूप तेथील अनेक प्रकारचें

विधि, व अपरिमित यज्ञसाधनें यांची अंधुक कल्पना करतां येण्यासारखी आहे. थोडक्यांत म्हणजे तेथील तेजस्वी वृत्तीचें, अगाध कर्मोपासनेचें, विविध देवतोपासनेचें, अपार औदार्याचें, अद्भूत कल्पनाशक्तीचें, अपूर्व साहसाचें, सूक्ष्म सृष्टिज्ञानाचें, प्रभावी राजकारणाचें, अजिंक्य राष्ट्रसामर्थ्याचें, अपार ऐश्वर्याचें, विविध कलाकौशल्याचें, सुंदर प्रदर्शन डोळयापुढें उभें राहून वैदक आर्यांच्या लोकोत्तर कर्तबगारीबद्दल व पौरुषाबद्दल अभिजात हिंदू अंतःकरणांत क्षणभर तरी आश्चर्य,आनंद व कौतुक यांच्या मधुरलहरी उमटल्याशिवाय राहणार नाहींत. अश्वमेधाचें हें जें एवढें लांबलचक विवेचन केलेलें आहे, तें आधुनिक भारतीयांना प्रत्यक्ष जरी नाहीं, निदान शब्दचित्र रेखाटून तरी त्यांना प्राचीन पूर्वजांच्या प्रभावी व तेजस्वी जागतिक व पारमार्थिक जीवनांविषयीं अंशतःतरी कल्पना यावी म्हणून केलें आहे.

आतां जातां जातां या यज्ञाची फलश्रुति सांगून हा विषय हातावेगळा करतो. 'तरति सर्वंपाप्मानं, तरति ब्रह्महत्यां यो अश्वमेधेन यजते' – जो अश्वमेध करतो, तो सगळीं पातकें तरून जातो. एवढेंच नव्हें; तर ब्रह्महत्त्या दोषापासूनहि तो मुक्त होतो. व त्याच्या सर्व कामना पूर्ण होतात, असें श्रुतींत सांगितलें आहे. (श. प. १३–३–११)

वैशंपायनांचा कुत्सित डाव !

येवढा मोठा अश्वमेध ! तो सम्राट जनमेजय करतात आणि राजपुरोहित वैशंपायनांना तेथें कोणीच विचारीत नाहीत हें आहे तरी काय ? शिष्य याज्ञवल्क्य तेथें सर्वाधिकारी आणि गुरु वैशंपायन म्हणजे कोणीच नव्हें? केवढें हें धाडस! आणि कोण हा यांचा अपमान ! सार्वभौम जनमेजयांच्या अश्वमेधासारख्या सर्वश्रेष्ठ यज्ञांत आपल्या प्रतिस्पर्ध्याला अध्वर्यत्वाचें श्रेष्ठ स्थान आणि आपल्याला अजीबात छाट केवढा हा जनमेजयांचा उद्दामपणा नि केवढें हें वैशंपायनांना लांछन !

वैशंपायन म्हणजे कांहीं लहानसहान प्रस्थ नव्हतें. त्यांची पकड तत्कालीन ब्रह्मवृंदावर अत्यंत जबरदस्त होती. हा यज्ञ होता होईतो हाणून पाडावा व याज्ञवल्क्यांचें नाक ठेंचून काढावें, असा मनांत कुत्सित विचार करून त्या रोखानें त्यांचें कारस्थान आतां गुप्त रीतीनें चालू झालें. राजसत्तेच्या जोरावर जें कांहीं करतां येण्यासारखें होतें त्यांचा तेथें निरुपाय होता. पदरीं नालस्ती येण्याचा तो प्रसंग होता. म्हणून वैशंपायनांनीं शहाणपणानें निराळाच डाव टाकला. यज्ञांत पुरोहित लागतात, त्याशिवाय यज्ञच होऊं शकत नाहीं. हें मर्मस्थान त्यांनीं अचुक ओळखलें व तेथें प्रहार करण्याचें ठरवून, त्याप्रमाणें त्यांनीं ते स्वत: राजपुरोहित असल्यामुळें त्यांचें वजन वाजसनेयाखेरीज इतर ब्राह्मणांवर चांगलें होते. हस्तिनापुरांतील व आसपासच्या प्रदेशांतील ब्रह्मवृन्दाशीं गुप्तरीतीनें खलबतें करून ऐनवेळीं या सर्व सनातनी

ब्राह्मणांनीं जनमेजयाच्या यज्ञावर कडकडीत बहिष्कार पुकारला. आणि अेका वाजसनेयाखेरीज इतर कोणत्याहि शाखेचे ब्राह्मण यज्ञास जाणार नाहींत अशी व्यवस्था केली. आपला अपमान व अपराध करणाऱ्या या जनमेजय व याज्ञवल्क्य या उभयतांना जवळ जवळ कायमचे वाळींतच टाकल्यासारखें त्यांनीं आतां करुन सोडलें.

राजे जनमेजय व याज्ञवल्क्य झाले तरी तितकेंच खंबीर व निश्चयी होते.आणि याज्ञवल्क्य म्हणजे तर प्रत्यक्ष मेरुचा अवतार. ते अशा पुरोहिती धाकाला थोडेंच भीक घालणार होते.हस्तिनापुरांतील ब्राह्मणांनीं ऐन वेळीं दगा दिला म्हणून ते कांहीं कचरले नाहींत कीं, डगमगले नाहींत. हस्तिनापुरांत व आसमंतांतील प्रदेशांत जसें वैशंपायनांचें वजन होतें,तसेंच त्यांचेंहि वजन काशी, कोसल व विदेह प्रांतांतील ब्राह्मणांवर होते. शिवाय जनकराजे त्यांचे परममित्र आणि जनमेजय हे तर त्यांच्या पूर्ण वचनांत होते. त्यांनीं आपल्या शिष्य मंडळींतूनच निरनिराळी यज्ञकर्माकरितां लागणारी ऋत्विज मंडळी तयार केली; आणि इंद्रोतदेवाप यांस आपल्या बाजूस वळवून घेऊन,त्यांची होतृस्थानीं नेमणूक केली. थोड्यांच अवधींत रात्रंदिवस खपून यज्ञसमारंभाची सर्व सिद्धता जय्यत तयार करुन ठेवली.

यज्ञाचा मंगल दिवस उजाडला, आणि यज्ञमंडपाच्या महाद्वारावर पहाटेस चौघडा मंगल सुरांत आलापूं लागला. पुरोहित मंडळी जमूं लागलीं. याज्ञवल्क्य इंद्रोतदैवापास बरोबर घेऊन मंडपांत उपस्थित झाले.अनेक राजराजेश्वर व जनमेजय महाराजहि मागोमाग आलेंच. सर्व तयारी सिद्ध झाली आणि यज्ञसमारंभास मोठ्या उत्साहानें प्रारंभ झाला. तसाच तो पुढें एक वर्ष आणि

चाळीस दिवस पर्यन्त मोठ्या थाटानें, नेटानें व उत्साहानें चालून यशस्वी रीतीनें पूर्ण करण्यांत आला. याज्ञवल्क्यांनीं तो पूर्ण करून दाखविला म्हणून जनमेजय राजे खुष झाले. वाजसनेयांच्या यशाची नौबत झडूं लागली. याज्ञवल्क्य विजयी झाले. आणि सम्राटांनीं त्यांचा मोठा गौरव केला.

आतां इंद्रोतदैवाप हा जनमेजयांच्या अश्वमेध यज्ञांत पुरोहित होता, याला आधार शतपथांत पुढीलप्रमाणे दिला आहे. 'एतेन हेन्द्रोतो दैवापः शौनकः। जनमेजयं पारिक्षितं याजयाञ्चकार तेनेष्ट्वा सर्वां पापकृत्यां सर्वां ब्रह्महत्यामपजघात सर्वां ह वै पापकृत्यां सर्वां ब्रह्महत्यामपहन्ति योऽश्वमेधेन यजते। (१३-५-४-१) इंद्रोतदैवाप यानें पारिक्षित जनमेजयाकडूनअश्व-मेध यज्ञ करविला. ह्या वचनाला महाभारतांतूनहि पुष्टि मिळते भारतांत म्हटलें आहे कीं,- 'एवमुक्त्वा तु राजानमिन्द्रोतो जनमेजयम्। याजयामास विधिवद्वाजिमेधेन शौनकः ॥' (महाभारत, अ. १४९) या दोन वचनांवरून इंद्रोतदैवाप यानें जन-मेजयांकडून अश्वमेध यज्ञ करविला हें निर्विवाद स्पष्ट होत आहे.

हा अश्वमेध यज्ञ सफल व यशस्वी झालेला पाहून जन-मेजयाला फार आनंद झाला. वैशंपायनांच्या बहिष्काराला दाद न देतां, एकटचा याज्ञवल्क्यांनीं आपल्या जबाबदारीवर तो महा-यज्ञ आपल्या कर्मकौशल्यानें व अपूर्व बुद्धीचातुर्यानें पूर्ण यशस्वी करून दाखविला, हें पाहून जनता त्यांचें कौतुक करीत त्यांना धन्यवाद देऊं लागलीं. जनक राजालाहि या गोष्टीनें मोठा आनंद वाटला. हस्तिनापुर तर त्यांच्या जयजयकारानें व आनंदघोषानें सर्वत्र दुमदुमून गेलें होतेंच या अश्वमेधाचा समारंभ व्यवस्थित व यथासांग पार पडल्यामुळें आणखी एक तसाच यज्ञ करून

दाखविण्याची सम्राटाला इच्छा झाली आणि लवकरच पुनः दुसरा यज्ञहि करण्याचें जाहीर करण्यांत आले.

या यज्ञांतहि अध्वर्यवत्वाची माळ अर्थात् पुनः याज्ञवल्क्यांच्या गळ्यांतच पडली. पण या खेपेला इंद्रोतदैवापाऐवजी तुरकावषेय हें होतृस्थानीं होते. याविषयीं ऐतरेय ब्राह्मणांत दाखला आढळतो तो असा : 'एतेन ह वाऽऐंद्रेण महाभिषेकेण तुरः कावषेयो जनमेजयं पारिक्षितमभिषिषेच तस्मादु जनमेजयः पारिक्षितः समंतं सर्वतः पृथ्वीं जयन्परियायाश्वमेध्येनेजे।' (ऐ. ब्रा. ८ २१) या वचनांवरुन पहातां जनमेजयांनीं एक अश्वमेध केला हीं गोष्ट निखालस सिद्ध होत आहे. वायु व मत्स्य पुराणांतूनहि निःसंशय यांस पुष्टी मिळत आहे. वायुपुराणांतील 'परिक्षित्तनयश्चापि पौरवो जनमेजयः। द्विरश्वमेधमाहृत्य ततो वाजसनेयकम्। प्रवर्तायित्वा तद्ब्रह्म त्रिखर्वी जनमेजयः ॥ (अ. ९९, २५४) असें सांगितलें आहे. पारिक्षित यांत जनमेजयानें दोन अश्वमेध यज्ञ केले; असें म्हणून त्यांत वाजसनेयक म्हणजे याज्ञवल्क्य यांचा संबंधहि दाखविण्यांत आला आहे, पूर्वीप्रमाणेंच हाहि यज्ञ अथपासून इतिपर्यंत यथासांग पार पडला. वैशंपायनांचा बहिष्कार मात्र फुकट गेला. धन्य जनमेजय राजे आणि धन्य त्यांची सत्वनिष्ठा व कर्मनिष्ठा !

स्त्रीचें सख्य हें सख्यच नव्हे !

यज्ञानुष्ठानांत विश्रांतीच्या वेळीं पुरोहित लोक सदा· मंडपांत विश्रांतीकरतां म्हणून येऊन बसतात. त्यावेळीं यज्ञांतील कांहीं विषयांवर प्रश्न निघून त्यांवर चर्चा चालत असते. अर्थात केव्हां ती गंमतीदार असते; तर केव्हां गंभीर असते. केव्हां केव्हां अत्यंत महत्वाचा विषयहि वादविवादाकरतां निघतो. असाच एक प्रसंग घडला. अग्निमंथनाच्या विषयावरून गोष्ट निघाली असतां; अरणी कशाची असावी हा प्रश्न उपस्थित झाला· याज्ञवल्क्यांनीं ती अरणी अश्वत्थवृक्षाचींच असावी असें प्रतिपादन करून त्यासंबंधीं असलेली एक गोष्ट त्यांनीं सांगितली. ती मोठी बोधप्रद आहे.

ती थोडी लांब असली तरी येथें देत आहोंत. तीवरून याज्ञ· वल्क्यांचे साहित्य शास्त्रांतील कुशलत्व, भाषाप्रभुत्व व रसपरि· पोषाची हातोटी यांची प्रचिति येते.

उर्वशी ही स्वर्गलोकांतील एक प्रसिद्ध अप्सरा होती. मग तिचें रुपलावण्याचें काय वर्णन करावें ? मोहक चेहरा, नाजूक शरीर, गौर कांति, सुबक ठेवण व नवतारुण्य पुरुषांना वेड लावायला मग आतां आणखी काय पाहिजे ? खरोखर उर्वशी म्हणजे सौन्दर्याची मूर्तिमंत व मनोहर अशी पुतळींच होती.

ती एकदां सहज स्वर्गलोकांतून खालीं मृत्युलोकीं आली. आणि इकडे तिकडे फिरत असतां अकस्मात मृत्युलोकांतील मदनाचा पुतळा पुरुरवा तिच्या नजरेस पडला. तिला त्यांच्या· सारखे सौन्दर्य आतांपर्यंत कोठेंच पहावयास मिळालें नव्हते· राजाकडे तिनें प्रथम पाहिलें. पुन:पाहिलें दोघांची दृष्टादृष्ट झाली आणि पुढें ? तिचा तोल सुटला आणि ती संपूर्ण प्रेमवश झाली·

पुरुरवा अत्यंत सुंदर नि देखणा होता. उंच बांधा, तेजस्वी चेहरा, विशाल भालप्रदेश, पाणीदार नेत्र, आणि त्याची आनंदी वृत्ति होती. अशी मूर्ति पाहून कोणती तरुणी मोहवश होणार नाहीं? गंधर्व लोकांतील अप्सरा झाली म्हणून काय झालें ? तिला स्त्रीहृदय होतेंच. शिवाय ती तर तरुण व विलासी होती. सुईचें लोहचुंबकापुढें काय चालणार ? तिच्या अंतःकरणांत पुरुरवाच्या दर्शनानें चलविचल झाली. व ती प्रेमवेडी बनली. तिच्या सौंदर्यानें पुरुरवाहि मोहवश झाला.

या प्रसंगाचें पर्यवसान पुढें गोड प्रेमविवाहांत झालें. पण कांहीं अटीवर त्या अटी अशा होत्या. १. पुरुरव्यानें तिला दिवसांतून फक्त तीनच वेळां आलिंगन द्यावयाचें. २. तिच्या संमतिशिवाय तिच्याजवळ जावयाचें नाहीं. ३. एकान्ताशिवाय इतर वेळीं तिनें त्यांस केव्हांहि नग्न स्थितींत पहावयाचें नाहीं. यांपैकी कोणतीहि एक अट मोडली गेली कीं, उर्वशी पुरुरवा-जवळ राहूं शकणार नाहीं. पुरुरवानें या अटी कबूल केल्यामुळें प्रेमाचा संसार थाटण्याचें उर्वशीनें कबूल केलें; व ती त्याच्या बरोबर गेली.

या प्रेमी जोडप्यांचा संसार मधुर, मोठ्या सुखांत व आनंदांत चालूं लागला. निरनिराळ्या सुखविलासांत व आमोद-प्रमोदांत ते प्रेमी जोडपें इतकें रंगून गेलें कीं; उर्वशीला गंधर्व लोकाचें पूर्ण विस्मरण झालें. पुरुरवाची राज्यकारभाराची व घरच्या इतर प्रेमळ माणसांची आठवणसुद्धां सपशेल बुजून गेली. पुरुरवाला उर्वशी व उर्वशीला पुरुरवा या पलिकडे निराळें जग असें राहिलेंच नाहीं.

अशा प्रेमरंगांत दिवसांमागून दिवस, महिने, वर्षे लोटली.

कांहीं दिवसांनीं गंधर्वांना तिची आठवण झाली. ते म्हणूं लागले- ‘ अरे हें काय झालें? उर्वशी गेली कोठें ? ती मृत्युलोकांतच रंगून बसली कीं, काय? कितीतरी काळ लोटला, तिला आमची आठवण होत नाहीं,गंधर्व लोकांची शोभाच गेली. त्यांत एकजण म्हणाला, ‘ अहो ’ कसची येते आतां ती ! तिनें राजा पुरुरवाशीं विवाह केला आहे. मात्र कांहीं अटी आहेत. त्यांतली एखादी मोडली गेल्याशिवाय तिची तेथून सुटका होणें शक्य दिसत नाहीं.

दुसरा म्हणाला—छें, तें कांहीं नाहीं. तिला येथें आणलींच पाहिजे. एखादी युक्ति लढवूं म्हणजे झालं ’ कांहीं विचार करून ते त्या उद्योगांस लागले.

तुम्हीं कांहीं म्हणा, स्त्रियांचा स्वभाव विचित्र खरा. तशांत मूलबाळ नसलें कीं, मग तो भारी विलक्षणच होतो.प्रसंगीं एखादा कुत्रा, मांजर, नाहीतर एखादा पोपट असा कोणतातरी एखादा प्राणी जवळ बाळगून त्यावर मातृवात्सल्याची तहान भागवून घ्यावयाची अशीं त्याची स्थिति होते. उर्वशी कांहीं याला अपवाद नव्हती. तिनें एक सुंदर बकरा व दोन गोमटीं कोंकरें बाळगलीं होतीं. त्यांजवर ती जीव कीं, प्राण करी. पुरूरवा जवळ नसला म्हणजे ती यांना जवळ घेऊन, त्यांच्याशीं चाळे करीत बसायची. रात्रीसुद्धां ती त्यांना विसरत नसे. जवळ तिच्या पलंगाशेजारींच ती निजत असत. प्रत्यक्ष पोटच्या गोळ्याप्रमाणें ती त्यांच्यांवर जीव कीं, प्राण करीत असे.

एके दिवशीं रात्रीं पलंगावर ती स्वस्थ पडली होती. खाली शेजारींच कोंकरे पोटांत मान खुपसून स्वस्थ झोपी गेलीं होती. रात्र बरीच झाली होती, तरी कां कोण जाणे तिचा कांहीं त्या दिवशीं डोळा लागेना. या कुशीवरून त्या कुशीवर व

त्या कुशीवरून त्या कुशीवर याप्रमाणें तिची सारखी चुळबुळ सुरूं होती. चैन पडेना व झोप येईना; म्हणून ती सहज पलंगावर उठून बसली, तों तिला कोणीतरी त्यांतील एक कोकरू पळवून नेत असल्याचें दिसलें.

लगेंच 'धांवा कोणीतरी लवकर धांवा!' असें म्हणत ती मोठ्यानें आक्रोश करूं लागली 'माझ्या बाळांना (कोंकरांना) कोणीतरी पळवून, नेत आहे.' इतक्यांत दुसरें कोंकरूंहि लांबविण्यांत आलें. मग तर ब्रह्मांडच कोसळून पडल्यासारखें तिला झालें. रडून व ओरडून सर्व राजवाडा उठविला तिनें.

पुरूरवा त्यावेळीं गाढ झोंपी गेला होता. तिच्या आरडाओरडयानें व आक्रोशानें तो जागा झाला. इतक्यांत तिची दुसरी किंकाळी आली. चटकन् तो उभा राहिला व चोरांना पकडावें म्हणून मोठ्या आवेशानें त्यांच्यामागें लागला. पण या गडबडींत अंगावर वस्त्र नव्हतें, तें लपटून घ्यावयाचें राहून, स्वारी नागडी उघडींच धांवत सुटली.

त्या चोरांना काय, हेंच पाहिजे होते. चोर म्हणजे दुसरे तिसरें कोणी नसून प्रत्यक्ष गंधर्वच होते. त्यांनीं ह्या संधीचा फायदा घेतला. त्यांनीं पुरूरवावर वीज चमकावून सूर्याप्रमाणें चक्क प्रकाश पाडला व उर्वशीला तें दृश्य स्पष्ट दिसलें. कराराचा भंग झाला. तिला गंधर्व लोकांची आठवण होऊन चटकन् तिनें पुरूरवाला तेथेंच सोडून, क्षणाचा बिलंब न करतां आपल्या घराचा रस्ता सुधारला. जातांना त्याची भेट घेतली नाहीं कीं, त्याच्याशीं भाषणहि केलें नाहीं. जणूं तो तिचा कोणींच नव्हे. विजेप्रमाणे ती तेथून निघाली; आणि सरळ गंधर्वलोकीं येऊन दाखल झाली.

'हा मी इथं आहे, हा मी इथं आहे, उर्वशी ! घाबरूं नकोस. हा पहा मी आलों' असें ओरडत तिला धीर देऊन तिचें सांत्वन करण्यासाठीं म्हणून, त्या चोरांना सोडून, तो तिच्या पलंगाकडे वळला आणि तेथें येऊन पहातो तो पलंग रिकामा. इकडे तिकडे वळून पाहिलें तर खोलीहि रिकामी. चोहोंकडे तपास केला पण तिचा पत्ता लागला नाही.

तो दिवस गेला. दुसरा गेला. आठवडाहि लोटला. पण उर्वशी कांहीं दिसेना त्याला. तेव्हां त्याची खात्री झाली कीं, आपणांस दगा देऊन ती पसार झाली. त्यामुळें तो घाबरला, दुःखी झाला, कष्टी बनला. तिचा वियोग त्याला पुढें इतका जाणवला कीं, त्यामुळें तो वेडापिसा बनला. घर, दार, अन्नपाणी सोडलें. राज्यवैभव सगळें कांहीं टाकून देऊन राजवाड्यांतून बाहेर पडून, सारखा तिच्या नांवानें टाहो फोडीत व शोक करीत कुरुक्षेत्रभर तो वेड्यासारखा भटकत सुटला.

त्या कुरुक्षेत्रांत 'अन्यतः प्लक्ष' नांवाचें कमलाच्छादित असें एक सुंदर सरोवर होतें. त्याच्या कांठांवर विशाल वृक्षांची दाट झाडी पसरली होती. एके दिवशीं जलविहार करण्यासाठीं म्हणून गंधर्वलोकांतील कांहीं अप्सरा तेथें आल्या. अंगावरची वस्त्रें उतरवून कांठावर ठेवलीं आणि शुभ्र राजहंसाप्रमाणें गंधर्व लोकाच्या त्या कर्पुरधवल सुंदर अप्सरा जलविहारासाठीं पाण्यांत उतरल्या. हंसत खेळत एकमेकीवर पाणी उधळत आनंदानें त्या जलक्रीडा करूं लागल्या.

याप्रमाणें त्या सरोवरांत त्यांचा सुरस विलास चालला असतांना कांठावरुन अेक उघडा बोडका वेडापिसा माणूस इकडे तिकडे बघत व गमत हळुंहळूं चालला होता. दिसावयाला

सुंदर पण चाळे वेड्याचे. त्या अप्सरांपैकीं अेकीची नजर सहज त्याच्याकडे वळली. त्याला पाहून तिला मोठी गम्मत वाटली. म्हणून तिनें आपल्या जवळच्या मैत्रिणीला हांक मारून म्हटलें ‘ अग अे, तुला अेक गंमत दाखविते ये. तें तिथं झाडाखालीं बघ. दिसतंय नां ? काय विलक्षण ध्यान आहे ग तें ’ ती असें म्हणाली.

ती मैत्रीण म्हणाली अय्या ! खरंच कीं:
जवळ जवळ दिगंबर मूर्तिच दिसते !

इतक्यांत तिसरी त्यांना येऊन मिळाली आणि त्याच्याकडे पहात म्हणाली — अग तो वेडा दिसतोय.

कोणत्यातरी पांखरानं त्याच्या हातावर तुरी दिल्या असाव्यांत. तेंच वेड हें, बरं कां मेनके.

तो चांगला दिसतोय नाहीं? कोणीतरी खानदानी असावा.

आणखी दोनचार अप्सरा तेथें जमल्या. तेव्हां त्यांतील एक म्हणाली “ चला ग, तिथें जाऊन त्याची थोडीशी गम्मत करूं. ”

“ संभाळ हो, पृथ्वीवरचं माणूस, तशांत वेडं.

“ म्हणून काय झालं ?

“ काय झालं ? जवळ जा म्हणजे समजेल.

“ येईल धावून आणि मारेल मिठी. मग समजेल गंमत.

“ छे. नको ग बाई ! इथुनंच काय पहावयाचं तें पाहूं. जवळ जायला नको नि फजिति व्हायला नको. नव्हें कां ग, तिलोत्तमे ?

“ भारींच गडे भित्री तूं ! इतकं ग काय भ्यायचं त्यांत.

आम्हीं इतक्याजणी असतां म्यायचं ग काय म्हणून त्याला ? जाऊं चला त्याच्याजवळ. असले जे वेडे असतात, ते कधीं कधीं आम्हांसारख्या स्त्रियांना पाहून शहाणे होतात म्हणे खरं का ग तिलोत्तमे.

"अन् शहाणे वेडे होतात, हें तूं विसरलीस काय?

"स्त्रीची मोहिनी आहेच तशी. नव्हें कां ग मेनके ? पुरुषांना वेड लावावं खरं; आम्हीं स्त्रियांनींच !

"म्हणून म्हणते संभाळा. गंमत करतां गिम्मत व्हायची. तशांत वेड्याशीं गांठ !

नंतर तो अप्सरांचा घोळका सरोवरांतून बाहेर येऊन वस्त्र धारण करून त्या वेड्याजवळ आला. वेड्यानें त्यांच्याकडे पाहिलें.एकदां पाहिलें. दोनदां पाहिलें. तिनदा पाहिलें. आणि मग त्याची नजर एकीवर खिळली. ओळख पटली नि त्याचें वेड झटकन् उतरलें. तो चांगला शुद्धीवर आला. डोळे हर्षनिर्भर झाले. एकीकडे अप्सरेकडे पाहून आनंदानें तो ओरडून 'प्रिये ऊर्वशी' म्हणत तिजकडे धांवून गेला.

बाकीच्या सर्व अप्सरा आश्चर्यचकित होऊन उर्वशीकडे पहात तिला म्हणाल्या ' उः ! काय ग ही भानगड. तो तुझं नांव घेऊन हांक मारतोय ' ?

" अग. विचारतेस काय ? असेल कोणीतरी तिचा.

" हं, आलं आतां सर्व ध्यानांत. मधेंच ही बया मृत्युलोकीं गुप्त झाली होती नां ?

त्या वेळचं हें प्रेमनाटक असावें खरं ना ऊर्वशी ?

मध्येंच तो वेडा म्हणतो, ' उर्वशी किती दुष्ट तूं ! किती निर्दय ! किती कठोर ! गेलीस ती गेलीस, पण जातांना एका

शब्दानें तरी विचारायचें· आतांतरी क्षणभर जवळ ये कशी!"

असें म्हणून तो तिला मिठी मारावयास म्हणून धांवला.

सर्व अप्सरा घाबरून सरकून जरा दूर झाल्या. उर्वशी दोन पावलें सरकून पुढें झाली. तिला उद्देशून तो वेडा म्हणाला. उर्वशी ! अशी अगदींच निर्दय होऊं नकोस माझ्या मनांत कितीतरी तुला सांगावयाचें आहे, चल मजबरोबर कां उगाच उभयतांस दुःखांत पाडून घेतेस?

हें सर्व त्या वेड्याचें भाषण ऐकून त्या सर्व अप्सरांमध्यें खळकन् एकच हंशा पिकला.

इतक्यांत उर्वशी त्या वेड्याला उद्देशून – "पुरुरव्या ! तुझ्याशीं माझा पूर्वसंबंध विसरून जा मागें झालं तें होऊन गेलं. मी आतां गंधर्व लोकीची अप्सरा आहे. पूर्वीची तुझीं उर्वशी नव्हें ! मागील सगळं विसरून जा.

"कसं विसरूं ? उर्वशी ! कसं विसरूं ?

"उषांपैकीं पहिली उषा जशी निघून गेली, तशीच मीहि तुला केव्हांचींच सोडून गेले आहे. राजा! आतां जा. वाऱ्या-प्रमाणें मी आतां तुला दुर्धर आहे. माझी आशा आतां व्यर्थ आहे. माझ्याशीं लगट करूं नकोस !

"उर्वशी ! तुला सोडून मी कुठं जाऊं ? मला अशी धिक्कारून देऊं नकोस. तूं जर तुझ्या मित्राचा सुदेवाचा असा धिक्कार करशील तर तो घरीं जाणार नाहीं.

"मग कुठं जाईल ?

"दूर, अति दूर जाईल. तो पुनः तुला भेटणार नाहीं.

तेव्हां– त्यापैकीं एक अप्सरा म्हणाली "पृथ्वीवरील

सारेंच पुरुष असे बाईलवेडे असतात कां ग तिलोत्तमे ? कसा अगदीं प्रेमानें नादान झाला आहे !

दुसरी म्हणते "त्यांत काय आहे. एवढा मोठा विश्वामित्र. केवढा तपस्वी ! तो नव्हता का या मेनकेचा कुत्रा होऊन तिच्या मागें लागला ?

उर्वशी पुरुरव्याला उद्देशून पुनः म्हणाली, पुरुरव्या ! आतां माझा नाद सोड. शहाणा हो आणि घरीं जा.

" नाहीं, उर्वशी. मी घरीं जाणार नाही. तुझा सुदेव तुला सोडून जाणार नाही. असाच तो रानांवनांत भटकत फिरेल. लांडगे त्याला फाडून खातील. किंवा तो प्राणहि देईल. पण तुला सोडून तो जिवंत रहाणार नाही. "

" राजा तूं मरूं नकोस. लांडगे तुला फाडून न खावोत! तुझें अमंगळ न घडो !

आम्हां स्त्रियांची एक गोष्ट सांगते ऐक. तुला स्पष्टच सांगायचं म्हणजे आम्हां स्त्रियांचं सख्य हें सख्यच नव्हें. आमचे अन्तःकरण म्हणजे लांडगीचे अन्तःकरण. म्हणून म्हणते, माझा नाद सोड आणि घरीं जा.

" हाय हाय ! काय ऐकतो हें मी ! सुंदर स्त्रीच्या मधूर जिव्हेंतून. फुलासारख्या कोमल स्त्री देहांत वज्रासारखें कठोर अंतःकरण कुठून आलं ?

" राजेश्वरा असा भ्रमिष्ट कां बरं होतोस ? मी तुला खरी वस्तुस्थिति सांगते. आम्हां स्त्रियांचा स्वभावच हा, आम्हां स्त्रियांचं प्रेम, हें खरें प्रेम नव्हें ? आणि सख्य हें सख्य नव्हें ! म्हणून म्हणते घरीं जा आणि सुखी हो !

त्या प्रेमवेडया पुरुरव्यांची स्थिति आतां काय वर्णन करावी ?

उर्वशी त्याला तशी कठोर बोलून गेली हें खरें. आणि बंधनापलिकडे रहाणाऱ्या उदंड कुमारीचें स्वतंत्र अंत:करण ती सरळ बोलून चुकली, हेंहि तितकेंच खरें. पण किती झालेंतरी स्त्रींच ती. पुरुरव्याची ती करुण व हीनदीन मूर्ति पाहून तिला कळवळा आला. आणि ती त्याला म्हणाली. राजा असा कष्टी होऊं नकोस ! तुझीं इच्छा अेक वेळ मी पुरी करीन. पण आज नाहीं.

" केव्हां ? "

" आजपासून अेक वर्षानं "

" खरं ? कां थाप ?

" अगदी खरं. वर्ष अखेरच्या रात्रीं तूं इथं ये. मीहि येतें. फक्त अेकच रात्र तुझ्याजवळ राहीन. तेव्हां तुझा मुलगाहि माझ्या पोटी जन्मास आलेला असेल. जातांना तोहि बरोबर घेवून जा. आतां हें वेड टाक, शोक आवर नि घरीं जा.

त्या वेडया पुरुरव्यावर ही जणूं अमृतवृष्टिच झाली. त्याचें वेड उतरलें. आणि तो घराकडे परतला.

पुढें ठरल्यावेळीं तो परत तेथें आला. तों काय चमत्कार तेथें एक सुंदर राजमहाल आणि त्यांत उर्वशी. उभयतांची भेट झाली व राजा आनंदित झाला,

दोघांची वियोग होण्याची वेळ जवळ आली, तेव्हां उर्वशी राजाला म्हणाली. " राजा उद्यां सकाळीं गंधर्व तुला अेक वर देणार आहेत. त्यावेळीं तुला काय मागायचें असेल तें मागून घे. '

" काय मागूं ? माझी लाडकी उर्वशी मला कायमची द्या म्हणूं ?

" तें शक्य नाहीं ! आम्हा अप्सरांना या मृत्युलोकीं कायमच्या येऊन राहतां येत नाहीं.

" मग काय मागूं तूंच सांग.

" तूं इतकंच म्हण कीं, मलाहि तुमच्यापैकीं एक होऊं द्या ;

पुरुरवा (आनंदून) " फार छान ! चांगली गोष्ट सांगितलीस बघ तूं ! म्हणजे मला गंधर्वलोकीं राहावयास सांपडून तुझ्याशीं मनमुराद विलास करावयास मिळेल. उर्वशी किती शहाणी आहेस ग तूं ! मोठी चाणाक्ष खरी. स्त्रियांना केव्हां केव्हां सुंदर गोष्टी सुचतात त्या अशा.

इतक्यांत उजाडलें आणि गंधर्व तेथे आले. त्यांनीं राजास वर मागण्यांस सांगितल्यावरून त्यानें उर्वशीनें आधींच शिकवून ठेवल्याप्रमाणें वर मागितला. ते म्हणालें, " राजा ! तें शक्य नाहीं. तुम्हां मनुष्यांमध्यें अग्निसारखें पवित्र शरीर एकाचेंहि नाहीं कीं, ज्यामध्यें हवन केलें असतां त्याला आमच्यासारखें होतां येईल. असें म्हणून त्यांनीं त्याला एका पात्रांत अग्नि दिला आणि म्हटले; 'या अग्नींत हवन कर म्हणजे तूंहि आमच्यासारखांच व आमच्यांतलाच एक होशील."

पुरुरव्यानें तो अग्नि घेतला. व उर्वशीनें राजापासून तिच्या उदरीं झालेला पुत्र त्याच्या स्वाधीन केला. दोन्हीं घेऊन राजा परत घरीं आला. त्या अग्नींत यथाविधि हवन करून अग्निनारायणाच्या कृपाप्रसादानें तो शेवटीं गंधर्वांपैकीं एक झाला.

बोध – 'न वै स्त्रैणानि सख्यानि'

'सालवृकाणां हृदयान्येता' (श. प. ११–५–१ ते ९)

ही उर्वशीची कथा ऐकून यज्ञमंडपांतील विद्वान मंडळीस मोठें कौतुक वाटलें व आनंद झाला.

हे परिक्षित जनमेजय कोण ?

योगीश्वर याज्ञवल्क्यांच्या समकालीन असणारे असे परिक्षित जनमेजय कोण या प्रश्नावर प्रकाश पाडणें हें अत्यंत आवश्यक आहे. हा प्रश्न प्रथमदर्शनी अत्यंत गुंतागुंतीचा वाटतो. या विषयावर आधुनिक विद्वानांत मतभेद पडून मोठी खडाजंगी माजून राहिली आहे. म्हणून या प्रश्नाचा उलगडा आम्हीं शतपथ व इतर ग्रंथाधारे अगदी थोडक्यांत करणार आहोंत. आम्ही ज्यावेळीं याज्ञवल्क्य चरित्र ग्रंथ प्रथम प्रसिद्ध केला, तेव्हांपासून म्हणजे सन १९३६ सालापासून या प्रश्नाला महाराष्ट्रांत तोंड फुटले. केसरीचे बहुश्रुत विद्वान श्री. ज. स. करंदीकर यांनीं प्रथम केसरींत हा प्रश्न उपस्थित करुन त्याला चालना दिली. पुढें नाशिकचे सुप्रसिद्ध पंडित म. म. श्रीधरशास्त्री वारे यांनीं आपल्या याज्ञवल्क्य चरित्रात श्री. करंदीकरांच्या मतालाच सांथ दिली. त्यानंतर प्रो. विष्णु बळवंत आठवले यांनींहि त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून आमच्यावर घसरून आमच्या विचारसरणीस बोटें मोडलीं. तेव्हां या सर्वांचा विचार समाचार घेणें आम्हांस प्राप्त झालें आहें. आम्हीं आमची विचासरणी शतपथ व इतिहासपुराण दृष्टया किती सुसंगत व तर्कशुद्ध आहे, हें आमच्या 'याज्ञवल्क्य दर्शन' या ग्रंथांत शेवटी शेवटीं ' याज्ञवल्क्य यांचें ऐतिहासिक समालोचन ' या प्रकरणांत दाखविलें आहे. आणि तेव्हांपासून तें आमचें विवेचन साधार व समर्पक खोडून काढण्याच्या भरीस

आतांपर्यंत कोणींच पडले नाहींत ! ‘ याज्ञवल्क्य दर्शन ’ सर्वांसच वाचावयास उपलब्ध असेल, अशीं खात्री नसल्यामुळें येथें या विषयासंबंधीं थोडक्यांत द्विरुक्तीचा दोष पत्करून चर्चा केली आहे.

वादाचा मुख्य मुद्दा ‘ याज्ञवल्क्य कालीन जनमेजय कोण, हा आहे. आमच्या मतें पांडवांचा पणतू व सर्पसत्र करणारा पारिक्षित जनमेजय तोच याज्ञवल्क्यांच्या समकालीनचा ठरतो. वैदिक वाङ्मयांत याज्ञवल्क्य जसें चार आहेत, तसें जनमेजय हे तीन आहेत. त्यांत पारिक्षित जनमेजय हा एकच आहे. नामसादृश्यावरून वरील संशोधकांची दिशाभूल झाली असून, याज्ञवल्क्य-कालीन जनमेजय कोण याविषयीं सर्वच गोंधळांत पडले आहेत. हा प्रश्न सोडविण्यांसाठीं नुसत्या पुराण ग्रंथांवरच सगळी भिस्त ठेवून चालण्यासारखें नाहीं. त्याच्या जोडीला शतपथाचें साहायहि अवश्य आहे. शतपथ हाच ग्रंथ त्यांच्या चरित्राची खरी साक्ष देणारा आहे. त्याला धरून असलेली पौराणिक वचनें येवढींच ग्राह्य असून; त्याला विरोध करणारीं वचनें अग्राह्य व इतिहास-दुष्ट आहेत, असें आमचें स्पष्ट व प्रांजल मत आहे.

पांडवांचा नातू जो परिक्षित त्याला तक्षकाच्या सर्पदंशानें दुर्मरण आलें. आपल्या बापाच्या दुर्मरणास कारणीभूत झालेल्या तक्षकाचा सूडबुद्धीनें निर्वंश करण्यासाठीं म्हणून परिक्षिताचा मुलगा जो जनमेजय त्यानें सर्पसत्र प्रारंभिले. त्याला श्रुतसेन उग्रसेन व भीमसेन असे तिघे बंधु होते. तीन जनमेजयांपैकीं सर्पसत्र करणारा जनमेजय हा एकच असून, तो पांडव वंशांतला परिक्षिताचा मुलगा होता हे महाभारतावरून सिद्ध होते. (म. भा. आदिपर्व, ३–१) तेथें ‘जनमेजयः पारिक्षितः सहभ्रातृभिः कुरुक्षेत्रे दीर्घसत्रमुपासते ! असें वचन असून, तेथील ‘जनमेजयः

पारिक्षितः' हा शब्द मननीय आहे. त्या शब्दप्रयोगानें अर्जुनाचा नातू जो परिक्षित त्याचाच मुलगा जनमेजय हा सर्पसत्र करणारा होय हें स्पष्ट होतें.

यानंतर त्या सर्पसत्रांत कोण कोण सदस्य होते, हें त्या सदस्यांचा उल्लेख आदिपर्वांत सांपडत असून, त्यांपैकीं उद्दालक, श्वेतकेतु, देवल, कहोड, व्यास व वैशंपायन या व्यक्ति महत्त्वाच्या आहेत. त्यांचा संबंध इतरत्र योगीश्वर याज्ञवल्क्यांशीं आला असून, तो कोठें, केव्हां व कसा आला, हें या चरित्र ग्रंथांत आम्हीं त्या त्या प्रसंगीं दाखविलेंच आहे. परंतु पुनः आम्हीं त्यांचें दिग्दर्शन येथें थोडक्यांत करीत आहोंत. (आ. प. ४८, ७–१०)

या जनमेजयाच्या सर्पसत्रांत कृष्णद्वैपायन व्यास हे आपले शिष्य वैशंपायनयासह जातीनें हजर असून, त्या सर्पसत्रांतच जनमेजयानें आपल्या पूर्वजांचें चरित्र ऐकण्याची व्यासापुढें आपली इच्छा प्रदर्शित केल्यावरून व्यासांच्या सांगण्यावरून वैशंपायनांनीं त्याला भारत कथन केलें. हा मजकूर महाभारतांत आदिपर्वातील अध्याय २१ श्लोक २२ मध्यें आला आहे.

यावरून ही सर्व मंडळी पारिक्षित जनमेजय याच्या सर्पसत्रांतच एकत्र आलेली होती, असें स्पष्ट दिसून येते.

याज्ञवल्क्य देखील कोणते या विषयावर स्पष्ट प्रकाश पाडणारे वचन विष्णुपुराणांत आढळतें तें असें :– 'यजुर्वेदतरोः शाखा सप्तविंशन्महामतिः । वैशंपायन नामासौ व्यासशिष्यश्चकार वै ॥१॥ शिष्येभ्यः प्रददौ ताश्च जगृहुस्तेप्यनुक्रमात् । याज्ञवल्क्यस्तु तस्याभूद ब्रम्हरातसुतो द्विज ॥ २ ॥ (विष्णु, अं ३–५–१ व २) या वचनांत एकाच ठिकाणीं व्यास, त्यांचा शिष्य वैशंपायन व त्या वैशंपायनाचा शिष्य ब्रम्हराताचा मुलगा याज्ञवल्क्य या

त्रिवर्गाचा संबंध आला आहे. चार याज्ञवल्क्यांपैकीं वैशंपायनांचा शिष्य याज्ञवल्क्य कोण याचें स्पष्टीकरण ब्रम्हरातसुत, हें शब्द घालून त्यावरून इतर याज्ञवल्क्यांचा निरास केला आहे.

आतां यापुढें वैशंपायन व याज्ञवल्क्य यांच्यांत खटका उडून वैशंपायनांनीं आपली विद्या परत मागितली ही गोष्ट पुढील वचनांत स्पष्ट केली आहे. 'ततः क्रुद्धो गुरुःप्राह याज्ञ-वल्क्यं महामतिः। मुच्यतां यत्त्वयाधीतं मत्तो विप्रावमन्यक ॥' (विष्णु, ३–५–८) वैशंपायनांच्या रागाच्या वचनामुळें त्यांची विद्या टाकून देऊन याज्ञवल्क्यांनीं सूर्याराधन करून शुक्ल यजुर्वेद मिळविला. परत घरीं आल्यावर जनकांच्या यज्ञांत त्यांची व वैशंपायनांची पुनः गांठ पडून तेथें दक्षिणेसाठीं त्या दोघांमध्यें भांडण चाललें असतां देवल ऋषींनीं मध्यस्ती करून त्यांचें भांडण मिटविलें. हा मजकूर महाभारतांतील शांतिपर्वांत आलेला आहे. 'ततः सशिष्येण मया सूर्येण गभस्तिभिः । व्यस्तो यज्ञो महाराज पितुस्तव महामनः ॥ १८ ॥ मिषतो देवलस्यापि ततोऽर्ध हृतवा-न्वसु । स्ववेददक्षिणार्थे विमर्दे मातुलेन ह ॥ १९ ॥ (शांतिपर्व ३२३– १८ व १९) येथें वैशंपायनांना मातुल असें म्हटलें आहे. शिवाय देवल ही व्यक्ति मननीय आहे. कारण हे देवलच जन-मेजयांच्या सर्पसत्रांत सदस्य असून, त्यांचा संबंध ब्रह्मरातसुत याज्ञवल्क्याशीं जनकांच्या वरील यज्ञांत आलेला आहे; तेव्हां देवल हे पांडववंशज पारिक्षित जनमेजय व ब्रह्मरातसुत याज्ञवल्क्य म्हणजे योगीश्वर याज्ञवल्क्य यांना जोडणारा एक महत्वाचा दुवा आहे. त्याचप्रमाणें वैशंपायन यांनीं पारिक्षित जनमेजयाला सर्प-सत्रांत भारत कथन केलें असून ते योगीश्वर याज्ञवल्क्याचें मातुल लागतात. तेव्हां पारिक्षित जनमेजय व वैशंपायन शिष्य

याज्ञवल्क्य म्हणजे योगीश्वर याज्ञवल्क्य या दोघांना जोडणारा हा दुसरा दुवा होय.

यानंतर सर्पसत्र करणारे पारिक्षितजनमेजय व योगीश्वर याज्ञवल्क्य यांना जोडणारा तिसरा महत्वाचा दुवा म्हणजे उद्दालक आरुणी हा होय.कारण जनमेजयांच्या सर्पसत्रांत ते सदस्य असून, त्यांचा संबंध याज्ञवल्क्यांकडे त्यांचे गुरु या नात्यानें येतो.

शतपथांतील 'तं हैतमुद्दालक आरुणि: ।वाजसनेयाय याज्ञ-वल्क्यायान्तेवासिन उक्तोवाच' (श. ब्रा. १४–९–३–१५) या वचनांत याज्ञवल्क्यांना 'अन्तेवासिन:' म्हणजे शिष्य असें म्हटलें असून, शिवाय त्यांना 'वाजसनेयाय' हें विशेषण लावून उद्दाल-कांनीं मोठी बहार केली आहे. यावरून वाजसनेय म्हणजे योगीश्वर याज्ञवल्क्यच ही गोष्ट निर्विवाद सिद्ध होते. पुन: दुसऱ्यांदा उद्दालक आरुणि व याज्ञवल्क्य यांचा संबंध जनक-राजाच्या विद्वत्सभेंतहि आला आहे. (श. ब्रा. १४–६–७–१)

या उद्दालका नंतर कहोड हा चौथा दुवा आहे. कारण तो सर्पसत्रांत जसा सदस्य होता, तसांच जनकसभेंत तो याज्ञवल्क्यांचा प्रतिस्पर्धी होता. (श. ब्रा. १४–६–४–१)

पुढला पांचवा दुवा श्वेतकेतु आरुणेयाचा. हा श्वेतकेतु म्हणजे उद्दालकांचा पुत्र. तो सर्पसत्रांत एक सदस्य होता. त्याचप्रमाणें तो याज्ञवल्क्य, व शोमशुष्म हे मिळून चालले असतां त्यांची वाटेंत जनकाशीं गांठ पडली. हा मजकूर शतपथांत आला आहे 'जनको ह वै वैदेहो समाजगाम श्वेतकेतुनारुणेयेन सोमशुष्मेण सात्ययज्ञिना याज्ञवल्क्येन तान्होवाच कथमग्निहोत्रं जुहोति । (श. ब्रा. ११–६–२–१) या वचनांवरून श्वेतकेतू व याज्ञवल्क्य यांचा संबंध उघड होतो.

शिवाय आणखी दोन दुवे सांपडतात. ते म्हणजे इंद्रोत दैवाप व तुरकावषेय हे होत यापैकी इंद्रोत दैवाप यांचा संबंध शतपथांत आला आहे. तो असा :– एतेन हैन्द्रोतो दैवापः शौनको जनमेजयं पारिक्षितं याजयांचकार (श, प. १३–५–४–१)– भावार्थ– इंद्रोत दैवाप यानें पारिक्षित जनमेजयाकडून एक यज्ञ करविला. त्याचप्रमाणें तुरकावषेय यांनींहि जनमेजयाला एका यज्ञांत ऐंद्र अभिषेकानें अभिषिक्त केलें. असा उल्लेख ऐतरेय ब्राह्मणांत (ऐ. ब्रा. ८–२१) आलेला आहे.

यावरील दोन वचनांवरून पारिक्षित जनमेजयराजांनीं आणखी दोन यज्ञ केले होते. ही गोष्ट शाबीत होते. या दोन यज्ञांत योगीश्वर याज्ञवल्क्यांचा संबंध आल्याचा सुगावा लागतो कीं, काय हें पाहूं या. सुदैवानें वायुपुराराणांत हा उल्लेख सांपडतो. तेथें जो उल्लेख आहे तो असा– ' पारिक्षित्तनयश्चापि पौरवो जनमेजयः। द्विरश्वमेधमाहृत्य ततो वाजसनेयकम् ॥२५४॥ प्रवर्तयित्वा तद्ब्रह्म त्रिखर्वी जनमेजयः । विषादाब्द्राम्हणैः सार्धमाभिशस्तः क्षयं ययौ ॥२५५॥ (वायु ९९,२५४–२५५) भावार्थ– पारिक्षिताचा मुलगा जनमेजय यानें वाजसनेयाला ब्रह्मांच्या जागीं नेमून दोन अश्वमेध यज्ञ केले. आणि पुढें ब्राह्मणांच्याकडून शापित होऊन तो राज्य सोडून निघून गेला. येथें ' वाजसनेयक ' हा शब्द फार अर्थबोधक आहे. 'वाजसनेयक ' हें विशेषण फक्त ब्रह्मरातसुत याज्ञवल्क्यांनांच लागू आहे. इतर याज्ञवल्क्यांना नाहीं. तें विशेषण शतपथांत उद्दालकांनीं योगीश्वर याज्ञवल्क्यांनाच लावलें आहे. तेथें त्यांनीं वाजसनेयाय याज्ञवल्क्याय' (श. ५–१४–९–३–१५) असें स्पष्ट म्हटलें आहे. त्यावरून वाजसनेयक म्हणजे दुसरा तिसरा कोणी

नसून फक्त आमचे चरित्रनायक योगीश्वर याज्ञवल्क्य हेच होत. याविषयीं संशयाला आतां जागाच राहात नाही.

हीच गोष्ट अधिक स्पष्टतेने मत्स्यपुराणावरून सिद्ध होते. 'अभिमन्योः परिक्षित्तु पुत्रः परपुरंजयः। जनमेजय पारिक्षितः पुत्रः परधार्मिकः। ५७। ब्रम्हाणं कल्पयामास स वै वाजसनेयकम्। स वै वैशंपायनेनैवं शप्तः किल महर्षिणा ।५८। (मत्स्य. ५०, ५७–५८) हें वचन तर फारच स्पष्ट आहे. अभिमन्यूचा मुलगा पारिक्षित, त्याचा मुलगा जनमेजय यानें वाजसनेयाला ब्रम्हयाच्या जागीं नेमल्यामुळें वैशंपायनांकडून तो शापित झाला. येथे वाजसनेयकाच्या जोडीला वैशंपायनाचाहि उल्लेख आलेला असून तो लक्षांत घेण्यासारखा आहे. यावरून पारिक्षित जनमेजय व योगीश्वर याज्ञवल्क्य यांना जोडणारे इंद्रोतदैवाप व तुरकावषेय हें दोन खात्रीचे दुवे आहेत यांत संशय नाहीं.

आणखी एक दुवा देतां येतो. तो शतानीकाचा आहे. शतानीक हा पारिक्षित जनमेजयांचा मुलगा असून, तो योगीश्वर याज्ञवल्क्यांचा शिष्य होता. 'जनमेजयः शतानीकं पुत्रं राज्येऽभिषिक्तवान्' असें मत्स्यपुराणांत (५२–६५) म्हटलें असून विष्णुपुराणांत 'तस्यापरः शतानीको भविष्यति योऽसौ याज्ञवल्क्याद्वेदमधीत्य परं निर्वाणमाप्स्यति।' (विष्णु अं ४–२१–२) असें म्हटले आहे. या दोन वचनांवरून पारिक्षित जनमेजय यांचा शतानीक हा मुलगा जनमेजय व याज्ञवल्क्य यांस जोडणारा इतराप्रमाणेंच महत्त्वाचा आठवा दुवा आहे.

याविषयीं साग्र स्पष्ट कल्पना यावी म्हणून पुढील नकाशा उद्बोधक ठरेल.



ही नांवें वरील नकाशावरून पारिक्षित जनमेजय व योगीश्वर याज्ञवल्क्य हे उभयतां समकालीन होते, हें दाखविण्यास निर्विवाद सुस्पष्ट आहेत.

एकंदर विवेचनावरून आम्हीं पांडववंशज पारिक्षित जनमेजय व ब्रह्मरातसुत योगीश्वर याज्ञवल्क्य यांचा जो संबंध दाखविला आहे, तो किती व कसा सुसंगत, संयुक्तिक व इतिहास-पुष्ट आहे, याविषयीं वाचकांचें समाधान करण्यास पुरेसा आहे, असें आम्हांस वाटतें. ही आमची सांखळी उखडून काढल्याशिवाय उगीच आमच्यांवर गैर टीकांचे नसते शितोडे उडविल्यास तें फक्त हास्यास मात्र कारण होईल. नामसादृश्यावरून विरोधकांची दिशाभूल झाली असून या निरनिराळ्या दुव्यांचा त्यांनीं साकल्यानें विचार केलेला दिसून येत नाहीं.

याविषयीं सविस्तर माहिती पाहिजे असल्यास आमचें ‘ याज्ञवल्क्य दर्शन ’ या ग्रंथांत पहावयास मिळेल.

पारिक्षित जनमेजय दोन आहेत म्हणून वर सांगितलें आहेच,

त्यापैकीं अभिमन्यूचा मुलगा जो पारिक्षित, त्याचा मुलगा सर्पसत्र करणारा जनमेजय याविषयीं आतांपर्यंत विवेचन केलें. आतां दुसरा एक पारिक्षित जनमेजय आढळतो, पांडवांचा मूळवंश ह्या पुरुषासून प्रारंभ होतो.तो वंश कथन करतांना माहिती सांपडते ती अशी–पुरूचा एक मुलगा पारिक्षित असून त्याचा मुलगा जनमेजय नांवाचा होता. असें वायुपुराणांत अ. ९९, श्लोक २१३ ते २५६ व विष्णु पुराणांत अंश ४, १९, २० या ठिकाणीं सांगण्यांत आलें आहे. हा पारिक्षित जनमेजय पांडवाच्या पूर्वीचा १५ वा पूर्वज ठरतो. महाभारतांत संभवपर्वात ९५ व्या अध्यायांत पुरुचा वंश दिला आहे. त्यांत परिक्षित जनमेजय हा अर्जुनापासून ७ वा पूर्वज ठरतो. भागवतांमध्यें स्कंद ९, २६ येथें त्याच पुरुची वंशावळ आहे. त्यांत पारिक्षित जनमेजय म्हणून सांगितलेंच नाही ! भारताचें वचन सत्य मानून चाललें तरी तो पांडवांचा ७ वा पूर्वज ठरत असून नांवापलीकडे त्याचा इतिहास कोठेंच उपलब्ध नाही. मग त्याच्याकडे तो याज्ञवल्क्य कालीन म्हणून बोट दाखविण्यांत काय स्वारस्य आहे ? तिसराहि एक जनमेजय आहे तो पुरूचा मुलगा असून त्याचा प्रस्तुत विषयांत कांहींच संबंध नाहीं. असो. असा हा जनमेजय व याज्ञवल्क्य यांचा इतिहास आहे.

मत्सराचा कडेलोट

राज सिंहासन गडगडलें

वैशंपायनांचा केवढा हा अपमान, निराशा नि फजिति. त्यांनीं केलें एक, नि झालें भलतेंच. वशिला व वजन खर्च करून बहिष्कार पुकारला, पण तो यशस्वी झाला नाहीं. अश्वमेध व्हावा तसा होऊन गेला. सगळींच मसलत फसली; बाजू अंगावर उलटली. पदरीं अपवाद आला आणि लोकांत अप्रतिष्ठा झाली. प्रतिस्पर्धी विजयी झाले आणि दुराग्रहाला थप्पड बसली. तरी पण स्तब्ध बसणें झालें नाहीं.

वैशंपायनांचा पारा आतां अर्थात चढू लागला. आणि त्यांत आश्चर्य कसलें ? याज्ञवल्क्यांचें तें अलौकिक कर्मकौशल्य, प्रलोभनीय वर्चस्व आणि त्याबरोबरच त्यांचा बहुजन समाजांत होत असलेला गौरव नि जयजयकार पाहून आगींत तेल पडलें. वैशंपायनांची मनस्थिति मोठी चमत्कारिक झाली. त्यांचा तोल सुटत चालला. विवेकानें ताळ सोडला. मत्सरानें उचल खाल्ली. शिष्टाचारास पायबंद बसला आणि क्रोधानें ब्रह्मांड पेटलें. याज्ञवल्क्यांना येन केन प्रकारेण खालीं ओढून उलथून पाडण्याचा या श्रीमदाचार्यांनीं आतां जणूं कांहीं विडाच उचलला आणि तो हेतु तडीस नेण्यासाठीं म्हणून गुप्त खबलतें चालू झालीं.

जनमेजय राजे जोपर्यंत याज्ञवल्क्यांच्या पाठीशीं आहेत, तोपर्यंत त्यांना कमीपणा आणण्यांत यश येण्याची आशा नसल्या-मुळें वैशंपायनांचा मेंदू आतां त्या पुण्यश्लोक राजाला प्रथम

चरकांत ओढण्याच्या कारस्थानांत घुटमळूं लागला. जनमेजय राजर्षिविरूद्ध आतां गुप्त कारस्थानें चालूं झालीं. वैशंपायनांना हस्तिनापुरांत अपयश आलें होतें, तरीं त्यांचें वजन बाहेर जगांत पूर्वीप्रमाणेंच प्रभावी होतें.

त्यांचा शिष्यसमुदाय व स्नेह परिवार मोठा दांडगा व ठिकठिकाणीं पसरलेंला असल्यामुळे त्यांचा हेतु साध्य होण्यास फारसें अवघड झालें नाहीं. त्यांचे कांहीं शिष्य देशांत इकडे तिकडे भटकत होते. यांच्याकरवी जनमेजयाविरूद्ध विष पेरण्यांत येऊन, राजद्रोहाचे सुरंग ठिकठिकाणीं पेरून ठेवण्याचा त्यांनी सपाटा चालविला आणि पुण्यश्लोक जनमेजयांचें राजछत्र उलथून पाडण्याचा राक्षसी कट सिद्ध केला.

मत्सरानें पछाडलेलीं पण मोठ्या विचारांचीं सुविद्य व सुबुद्ध माणसेंदेखील इरेस पडून प्रसंग विशेषीं कशीं भडकतात व त्यामुळें विवेकाला व न्यायनीतीला कशी पारखीं होतात, याचें प्रतीक पहावयाचें असल्यांस तें येथें प्रत्यक्षच पहावयास मिळेल. आचार्य वैशंपायन म्हणजे कांहीं अशी तशी व्यक्ति नव्हती. बोलून चालून व्यास महर्षीचे पट्टशिष्य, यजुर्वेद विद्यापीठाचे मुख्य कुलगुरु जनमेजयाचे पुरोहित, भारत महाग्रंथाचें संपादक, राष्ट्रांतील वजनदार पुरोहित, ब्राह्मणवर्गाचे अग्रणी. मग आतां त्यांची प्रतिष्ठा व योग्यता आणखी काय वर्णावी? अशा सुज्ञ, सुविद्य व सुप्रष्ठित महात्म्यालादेखील मत्सरानें ग्रासल्यामुळें आपण हें काय करीत आहों याचें भानहि राहूं नये; ही किती दुर्दैवाची गोष्ट आहे? असाच प्रकार मागें एकदां वसिष्ठ विश्वामित्र यांच्यामध्येंहि घडून आलेला आम्हीं ऋग्वेदांत पहातों. दोघेंहि ब्रम्हर्षिच. अत्यंत ज्ञानी व महान विभूति पण या पौरोहित्यापायींच त्यांच्यांत केवढा वणवा

पेटला! सुदासाचें पौरोहित्य विश्वामित्राकडून जाऊन तें वसिष्ठांच्या गळ्यांत पडतांच विश्वामित्रानें दावा साधला. एक नव्हे, दोन नव्हे वसिष्ठाचे शंभर पुत्राचे बळी विश्वामित्रानें निर्दयपणें मोजून घेतले! ही कथा काय लोकविश्रुत नाही ? तरी विश्वामित्राची शांति झाली नाहीं आणि वसिष्ठाची ढळली नाहीं. तोच प्रकार येथेंहि दृष्टोत्पत्तीस येतो. वैशंपायनांनीं जटा आपटून आकाश पाताळ एक केलें तरी याज्ञवल्क्यांची शांतवृत्ति अगदीं चळली नाहीं.

काय चमत्कार पहा. राग सगळा याज्ञवल्क्यांवर आणि संधान रोखलें ते राजर्षि जनमेजयावर. पांडवकुलभूषण अर्जुनाच्या पुण्यश्लोक प्रपौत्रावर. राजपुरोहित वैशंपायन आतां विवेकास पारखे झाले. ते आतां क्रोध व मत्सर यांच्या पूर्ण आहारी गेले. आणि एके दिवशीं ज्वालामुखीसारखा एकदम स्फोट होऊन, जिकडे तिकडे बंडाचा भडका उडाला. जनमेजयावर ब्राह्मणाच्या शापाची अग्निवृष्टि कोसळली. हरहर. पुण्यश्लोक धर्मराजांचें सिंहासन गडगडलें आणि राजराजेश्वर स्थानभ्रष्ट झाले; जिकडून तिकडून सनातनी ब्राह्मणांची कोपाग्निवृष्टि झाली आणि त्रैलोक्यवीर अर्जुनाचा पणतु सर्व कपटनाटक पाहून वैतागून अरण्यांत निघून गेला; आणि वैशंपायनांच्या डोळ्यांचें पारणें एकदांचें फिटले.

धन्य जनमेजय राजे ! आणि धन्य त्यांची शांतवृत्ति ! बंड झाले म्हणून ते कचरले नाहींत. किंवा वैशंपायनांच्या रोषाला डगमगले नाहींत. राजपुरोहिताचा हा खोडसाळपणा व ग्राम कारस्थानें पाहून त्यांना शिसारी आली व खुषीनें राजपदा-वर पाणी सोडून आनंदानें ते वनवासी झाले. तथापि याज्ञ वल्क्यांच्या स्नेहभावांत व आदरनिष्ठेंत लवमात्रहि त्यांनीं कमी

पणा दाखविला नाहीं. परमधार्मिक असल्यामुळें सूडबुद्धीला थारा न देतां, दुष्ट व मत्सरी जगाचा संपर्क नको म्हणून त्यांनीं आपण होऊन काढता पाय घेतला. केवढा तो स्वार्थत्याग नि केवढी ती समाधानावृत्ति ! वैदिक राजे पराक्रमांत जसे श्रेष्ठ तसेच ते सत्व रक्षणांतहि अत्यंत दक्ष असत. राज्यच काय, प्राण गेला तरी आपल्या सत्वाला ते धक्का पोंचूं देणार नाहींत.

राजमुकुटावर तुळशीपत्र वाहून गृहत्याग, नव्हें राज्यत्यागहि केला पण सूडबुद्धीला तिलप्रायहि थारा दिला नाहीं. वैराग्यवृत्ति धारण करून अखेरपर्यंत अरण्यांतच त्यांनीं दिवस काढले. त्यांना धन्यवाद असोत. याविषयीं मत्य पुराणांत मजकूर आढळतो तो असा:—

'ब्रह्याणं कल्पयामास सवै वाजसनेयकम्
स वै वैशंपायनेनैव शप्तः किल महर्षिणा ।।५८।।
पारिक्षितः सुतोऽसो वै पौरवो जनमेजयः ।
द्विरश्वमेधमाहृत्य महावाजसनेयकः ।।६३।।
प्रवर्तयित्वा तं सर्वमृषि वाजसनेयकं ।
विवादे ब्राह्मणैः सार्धमाभिशक्षीवनं ययौ ।। ६४ ।।

(मत्स्य. ५०, ५७–६५)

याच अर्थाचा वायुपुरांणांतहि उल्लेख सांपडतो.

'पारिक्षित्तनयस्यापि पौरवो जनमेजयः ।
द्विरश्वमेधमाहृत्य ततो वाजसनेयकम् ।। २५४ ।।
प्रवर्तयित्वा तद्ब्रह्म त्रिखर्वो जनमेजयः ।
विषादाद्ब्राह्मणैः सार्धमभिशप्तो क्षयं ययौ ।।२५५।।

(वायु· ९९ २५४-२५५)

डाव फसला

किती झालें तरी बंड तें बंडच. त्याचा रंग तीनच दिवस; फार तर राज्यांत चार दिवस गोंधळ आणि बेबंदशाही माजून राहील. इतकेंच ! या पलीकडे कांहीं नाहीं आणि येथेंहि असाच प्रकार झाला. जनमेजयांनीं लोकांचा रागरंग पाहिला आणि राजपद सोडायची तयारी दाखविली. हें पाहून बंडाची वावटळ आपोआप ओसरत चालली. पण यापासून वैशंपायनांस जें साधावयाचें होतें, तो हेतु मात्र साध्य झाला नाहीं. ज्या उद्देशानें त्यांनीं हा डाव टाकला होता, तो त्यांचा उद्देश सपशेल फसला. त्यापासून याज्ञवल्क्यांच्या लौकिकाला अगर वर्चस्वाला काडीमात्रहि धक्का लागला नाहीं. इतकेंच नव्हें; तर त्यांच्या इभ्रतीला व लोकप्रियतेला उलट भरतीच आली. हस्तिनापुरच्या गादीवर पुन: त्यांचा परमशिष्य शतानीक विराजमान झाला.

जनमेजयाचा ज्येष्ठ पुत्र जो शतानिक तोच जनमेजयानंतर गादीवर आला. यासंबंधीं ऐतिहासिक पुरावा देणें थोडेसें जरूर आहे. हा जो शतानिक आहे तो पांडवप्रपौत्र पारिक्षित जनमेजयाचा मुलगा. पांडव पूर्वज पारिक्षित जनमेजयाचा नव्हें; याबद्दल भविष्य पुराणांतील एक सूचक पण महत्त्वाचा उतारा देणें योग्य होईल. 'शतानिक उवाच अंजलि: शिरसा ब्रह्मन् कृतोऽयं पादयोस्तव । ब्रूहि मे धर्मशास्त्रं तु येनाहं पूज्यतां व्रजे ।।२८।। समुद्धर भवादस्मात्तत्कीर्तयित्वा कथां शुभाम् । यथा मम पिता पूर्वं कीर्तयित्वा तु भारतम् ।।२९।। तस्य तद्वचनं श्रुत्वा

व्यासो वचनमब्रवीत् । एष शिष्यः सुमन्तुर्मे कथयिष्यति ते प्रभो ॥३०॥ यथा वैशंपायनेन पुरा प्रोक्तं पितृस्तव। महाभारतमाख्यानं ब्रह्महत्याव्यपोहनम् ॥३१॥ (ब्रह्मपर्व. अ. १, २८–३१)

हें वचन आमच्या मतें अत्यंत महत्त्वाचे आहे येथें एकाच ठिकाणीं व्यास, सुमंतु, वैशंपायन, जनमेजय व शतानिक यांचा एकत्र संबंध स्पष्ट दाखविण्यांत आला असून, त्यावरून प्रस्तुत शतानिक हा पांडव वंशज जनमेजयाचा पुत्र ठरतो. शिवाय व्यास शिष्य वैशंपायनांनीं सर्पसत्र करणाऱ्या पारिक्षित जनमेजयांस भारत कथन केलें. तसेंच व्यासपुत्र शुकाचार्यांनीं जनमेजयाच्या पित्यास पारिक्षितास भागवत कथन केलें. आणि व्यासाचें दुसरे शिष्यसु मंतु यांनीं जनमेजयपुत्र शतानिकास म्हणजे वरील पारिक्षिताच्या नातवास भविष्यपुराण श्रुत केलें. तेव्हां यावरील पुराणवचनावरून शतानिक हा पांडव प्रपौत्र जनमेजयाचा पुत्र ठरतो. आणखी पुष्टी पाहिजे असल्यांस 'जनमेजयाच्छतानिकस्तस्माऽऽजज्ञे स वीर्यवान् । जनमेजयः शतानिकं पुत्रं राज्येऽभिषिक्तवान् ॥ (मत्स्य. ५०–६५). हा श्लोक देईल. व जवळ जवळ याचाच अनुवाद वायुपुराणांतहि केलेला आढळतो. (पहा, वायु. ९९,२५४ते२५६.) या सर्व पुराव्यावरुन शतानिक हा जनमेजयांचा पुत्र ठरतो. याविषयीं शंका घेण्यास आतां जागा नाहीं.

शतानिक वाजसनेय याज्ञवल्क्य यांचा शिष्य होता. याचा उल्लेख पूर्वी केलाच आहे. हा आधार भागवतांतुला आहे. 'तस्य (जनमेजयस्य)पुत्रः शतानिको याज्ञवल्क्यात् त्रयीं पठन् । अस्त्रज्ञानं **क्रियाज्ञानं शौनकात्** परमेष्यतिच'. (भागवत ९, २२ ३८) **कंसांतील अक्षरें आमची असून तीं वाचकांस 'तस्य' याचा अर्थ**

बरोबर समजण्यासाठीं घातला आहे. या भागवत वचनाला विष्णुपुराणांतूनहि पुष्टि मिळते. 'अत परं भविष्यानहं भूपाला-न्कीर्तयिष्ये योऽयं सांप्रतमवनीपतिस्तस्यापि जनमेजयश्रुतसेनोग्र-सेनभीमसेनाः पुत्राश्चत्वारो भविष्यन्ति ॥१॥ तस्यापरः शतानीको भविष्यति योऽसौ याज्ञवल्क्याद्वेदमधीत्य कृपादस्त्राण्यवाप्य विषय विरक्तचित्तवृत्तिश्च शौनकोपदेशादात्मविज्ञानप्रवणः परंनिर्वाण-माप्स्यति ॥२॥ (विष्णु, अं. ४-२१ १ व २) यांत जनमेजय पुत्र शतानीक हा याज्ञवल्क्याकडून वेद शिकला असा उल्लेख आहे अर्थात तो त्यांचा शिष्य ठरला.

जनमेजयानंतर शतानीक गादीवर आल्यावर त्यानें वैशंपायनांस जवळ न करतां याज्ञवल्क्याची बाजू घेऊन शुक्ल यजुर्वेदाची तळी उचलून धरली आणि दरबारांत राजवाड्यांत वाजसनेयास थारा दिला. कारण तो स्वतः याज्ञवल्क्याचा शिष्य असून शुक्ल यजुर्वेदाचा पाठ त्यानें घेतला होता. अर्थात् त्यांनीं गुरुची बाजू घेतली हे स्वाभाविकच झालें. यामुळें वैशंपायनाचा व्यूह सगळा कोलमडून पडला व मनांतील मांडे मनांतच जिरले. त्यांची मसलत फिसकटून वर्चस्वाला झपाट्यानें ओहोटी लागली. हस्तिनापुरच्या राजदरबारांत व क्षत्रियसमाजांत शुक्ल यजुर्वेदाला मानाचें स्थान मिळून वाजसनेयांचें प्रस्थ व प्राबल्य वाढत चाललें व त्यामानानें वैशंपायनांची पकड ढिली पडत चालली. शुक्ल यजुर्वेदाला वसंत काळ लागला व कृष्ण यजुर्वेदाला शिशिर ऋतूची बाधा झाली.

कांहीं कालानंतर जनमेजय राजे अरण्यांत कालवश झाल्याची दुःखद बातमी हस्तिनापुरांत येऊन थडकली. ती ऐकून राजधानींत एकच हाहाःकार उडाला. या दुरंताचें खापर माजी

पुरोहितावर फोडण्यांत येऊन, लोकांत विशेषतः क्षत्रिय समाजांत त्यांच्या विषयीचा प्रेमादरभाव पार आटून जाऊन, बहुजन समाज त्यांच्याकडे पाठ वळवून बसला. याचा परिणाम असा झाला कीं, पुढें पुढें क्षत्रियांत व सनातनी गटांत तेढ व विरोध वाढत जाऊन वैशंपायन कंपू क्षत्रियांस पाण्यांत पाहूं लागला. तेव्हांपासून क्षत्रियांचें पौरोहित्य जुन्या ब्राम्हणांकडून सुटून ती जागा वाजसनेयांकडे येत चालली. आणि व्यवहारतः वैशंपायनांचा अस्त झाला.

स्वजनकलह म्हणजेच राष्ट्रनाश

याज्ञवल्क्यांच्या आश्रमांत यज्ञविषक चर्चा चालली असतां स्वजनद्वेष हा मुद्दा निघाल्यावरून त्याचें उदाहरण देऊन स्पष्टीकरण करण्याकरितां म्हणून पुढील गोष्ट त्यांनी सांगितली :–

'पूर्वी एकदां असें झालें कीं, नेहमीं एकोप्यानें राहाणाऱ्या व वागणाऱ्या देवांत काय झालें कोण जाणें भयंकर तेढ वाढून भांडण जुंपलें. असें मागें कधींच झालें नव्हतें. पण आतां त्यांच्यांत भेद पडून निरनिराळे पक्ष निर्माण झाले. अग्नि व वसु याचा एक गट होऊन अग्नि त्याचा पुढारी झाला. सोम व रुद्र यांचा एक गट बनून त्याचें अग्रेसरत्व रुद्राकडे आलें. वरुण व आदित्य यांचा एक गट बनून त्याचें आधिपत्य वरुणाकडे आणि इंद्र व मरुत यांचा एक गट होऊन त्यांत इंद्राला अग्रस्थान देण्यांत आलें. पुढें पुढें त्यांच्यांत इतकें वितुष्ट माजलें कीं, त्यांच्यात्यांच्यांत देखील विस्तव आडवा जाईनासा झाला. कोणी कोणाचें ऐकेना कीं, कोणी कोणाला जुमानीना. जो तो आपापल्यापुरतां पाहूं लागला व प्रत्येक गटांत त्या त्या गटाचें म्हणणेंच खरें, आपणच काय ते शहाणें, आपलेंच सर्वांनी ऐकावें व त्याप्रमाणें वागावें असा दुराभिमान व दुराग्रह वाढीस लागून इतरांस तुच्छ व क्षुद्र मानण्याची प्रवृत्ति बळावत चालली. यामुळें चौघांची तोंडें चार दिशांस होऊन एकमेक एकमेकास पाण्यांत पाहूं लागले व एकमेकापासून दूर व अलिप्त राहूं लागले.

अर्थात ही गोष्ट पुढें प्रसिद्ध पावून देवांचे शत्रू जे असुर व राक्षस यांच्या कानावर गेली. त्यांना तेवढेंच हवें होतें. आपल्या शत्रूंची जितकी शक्ति कमी होईल, तितकी त्यांच्या पथ्यावरच

होती. तशांत सुंदर स्वर्गावर व तेथील दिव्य ऐश्वर्यावर राक्षसांचा प्रथमपासूनचा डोळा होता. देवांत फूट पडली असून त्यांच्या त्यांच्यांत भयंकर तेढ वाढली आहे ही बातमी कानीं येताच त्यांनीं एक मोठा कट केला आणि 'दोघांचें भांडण तिसऱ्याचा लाभ' या सुभाषिताचा फायदा घेण्याचें ठरवून त्याप्रमाणें त्यांनीं स्वर्गावर स्वारी केली. चोहोबाजूंनीं निकराचा हल्ला चढविला. शेवटीं व्हावयाचें तेंच झालें. देवांची धांदल उडून त्यांचा पराभव झाला व असुर विजयी झाले.

आतां देवांचा सुंदर व ऐश्वर्यसंपन्न स्वर्ग दुष्ट व स्वार्थी असुरांचा झाला आणि स्वर्गाचे खरे मालक परतंत्र नि परवश बनले ! तरी देवांचे डोळे एवढ्यावरच उघडले नाहींत स्वजन-द्वेषाचा मोठा उन्माद त्यांना चढला होता द्वेषामुळें त्यांचें डोकें जागेवर राहिलें नाहीं. कशी झाली इंद्राची फजिती ? कसा बसला अग्निला मार ? कसा उतरला रुद्राचा नक्षा ? वरुणाची कशी फजिती उडाली. याप्रमाणें एकमेक एकमेकांस टोमणे मारून प्रत्येक गट आपआपसांत समाधान मानूं लागला !

होतां होतां राक्षसदिकांचा पिंगा व शिरजोरपणा वाढत चालला. असुरांचा राज्यकारभार सर्व देवांना त्यामुळें जाचक व मारक होऊं लागला. देवांची धुंदी उतरत चालली.

ते आतां आपापसांत कुजबुजूं लागले. आणखी कांहीं दिवस लोटलें तर खात्रीनें असुर आम्हांस कायमचे निर्वीर्य करून अखेर नामशेषहि करून टाकतील हें कांहीं ठीक लक्षण नाहीं. आपआप-सांतील भांडण व तुटकपणा हींच आमच्या दुःखास, अपमानास व हालअपेष्टांस कारणीभूत आहेत ! तडजोड काढून तेढ व दुही मिटवून पूर्वीप्रमाणें आपण सर्वजण एक होऊं या मग त्या मूठभर असुरांची आमच्यावर सत्ता गाजविण्याची काय बिशाद आहे ? आपला दुराभिमान व दुराग्रह टाकून देऊन एका हुकमती

खालीं सर्वांनीं राहूं या याशिवाय तरुणोपाय नाहीं. असें झालें तरच आमची धडगत लागून स्वर्ग पुनः परत मिळेल.

असा विचार करून सर्व देव आपापसांतील तेढ विसरून व भेद मोडून पुनः पूर्ववत एक झाले. त्यांनीं शक्तिमान व पराक्रमी इंद्राला आपला पुढारी केला. पुढें ऐक्याचा प्रभाव जसा व्हावा तसाच झाला. देवदानवांत पुनः लढाई जुपली आणि देव त्यांत विजयी झाले! असुरप्रभृति दुष्ट लोक पराभूत होऊन पळून गेले आणि देवांचा स्वर्ग देवाना मिळाला.

हा सुंदर बोध लक्षांत घेऊन भारतीयांनीं आपापसांत भांडण्याची व किरकोळ कारणावरून फटकून राहण्याची घातुक वृत्ति सोडून दिल्यास भारतमातेकडे वक्र दृष्टीने पाहण्याची कोणाची छाती आहे? 'देवानां पंथामनुचरेम' अशी वैदिक आर्यांची तेजस्वी घोषणा होती. म्हणूनच ते धन्य व सुखी झाले. भांडखोर वृत्तीनें कोणाचेंच कल्याण साधण्यासारखें नाहीं. कारण अशा भांडखोर लोकांचा शत्रु किती जरी दूर असला तरी या त्यांच्या भांडणाचा व बेकीचा येनकेन प्रकारेण फायदा घेऊन अचूक झडप घालून त्यांचा देश बळकावून बसल्याशिवाय राहणार नाहींत. आपापसांत भांडत बसणें म्हणजे शत्रूला घरांत शिरण्यास आमंत्रण देण्यासारखेंच होय. नंतर ते शत्रूच्या आहारीं जाऊन पडल्याशिवाय राहात नाहींत. म्हणून शहाण्यांनीं आपापसांत भांडत बसूं नये. हें तत्त्व समजून जो स्वजनांशीं भांडत नाहीं तो शत्रूच्या पोटांत तिडिक उत्पन्न करतो व त्याच्या आहारीं मुळींच जात नाहीं. (श. प. ३–४–२–१–ते ३)

या गोष्टीचा बोध म्हणून याज्ञवल्क्यांनीं 'तस्मादु ह न स्वा ऋतीयेरन्। यो हैवं विद्वान्नर्तीयतेऽप्रियं द्विषतां करोति न द्विषभ्द्यो रध्यति, तस्मान्नर्तीयेत। (श. प. ३–४–२–३) असें यथार्थ उद्गार काढलेलें आहेत.

योगीश्वरांचा पुण्याश्रम

पुण्यश्लोक जनकराजाचें राज्य म्हणजे त्यावेळचा एक अत्यंत सुपीक व सुमृद्ध देश होता. प्रजा सुखी, संतुष्ट व सत्कर्मनिष्ठ होती. राज्यव्यवस्था चोख व अधिकारीवर्ग सरळ व सालस होता. अर्थात दुष्काळ, चोऱ्या, बंडबखेडे यांचें नांव नव्हतें. जिकडे तिकडे शांतता, सुबत्ता व समाधान यांनीं वातावरण खुलून गेलेलें होतें. मनुष्याला सुधारणेच्या नांवाखालीं दुर्बल व अल्पायु बनविणारे तें विज्ञानयुग नव्हतें तर त्याला उद्योगप्रवण, समर्थ व दीर्घायु करणारे ज्ञानयुग होतें. प्राचीन वैदिक आर्यांचा तो भरभराटीचा काळ होता.

खुद्द मिथिला नगरीकडे पाहिलें म्हणजे जेथें तेथें मोठमोठे वाडे, मनोहर गोपुरें, सरळ रस्ते आणि प्रशस्त बागबगीचे असत. सर्वच सुंदर आणि मनोहर होतें. खुद्द जनक राजाचा राजवाडा म्हणजे प्रत्यक्ष इंद्रभुवन असून त्या भव्य वाड्यावर चकाकणारे सोन्याचें सुंदर कळस, चारी दिशांच्या चारी वेशीवर मोठ्या तोऱ्यानें हवेंत फडफडणाऱ्या सुर्यबिबांकित कर्पूरधवल पताका आणि त्यांच्यासमोर झुलणारे पांढरे शुभ्र हत्ती, या वैभवाचें कोण वर्णन करूं शकेल ?

अशा वैभवसंपन्न मिथिला नगरीजवळच पण कांहीं अंतरावर योगीश्वरांचा विख्यात आश्रम समुद्राप्रमाणें पसरलेला होता. त्याची शोभा म्हणजे कांहीं विलक्षण होती. जिकडे तिकडे उंच विशाल व सुंदर वृक्षांनीं तो आश्रम सर्वत्र नटलेला होता. मधून मधून फलपुष्पांच्या लहानमोठ्या बागा, भाजीपाल्यांचे ताफे, सुपीक शेतें व गायींचीं हिरवीगार कुरणें, अशा अनेक गोष्टींनीं तो पुण्याश्रम जिकडे तिकडे अगदीं खूलून गेला होता.

त्याचप्रमाणें चोहिकडे गोशाळा, यज्ञशाळा, पाठशाळा, भोजनशाळा, सभागृहें, अतिथिगृहें इत्यादि पसरलेलीं होतीं. मध्यभागीं योगीश्वराचें निवासस्थान असून दारा समोर कर्मयोगाचा सूर्यबिंबांकित शुभ्र ध्वज नभोमंडलांत उंच फडफडत होता. हा आश्रम म्हणजे त्यावेळचें सरस्वतीचें एक मुख्य क्रीडोद्यान व कर्मयोगाचें महाक्षेत्रच बनून गेला होता. येथेंच शुक्ल यजुर्वेद जन्मास आला आणि येथेंच शतपथ ब्राह्मण प्रकाशांत आलें. येथेंच अनेक यज्ञसमारंभ झाले आणि येथेच अनेक ऐतिहासिक गोष्टी घडल्या.

जनक राजे वेदविद्येचे अत्यंत शोकी, अभिमानी, महाज्ञानी, मोठे कर्मयोगी व अत्यंत उदार असे होते. राजनीतीचे कुशल कर्णधार व अध्यात्म शास्त्राचे सूक्ष्म चिकित्सक असे होते. शुक्राचार्यासारख्या ज्ञानी पुरुषाला देखील उपदेश करण्याची ज्यांची योग्यता, अशा त्या थोर पुण्यश्लोक राजर्षीची थोरवी काय वर्णन करावी ? (म. शां. प. अ. ३२६) अशा उदार व उदात्त नृपतीचा व योगीश्वर याज्ञवल्क्यांचा स्नेह व सलोखा अत्यंत वाढला तर त्यात नवल तें काय ? गुणी जनांचा तो सहज स्वभाव आहे.

शिवाय याज्ञवल्क्य व जनक यांच्यांत गुरुबंधूचे नातें होतें. दोघेहि तत्कालिन सुप्रसिद्ध योगाचार्य हिरण्यनाभ यांचे शिष्य होते. दोघेहि योगविद्या तेथेंच शिकले. त्यामुळें साहजिकच प्रेम व स्नेह यांची अभिवृद्धि झाली. या ब्रह्मर्षीच्या पुण्याश्रमाला जें एवढें विशाल व स्वर्गीय स्वरुप प्राप्त झाले, होतें त्याला कारण म्हणजे या कृतिजनकाचें थोर व उदार अंतःकरण हेंच होय. त्यावेळीं ब्राह्मण व क्षत्रिय दोघेहि वेदमाऊलीचें परमभक्त व अनन्य उपासक होते. तेथें आजच्या सारखें वेदोक्ताचें

आत्मघातकी खूळ माजलें नव्हते. आर्यांच्या वेदविद्येचा उत्कर्ष करणारे जसे ब्राह्मण तसेंच या आर्यभूमीला सुवर्णभूमि बनविणारे वीरबंधु क्षत्रियच होते. वैदिक आर्यांचा विजयी झेंडा जगभर नाचविणारे लोकोत्तर शूरवीर क्षत्रियच भारत भूमीच्या स्वातन्त्र्य लक्ष्मीच्या संरक्षणार्थ आर्यशत्रूंबरोबर प्राणाची पर्वा न करतां अखंड झुंजून तिला परशत्रूपासून अलिप्त ठेवणारे व तिला जिवापाड जपणारे हे क्षत्रिय बधूच नव्हेत तर कोण ? विद्वान ब्राह्मणाला उदार आश्रय देऊन वेदविद्येचें संवर्धन व संगोपन या उदार वर्गानें केलें म्हणूनच आज वेदविद्येला व वैदिक संस्कृतीला अग्रपूजेचा मान मिळत आहे.

याज्ञवल्क्यानीं या ब्राह्मणक्षत्रिय सख्याला मातापुत्राचें नातें जोडलें आहे. 'ब्रह्मणोहि क्षत्रं जायते'– ब्राह्मणापासूनच क्षत्रिय जन्मतो. असें शतपथांत स्पष्ट म्हटलें आहें. येथे ज्ञान या अर्थी ब्राह्मण व कर्म या अर्थी क्षत्रिय अशी ही शब्दयोजना आहे. हें लक्षांत घेतलें पाहिजे. अर्थात् ज्ञानापासूनच कर्माची उत्पत्ति ही गोष्ट शास्त्रशुद्ध व अनुभवसिद्ध असून ती योगीश्वरांना अवगत होती. म्हणूनच त्यांनीं 'यन्मनसा चिंतयति तत्कर्मणा करोति' असें शतपथांत घोषित केलें आहें. (कर्माचें मातृस्थान ज्ञानाकडे असल्यामुळें व ब्राह्मण हे ज्ञानमूर्ति व क्षत्रिय हे कर्ममूर्ति असल्यामुळें ब्राह्मणांपासून क्षत्रियांची उत्पत्ति असें लक्षणेनें म्हणतां येतें. या उभयतांत मातृपुत्र संबंध दाखविण्यांत त्यांचे व्यवहारकौशल्य प्रतीत होतें. त्यांनीं म्हटलें आहे कीं, 'न माता पुत्रं हिनस्ति न पुत्रो मातरम्– माता ही मुलाचा घात करीत नाहीं. म्हणजे त्याला दुखवीत नाहीं. आणि मुलगा हा मातेचा घात करीत नाहीं. म्हणजेच तिला दुखवीत नाहीं. एक प्रेमानें व दुसरा

आदरानें एकमेकाकडे पहातात. वैदिक आर्यांचा असा हा दंडक आहे. याच भावनेनें 'न मातृसमो गुरुः' असें भारतांत म्हटले असून 'मातृदेवो भव' असें श्रुतिवाक्य आहे त्या धोरणानें मातृस्वरुप ब्राह्मणाला क्षत्रियांचा गुरु म्हटलें यांत कोठेंही चुकलें नाहीं भारतीय संस्कृतिचा द्वेष करणारांनीं वाटल्यास ब्राह्मणांवर बोटें मोडावीत.पण त्यात मातृद्रोहाचे पातक आहे असें श्रुतिमाऊली सांगतें, हें आत्मकल्याणेच्छुनी अभिजात भारतीयानीं विसरूं नये.तात्पर्य एका बाजूला प्रेम तर दुसऱ्या बाजूला आदर असा त्यावेळीं ब्राह्मण-क्षत्रिय संबंध होता. जेथें व जेव्हां या दोन प्रभावी वर्गात ऐक्य व सख्य नांदेल तेव्हांच व तेथेंच ब्राह्मणाला मान व क्षत्रियाला राज्य असा रमणीय व स्पृःहणीय देखावा दृष्टीस पडावयाचा. हें बीज वाक्य प्राचीन वैदिक लोक पूर्ण, अगदी पूर्ण ओळखून होते आणि म्हणून त्यांच्या राजवटींत स्वातंत्र्य कामधेनु आनंदानें नांदत होती. राष्ट्र सुखी व संपन्न असे. असा इतिहासाचा दाखला पाहण्यास मिळतो

या आश्रमांतच अनेक विषयांची सूक्ष्म व गंभीर चर्चा झाली. अनेक सिद्धांत बसविले गेले व अनेक विषयांची समंजस सुसंगति लावण्यांत आली. तेथें जे वादविवाद होत असत झाले ते सर्व तात्त्विक स्वरूपाचे असून, आजहि त्यांना विचारप्रणालींत महत्वाचें स्थान असून, मागें झालेल्या धर्मसंस्थापकांना ते मार्गदर्शक व उपकारक असे ठरले आहेत. भगवान बुद्धांनीं तर ठिकठिकाणीं याज्ञवल्क्यांच्या पावलावर पाऊल टाकून याज्ञवल्क्यांच्या शिकवणीचा भरपूर फायदा घेऊनच आपला धर्म रंगविला व सजविला आहे. ज्यांनीं शतपथाचा विशेषतः या ग्रंथांतील बृहदारण्यकाचा सूक्ष्म व सखोल अभ्यास केला आहे

त्यांना आजहि हें सहज कळून येण्यासारखें आहे.* याज्ञवल्क्यांची शिकवण किती सुंदर नि समर्पक आहे याची कल्पना यावी म्हणून आजच्या राष्ट्रवादाचें एकच उदाहरण येथें दिलें आहे. राष्ट्र सुखी व संपन्न कसें व केव्हां होईल म्हणजे तें कसें असावें, याचें लक्षण त्यांनीं शुक्ल यजुर्वेदांतील एका मंत्रांत सूचित केलें आहे, तें आम्हां भारतीयांना आजहि मननीय आहे.

भारतीय राष्ट्राची त्यांनीं कल्पना मांडून ती रंगवून दाखविली आहे, ती अशी :– 'आ ब्रह्मन्ब्राह्मणो ब्रह्मवर्चसी जायतमा राष्ट्रे राजन्यः शूर इषव्योऽतिव्याधी महारथो जायतां दोग्ध्री धेनुर्वोढानड्वानाशुः सप्तिः पुरन्धिर्योषा जिष्णू रथेष्ठाः सभेयो युवाऽस्य यजमानस्य वीरो जायतां निकामे निकामे नः पर्जन्यो वर्षतु फलवत्यो न ओषधयः पच्यन्तां योगक्षेमो नः कल्पताम् ॥ (शु. य. २२–६२) भावार्थ – हे ब्रह्मन् ! आमच्या राष्ट्रांत ज्ञानतेजानें चमकणारे असे तेजस्वी ब्राह्मण निपजोत. तसेंच आमच्या देशांत पराक्रमी, धनुर्धारी व महारथी असें शत्रूला धूळ चारणारे शूर क्षत्रिय निपजोत. आमच्या देशांत धष्टपुष्ट अशा चांगल्या दुभत्या गाई निपजोत. अत्यंत चपल असे उमदे घोडे निपजोत. सर्वांग रमणीय व सद्गुणमंडित अशा लावण्यसंपन्न स्त्रिया उत्पन्न होवोत. अखंड विजयशाली असे अतिरथी, महारथी वीरश्रेष्ठ निपजोत. आमच्या यजमानाला म्हणजे राजाला सर्वसमर्थ, सभापंडित व पराक्रमी असा युवराज प्राप्त होवो. आमच्या इच्छेप्रमाणें मेघराज आमच्या राष्ट्रावर वेळोवेळीं जलवृष्टि करो आणि आम्हां प्रजाजनांचा योगक्षेम सुरळीत चालो.' ही प्रार्थना

* याचें सविस्तर विवेचन आमच्या 'बुद्धदर्शन' या ग्रंथांत पुढें करणारच आहोंत तें वाचकांनीं अवश्य पहावें.

केवढी सुंदर व भावनामधुर आहे बरें! यांत ब्राह्मण क्षत्रियांचा जो उल्लेख आहे तो लाक्षणिक अर्थानें आहे. सर्व मानव कुलाला तो अनुलक्षून आहे. राष्ट्रांतील प्रत्येक मनुष्य आपापल्यापरी कार्यकुशल व सद्गुणसंपन्न असावा असा त्याचा अर्थ आहे. अशा स्वरूपानें राष्ट्र ज्यांना लाभलें आहे, 'ते लोक धन्य होत.' असें उद्गार सहजच निघतील. यापेक्षां सुंदर राष्ट्राची कल्पना इतक्या थोड्या शब्दांत अद्यापपर्यंत जगांत कुठेंच स्फुरलेली दिसून येत नाहीं.

याज्ञवल्क्यांची सामाजिक दृष्टि

वैदिक आर्यांची सामाजिक दृष्टि कशी काय होती, याचें सुंदर चित्र योगीश्वरांच्या मार्मिक शिकवणींत पहावयास सांपडतें. मानवकुलाकडे – विशेषत: भारतीय समाजाकडे वैदिक ऋषींची पहावयाची प्रापंचिक व पारमार्थिक आणि आजच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे व्यावहारिक व राष्ट्रीय दृष्टि कशी होती, हें नजरेस आणून व तात्विक दृष्ट्या ती कशी असावी, या विषयी योगीश्वरांनीं जें सुदर विवेचन मानवजातीला गुण्या-गोविंदानें नांदण्यासाठीं म्हणून केलें आहे तें विचारवंताला खरो-खर चिंतनीय व अनुकरणीय असेंच आहें. जगांतला अत्यंत प्राचीन असा सुधारलेला व प्रगतिपथावर चाललेला मानव समाज म्हणजे वैदिक आर्यसमाज होय. याबद्दल ऐतिहासिक दृष्ट्या जगांतील तज्ञ विद्वानांत पूर्ण एकमत आहें. तेव्हां महर्षिच्या स्वानुभावशुद्ध विचारप्रणालीकडे सूक्ष्म, शांत व समतोल दृष्टीनें पाहणें व त्याचें अनुकरण करणें यांतच भारतीयांचें उदंड कल्याण आहें असें आम्ही समजतों. भारतीय आचार, अर्थात् भारतीय संस्कृति ही स्वतंत्र, स्वयंपूर्ण व स्वयंजीवि अशी चिरंजीव संस्कृति असून, त्या तेजस्वी परंज्योतीवर कालमानानुसार आलेली काजळी झाडून टाकणें, इतकेंच सूज्ञ समाजनायकांचें कर्तव्य आहें. तिची उलथापालथ करूं पाहणें म्हणजे भारताचा सर्वनाश करण्यासारखे आहें. या सामाजिक प्रश्नावर वैदिक ऋषींचा कौल काय मिळतो तो पाहूं या. अर्थात त्याकरतां योगीश्वरांच्या शतपथ ग्रंथाकडे दृष्टि दिली कीं, तें पुरें आहे.

एकपेशी प्राण्यापासून विकास पावत पावत जसा मनुष्य-प्राणी पूर्णावयवी बनला. तद्वत् एकावयवी वैदिक आर्यसमाजाचा क्रमानें विकास होत गेला आहे. आणि ही गोष्ट योगीश्वरांनीं शतपथांत अत्यंत सुंदर रीतीनें ग्रथित करून ठेवली आहे. ती आजदेखील कोणत्याहि समाजशास्त्रवेत्त्याला कबूल करावी लागेल.

भारतीय वैदिक समाज हा प्रथमारंभीं एकवर्णात्मक म्हणजे ब्राह्मणविशिश्ट असा एकावयवीच होता ('ब्रह्म वा इदमग्र आसीत्तेदकमेव' श. प. १४–४–२–२३) तो एकटाच असल्यामुळें जागतिक सर्व व्यवहार परिणामकारक रीतीनें घडवून आणण्यास समर्थ होईना. त्या एकाग स्थितींत समाजाचें शारीरिक, बौद्धिक व आत्मिक संवर्धन, संपोषण व संरक्षण जसें व्हावयास पाहिजे तसें त्यास करतां येईना म्हणून समाजाचें संरक्षण अधिक सुसूत्र सुव्यवस्थित व्हावें, या उद्देशानें त्यानें आपल्यांतूनच प्रभावी व प्रशस्त असा क्षत्रियवर्ण निवडून तयार केला. ('तच्छ्रेयोरुपम त्यसृजत क्षत्रम्' श. प. १४–४–२–२३) हा वर्ण उत्पन्न झाल्या-वर समाज सुरक्षित झाला. ही गोष्ट खरी. पण वाढत्या समा-जाचें संगोपण करण्याचें कार्य त्याच्याकडून होईना. तो हेतु साधण्यास म्हणून त्यानें आतां पुन: आपल्यांतूनच कृषि व वाणिज्य संवर्धक असा वैश्यवर्ण निर्माण केला. ('सविशमसृजत' १४–४–२–२४) पुन: अडचण भासूं लागली ती लागलीच. तींत अवयव झालें तरी ते कार्यक्षम होईनात. म्हणून आतां शूद्र म्हणजे सांग-कामे यांचा वर्ण निर्माण केला. इतकें करूनहि कर्तव्यव्यवस्था नीट व नियमित नसल्यामुळें सर्वांना उपकारक व हितकारक होईल असा बंधनात्मक श्रेयोरुप धर्म निर्माण करण्यांत आला. अर्थात्

हा धर्म म्हणजे क्षत्रियांचा देखील नियंता आहे. म्हणून राजाज्ञेपेक्षां धर्माज्ञा ही श्रेष्ठ प्रतीची आहे. त्यांत पुष्कळ तथ्यांश आहे, असें आज जगाकडे पाहून म्हणण्यास कांहीं धर्माचें फर्मान आहे. हा भारतीय समाज जेव्हां चतुर्वर्णात्मक झाला तेव्हां तो सर्वांग परिपूर्ण होऊन समर्थ व कार्यक्षम झाला. हा भारतीय समाजाचा विकास मानवतेचा नैसर्गिक व स्वाभाविक विकास असून त्याची छाप जगांतील कोठल्याहि मानववंशावर कमी अधिक प्रमाणांत पडलेली दिसून येते. वैदिक आर्यांचे जे निरनिराळे वर्ण झाले त्यांचा परमार्थाशी फारसा संबंध नसून जगांतील सर्वमानव समाजाचे जीवन सुकर व सुखकर व्हावें एवढांच त्यांत उद्देश आहे असें आम्हांस वाटतें. हे सर्व वर्ण प्रपंचांत परस्परांस उपकारक व हितकारक होऊन सर्वांना त्यांत ऐहिक व पारमार्थिक अभ्युदय व निःश्रेयस यथाशक्ति व यथामति साधतां येऊन त्यांचा हा मानवजन्म कृतकृत्य व्हावा अशी उदात्त योजना या वर्णव्यवस्थेच्या बुडाशीं गर्भित आहे.

गुलाबाच्या पाकळ्या जरी भिन्न भिन्न दिसल्या तरी फूल जसें एक, दाणे वेगळे वेगळे असले तरी डाळिंब जसें एक, मोती वेगळे असले तरी हार जसा एक, तद्वत् वर्ण अगर जाति जरी व्यवहार दृष्ट्या भिन्न भिन्न असल्या व दिसल्या तरी परमार्थतः भारतीय मानवकुल एक व अखंड, ही दिव्य भावनाच पूर्वी स्फुरत होती आणि म्हणूनच वैदिक राष्ट्र त्यावेळीं जगांत प्रभावी व तेजस्वी म्हणून गाजून गेलें. शरीरांतील निरनिराळ्या अवयवांना सर्वत्र खेळून चैतन्य व सामर्थ्य देणारें शरीरांतील रक्त जसें एक तद्वत् भारतसमाजोद्यानांतून निरनिराळ्या ताटव्यांतून वाढलेल्या लहान थोर विविध जातिरूप झाडझुडपांना सुंदर टवटवी व मधुर

तजेला देणारें अमृतसदृश धर्मरूपीं पवित्र जीवनहि एकच असल्यामुळें तो धर्म एके काळीं स्वर्गातील नंदनवनाप्रमाणें फुलून व खुलून दिसत असला तर त्यांत नवल तें काय ?

हें आम्हीं आज कांहींतरीच सांगतों असें मात्र कोणी समजूं नये. योगीश्वरांनींच ही गोष्ट आज पांच हजार वर्षांपूर्वीच स्पष्ट सांगून टाकली आहे. समाजांत हा वर्णोत्पत्ति व्यवहार व्यवसायमूलक अस्तित्वांत आलेला असला तरी तो समाज कांहीं परमार्थतः भिन्न व तुटक नाहीं; धर्म व संस्कृतिदृष्टया तो एक नि अखंड आहे, असें वैदिक ऋषींचें स्पष्ट मत आहे. (इदं ब्रह्म, इदं क्षत्रं इमे लोका इमे देवा इमानि भूतानि इदं सर्वं यदयमात्मा (श. प. १४–५–६). हे ब्राह्मण, हे क्षत्रिय, हे देव, हें भूतजात, हीं सर्व आत्माच. प्रत्येकाच्या अंतर्यामी राहणारा हा परमात्माच आहे. म्हणजे हा सर्व मानवी समाज व्यवसायतः भिन्न दिसला तरी वस्तुतः आत्मरूपच–अर्थात् एकच आहे. यापेक्षां स्पष्ट आणि सरळ असें आणखी अधिक तें काय सांगावयाचें राहिलें ? विविधत्वांत एकत्व,(अविभक्तं विभक्तेषु)पाहण्याची पारमार्थिक दृष्टि काय ती ही. हिलाच आधुनिक भाषेंत राष्ट्रीय दृष्टि म्हणतात. मानव्य दृष्टि म्हटलें तरी चालेल. ही धर्मभावना, ही प्रेमभावना, ही ऐक्यभावना, ही विश्वभावना, ही आत्मभावना जर मंदावली, बिघडली, मावळली तर तेथें लोभप्रेरित, स्वार्थप्रचुर जातीयतेचा, प्रांतीयतेचा, अराष्ट्रीयतेचा भस्मासुर हडकून त्या समाजाचा अगर राष्ट्राचा सर्वनाश केल्याशिवाय राहणार नाहीं. हा इषारा वरील वचनांत गर्भित आहे, हें शहाण्यांनीं विसरूं नये.

अनेक लहान थोर व्यक्तींचें मिळून एक कुटुंब होतें. अशा अनेक कुटुंबांची समान व्यवसायामुळें एक जात बनते. आणि

अशा अनेक जातींचा मिळून एक गांव होतो. अशा अनेक गांवांचा एक प्रांत व अनेक प्रांतांचा एक देश अगर एक राष्ट्र होतें. प्रपंचांत वैयक्तिक अगर कौटुंबिक हिताहिताच्या दृष्टिनें विचार करणें इष्ट व योग्य असलें, तरी ज्यावेळीं गांव, प्रांत, देश अगर राष्ट्र अशा सामुदायिक दृष्टिनें विचारविनिमय करावयाचा असतो तेव्हां व्यक्ति, कुटूंब अगर इतर घटकांचा पृथक्शः विचार करीत न असतां, व्यापक व सामुदायिक हिताहिताच्या दृष्टीनेंच तो केला पाहिजे. आणि हीच वैदिक भाषेंत परमार्थदृष्टि होय आणि यालाच आज आपण राष्ट्रीय दृष्टि म्हणतो. ही दृष्टि मनुष्यांत जसजशी विकास पावत जाईल तसतशी त्याची योग्यता व अधिकार परमार्थांतहि वाढत जाता आणि होतांहोता शेवटीं तो विश्वकुटुंबी होऊन,'हें विश्वचि माझे घर' अशी दिव्य घोषणा करूं लागतो. हाच महात्मा किंवा महर्षि. 'इदं सर्व यदयमात्मा' हें महर्षि योगीश्वराचें विश्वसंग्राहक व विश्वप्रेमात्मक दिव्य वचन सतत डोळ्यापुढें ठेवून आम्हीं आत्मोपम्य दृष्टीनें राष्ट्रीय व सामाजिक प्रश्न सोडवावयास बसूं तर खरोखर केवढी बरें भौज होईल.

ही वर्णोत्पत्ति व वर्णव्यवस्था समाजाच्या व राष्ट्राच्या हिताकरतां, कल्याणाकरतां, उत्कर्षाकरतां व उद्धाराकरतां म्हणून निर्माण करण्यांत आलेली आहे, ही मंगल भावना डोळ्यापुढें न ठेवितां जर कोंणी स्वार्थनिष्ठ विशिष्ट वर्गीय जातीयतेचें भूत उठवूं पाहील तर त्यापासून कोणाचेंच हित न साधतां, सर्वांचाच नाश मात्र ओढवेल, ही गोष्ट समाजनेते म्हणविणाऱ्यांनीं ढळढळीत आपल्या डोळ्यापुढें सदैव ठेवली पाहिजे.

याज्ञवल्क्य असा गंभीर इशारा देतात कीं, 'ब्रह्म तं परादद्योऽन्यत्रात्मनो ब्रह्म वेद' आपण वेगळे आणि ब्राह्मण

वेगळे असें जे समजतात त्यांस ब्राह्मण दूर करतात." (श. प. १४-५-४-५) आणि आपण वेगळे आणि क्षत्रिय वेगळे असें जे समजतात त्यांस क्षत्रिय दूर करतात. ('क्षत्रं तं परादाद्योऽन्यत्रात्मनः क्षत्रं वेद' १५-५-४-५) आणि याच न्यायानें आपण वेगळे व वैश्य वेगळे असें जे समजतात त्यांस वैश्य दूर करतात व आपण वेगळे व शूद्र वेगळे असें जे समजतात त्यांस शूद्र दूर करतात. ('लोकास्तं परादुर्योऽन्यत्रत्मनो लोकान्वेद' १४-५-४-५) आणि आपण वेगळे आणि हें सर्व जग वेगळें असें जो समजतो त्यास सर्व जगच व हें सर्वभूतजात दूर करतें. ही याज्ञवल्क्यांची पथ्यकर व विश्वमंगल शिकवण डोळ्याआड करून, क्षुद्र जातीयतेच्या व संकुचित प्रांतीयतेच्या वेडानें भडकून जाऊन भलते सलते चाळे करीत गेल्यानें समाजस्वास्थ्य कोलमडून पडून राष्ट्राचा सर्वस्वीं घात मात्र होईल. भारतीय समाजाचा हा जो स्वाभाविक वर्णविकास झाला आहे, त्याच्या बुडाशीं विराट पुरुषाची देहकल्पना आहे. त्या विराट पुरुषाला मुख, बाहू, मांड्या, पाय इत्यादि जसे अवयव आहेत, तद्वत् भारतीय समाजपुरुषाचे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार प्रमुख अवयव असून त्यांच्या परस्पर सहकार्यानें व सहानुभूतीनें तो समाजपुरुष जगणारा व कार्यक्षम होणारा आहे हे न समजण्याइतका भारतीय समाज निर्बुद्ध झाला आहे असें अजून आम्हांस वाटत नाहीं. 'सर्वे सुखिनः सन्तु' ही मंगल भावनाच भारतीय वर्णव्यवस्थेच्या बुडाशीं स्फुरत आहे. योगीश्वरांची ही शिकवणूक इतकी तेजस्वी, प्रभावी, व्यापक व शास्त्रशुद्ध आहे कीं, सर्व विद्वत्जगत्यांस हिंदु तत्वज्ञानाचे जनक (Father of Hindu Philosophy या महनीय नांवानें ओळखतें.

सुशील आर्यगृहिणीचा आदर्श

एका प्रसंगीं याज्ञवल्क्यांनीं पुढील गोष्ट सांगितली. ती मोठी उद्बोधक आहे.

भृगु ऋषि हे स्वर्गास गेले तेव्हां त्यांनीं आपल्यापैकींच भार्गवच्यवन ऋषीस बरोबर न घेतां त्यांला येथेंच पृथ्वीवर ठेऊन आपण एकटेच त्या दिव्य लोकावर निघून गेले. अरेरे बिचारा च्यवन जख्खड म्हातारा, अगदींच गळाठलेला, जवळ जवळ पिशाच्च- रूपच बनला होता, असेंच कां म्हणाना ! एकटाच कसाबसा कालक्रमणा करीत होता. मात्र एवढी गोष्ट खरी कीं, तो महा तपस्वी होता. शरीरानें अगदींच थकला भागला असला तरी त्याचें तप:सामर्थ्य मात्र फार प्रखर होतें. आपल्या तप:प्रभावानें बसल्याबसल्याच तो आपली इच्छा तृप्त करून घेत असे.

एकदां असें झालें कीं, शर्यात मानव हा कांही लोकांनिशी फिरत फिरत जेथें च्यवन राहत होता, तेथें जवळच कांहीं अंतरावर येऊन कांहीं दिवस तळ देऊन राहिला. एके दिवशीं त्याचीं मुलें सहज फिरत फिरत त्या म्हाताऱ्यापाशी आलीं. च्यवनाचें तें अभद्र व विचित्र रूप पाहून त्यांनीं त्याची पोरस्वभावाला अनुसरून टिंगल व टवाळी चालविली व मधुन मधून मातीच्या ढेकळांचा त्याजवर वर्षावहि करण्यास कांहीं कमी केलें नाहीं !

बिचारा च्यवन, अगदीं म्हातारा, जणुं कांहीं पिकलेलें पान, एकटाच, जवळ कुणी नाहीं. अशी जरी परिस्थिति होती तरी तो साधासुधा नव्हता. त्या आडमुठ्या मुलांनीं केलेली थट्टा-कुचेष्टा व खोड्या पाहून ब्राह्मण भयंकर चिडला व संतापला. वैदिक ऋषी हे जितके शांत, तितकेच ते तापट, जितके दयाळू

तितकेच कठोर असतात. प्रसन्न झाले तर वाटेल तें देतील नि रुष्ट बनले तर पाताळांत दडपतील. त्यांची वाणीही तशीच प्रखर नि प्रभावशाली असे. मुलांनीं केलेल्या या अपराधाचें उट्टें शर्यातीवर काढण्याचें ठरवून त्यांनीं शर्यातीच्या परिवारांत व बरोबरच्या लोकांत तपःसामर्थ्यानें नसतें भांडण उपस्थित केलें.

शिबिरांत पहावें तिकडे भांडणच भांडण झालें. भावाभावांत भांडण, वहिणीबहिणींत भांडण, भावाबहिणींत भांडण, बापामुलांत भांडण, मायलेकींत भांडण, नवराबायकोंत भांडण, बायकाबायकांत व पुरुषापुरुषांत भांडण घरोघर भांडण! यामुळें त्यांचे सर्व व्यवहार जवळजवळ बंद पडून अखेर अन्नपाण्याचीसुद्धां भ्रांत पडली. कोणीं कोणाचें ऐकेना व कोणी कोणाला जुमानी ना. सगळा एकच गोंधळ नि एकच गडबड उडाली!

हा चमत्कारिक प्रकार पाहून शर्यातास मोठा विचार पडला. आतांपर्यंत सर्व लोक गुण्यागोविंदानें नांदत असतां ही सर्वच भांडण्याची वावटळ अशी कां उद्भवावी, याचें गूढ त्याला उकलेना. आपल्याकडून कोणातरी सत्पुरुषाचा छळ वा अवमान तर झाला नसेल ना, किंवा देवांचा कांहीं अपराध तर घडला नसेल ना, अशी शंका मनांत उद्भवून, पुढें त्यानें त्याप्रमाणें चौकशी चालविली. कांहीं गोपालांच्या व धनगरांच्या मुलांकडून आपल्या मुलांनीं एका म्हाताऱ्याची टिंगल करून त्यास ढेंकळांनीं मार दिल्याचें समजलें. तो मनांत फारच चपापला. कारण च्यवनऋषीचा आश्रम जवळच होता व त्याची खात्री झाली कीं, तो म्हातारा म्हणजे दुसरा कोणी नसून महातपस्वी च्यवन ऋषिच होय.

लागलीच त्यानें आपला रथ जोडला व बरोबर आपली मुलगी सुकन्या हिला घेऊन, च्यवन होता तेथें तो आला. दुरूनच च्यवनास पाहून तो रथावरून खालीं उतरला व पायींच त्या ऋषीजवळ गेला. शर्यात राजा म्हणजे मोठा विद्वान व तसाच कर्मयोगी असल्यानें च्यवनाची योग्यता तो जाणून होता. जवळ गेल्यावर हात जोडून तो ऋषीस म्हणाला, 'महर्षे, नमस्कार असो. माझ्याकडून एक मोठा अपराध झाला आहे. तो आपण क्षमा करून पोटांत घालावा. माझ्या मुलांनीं आपली योग्यता न जाणतां पोरबुद्धीनें आपला अपमान व अपराध केला आहे. टवाळी करून अनादर केला आहे. तो सर्व माझाच अपराध आहे. ती माझीच चूक आहे. हें जें पातक मजकडून घडलें, त्याची मला क्षमा करा. माझ्या अनुयायांत जीं बंडाळी व भांडणें माजलीं आहेत ती सर्व थांबावीत व ते सर्व पूर्वीप्रमाणें गुण्यागोविंदानें नांदावयास लागावेत अशी विनंती आहे.

च्यवन–त्याबद्दल तूं मला काय देशील ?

शर्यात–ही माझी मुलगी सुकन्या आपणांस देत आहे. ती चांगली उपवर झाली असून तिचा आपण पत्नी म्हणून स्वीकार करावा आणि मला धन्य करावें. आपल्याजवळ दुसरें कोणी माणूस नसल्यामुळें असा प्रकार घडतो. पुनः आतां असें घडूं नये व आपली सेवाचाकरी योग्यरीतीनें व्हावी या इराद्यानें ही माझी कन्या आपणास अर्पण करीत आहे. ती दक्ष राहून आपली सेवाचाकरी करील.

असें म्हणून त्यानें तिला च्यवनाच्या स्वाधीन केलें व त्याचा अनुग्रह घेऊन तो तेथून निघाला. सुकन्या तेथेंच राहिली. स्वस्थानीं परत येऊन राजा पहातो, तों मौज ही कीं, लोकांचे सर्व व्यवहार पूर्वीप्रमाणेंच सुरळीत व सुसूत्र चालेले होते.

या सुमारास अश्विनीकुमार हे रोगग्रस्तांचे रोग बरें करीत त्या प्रदेशांतून संचार करीत होते. फिरत फिरत ते च्यवनाच्या आश्रमास आले व तेथें त्यांना सुकन्येची गांठ पडली. बोलून चालून सुकन्याच ती. सौदर्याची मोहक पुतळी होती. तिच्या त्या अप्रतिम लावण्याकडे पाहून ते मोहित झाले व तिची प्रेमयाचना करूं लागले. अश्विनीकुमार म्हणजे तितकेच सुंदर व अत्यंत मनमोहक होते हें सांगायला नकोच.

ते तिला म्हणाले–सुकन्ये, तू इतकी सुंदर व तरूण असून इथें अशी एकटीच काय म्हणून ? तो पलीकडे थेरडा डोळे झांकून झोंपा काढीत आहे, तो तुझा कोण ? आजा कां पणजा ?

सुकन्या–आजाहि नव्हे नि पणजाहि नव्हे.

अश्विनीकुमार–मग कोण तर ?

सुकन्या–माझे पतिदेव.

अश्विनीकुमार–आं ! तो तुझा पति, तुझा प्रेमदेव! ! काय म्हणतेस तरी काय तूं सुकन्ये ?

सुकन्या–अहो तो माझा प्राणवल्लभ आहे. पतिदेव आहे.

अश्विनीकुमार–छे ! भलतंच कांहीं तरी ! तुला आईबाप आहेत कीं नाहींत ? कां तूं एकटीच आहेस ?

सुकन्या–मला आईहि आहे. बापहि आहे.

अश्विनीकुमार– नांव त्यांचें ?

सुकन्या–बापाचं नांव शर्याति.

अश्विनीकुमार– राजा शर्याति कां ?

सुकन्या–हं. तोच माझा बाप !

अश्विनीकुमार–मग तूं राजकन्या ?

सुकन्या–हो तसंच.

अश्विनीकुमार–मग इथं काय म्हणून ?

सुकन्या–मला इथं दिली म्हणून.

अश्विनीकुमार–त्यांनीं तुला या थेरड्याला दिली ?

सुकन्या–अहो असं बोलूं नका. माझ्या देखत तरी बोलूं नका. ते माझे पतिदेव आहेत.

अश्विनीकुमार–अहाहा ! काय पतिदेव. कसला प्राणनाथ. वेडीतर नाहींस नां तूं.

सुकन्या–मला वेडीच समजा.

अश्विनीकुमार–नाही तर काय ? अहाहा, काय रूप, काय ध्यान, पिशाच्च आहे, पिशाच्च ! असल्या मढयाशी कसला ग तुझा संसार ? कसला प्रेमव्यवहार ! तो काय सुखाचा म्हणावा ? सुकन्ये, शाहणी असलीस तर दे त्या थेरड्याला टाकून नि चल आमच्या बरोबर. आपण खूप मौजेंत राहूं व चैनच चैन करूं.

सुकन्या–तुम्ही कोण ?

अश्विनीकुमार–आम्ही होय ? आम्ही अश्विनीकुमार.

ती खरी आर्य स्त्री व खरी पतिव्रता होती. तिनें हें सर्व ऐकून घेतलें आणि शांतपणें उत्तर दिलें. ज्याला माझ्या पित्यानें पति म्हणून मला एकदां दिली, तो कसा जरी असला तरी तो माझा देवच. तोच माझा प्राणनाथ. आणि तोच माझा प्रेमदेव... तो जिवंत असेतोपर्यंत त्याला मी सोडणार नाहीं. त्याला मी टाकणार नाहीं. तुम्ही येथून मुकाटयानें चालते व्हा. हे तिचे खणखणीत उद्‌गार ऐकून बिचारे हिरमुसलें होत्साते आल्यावाटेनें परत निघून गेले.

अश्विनीकुमार तेथून निघून गेल्यावर च्यवन सुकन्येला हाक मारून म्हणाला, ‘ सुकन्ये, आतां आलेले पुरुष कोण ? त्यांनीं तुला काय विचारलें ? ’ तिनें घडलेली सर्व हकीकत त्यास पूर्ण निवेदन केली. ती सर्व ऐकून घेऊन अश्विनीकुमारांची योग्यता जाणून, आपला फायदा व त्यांची फजीति होईल, अशी एक युक्ति योजून तिला म्हणाला–सुकन्ये, हें बघ, ते पुनः तुझ्याकडे केव्हां तरी येतील नि पुन: असाच लोचटपणा करतील. तर त्यावेळीं तूं त्यांना एकदम अशी धुडकावून देऊं नकोस. त्यांच्याशीं बोल. असें म्हणून च्यवनानें सुकन्येला पुढें काय बोलावयाचें याचें मार्गदर्शन केलें.

सुकन्येनेंही त्याबद्दल अनुमति दिली.

कांहीं दिवसांनीं च्यवनानें म्हटल्याप्रमाणें पुन: ते तिच्याकडे आले आणि पुन: तिला तेच प्रश्न विचारूं लागले. तेव्हां ती त्यांना म्हणाली–‘ कुमार हो, काय म्हणावें तुम्हांला ? माझ्या पतीची निंदानालस्ती करतां, उणंपुरं काढतां, पण तुम्ही तरी असे कुठें सर्व–संपन्न आहा. तुमच्यांतहि व्यंग आहेच कीं नाहीं ?

अश्विनीकुमार–आं ! व्यंग, आमच्यांत व्यंग, काय म्हणतेस हें तूं सुकन्ये ! आम्ही अश्विनीकुमार म्हणजे–मनुष्यांतीलच नव्हे, तर देवांतले सुंदरांतील सुंदर, कमलासारखे मोहक नि मदनासारखे मनोहर आहोंत. अशांना नांव ठेवतेस, काय म्हणावं तुला ? तूं आंधळी तर नाहींस ना ?

सुकन्या–नाहीं. मी आंधळी नाहीं. मला सर्व कांहीं दिसते आहे. पण तें राहूं द्या. तुमची स्तुति मला नको. कृति पाहिजे. असेल सामर्थ्य तर दाखवा माझ्या पतीला आधी तरुण करून. आणि मग सांगेन तुमच्यांत काय उणें आहे तें.

अश्विनीकुमार—आमच्यांत काय उणें पाहिलेंस तूं ?

सुकन्या—उगीच तोंडदेखलें बोलून फसण्याइतकी मी कांही वेडी नाहीं. आपल्यांत तसें सामर्थ्य असेल, तुम्ही खरोखरच देवाप्रमाणें सर्वसंपन्न असाल तर मी सांगितलेलें करून दाखवायला काय हरकत आहे ?

अश्विनीकुमार—तुझ्या पतीला तरूण करून दाखवावं, इतकेंच ? त्यांत ग काय मोठसं आहे.

सुकन्या—बढाई नको, कृति पाहिजे. शितावरून भाताची परीक्षा. मग कळूं दे कीं आपला प्रताप. पडूं दे उजेड.

अश्विनीकुमार—वरं. तुझ्या म्हणण्याप्रमाणेंच कृति करून दाखवितों. या अश्विनीकुमारांचा प्रभाव तर पहा. आणि तो चमत्कार आम्हीं आतांच करून दाखवितो. तो पलीकडे तलाव आहे ना ? त्या तलावांत तुझ्या पतीला नेऊन बुडव. चांगला पाण्यांत बुडव म्हणजे ज्या वयाचा व ज्या रूपाचा तूं त्याला होऊं इच्छिशील, त्या वयाचा व त्या रूपाचा होऊन तो वर येईल ! सुकन्ये, खोटं नाहीं. जा आणि आमच्या म्हणण्याची प्रतीति पहा. तुला आमची कृति हवी ना ? जा तर.

सुकन्येनें त्याप्रमाणें केलें आणि काय चमत्कार ! तो जख्खड म्हातारा च्यवन खरोखरच मदनाचा पुतळा होऊन वर आला ! तें त्यांचे अलौकिक तारुण्य आणि तेज व मधुर दृश्य पाहून सुकन्या हर्षानें स्तंभितच झाली. तिचे डोळे धन्य झाले. ती आनंदित झाली व तिच्या ओठांवर मधुर हास्य झळकलें.

इतक्यांत कुमार तेथें आले व म्हणाले, " सुकन्ये, आमची परीक्षा पाहिलीस ना ? तुझी अट आम्ही पूर्ण करून दाखविली आतां सांग आमच्यांत काय उणें पाहिलेंस तूं.

ती बिचारी काय सांगणार ? पतीनें सांगितलें होतें तेवढें ती बोलून गेली. पुढचा रस्ता तिला काय माहीत ? हंमत हंसत च्यवनाकडे पहात ती स्तब्ध उभी राहिली. च्यवनानें तें ओळखलें व लगेच पुढें होऊन म्हटलें, "कुमार, मी सांगतो तुमच्यांत काय उणें आहे तें. तिकडे पलीकडे कुरुक्षेत्र आहे. तेथें देव हल्लीं यज्ञ करीत आहेत. त्या यज्ञांत त्यांनीं तुम्हाला बहिष्कृत केलें आहे. अर्थात तेथें तुम्हांला हविर्भाग मिळत नाहीं. मग हें व्यंग काय कमी समजतां ? या दृष्टीनें तुम्ही अपूर्णच आहांत. असर्व आहांत. तेव्हां दुसऱ्यांना हिणविण्याचें कारण नाही. हें ऐकून बिचारे अश्विनीकुमार निरुत्तर झाले व तोंड आंबट करून आले तसे चालते झाले.. (श. प. ४-१-५ ते ९)

योगीश्वरावर एक संकट

एके दिवशीं याज्ञवल्क्य हे अगदीं पहाटेस उठून सहज बाहेर फिरावयास म्हणून आश्रमाच्या बाहेर पडले. पहाटेची वेळ होती. सुगंध व शीतल असा वायुराज मंद मंद वाहत होता. पक्ष्यांच्या विविध किलकिलाटानें आसमंतांतील सर्व भाग दुमदुमून गेलेला होता. आकाशांत आरक्त अरुणकांति नुकतीच डोकावत होती. जिकडे तिकडे प्रसन्नतेनें वातावरण खुलून राहिलें होतें. अशा प्रशांत वेळीं ते एकटेच फिरत फिरत मिथिला नगरीच्या बाहेर पडले. थोडयाच अंतरावर वृक्षाच्छादित अशी एक लहान टेकडी असून तिच्या सभोंवती वन्य वृक्षांची गर्द झाडी पसरली होती. याज्ञवल्क्य टेकडीवर चढून आसमंतांतील सृष्टिसौन्दर्यावर दृष्टी फिरवीत थोडावेळ एका झाडाखालीं उभे राहिले. तेथें त्यांस समाधि लावून बसण्याची लहर आली. मग विलंब कसला ? प्रशस्त जागा पाहून तेथें त्यांनीं बैठक घातली व लवकरच समाधि लावून तल्लीन झाले.

तो प्रदेश झाडाझुडपांनीं अत्यंत गजबजलेला असल्यानें वन्य श्वापदांचें जणुं तें एक माहेरघरच बनलें होतें. दिवसासुद्धां तेथें फिरकावयाची मोठी भीतीच ! पण याज्ञवल्क्यांना काय लहर आली कोण जाणे, ते आज तिकडे गेले व तेथेंच समाधिस्थ होऊन बसले. सगळा निर्जन प्रदेश, सभोंवती किर्र झाडी, मनुष्यप्राण्याचा संचार नसायचा. समाधि लावून बसल्यावर योगायोगानें म्हणा एक हिंस्र श्वापद सावज शोधीत शोधीत तेथें आले व त्याची क्रूर नजर योगिराजावर गेली. नरमांस भक्षणास चटावलेला तो एक मोठा वाघ होता. वाघासारखा क्रूर व हिंस्र असा भयंकर

प्राणीच नाहीं. मनुष्याचा वास येतांच याज्ञवल्क्यांकडे टक लावून व शेंपूट वळवीत नखें उगारून शिकार साधण्याची तयारी त्यानें चालविली. त्याला तें मधुर मिष्टान्न होतें खरें पण तें याज्ञवल्क्यावरील प्राणसंकटच !

वाघ आतां शेंपूट वळवीत व अंग हलवीत अचूक झेंप घालण्यासाठीं घर उठणार इतक्यांत एक तीर सूं सूं करीत त्या झाडींतून त्याच्याकडे आला व नेमका त्याच्या एका डोळ्यांत शिरून बसला. तसाच दुसराही एक तीर मागोमाग येऊन अचूक त्याच्या दुसऱ्या डोळ्याचा त्यानें ठाव घेतला. पुढें लागोपाठ एकामागून एक असे तीन बाण येऊन त्याच्या शरीरांत रुतून बसले ! वाघानें एक भयंकर डरकाळी फोडली ! आणि अंतकालच्या असह्य वेदनामुळें व्यथित होऊन तो तेथून सावज सोडून सैरावैरा रानांत धांवत सुटला व अरण्यांत नाहींसा झाला. योगीश्वरांकडून यापुढें पुष्कळच कार्य व्हावयाचें होतें आणि म्हणूनच ते या प्राणसंकटांतून बचावले.

वाघाच्या मरणवेळेच्या किंकाळीनें योगीश्वरांची समाधि भंग पावली. डोळे उघडून पाहतात तों सूर्यनारायण उदयगिरीवर चमकूं लागला होता. डोळ्याला वाघ दिसत नव्हता. पण त्याची प्राणांतक किंचाळी मात्र ऐकूं येत होती. चटकन् ते वर उठून उभे राहिले तों इतक्यांत प्रधानजी 'मित्र' झाडींतून आपणाकडेच येत असलेले दिसले. त्यांना पाहून हळुं हळुं पावलें टाकीत ते पुढें चालूं लागले. दहा पांच पावलें पुढें गेले असतील नसतील तोंच प्रधानजी त्यांना येऊन मिळालेच.

मित्रांच्या मागून दोन क्षत्रिय वीर (अर्थात् हे प्रधानजीचे शरीररक्षक होते.) हातांत धनुष्यबाण घेऊन आपापसांत कांहीं

बोलत चालत येत होते. त्यांनींच वाघाला दुरून पाहून चटकन् खांद्यावरचें धनुष्य उचलून त्यावर बाणांचा अचूक प्रयोग केला होता. या शिकारीबद्दलचें त्यांचें संभाषण चाललें होतें. मित्र जवळ आल्यावर त्यांनीं वाघाची शिकारीची हकीकत याज्ञवल्क्यांना सांगितली व त्या क्षत्रीय वीरांच्या नेमबाजीचें कौतुक करून त्यांच्या कौशल्याचें वर्णन केलें. ही हकीकत ऐकून याज्ञवल्क्यांना मोठा आनंद झाला व आपले प्राण वाचविल्याबद्दल त्यांस त्यांनीं कृतज्ञतापूर्वक धन्यवाद दिले. सर्व मिळून मिथिलेच्या रस्त्यास लागले. याज्ञवल्क्य एका मोठ्या आपत्तीतून निभावले, हा दैवयोगच म्हणायचा.

कुमारी मैत्रेयी

कुमारी मैत्रेयी ही जनक राजाच्या 'मित्र' प्रधानजीची मुलगी. ती अजून अविवाहितच होती. प्रसिद्ध विदुषी गार्गी वाचक्नवी ही तिची मावशी म्हणजे तिच्या आईची बहीण. ती आजन्म कुमारीच होती. तिनें मैत्रेयीस जवळ ठेवून घेऊन मोठ्या वात्सल्यानें तिला वाढविलें होतें व तिला धार्मिक शिक्षण देऊन सुविद्य व सुचरित्र केलें होतें. ती या सुमारास आपल्या बापाच्या घरी रहावयास आली होती.

त्याकाळीं मुली प्रौढ झाल्यावरच त्यांचा विवाह होई. बालविवाह प्रचारांत नव्हता. सुकन्या, सुभद्रा, रुक्मिणी, द्रौपदी, सीता वगैरे मुली विवाहाच्या वेळीं चांगल्या नवतरुणीच होत्या. अशी इतिहास-पुराणांची ढळढळीत साक्ष आहे. मैत्रेयी जरी उपवर झाली होती तरी तिचें मन अजून विवाहसुखाकडे झुकावें तसें झुकलें नव्हतें. मावशीजवळ राहून तें जवळजवळ मावशीच्या वळणावरच गेलें होतें. आणि संसारसुखाचा ध्यास तितकासा तिला लागलेला नव्हता.

अरण्यांतील वाघाच्या प्राण-संकटांतून सुटल्या दिवसापासून याज्ञवल्क्य व मित्र प्रधानजी यांच्यांत एकमेकांकडे ये जा होऊन त्यांचा घरोबा वाढत चालला. प्रथमपासूनच मित्र प्रधान हे याज्ञवल्क्यांचे मोठे चाहते व अभिमानी असून अधूनमधून सवडी-प्रमाणें ते याज्ञवल्क्यांकडे जात येत असत. स्वतः मित्र हे मोठें वेदज्ञ व शास्त्रज्ञ होते. प्रसंगोपात ते याज्ञवल्क्यांशीं ग्रंथरचना कार्यांत वेळोवेळीं चर्चा करून त्यांना उपयुक्त सूचनाहि देत याज्ञवल्क्यांचें अगाध वेदज्ञान, सूक्ष्म व सखोल अध्यात्मपरिचय

ग्रंथरचना कौशल्य, विविध शास्त्रीय माहिती व प्राचीन इतिहास पुराणादिकांचें मार्मिक ग्रहण या सर्व आश्चर्यकारक गोष्टी पाहून ते फार चकित व आनंदभरित झाले होते. तसेंच याज्ञवल्क्यांचें विविध ज्ञानभांडार, प्रतिभासौंदर्य, कर्मकौशल्य, चर्चापटुत्व पाहून प्रधानजीच्या भाविक अंत:करणांत त्यांच्याविषयीं नितांत प्रेम, भक्ति व श्रद्धा रुजून राहिल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. याज्ञवल्क्यांच्या मनांतहि प्रधानजीविषयीं प्रेमादरभाव जागृत होऊन ते प्रधानजीकडे आत्मीयतेनें पहात. कधीं कधीं ग्रंथरचनेंत त्यांचा सल्लाहि घेत. तशांत अरण्यातील प्रसंगाची भर पडून दिवसेंदिवस त्या दोघांत आत्मीयता वाढीस लागली, हें साहजीकच आहे.

याज्ञवल्क्य मित्र प्रधानजीकडे आले म्हणजे त्यांचा दर्शनलाभ मैत्रेयीला वारंवार घडे. बापाचें व त्यांचें संभाषण चाललें असतां दाराआड उभी राहून त्यांचा संवाद ऐकण्यांत तिला मोठी हौस वाटे. कारण तो संवाद तसा उद्‌बोधक व मनोरंजक असे. दिवसेंदिवस तिचें मन याज्ञवल्क्यांकडे अधिकाधिक ओढ घेऊं लागलें. एके दिवशीं याज्ञवल्क्यांचा आश्रम पाहण्याची तिला इच्छा झाली. बापाजवळ ती गोष्ट काढल्यावरून त्यांनीं तिला संधि साधून आश्रमाकडे नेलें. तेथें गेल्यावर चौकशी करतां गुरुदेव पाठशाळेंत आहेत असें कळल्यावर ते पाठशाळेकडे वळले व मैत्रेयी ही बाहेरच उभी राहिली. त्याच वेळीं याज्ञवल्क्यांची गृहदेवता कात्यायनी ही दारांतच समोरच्या पुष्पवाटिकेकडे पाहत उभी होती. मैत्रेयीला बाहेरच उभी असलेली पाहून स्मित हास्य करून तिच्याजवळ जाऊन तिला आदरानें ती आश्रमांत घेऊन गेली.

या ठिकाणीं थोडेसें कात्यायनी व मैत्रेयी यांच्या प्रकृति व स्वभावाविषयीं दोन शब्द लिहिणें हें इष्ट आहे. या युवतीद्वयांचें चित्र कसें व किति रेखाटावें? दोघीहि आपआपल्या परीनें सुंदरच होत्या. कात्यायनी ही तर अगदीं तरूणच असून तिचा वर्ण सोन्यासारखा व चेहरा गौरीसारखा मनोहर होता. अंगानें जरा स्थूल असल्यामुळें उंचीला ती किंचित् ठेंगणी दिसत होती. मुखावर तारुण्याचें तेज उजळत होतें. मैत्रेयी ही अंगानें सड-पातळ असून, तिचा रंग स्फटिकासारखा होता. त्यामुळें तिचें रूप लावण्यहि तितकेंच आकर्षक होतें. तिचे डोळे कमलासारखे विशाल व रेखीव असून त्यांत विलक्षण तेज चमकत होतें. थोडक्यांत सांगावयाचें म्हटलें तर एक लक्ष्मी तर दुसरी सरस्वती होती.

रूपांत दोघींहि जरी सुदर व मनोहर होत्या, तरी त्यांच्या स्वभावांत मात्र विलक्षण फरक होता. कात्यायनी ही साधीसुधी व सामान्य स्त्री असून तिचें सगळें लक्ष्य प्रापंचिक विषयांत गुतलेलें असे. मात्र ती अंतःकरणाची मोठी कोमल व मायाळू असे. स्वभाव उदार व उमदा होता. ती सर्वांबरोबर खेळीमेळीनें व गोडीगुलाबीनें वागे. हाताची सढळ व मनाची थोर, मनोरंजक व करमणुकीच्या कथा, गोष्टी ऐकण्याचा तिला मोठा छंद. धर्माच्या व तत्त्वज्ञानाच्या गोष्टी म्हणजे तिला फार वावड्या वाटत. तिचा पतिराज म्हणजे प्रत्यक्ष बृहस्पतीचा अवतार. त्यांच्या तोंडून धर्म व तत्त्वज्ञानविषयक व्याख्यानें, प्रवचनें, उपन्यास, इतिहास, पुराणादि ऐकण्यास लोकांच्या उड्यावर उड्या पडत. पण कात्यायनीला त्या सर्व गोष्टी ऐकण्याचा मोठा कंटाळा असे. प्रापंचिक व गृहकृत्यांत मात्र तिची हौस दांडगी असून रात्रंदिवस

तिचा जीव त्यांतच घुटमळत असे. आश्रमांतील धान्य कोठारांवर, गोठ्यातील गायीगुरांवर, बागेंतील झाडफुलांवर व मळ्यांतील भाजीपाल्यावर तिची करडी नजर असे. प्रत्येक वस्तु चांगली, स्वच्छ, जिथल्या तेथें ठेवण्यांत ती लक्ष घाली. यज्ञशाळेंतील व्यवस्था नि स्वच्छता ती मन लावून चोख ठेवीत असे. ती खरीखुरी गृहिणी होती. 'अस्मिन् गृहे गार्हपत्याय जागृहि' हा आर्यसुगृहिणीचा सुंदर कित्ता तिनें मोठ्या कटाक्षानें गिरविला होता व गृहलक्ष्मी हें पद ती सार्थ करीत होती.

मैत्रेयी याहून जरा निराळी होती. तिला प्रापंचिक जीवनाची अद्याप विशेष गोडी लागली नव्हती. तिचा ओढा परमार्थाकडे झुकलेला असे. तिचें मन कात्यायनीसारखें उथळ व हळवें नव्हतें. ते गंभीर व विचारनिष्ठ होतें. प्रत्येक गोष्ट ती विचाराच्या निकषावर घासून ग्राह्याग्राह्य आहे कीं नाही हें ती ठरवीत असे. धार्मिक व तात्विक वादविवाद तिला आवडे व तो निघाला म्हणजे मन लावून ऐकण्यांत तिला मोठी धन्यता वाटे. जगन्नियंत्या परमेश्वराचें रूपैश्वर्य डोळ्यांनीं पहावें, त्याचें गुणगान कानांनीं ऐकावें, त्याचा महिमा तोंडानें गावा, व त्यांस एकंदर मनानें चिंतावें, याची तिला फार हौस व त्यांतच तिचा परमानंद. तिच्या मोहक चेहऱ्यावर सात्विक दिव्यकांतीची प्रभा दृष्टीस पडून ती पोक्त, करारी, गंभीर दिसत असे. सांसारिक गोष्टींविषयीं ती उदासीनच राही.

दोघींच्या स्वभावांत विरोध दिसत असला तरी या आश्रमभेटीनंतर त्यांच्यांत मैत्रीची वाढ झाली व परस्परांत परस्परांच्या गुणांविषयी आदरभावच उत्पन्न झाला. लवकरच त्या दोघी जिवाभावाच्या मैत्रिणी झाल्या.

जनक महासभा

जनक राजाची ज्ञानलालसा मोठी प्रखर होती. केव्हां केव्हां ती जोरानें वर उसळी मारून अनावर होत असे. जनमेजय राजे नुकतेच दिवंगत झाले होते व वैशंपायनांची बंडाळीहि शांत झाली होती. याचा फायदा घेऊन सर्व विद्वान ऋषींची एक मोठी परिषद भरवून तींत ब्रह्मज्ञानाविषयीं खूप व कसून चर्चा करवावी व आपण ती ऐकावी असें जनकाच्या मनांत आल्यानें तत्कालीन कुरुपांचालांतील प्रथितयश व वादकुशल अशा सुप्रसिद्ध व थोर थोर आचार्यांना यज्ञाच्या मिषानें निमंत्रण पाठविलें. यांत त्यांचा हेतु हा कीं, या सभेत ब्रह्मज्ञानाविषयीं वादविवाद करवून, त्यांत जो श्रेष्ठ ठरेल, त्याजकडून ब्रह्मोपदेश घ्यावयाचा. हा हेतु त्यांनी बाहेर मात्र बोलून दाखविला नव्हता. आमंत्रणाप्रमाणें सर्व निमंत्रित ऋषिमंडळी त्या यज्ञ समारंभांत उपस्थित झाली. याज्ञवल्क्यहि तेथें हजर होते.

यज्ञ समाप्त झाल्यावर त्यांनीं आपल्या गोठ्यांतून एक हजार सुंदर गाई निवडून, त्यांचीं बांकदार शिंगें दहा दहा वजनी सुवर्णालंकारानें श्रृंगारून, त्यांच्या वत्सांसहित तयार ठेविल्या व उपस्थित ऋषिवर्यांची राजदरबारांत एक सभा बोलाविली. सर्व मंडळी सभागृहांत जमल्यावर जनक राजे उठून उभे राहिले व हात जोडून, त्या विद्वानांना उद्देशून विनंतीपूर्वक म्हणाले कीं, " ऋषिवर्य हो ! मी येथें आज एक हजार गाई सुवर्णानें श्रृंगारून दक्षिणा देण्यासाठीं म्हणून तयार ठेविल्या आहेत. आपणांत ब्रह्म-

ज्ञानावर वादविवाद करून, जो सर्वांत श्रेष्ठ व विजयी ठरेल त्याला त्या दान करण्यांत येतील." (श. प. १४-६-१ व २)

उपस्थितांमध्यें प्रामुख्यानें उल्लेखनीय विद्वान म्हणजे कुरु-पांचालांतील सुप्रसिद्ध उद्दालक आरुणि हे होत. त्यांची विद्वत्ता व योग्यता प्रचंड होती. ते मंत्रविद्येंत व अध्यात्मविद्येंत एकमेवाद्वितीय असे पंडितवर्य असून त्यांच्या आश्रमांत राहूनच याज्ञवल्क्यांनीं गूढमंत्रविद्येचा सूक्ष्म व सखोल अभ्यास केलेला होता. तत्कालीन प्रसिद्ध विद्वानांतील ते एक श्रेष्ठ प्रतीचे विद्वान मानले जात. याज्ञवल्क्यांचे गुरुदेवहि तेच होते.

त्यांच्या खालोखाल आचार्य विदग्ध शाकल्य हे होत. त्यांना पुराणांत देवमित्र शाकल्य म्हटलें असून आश्वलायनशाखेचे ते प्रणेते होते. ऋग्वेदाचा पादपाठ लावणारे आचार्य ते हेच होत. ते सुप्रिय राजाचे पुरोहित होते. शिवाय याज्ञवल्क्यांच्या ऋग्वेदीय गुरुदेवतेचा मानहि त्यांना मागें मिळाला होता.

कहोड कोषीतकेय हे उद्दालक आरुणीचे शिष्य असून, शिवाय त्यांचे ते जामातहि होते. उद्दालकांची सुजाता ही मुलगी त्यांना दिली होती. हे मोठे आत्मज्ञानी व तत्त्वचिकित्सक आचार्य होते. उद्दालक आरुणि, प्राचीनशाल, सत्ययज्ञ, इंद्रद्युम्न इत्यादि मोठमोठे श्रुतिसंपन्न ब्राह्मण मिळून कैकेय अश्वपति राजाजवळ वैश्वानर आत्म्याविषयीं चर्चा करून ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठीं म्हणून गेले होते व चर्चा करून त्याजकडून पुढें त्यांनी ज्ञानप्राप्तीहि करून घेतली. (छां.५-११). अर्थात् हे कहोड कौषीतकेयदेखील एक मोठे जाडे विद्वान होते.

भुज्यु लाह्यायनि हेहि आरुणीचे एक जुने शिष्य असून, पुढें ते वैशंपायनांच्या चरकशिष्यगणांत शिरले. त्यांना गंधर्वाकडून

विशेष प्रकारचें ज्ञान मिळालें असून, तेहि गूढविद्येचे एक मोठे अधिकारी होते

आर्तभाग जरत्कारव हे जरत्कारु नांवाच्या नागकन्येचे पुत्र असून नागराज वासुकीचे भाचे होते. जनमेजयाच्या सर्पसत्रांत तक्षकाचा प्राण वांचविणारे प्रसिद्ध आस्तिक मुनि ते हेच असा आमचा समज आहे. हेहि चांगले पट्टीचे पंडित होते.

उद्दालक आरुणिसारख्या अव्वल दर्जाच्या श्रेणींत शोभण्यासारखे अधिकार संपन्न असे विद्वान व गार्गी वाचक्नवी या विदुषीहि समारंभास उपस्थित होत्या. त्यांचें वाक्चातुर्य आणि अध्यात्म विद्यांतर्गत वादकौशल्य अवर्णनीय होतें. याज्ञवल्क्यांना या सभेंत प्रश्नांमागून प्रश्नांचा सारखा भडिमार करून जर्जर व निरुत्तर करून छेडणारी ही विदुषी त्या सर्व विद्वानात चमकून गेली. तिच्यासारखा खमंग व तिखट प्रतिस्पर्धी याज्ञवल्क्यांना त्या सभेंत दुसरा कोणी आढळला नाहीं.

याशिवाय जनक राजाचा होतृ पुरोहित अश्वल, उषस्त चाक्रायण वगैरे अनेक पंडित होते. एकापेक्षां एक वरचढ अशीं ज्येष्ठ, श्रेष्ठ व नामांकित विद्वद्रत्नें या ऐतिहासिक विद्वत्सभेंत उपस्थित होती.

जनक राजाचें भाषण ऐकून जमलेल्यापैकीं कांहींना आनंद झाला व कांहींजण विचारमग्न झाले. ज्यांना जनकांच्या प्रश्नांची खोंच समजली होती, ते विचारांत पडले. तेथें जमलेले सर्वच विद्वान ब्राह्मणश्रेष्ठ असल्यामुळें ' मीच तेवढा ब्राम्हणश्रेष्ठ असें छातिठोकपणें भरसभेंत सांगणें म्हणजे इतर ऋषींचा धडधडीत अपमान करण्यासारखेंच होय असें जो तो मनांत समजून कोणीहि पुढें येण्यास धजेना. जिकडे तिकडे अगदीं सामसूम होती.

याज्ञवल्क्यांनीं हा प्रकार पाहिला. स्तब्धतेमुळें जनकाराजाची निराळी समजूत होण्याचा संभव होता. कोणी पुढें येण्यास तयार नाही हें पाहून, याज्ञवल्क्य चटकन् उठून पुढें झाले व सामश्र या शिष्याला हांक मारून सांगितले कीं, या गाई घेऊन जा.

इतका वेळ पुतळ्याप्रमाणें शांत व स्तब्ध बसलेल्या त्या ऋषि-मंडळांत आतां हळूंच कुजबुज सुरूं झाली ! याज्ञवल्क्य एकटेच गाई नेणार हें पाहून त्याचा धीर सुटला. 'काय, याज्ञवल्क्य तेवढेच ब्रम्हिष्ठ आणि आम्हीं कोण ? पाहूं कसे गाई नेतात ते ! आम्हीं गप्प बसणार नाहीं. दोन हात होऊंच द्या' अशा इर्षेनें ब्रह्मवृंद चुळबुळ करूं लागला. याज्ञवल्क्यहि शेरास सव्वाशेर होते. प्रत्यक्ष सूर्यनारायणाचे ते पट्ट-शिष्य होते आणि सरस्वतीचा वरप्रसादहि त्यांना मिळाला होता. पोकळ धाकदपटशाला ते थोडेच भीक घालणार होते? त्यांनीं प्रसंग ओळखला आणि रागरंग पाहून त्यानीहि कंबर कसली.

हा विलक्षण प्रकार पाहून जनक राजे स्तंभितच झाले. आपण केलें काय नि हें झालें काय ? विद्वानांमध्यें ही माजलेली बंडाळी पाहून ते मनांत जरा चरकल्यासारखे झाले. तरी धीर न सोडतां प्रसगावधान साधून तेथें जवळ जवळ हातघाईवर आलेल्या मंडळीस नम्रपूर्वक हात जोडून शांतपणें त्यांनीं विनंती केली कीं, " महाराज, आपण थोर ब्राह्मणश्रेष्ठ म्हणवितां आणि हें आरंभिलें आहे तरी काय? आपण आपला उदात्त धर्म विसरून सामान्य माणसाप्रमाणें हातघाईवर येता त्याला काय म्हणावें ? ब्राह्मण-हो, शांत व्हा नि खाली बसा. आपणांत ब्रम्हिष्ठ कोण याबद्दल मतभेद असला, तर त्याबद्दल शांतपणें वादविवाद करून

काय तो निर्णय लावून घ्या. या माझ्या नम्र सूचनेचा आपण अवश्य विचार करावा. ''

जनकराजाची ही सूचना सभेंत सर्वांना पटली. आपल्यांत ब्राह्मणश्रेष्ठ कोण हें ठरविण्यासाठी ते वाद करण्यासाठीं तयार झाले. याज्ञवल्क्य एकटेच एका बाजूला आणि इतर सर्व विद्वन्-मडळ एका बाजूला असे पक्ष होऊन चर्चेस प्रारंभ झाला. जनकराजाचा दरबार, विद्वन्मंडळाची महासभा आणि तत्त्वज्ञानावर वादविवाद असा तो अपूर्व योग होता. प्रत्यक्ष सरस्वतीच तेथें अवतरणार होती. (श. प. १४-६-१ ते ३)

लढाईस तोंड लागलें !

जनकराजाची विनंति मान्य करून सर्व ब्राह्मण आपापल्या जागीं जाऊन बसले आणि जिकडेतिकडे शांतता झाल्यावर प्रथम जनकांचा पुरोहित अश्वल हा पुढें येऊन त्यानें वादास तोंड पाडलें.

अश्वल– आपण ब्रम्हिष्ठ आहांत काय ?

याज्ञवल्क्य– जो कोणी ब्रम्हिष्ठ असेल तो असो. त्यास माझा नमस्कार असो. आम्हांस फक्त गाई पाहिजेत.

अश्वल– गायी कांहीं फुकट मिळणार नाहींत. माझ्याशीं वाद-विवाद करा आणि मला जिकल्यावरच त्या घेऊन जातां येतील.

याज्ञवल्क्य– ठीक आहे.

अश्वल– हें सर्व जग मृत्यूनें व्याप्त आहे. आणि तसेंच तें मृत्युवशहि आहे कीं नाही ?

याज्ञवल्क्य– होय आहे. सर्व कांहीं मृत्युव्याप्त व मृत्यु-वश आहे.

अश्वल– मग आतां हें सांगा की, त्या मृत्यूपासून हा यजमान कसा मुक्त होईल. ?

याज्ञवल्क्य– यज्ञांतील होता, ऋत्विक्, अग्नि आणि वाक् यांच्या साहाय्यानें.

अश्वल– कारण ?

याज्ञवल्क्य– कारण, वाक् हाच यज्ञाचा होता. ही जी वाक् तोच अग्नि, तोच होता, तीच मुक्ति, आणि तीच अतिमुक्ति.

अश्वल– ठीक आहे. आतां हें पहा. हें सर्व अहोरात्रानें जग व्याप्त असून त्यांना वश आहे. हें खरें ना ?

याज्ञवल्क्य– बरं पुढ ?

अश्वल– या अहोरात्रीच्या व्याप्तीपासून यजमान कशानें मुक्त होईल ?

याज्ञवल्क्य– अध्वर्यु, ऋत्विक्, चक्षु व आदित्य यांनी तो मुक्त होईल.

अश्वल– कसा ?

याज्ञवल्क्य– चक्षु हाच यज्ञाचा अध्वर्यु. चक्षु, तोच आदित्य. तोच अध्वर्यु. तीच मुक्ति आणि तीच अतिमुक्ति .

अश्वल– पुन: आणखी हें सर्व शुक्लपक्ष, कृष्णपक्ष यांनीं व्याप्त व वशीकृत आहे ना !

याज्ञवल्क्य– होय.

अश्वल : तर हा यजमान या दोन्ही पक्षांच्या व्याप्तीपासून कशानें मुक्त होईल ?

याज्ञवल्क्य : उग्दाता, ऋत्विक्, वायु व प्राण यानीं तो मुक्त होईल. कारण प्राण हा यज्ञाचा उग्दाता. तोच वायु, तोच उग्दाता. तीच मुक्ति व तीच अतिमुक्ति होय.

अश्वल : हें अंतरिक्ष आधाररहित आहे ?

याज्ञ वल्क्य : कबूल.

अश्वल : कोणत्या क्रमानें यजमान हा स्वर्गलोकाचें आक्रमण करूं शकेल ? याला उत्तर आहे काय ?

याज्ञवल्क्य : आहे, ब्रह्मा ऋत्विक्, मन आणि चंद्र या क्रमानें तो स्वर्गाचें आक्रमण करूं शकेल.

अश्वल : कारण ?

याज्ञवल्क्य : कारण मन हा यज्ञाचा ब्रह्मा. हे जे मन तोच चंद्र. तोच ब्रह्मा. तीच मुक्ति व तीच अतिमुक्ति. याप्रमाणें

मृत्यूपासून मुक्त होण्याचीं हीं अशी निरनिराळीं साधनें आहेत.

अश्वल : आपलें म्हणणें बरोबर आहे. आतां सांगा, किती ऋचांनीं होता हा यज्ञांत हवन करतो ?

याज्ञवल्क्य : तीन ऋचांनीं.

अश्वल : त्या कोणत्या ?

याज्ञवल्क्य : पुरोनुवाक्या, याज्या व शस्या.

अश्वल : यांनीं तो काय मिळवतो ?

याज्ञवल्क्य : जें जें म्हणून प्राणयुक्त आहे, तें तें सर्व तो मिळवतो.

अश्वल : यज्ञांत अध्वर्यु हा किती आहुति हवन करतो ?

याज्ञवल्क्य : तीन.

अश्वल : त्या कोणत्या ?

याज्ञवल्क्य : ज्या हवन केल्या असतां पूर्ण जळून जातात त्या उदाहरणार्थ तूप इत्यादि. ज्या हवन केल्या असतां मोठा शब्द करतात त्या म्हणजे मांसादि पदार्थ. आणि ज्या हवन केल्या असतां खाली जातात त्या म्हणजे उदक, सोम इत्यादि.

अश्वल : ठीक आहे. आतां या आहुतीनीं तो यजमान काय मिळवितो ?

याज्ञवल्क्य : ज्वलन पावणाऱ्या आहुतींनीं तो देवलोक प्राप्त करून घेतो.

अश्वल : कारण ?

याज्ञवल्क्य : देवलोक दीप्तियुक्त आहे म्हणून. त्याचप्रमाणें ज्या शब्दयुक्त आहेत, त्यापासून तो पितृलोक मिळवितो. कारण तेथें जातांना 'हाय हाय ! मेलो ! मेलो ! वांचवा वांचवा !' असा आक्रोश व ध्वनि होत असतो. आणि ज्या आहुति तळाला

जातात त्यापासून तो मृत्युलोक मिळवतो. कारण मृत्युलोक हा खाली आहे.

अश्वल : हें सर्व म्हणणे मला मान्य आहे. ब्रह्मा हा दक्षिणेकडे बसून किती देवतांनीं यज्ञाचें रक्षण करतो ?

याज्ञवल्क्य . एकाच देवतेनें.

अश्वल : ती कोणती ?

याज्ञवल्क्य : मन.

अश्वल : कसें ?

याज्ञवल्क्य : अश्वला, मन हे अनंत आहे. सर्व देव हेहि अनंतच आहेत. म्हणून त्यामानानें अंतरहित असा देवलोकच तो प्राप्त करून घेतो.

अश्वल : यज्ञामध्यें उग्दाता हा किती स्तोत्रियांनीं स्तवन करतो ?

याज्ञवल्क्य : तीन.

अश्वल : त्या कोणत्या ?

याज्ञवल्क्य : पुरोनुवाक्या, याज्या व शस्या.

अश्वल : अध्यात्म संपादन करणाऱ्या त्या कोणत्या ?

याज्ञवल्क्य : प्राण हीच पुरोनुवाक्या. अपान हीच याज्या आणि व्यान हीच शस्या.

अश्वल : यांपासून तो काय मिळवितो ?

याज्ञवल्क्य : पुरोनुवाक्यापासून पृथ्वीलोक, याज्यापासून अंतरिक्ष लोक, शस्यापासून द्युलोक. याप्रमाणें या तीन स्तोत्रिया-पासून यजमान हा तीन लोक प्राप्त करून घेतो. अश्वलाजवळ याज्ञवल्क्यांना विचारण्यास आतां प्रश्नच उरले नव्हते ! अर्थात तेवढ्यावर स्वारी थांबली आणि म्लान वदन करून खाली पाहूं लागली आणि याज्ञवल्क्य विजयी झाले. (श.प.१४-६-१-४ ते १२)

आर्तभाग जरत्कारवाची माघार!

जनकराजाचा पुरोहित अश्वल हा पराभूत होऊन परत गेल्यावर त्याच्या जागीं आतां आर्तभाग जरत्कारव वाद करावयास पुढें आला.

आर्तभाग : ग्रह किती आहेत ? आणि अतिग्रह किती आहेत.

याज्ञवल्क्य : ग्रह (म्हणजे ग्रहण करणारे) हे आठ आहेत व अतिग्रह हे देखील तितकेच आहेत.

आर्तभाग : ते कोणते ?

याज्ञवल्क्य : प्राण हा ग्रह. हा प्राण अपान म्हणजे गंध या अतिग्रहानें गृहीत आहे.कारण मनुष्य हा घ्राणानेंच गंध घेतो.त्याच प्रमाणें वाक् हा ग्रह नाम या अतिग्रहानें गृहीत आहे. कारण वाचेनेंच नामें उच्चारतो. जिव्हा हा ग्रह रस या अतिग्रहानें गृहीत आहे. कारण जिव्हेनेंच रस जाणतो. चक्षु हा ग्रह रूप या अतिग्रहानें गृहीत आहे. कारण चक्षूनेंच रूपे पाहतो. श्रोत्र हा ग्रह तो शब्द या अतिग्रहानें गृहीत आहे. कारण श्रोत्रानेंच शब्द ऐकतो. मन हा ग्रह आहे. हा काम (इच्छा) या अतिग्रहानें गृहीत आहे. कारण मनानेंच कामाची इच्छा होते. हस्त हा ग्रह आहे. हा कर्म या अतिग्रहानें गृहीत आहे. कारण हातांनींच कर्म करतो. त्वचा हा ग्रह आहे. हा स्पर्श या अतिग्रहानें गृहीत आहे. कारण त्वचेनेंच स्पर्श जाणतो. हे असे आठ ग्रह व अतिग्रह आहेत.

आर्तभाग : हे सर्व मृत्यूचें अन्न आहेत कां ?

याज्ञवल्क्य : होय.

आर्तभागहा : मृत्यु जिचें अन्न आहे, अशी देवता कोणती ?

याज्ञवल्क्य : ती देवता म्हणजे अग्नि. अग्नि हा या सर्वांचा मृत्यु आहे. पण गम्मत ही कीं, तो अग्नि हा उदकाचें अन्न आहे ! सर्व हृदयग्रंथींचा नाश झाला म्हणजे पुरुष हा मृत्यूवर जय मिळवितो.

आर्तभाग . जेव्हां हा पुरुष मरण पावतो,तेव्हां त्याचीं इन्द्रियें त्याच्यामधून निघून वर जातात कीं नाहीं ?

याज्ञवल्क्य : नाहीं, तीं इन्द्रियें वर निघून जात नाहींत. तीं येथेंच नष्ट होतात. तो (देह) फुगतो. बाह्यवायूनें भरतो व अखेर मृत होऊन, येथेंच पडून राहतो.

आर्तभाग : जेव्हां हा पुरुष मरण पावतो, तेव्हां त्याला न सोडणारें असें काय असतें ?

याज्ञवल्क्य : त्याला न सोडणारें असें नाम असतें.

आर्तभाग : तें कसें ?

याज्ञवल्क्य : नाम हें अनंत आहे. देव हेही अनंत आहेत. नामानेंच पुरुषाला त्या अनंत लोकांची प्राप्ति होते.

आर्तभाग : ठीक आहे. हा पुरुष जेव्हां मरण पावतो, तेव्हां त्याची वाणी अग्नीकडे जाते, प्राण वायूकडे जातो, चक्षु सूर्याकडे जातो, मन चंद्राकडे जातें. त्याचप्रमाणें श्रोत्र दिशांकडे, शरीर पृथ्वीकडे, हृदय आकाशाकडे,लोम औषधीकडे, केश वनस्पतीकडे आणि रक्त व रेत हीं उदकाकडे जातात.

याज्ञवल्क्य : होय.

आर्तभाग : असें झालें म्हणजे मग हा पुरुष कोठें जातो ?

याज्ञवल्क्य : ही गोष्ट सभेंत सांगणें इष्ट नाहीं. फक्त ती तुला व मला या दोघांनाच समजली पाहिजे.

नंतर ते दोघेहि तेथून उठले व दुसरीकडे गेले. तेथें गेल्यावर

दोघे मिळून एकत्र विचार करून अखेर दोघांनीं एकमतानें 'कर्म' म्हणूनच निर्णय सांगितला. त्यांनीं प्रशंसा केली ती कर्माचीच केली. पुण्य कर्माच्या योगानें मनुष्य हा पुण्यवान होतो आणि पापकर्में करून तो पापी बनतो. एवढे झाल्यावर आर्तभाग पुढें प्रश्न विचारण्याच्या भानगडींत पडला नाही. त्यानें याज्ञवल्क्याचें सामर्थ्य ओळखलें व मौन धारण करून आला तसा आपल्या जागेवर जाऊन बसला. (श. प. १४।६।२।१ ते १४)

आर्तभागानंतर भुज्यु लाह्यायनि पुढे आला.

भुज्यु-आम्ही तीर्थयात्रा करीत फिरत फिरत मद्रदेशांत गेलो तेंथें आम्ही पतंचल काप्य याच्या घरी गेलों त्याच्या मुलीच्या अंगात एक गंधर्व शिरून बसला होता. त्याची गम्मत पहावी म्हणून आम्ही त्या मुलीजवळ गेलो आणि त्याला सहज प्रश्न टाकला की, तू कोण आहेस ? तेव्हां त्यानें उत्तर दिलें कीं, मी अंगिरस गोत्री सुधन्वा आहे. पुढें आम्हीं मनुष्य मेल्यावर त्याची गति काय होते, हें समजून घेण्याच्या इराद्यानें त्याला विचारलें कीं, आतां पारिक्षित जनमेजय कोठें गेले ? त्याचें त्यानें आम्हास उत्तर दिलें आहे. तें आम्हांला ठाऊक आहे. तथापि आपण पारिक्षित कोठें गेले, तें सांगा ?

याज्ञवल्क्य-त्या गंधर्वानें तुम्हांस सांगितलें असेल कीं, अश्वमेध करणारे जेथें जातात, तेथे ते गेले म्हणून ? आदित्य हा रथांतून बत्तीस दिवसांमध्यें जेवढा प्रदेश आक्रमण करतो, तेवढ्या प्रमाणाचा हा लोक आहे. या लोकाच्या सभोंवती यांच्या दुप्पट विस्तारानें पृथ्वी पसरलेली आहे. या पृथ्वी सभोंवती पृथ्वीच्या दुप्पट आकारानें समुद्र पसरलेला आहे. त्याच्या सभोवती वस्तऱ्याच्या धारे इतकें अगर माशीच्या पंखाइतकें आकाश पातळ आहे. तेथून इंद्रानें गरुडाचें रूप धारण करून त्या अश्वमेध करणाऱ्या पारिक्षितांसह

वायूच्या स्वाधीन केलें. वायूनें त्याला आपल्यासारखें सूक्ष्म रूप देऊन जेथें अश्वमेधयाजी होते त्या ठिकाणीं नेलें.म्हणून त्या गंधर्वानें वायूचीच प्रशंसा केली. वायु हाच व्यष्टि (म्हणजे विविध रूपें व्यापून राहणारा. व वायु हाच समष्टि म्हणजे सूत्ररूपानें व्यापून राहणारा) होय. हें जो जाणतो तो मृत्यूवर जय मिळवितो. (श. प. १४।६।३।१ व २)

याज्ञवल्क्यांचा हा खुलासा ऐकून भुज्यु गप्प बसला. त्याला पुढें प्रश्न विचारण्याचें धैर्यच झाले नाही.

भुज्यु लाह्यायनि पराजित झाल्यावर कहोड कौषीतकेय हा वादविवाद करण्यांस पुढे सरकला.

कहोड–हा जो साक्षात् व प्रत्यक्ष असा सर्वांतर्यामी आत्मा आहे तो मला स्पष्ट करून सांगा.

याज्ञवल्क्य– हा तुझा आत्मा, तोच सर्वांतर आहे !

कहोड– म्हणजे ? मला काही या उत्तरापासून बोध झाला नाही. तो कोणता आत्मा हें विशद करून सांगा.

याज्ञवल्क्य– जो क्षुधेच्या पलीकडे आहे, तृष्णेच्या पलीकडे आहे, शोक, मोह, जरा यापलीकडे आहे आणि जो मृत्यूच्याहि पलीकडे आहे, तो आत्मा, तो तुझाच आत्मा–सर्व व्यापी आहे. या सुप्रसिद्ध आत्म्याचें यथार्थ ज्ञान झालें म्हणजे पुत्राची इच्छा, धनाची इच्छा, लोकांची इच्छा यांपासून पराङमुख होऊन, ब्रह्मज्ञानी हे भिक्षाचर्य वृत्तीनें राहूं लागतात. जी पुत्रैषणा,तीच वित्तैषणा आणि जी वित्तैषणा तीच लोकैषणा.या सर्व गोष्टी इच्छेतच मोडतात. म्हणून जो ब्रह्मज्ञानी आहे, त्यानें पांडित्याचा व इच्छांचा त्याग करून, बालवृत्तीनें राहण्याची इच्छा करावी. बालवृत्ति व पंडितवृत्ति निःशेष झाली म्हणजे मग

मौन धारण करून तो मुनि होतो.पुढें बाल्य व मौन हीहि निःशेष झालीं म्हणजे तो मुनिच ब्राह्मण म्हणजे ब्रह्मज्ञ होतो. या ब्रह्मा-हून इतर असे जें कांहीं आहे, तें सर्व विनाशी आहे ! याज्ञवल्क्याचें हें भाषण ऐकून कहोड मौन धारण करून उठून स्वस्थानीं जाऊन बसला. (श. प. १४।६।४।१)

कहोडानें वादविवाद क्षेत्रातून पाय मागें घेतल्यावर त्याच्या जागीं उषस्त चाक्रायण हा आला.

उषस्त –साक्षात व प्रत्यक्षब्रह्म असा जो सर्वांतर्यामी आत्मा आहे तो आपण जाणता काय ?

याज्ञवल्क्य–हा तुझा आत्माच सर्वांतरीं आहे.

उषस्त–तो सर्वांतर आत्मा कोणता ?

याज्ञवल्क्य–जो प्राणानें प्राणन करतो, तो तुझा आत्मा सर्वांतर्यामी आहे. जो अपानानें अपानकर्म करतो, तो तुझा आत्माच सर्वांतर आहे. जो व्यानानें व्यान–कर्म करतो, तो तुझा आत्माच सर्वांतर आहे. जो उदानानें उदानकर्म करतो तो तुझा आत्माच सर्वांतर आहे. हाच तुझा आत्मा सर्वांच्या आत आहे !

उषस्त–हें काय उत्तर झालें ? हें सांगणें म्हणजे हा बैल, हा अश्व अशा प्रकारानें खुणेनें सांगण्यासारखेंच तें सामान्य प्रतीचें आहे. असलें संदिग्ध उत्तर मला नको. साक्षात् व प्रत्यक्ष ब्रह्म असा जो सर्वांतर आत्मा आहे, तो मला स्पष्ट करून सांगा.

याज्ञवल्क्य–हा तुझा आत्मा तोच सर्वांतर्यामी–सर्वव्यापी–आहे.

उषस्त–सर्वांतर्यामी म्हणता तो कोणता ?

याज्ञवल्क्य–तुझी ही जी स्थूलदृष्टि–लौकिकदृष्टि आहे, त्या दृष्टिला देखील पाहणाऱ्याला तूं तुझ्या लौकिकदृष्टिनें पाहूं

नकोस. तुझ्या स्थूलश्रुतीच्या श्रोत्याला तूं आपल्या लौकिक कर्णांनीं श्रवण करूं नकोस. तुझ्या लौकिक मनाचें जो मनन करणारा आहे, त्याचें तूं आपल्या स्थूल मनानें मनन करूं नकोस. त्याचप्रमाणें तुझी ही जी स्थूलबुद्धि आहे, तिच्या ज्ञात्याला तूं आपल्या स्थूलबुद्धीनें जाणूं नकोस. या स्थूल इंद्रियांनीं त्याला जाणण्याचा तुझा प्रयत्न सगळा व्यर्थ आहे. तुला सत्य सत्य सांगतो कीं, हा तुझा आत्मा तोच सर्वांच्या अंतर्यामी आहे. अर्थात् तो सर्वव्यापी आहे. या आत्म्याहून इतर जें कांहीं आहे, तें सर्व विनाशी आहे. (श.प. १४।६।५।१ते३)

विदुषी गार्गी वाचक्नवीची सरबत्ती !

आतां गार्गी वाचक्नवी पुढें आली. प्रसिद्ध आर्यविदुषी आणि ब्रह्मवादिनी अशी ती होती. तिचें ज्ञानतेज प्रखर असून विजेप्रमाणें त्या सभेत चमकत होती. ती दिव्य ज्ञानाची खरोखर मूर्तिमंत पुतळीच होती. याज्ञवल्क्यासारख्या अतिरथीबरोबर ती त्या भरसभेंत दोन हात करावयास हिरीरीनें पुढे सरसावून आली, एवढ्यावरूनच तिचें ज्ञानसामर्थ्य केवढे प्रचंड नि अद्भूत असलें पाहिजे, याची वाचकानीच कल्पना करावी. मोठमोठ्या पडितांना याज्ञवल्क्य वादविवादांत हटवित असत. पण ही महामाया मात्र त्यांना मोठी खमंग व तिखट भेटली. याज्ञवल्क्याशी झुज खेळण्यास वादक्षेत्रांत ती एकदां नव्हे, तर दोन वेळां पुढें आली, यावरून तिचें ज्ञान-वैभव व वादकौशल्य चांगलें प्रतीत होतें. तिने त्याच्याशीं घनघोर वादसंग्राम करून सूक्ष्म व खोंचदार प्रश्नांचा तीक्ष्ण बाणाप्रमाणे त्यांच्यावर सारखा भडीमार करून, त्यांना तिनें चांग-लेंच पेचांत धरून मेटाकुटीस आणलें.

तिच्या सूक्ष्म व खुबीदार प्रश्नांना उत्तरें देतां देतां ते अगदीं रडकुंडीस आले होते, असें म्हटलें तरी चालेल. ती त्या सभेत याज्ञवल्क्याबरोबर वाद करावयास पुढे येऊन बसतांच सर्व सभा स्तंभित झाली. सर्वांची दृष्टि तिच्यावर वेधली व जो तो आश्चर्यानें व कौतुकानें तिच्याकडे पाहूं लागला. इतक्यांत तिनें तोंड उघडलें आणि गभीर स्वरांत याज्ञवल्क्यास म्हटलें कीं, हें जें पार्थिव जग आहे तें सर्व उदकांमध्यें ओत व प्रोत आहे. हें खरें कीं नाहीं ?

याज्ञवल्क्य—होय आहे.

गार्गी–आतां मला हें सांग कीं, हें उदक कशांत ओत व प्रोत आहे ?

याज्ञवल्क्य–तें उदक वायूमध्यें ओत व प्रोत आहे.

गार्गी–वायु कशांत ओत व प्रोत आहे ?

याज्ञवल्क्य–तो आकाशांत ओत व प्रोत आहे.

गार्गी–आणि तें आकाश कशांत ओत व प्रोत आहे ?

याज्ञवल्क्य–अंतरिक्ष लोकांमध्यें.

गार्गी–अंतरिक्ष लोक कशामध्यें ओत व प्रोत आहे ?

याज्ञवल्क्य–द्युलोकांमध्यें ओत व प्रोत आहे.

गार्गी–द्युलोक कशांत ओत व प्रोत आहे ?

याज्ञवल्क्य– आदित्य लोकांमध्यें ओत व प्रोत आहे.

गार्गी–आणि आदित्य लोक हा ?

याज्ञवल्क्य–तो चंद्रलोकांत.

गार्गी–आणि चंद्रलोक ?

याज्ञवल्क्य–तो नक्षत्रलोकांत.

गार्गी–नक्षत्रलोक कशांत ओत व प्रोत आहे ?

याज्ञवल्क्य–देवलोकांत.

गार्गी–देवलोक कशांत ?

याज्ञवल्क्य–प्रजापति लोकांत.

गार्गी–प्रजापतिलोक कशांत ?

याज्ञवल्क्य–ब्रह्मलोकांत.

गार्गी–आणि तो ब्रह्मलोक कशांत ?

याज्ञवल्क्य–गार्गी आतां मात्र तूं ताळ सोडला आहेस. मर्यादा उल्लंघून प्रश्न करूं नकोस नि तुझें मस्तक तुटून पडण्याची इच्छा करूं नकोस. जो प्रश्नाचा विषय होऊं शकत नाहीं अशा देवते-संबंधीं तूं प्रश्न करीत आहेस. म्हणून असा प्रश्न करूं नकोस. याज्ञवल्क्यांनीं असा इशारा देतांच ती नरमली आणि आणखी प्रश्न न विचारतां तितक्यावरच चर्चा थोपवून, मुकाटयानें आपल्या जागेवर जाऊन बसली. (श. प. १४।६।६।१ ते ६)

उद्दालक आरुणींचा पराभव

उद्दालक आरुणि हे याज्ञवल्क्यांचे गुरुदेव, तत्त्वज्ञानाचे शिखामणि आणि वेदविद्येचे गौरीशंकर होते. खरी वैदिक आर्यांची कर्तव्यजागृति म्हणजे मोठी प्रखर होती. कर्तव्य क्षेत्रांत जो अडवा येईल, मग तो कोणी कां असेना त्याचें नातेंगोतें विसरून त्याच्याशीं दोन हात करण्याचा त्यांचा बाणा खरोखर वाखाणण्यासारखा होता. धनुर्धारी अर्जुन हा द्रोणाचार्यांचा शिष्य, पण कुरुक्षेत्रावर दोघांची जेव्हां गांठ पडली, तेव्हां अर्जुनानें गुरूशिष्याचें नातें विसरून त्यांच्याशीं घनघोर रणसंग्राम गाजविलाच कीं नाहीं ? पितृआज्ञा होतांच परशुरामानें तर प्रत्यक्ष आपल्या आईचें मस्तकच उडवून दिलें ! गंधर्वाला वांचविण्याकरतां आपलें वचन सत्य करण्याकरतां धनुर्धारी अर्जुनानें प्रत्यक्ष आपला मित्र व उपकारकर्ता जो कृष्ण भगवान याच्याशीं अखेर लढाईही केली. अशीं अनंत उदाहरणें वैदिक आर्यांच्या प्राचीन व तेजस्वी इतिहासांत ठिकठिकाणीं आढळून येतात.

हाही असाच एक प्रसंग होता. गुरू-शिष्याचें नातें क्षणभर बाजूस ठेवून गुरुदेवाबरोबर लढण्यास तयार होणें याज्ञवल्क्यांना जरूर वाटलें. अर्थात् दोघांचेंहि आतां तुमुल वाग्युद्ध जुंपलें व प्रश्नांची सरबत्ती उडाली.

उद्दालक म्हणाले:—मी मद्रदेशांत पतंचलकाप्याच्या घरीं यज्ञविधीचें अध्ययन करण्यासाठीं म्हणून कांहीं दिवस राहिलों होतों. तेथें असतांना त्या पतंचलाच्या भार्येच्या अगांत एक गंधर्व येत असे. त्याचें नांव 'आथर्वाण कबंध'. तो गंधर्व एकदां अंगांत आल्यावेळीं पतंचलाला व इतर याज्ञिकांना उद्देशून म्हणाला, हा लोक, परलोक आणि हें सर्व भूतमात्र ज्या एका सुत्रांत ओवलेलें

आहे, तें सूत्र तुम्ही जाणतां काय ? त्यावर तो पतंचल म्हणाला कीं, ' नाहीं भगवन् आम्ही तें जाणत नाहीं '. यावर पुन: तो गंधर्व म्हणाला–पतंचला हा लोक, परलोक व त्याच प्रमाणें हें सर्व प्राणिमात्र यांच्यामध्यें राहून जो त्या सर्वांचें नियमन करतो, त्या अंतर्यामी असणाऱ्याला तरी ओळखता काय ? ' नाहीं, भगवन् ' तो पतंचल उत्तरला ' आपण त्याला ओळखत नाहीं. ' तेव्हां त्यानें पतंचलाला म्हटलें– तें सूत्र व तो अंतर्यामी राहणारा यांना जो जाणतो तोच खरा ब्रह्मवेत्ता. तोच खरा देववेत्ता, तोच खरा वेदवेत्ता, तोच खरा भूतवेत्ता, तोच खरा आत्मवेत्ता, आणि तोच खरा सर्ववेत्ता. तेव्हां त्यानें जें म्हटलें तें अगदीं सत्य आहे. त्रिवार सत्य आहे. तें सूत्र व तो मी अंतर्यामी जाणतो आणि तें ज्ञान नसतां याज्ञवल्क्या, जर तूं या गाई नेशील तर तुझें मस्तक तुटून पडेल !

याज्ञवल्क्य : तें सूत्र मीही पण जाणतो.

उद्दालक : मग सूत्राची माहिती सांगा.

याज्ञवल्क्य : तें सूत्र म्हणजे वायु होय. हा लोक, परलोक व हें सर्व भूतमात्र त्या एका वायुरूपीं सूत्रांतच गोविलेलें आहेत. म्हणून मनुष्य मेला म्हणजे म्हणतात कीं, त्याचीं इंद्रियें तुटलीं आहेत. कारण वायुरूपीं सूत्रानें तीं बद्ध झालेलीं असतात.

उद्दालक : याज्ञवल्क्या खरें आहे तुझें म्हणणें. अंतर्यामी असणारा तो कोण ?

याज्ञवल्क्य : जो पृथ्वीमध्यें स्थित आहे, जो पृथ्वीच्या आंतहि आहे, ज्याला ' हा आहे ' असें पृथ्वी जाणत नाहीं, पण ज्याचें शरीर ही पृथ्वी आहे आणि जो पृथ्वींत राहून पृथ्वीचें नियमन करतो असा तुझा हा अमर आत्माच अंतर्यामी आहे.

उद्दालक : बरोबर. याज्ञवल्क्या, अगदीं बरोबर बोललास. पण संपलें कां तुझें उत्तर येवढ्यावरच ?

याज्ञवल्क्य : नाहीं अजून आहे.

उद्दालक : मग सांग तर.

याज्ञवल्क्य : ऐका सांगतो. जो उदकांत स्थित आहे, जो उदकाच्या आंत आहे पण उदक ज्याला जाणूं शकत नाहीं, आणि ज्याचें शरीर हें उदक आहे आणि जो उदकांत राहून त्याचें नियमन करतो असा हा तुझा अमर आत्मा अंतर्यामी आहे, त्याचप्रमाणें जो अग्निमध्यें स्थित आहे, जो अग्नीच्या आंत आहे पण अग्नि ज्याला जाणूं शकत नाहीं, शरीर ज्याचें हा अग्नि आहे, जो अग्नींत राहून त्याचें नियमन करतो, असा हा तुझा अमर आत्मा अंतर्यामी आहे. जो आकाशामध्यें स्थित आहे, जो आकाशाच्या आंत आहे, पण आकाश ज्याला जाणूं शकत नाहीं आणि ज्याचें शरीर हें आकाश आहे व जो आकाशांत राहून त्याचें नियमन करतो, असा हा तुझा अमर आत्मा अंतर्यामी आहे. जो वायूंत स्थित आहे, जो वायूच्या आंत आहे पण ज्याला वायु जाणत नाहीं आणि ज्याचें शरीर वायु आहे व जो वायूंत राहून त्याचें नियमन करतो, असा हा तुझा अमर आत्मा अंतर्यामी आहे. जो आदित्यांत स्थित आहे, पण ज्याला आदित्य जाणत नाहीं आणि ज्याचें शरीर हा आदित्य आहे व जो आदित्यांत राहून त्याचें नियमन करतो, असा तुझा हा अमरतआत्मा अंतर्यामी आहे. जो चंद्रतारकांमध्यें स्थित आहे, जो चंद्रारकांच्या आंत आहे पण ज्याला चंद्रतारका ओळखत नाहींत, ज्याचें शरीर या चंद्रतारका आहेत व जो चंद्रतारकांत राहून त्यांचें नियमन करतो, असा हा अमर आत्मा अंतर्यामी आहे.

उद्दालक : संपलें कां अजून आहे ?

याज्ञवल्क्य : नाही, तें इतक्यांत संपणार नाहीं. ब्रह्मवेत्याची परीक्षाच पहावयाची आहे ना? पूर्ण खात्री करून घ्या आणि मग पुढें काय विचारावयाचें आहे तें विचारा आपण! अंतर्यामी असणाऱ्या सद्वस्तूंचें निरुपण अजून ऐका. जो दिशांमध्यें आहे, ज्याचें शरीर या दिशा आहेत व जो दिशांमध्यें राहून त्यांचे नियमन करतो, असा हा आत्मा अंतर्यामी आहे व तो अमर आहे जो विद्युताच्या आंत आहे पण ज्याला विद्युत् ओळखत नाहीं, ज्याचें शरीर विद्युत आहे व जो विद्युतांत राहून त्याचें नियमन करतो असा आत्मा अंतर्यामी आहे व तो अमर आहे. जो सर्व लोकां, मध्यें स्थित आहे, जो सर्व लोकांच्या आंत आहे पण ज्याला सर्व लोक जाणत नाहींत, ज्याचें शरीर सर्व लोक आहेत असा आत्मा अंतर्यामी असून तो अमर आहे. जो सर्व वेदांमध्यें आहे, जो सर्ववेदांच्या आंत आहे, पण ज्याला वेद जाणूं शकत नाहींत, ज्याचें शरीर वेद आहेत व जो वेदांत राहून त्यांचें नियमन करतो, असा आत्मा अंतर्यामी असून तो अमर आहे. जी गोष्ट अधिवेद वस्तूंविषयीं तीच अधियज्ञ व अधिभूत विषयीं समजा. जो सर्व यज्ञामध्यें आहे, जो सर्व यज्ञांच्या आंत आहे, पण ज्याला यज्ञ जाणूं शकत नाहीं, ज्याचें शरीर यज्ञ आहे असा आत्मा अंतर्यामी असून तो अमर आहे. जो सर्व भूतांमध्यें राहतो, जो सर्व भूतांच्या आंत असतो, पण ज्याला सर्व भूतें जाणूं शकत नाहींत, ज्यांचें शरीर हीं सर्व भूतें आहेत व जो सर्व भूतांमध्यें राहून त्यांचें नियमन करतो तो आत्मा अंतर्यामी असून अमर आहे. हें अधिभूत झालें. आतां अध्यात्म सांगतो.

जो प्राणामध्यें आहे, जो प्राणाच्या आंत आहे, पण ज्याला प्राण जाणत नाहीं, ज्याचें शरीर प्राण आहे व जो प्राणांत राहून त्याचें नियमन करतो, असा आत्मा अमर असून तो अंतर्यामी आहे. जो वाणीमध्यें स्थित आहे, जो वाणीच्या आंत आहे, पण ज्याला वाणी जाणूं शकत नाहीं, ज्याचें शरीर वाणी आहे व जो वाणींत राहून तिचें नियमन करतो, असा आत्मा अमर असून तो अंतर्यामी आहे. जो चक्षूमध्यें आहे, जो चक्षुच्या आंत आहे पण चक्षु ज्याला जाणत नाहीं, ज्याचें शरीर चक्षू आहे व जो चक्षूमध्यें राहून त्याचें नियमन करतो, असा आत्मा अमर असून तो अंतर्यामी आहे.जो श्रोत्रामध्यें स्थित आहे, जो श्रोत्राच्या आंत आहे. पण ज्याला श्रोत्र जाणत नाही, ज्याचें शरीर श्रोत्र आहे व जो श्रोत्रामध्यें राहून त्याचें नियमन करतो, असा आत्मा अमर असून अंतर्यामी आहे. जो त्वचेमध्यें स्थित आहे, जो त्वचेच्या आंत आहे, पण ज्याला त्वचा ओळखत नाहीं, ज्याचें शरीर ही त्वचा आहे व जो त्वचेच्या आंत राहून तिचें नियमन करतो, असा हा आत्मा अमर व अंतर्यामी आहे. जो तेजामध्यें आहे, जो तेजाच्या आंत आहे पण ज्याला तेज ओळखत नाहीं, ज्याचें शरीर तेज आहे व जो तेजामध्यें राहून त्याचें नियमन करतो असा तो तुझा आत्मा अमर व अंतर्यामी आहे. जो तमामध्यें आहे, जो तमाच्या आंत आहे, पण ज्याला तम जाणत नाहीं, ज्याचें शरीर तम आहे व जो तमाच्या आंत राहून त्याचें नियमन करतो, असा तो-आत्मा अमर असून अंतर्यामी आहे. जो रेतामध्यें स्थित आहे, जो रेताच्या आंत आहे, पण ज्याला रेत जाणत नाहीं, ज्याचें शरीर रेत आहे व जो रेतामध्यें राहून त्याचें नियमन करतो, असा तो आत्मा अमर व

अंतर्यामी आहे. तसाच जो आत्म्यामध्यें स्थित आहे, जो आत्म्याच्या आंत आहे, पण ज्याला आत्मा जाणत नाहीं, ज्याचें शरीर आत्मा आहे व जो आत्म्यामध्यें राहून त्याचें नियमन करतो, असा आत्मा अमर व अंतर्यामी आहे.

उद्दालकाचें तोंड उतरलें. पराभूत झाल्याची दाट छाया त्याच्या मुखावर स्पष्ट उमटली. ब्रह्मज्ञानाचे हें दिव्य व्याख्यान ऐकून उद्दालकच काय सर्व सभा पुतळ्याप्रमाणें तटस्थ झाली

पुन: याज्ञवल्क्य म्हणाले : गौतमा ! ऐक. ब्रह्मज्ञान ऐक ! उपरोक्त लक्षणाचा जो अमर व अंतर्यामी आत्मा तो अदृष्ट आहे. पण पाहणारा मात्र तोच आहे. तो अश्रुत आहे, पण ऐकणारा मात्र तोच आहे. तो अमत आहे, पण मनन करणारा मात्र तोच आहे. तो अविज्ञात आहे, पण विज्ञाता मात्र तोच आहे. तो तुझाच आत्मा असून तो अमर आहे व अंतर्यामी आहे. गौतमा ! फार काय सांगूं ? त्या आत्म्याखेरीज इतर जें कांहीं आहे तें सर्व नाशवंत आहे. गौतमा ! तें सर्व नाशवंत आहे. आतां विचार काय तुला विचारावयाचें असेल तें ?

उद्दालकांनीं कांहीं एक न बोलतां आपली मान खाली घातली. (श. प. १४-६-७-१ ते ३१)

गार्गीचा याज्ञवल्क्यांना नमस्कार !

उद्दालक आरुणि उठून गेल्यावर पुन्हां गार्गीनें उचल खाल्ली आणि नव्या दमानें वाद करावयास पुढें आली. ती उठून सभेंतील मंडळीस उद्देशून म्हणाली,–"विद्वज्जनहो, मी आतां याज्ञवल्क्यांना दोन प्रश्न विचारीत आहे. त्याचें उत्तर त्यांनीं दिल्यास त्यांच्यासारखा ब्रह्मज्ञानी कोणीही नाहीं असें म्हणावें लागेल. ज्याप्रमाणें काशी अथवा विदेह देशांतील शूर घराण्यातला एखादा धनुर्धारी वीर धनुष्याला दोरी चढवून अणुकुचिदार तीक्ष्ण असे बाण हातांत घेऊन उभा राहावा, त्याप्रमाणें मी हे दोन प्रश्न घेऊन आपल्यापुढें उभी आहे. त्या प्रश्नांचीं नीट व सरळ उत्तरें मिळावींत "

याज्ञवल्क्य : विचार, गार्गि, खुशाल विचार. दोनच काय तुला हवें तितकें विचार.

गार्गी : जें द्युलोकाच्या वर आहे, जें पृथ्वीच्या खाली आहे, जें या द्यावापृथ्वीच्या मध्यें आहे, ज्याला भूत, वर्तमान व भविष्य असें म्हणतात, तें कशामध्यें ओत व प्रोत आहे ?

याज्ञवल्क्य : तें आकाशांत ओत व प्रोत आहे.

गार्गी : अगदीं बरोबर. आपण माझ्या प्रश्नाला बरोबर उत्तर दिलेंत म्हणून मी आपणांस आदरपूर्वक वंदन करते.

असें म्हणून तिनें त्यांना दोन्ही हात जोडून नमस्कार केला.

याज्ञवल्क्य : आतां तुझा दुसरा प्रश्न काय तो विचार.

गार्गी : तें आकाश कशांत ओत व प्रोत आहे ?

याज्ञवल्क्य : याचें उत्तर जें ब्रह्म जाणणारे आहेत, ते असें सांगतात कीं, आकाश ज्यांत ओत व प्रोत आहे तें क्षयरहित ब्रह्म होय.

गार्गी : आणि तें ब्रह्म कसें आहे ?

याज्ञवल्क्य : तें ब्रह्म अस्थूल, अनणु, अऱ्हस्व व अदीर्घ आहे. तसेंच तें अप्रकाश व अस्नेह आहे. शिवाय तें तमोरहित, छायारहित,वायुरहित, आकाशरहित व संगरहित आहे. तें ब्रह्म असें आहे कीं, त्याला गंध नाहीं, चक्षु नाहीं, श्रोत्र नाहीं, वाणी नाहीं, मन नाहीं. तें तेज, प्राण, मुख, मात्रा, अंतरबाह्य यांनीं, रहित आहे. तें कांहीं खात नाहीं व त्याला कोणी भक्षण करीत नाहीं असें हें ब्रह्म आहे.

गार्गी : आणखी कांहीं.

याज्ञवल्क्य : या अक्षर ब्रह्माच्या नियंत्रणानें निर्माण केलेले हे सूर्यचंद्रदेखील त्याच्या नियमानुसार वागतात. त्याच्याच नियंत्रणानें निर्माण केलेली द्यावापृथ्वी त्याच्या नियमानुसार जेथल्या तेथें स्थिर आहेत. त्याचप्रमाणें हे निमेष, मुहूर्त, अहोरात्र, पक्ष, मास, ऋतु व संवत्सर हीं सर्व त्याच्याच नियंत्रणानें स्थिर होऊन राहिली आहेत. त्याच्याच नियंत्रणानें पर्वतांपासून नद्या चोहोंकडे वाहतात. मनुष्य दान देणाऱ्यांची व देव यजन करणाऱ्यांची प्रशंसा करतात, हें देखील त्याच्याच नियंत्रणामुळें होय. पितर दर्वी होमांची प्रशंसा करतात, तेंही त्यामुळेंच. या अक्षरब्रह्माला न जाणतां जो या लोकीं हवन करतो, यज्ञ करतो, हजारों वर्षें तप करीत राहतों, तें त्याचें सर्व फळ अंतयुक्त असून निरुपयोगी होतें. या ब्रह्माला न जाणतां जो या लोकीं मरण पावतो, तो खरोखर कृपण होय. जो याला जाणून मरण पावतो तो खरा ब्राह्मण होय.

गार्गी : आपणांस आणखी कांहीं सांगावयाचें असल्यास तेंहि सांगून टाकावें.

याज्ञवल्क्य : ऐक, गार्गि. या ब्रह्माचें एकेक लक्षण नुसती ऐकत रहा. तें हें अक्षरब्रह्म अदृष्ट आहे, म्हणजे तें आतांपर्यंत कोणाला दिसलें नाहीं. पण गम्मत ही कीं, हें सर्व पाहणारें मात्र तेंच आहे ! तसेंच तें अश्रुत आहे. पण ऐकणारें मात्र तेंच. तें अमत असून, मनन करतें. अविज्ञात असून, सर्व कांहीं जाणतें. या ब्रह्माहून दुसरा कोणी द्रष्टा नाहीं, श्रोता नाही, मन्ता नाहीं किंवा ज्ञाता नाहीं. या ब्रह्मांतच आकाश ओत व प्रोत आहे.

गार्गी आतां पूर्वीची गार्गी राहिली नव्हती. याज्ञवल्क्यांचें तें सुंदर व अर्थगंभीर भाषण ऐकून तिचा सर्व अभिमान थिजून गेला होता. तिनं याज्ञवल्क्यास आदरपूर्वक नमस्कार करून, तेथील ब्राह्मणांस उद्देशून खणखणीत आवाजांत म्हटलें, "ब्राह्मण हो, याज्ञवल्क्याला नमस्कार करूनच मोकळे व्हा. कारण ब्रम्हज्ञानांत त्यांना जिकण्यास तुमच्यांत कोणीच समर्थ नाहीं." इतकें बोलून याज्ञवल्क्याला पुनः नमस्कार करून ती स्वस्थानीं गेली. (श. प. १४–६–८–१ ते १२)

एक अद्भूत चमत्कार !

गार्गीचें भाषण ऐकून तेथील सर्वांचीं तोंडें खारकन् उतरून निस्तेज पडलीं. आपण सर्व खास हरलों या भावनेनें जो तो मनांत खिन्न होऊन चरफडूं लागला. आणि क्षणभर सभेमध्यें सर्वत्र स्मशान शांतता पसरली.

इतक्यांत अश्वलायन शाखेचे प्रख्यात पुरस्कर्ते विदग्ध शाकल्य मुनि—याज्ञवल्क्यांचे एक माजी गुरुदेव—हे उठून वादक्षेत्रांत दाखल झाले. त्यांना पाहून सभेंत पुन: नवचैतन्याचा संचार झाला व त्या निराश सभागृहांत पुन: आशेचें व उत्साहाचें वातावरण खेळूं लागलें.

हे शाकल्य आचार्य म्हणजे होतेच तसे बृहस्पति. वादकौशल्यांत त्यांचा मोठा लौकिक होता. ऋग्वेदावर त्यांचा हुकमी अधिकार होता. तत्त्वज्ञानावरील त्यांचें प्रभुत्व तसेंच दांडगें होतें त्याविषयीं कोणाचा मतभेद नव्हता. हा हुकमी मोहरा वादक्षेत्रांत उतरलेला पाहून सभा पुन: उत्साहभरित झाली. शाकल्य महापंडिताच्या तेजापुढें व प्रश्नांच्या सरबत्तीपुढें याज्ञवल्क्य कसें टिकणार आणि काय जय मिळविणार? स्वारी लवकरच गडगडून पडणार या फसव्या भावनेनें जो तो हुरळून गेला व याज्ञवल्क्यांचा नक्षा केव्हां व कसा उतरेल, हें पाहण्यास जो तो मोठ्या आशेनें वाट पाहूं लागला.

पुढें लवकरच वादास तोंड लागलें व शाकल्यांनींच चर्चेस प्रारंभ केला. ते म्हणाले—याज्ञवल्क्या, आतां माझ्याशीं गांठ आहे. समजलें ना ?

याज्ञवल्क्य : ठीक आहे. समजलों.

शाकल्य : मग आतां माझ्या प्रश्नास सरळ उत्तरें देत जा. माझा पहिला प्रश्न असा कीं, देव किती आहेत ?

याज्ञवल्क्य : देव ? ते तीन आणि तीनशे; तीन आणि तीन हजार.

शाकल्य : म्हणजे काय? थोडक्यांत पुनः सांग किती आहेत ते ?

याज्ञवल्क्य : तेहतीस आहेत.

शाकल्य : पुन: सांग देव किती ?

याज्ञवल्क्य : सहा.

शाकल्य : देव किती ?

याज्ञवल्क्य : तीन.

शाकल्य : पुन: सांग देव किती ?

याज्ञवल्क्य : दोन.

शाकल्य : किती ?

याज्ञवल्क्य : दीड.

शाकल्य : अखेरचें एकच उत्तर दे. देव किती ?

याज्ञवल्क्य : शाकल्यमुने ! देव एकच आहे. हेंच माझें शेवटचें उत्तर.

शाकल्य : ठीक आहे, तुझ्या म्हणण्याचा मथितार्थ समजलों. तीन आणि तीनशें; तीन आणि तीन हजार देव आहेत असें तूं प्रथम म्हटलेंस. पण ते देव कोणते ?

याज्ञवल्क्य : शाकल्यमुने ! या सर्व देवांच्या विभूति आहेत. प्रत्यक्ष देव नव्हेत. तसें सांगायचें म्हणजे देव हे फक्त तेहतीसच आहेत.

शाकल्य : हें तरी खरें ना ? मग सांग, ते तरी कोणते ?

याज्ञवल्क्य : आठ वसु, अकरा रुद्र व बारा आदित्य. हे असे एकतीस. आणि त्यांत इंद्र व प्रजापति मिळवून तेहतीस.

शाकल्य : आठ वसु, कोणते ?

याज्ञवल्क्य : अग्नि, पृथ्वी, वायु, अंतरिक्ष, आदित्य, द्यौ, चंद्रमा व नक्षत्रें हे आठ वसु आहेत.

शाकल्य : कारण ?

याज्ञवल्क्य : त्यामध्येंच सर्व विश्वजात वास करते म्हणून.

शाकल्य : आणि अकरा रुद्र ?

याज्ञवल्क्य : शरीरांत असणारीं दहा इंद्रियें आणि अकरावा आत्मा मिळून अकरा रुद्र.

शाकल्य : यांना रुद्र म्हणण्याचें कारण ?

याज्ञवल्क्य : शरीर सोडून जातांना हे प्राण्यास रडवितात म्हणून.

शाकल्य : आतां बारा आदित्यांचा खुलासा कर.

याज्ञवल्क्य : संवत्सराचे जे बारा महिने आहेत, त्यांनाच आदित्य ही संज्ञा आहे. यांना आदित्य म्हणण्याचें कारण ते हें सर्व घेऊन जातात.

शाकल्य : आतां तुझा इंद्र कोण तें सांग.?

याज्ञवल्क्य : गर्जना करणारा, गडगडाट करणारा–तो इंद्र.

शाकल्य : आणि प्रजापति ?

याज्ञवल्क्य : तो पशु होय.

शाकल्य : याज्ञवल्क्या, येथपर्यंत तूं सगळें ठीक बोललास. हे तेहतीस देव तुझे बरोबर आहेत. आतां मला सांग कीं, तूं उल्लेखिलेले सहा देव कोणते ?

याज्ञवल्क्य : अग्नि, पृथ्वी, वायु, अंतरिक्ष, आदित्य आणि द्यौ हे असे सर्व मिळून सहा देव होत.

शाकल्य : ठीक, तीन कोणते ?

याज्ञवल्क्य : हे जे तीन आहेत, ते लोक आहेत. त्यांतच सर्व देव राहतात.

शाकल्य : दोन म्हणालास ते कोणते ?

याज्ञवल्क्य : अन्न आणि प्राण.

शाकल्य : दीड कोणता ?

याज्ञवल्क्य : हा जो वाहतो तो वायु.

शाकल्य : हा वायु एकटाच वाहतो असें म्हणतात. मग तूं दीड म्हणतोस हें कसें काय ?

याज्ञवल्क्य : या वायूमध्येंच हें सर्व वृद्धि पावतें म्हणून याला दीड म्हणतात.

शाकल्य : हा तुझा खुलासा मला पटला. आतां तुझा एक देव तो कोणता ?

याज्ञवल्क्य : प्राण. तो ब्रह्म होय. त्याला त्यत् हें परोक्ष नांव आहे. शाकल्यमुने, पुनः ऐका. पृथ्वी हा ज्याचा आश्रय आहे, अग्नि ज्याचा चक्षु आहे, मन ज्याचा संकल्प करणारा आहे अशा सर्व आत्म्यांचा परम आश्रय असलेल्या पुरुषाला जो जाणतो, तोच पंडित होय.

शाकल्य : याज्ञवल्क्या, तूं ज्याला सर्व आत्म्याचा परम आश्रय म्हणतोस तो पुरुष मी जाणतो. शरीरांत जो राहतो तोच हा होय. तो काममय आहे. स्त्री ही त्याची देवता आहे.

याज्ञवल्क्य : हे मुने, रूप हा ज्याचा आश्रय आहे, चक्षु हा ज्याचा पाहण्याचें साधन आहे आणि मन हा ज्याचा सकल्प करणारा आहे, अशा सर्व आत्म्याचा परम आश्रय असलेल्या पुरुषाला जो जाणतो तोच पंडित होय.

याप्रमाणें पुरुषाविषयीं त्या दोघांत पुष्कळ प्रश्नोपप्रश्न झाल्यावर शेवटीं याज्ञवल्क्य म्हणाले—शाकल्यमुने, या ब्राह्मणांनीं आपणांस निखारे उचलण्याचा जगुं काय चिमटाच केला आहे. या भाषणानें शाकल्य थोडेसे चिडले व म्हणाले—याज्ञवल्क्या, कुरु

व पांचाल देशींच्या या विद्वान ब्राह्मणांना तूं असें टाकून कां बोलतोस. तूं तरी ब्रह्म जाणतोस काय ?

याला याज्ञवल्क्यांनीं सरळ उत्तर देऊन कांहीं यज्ञविषयक विचारलेल्या प्रश्नांना चोख व समर्पक जबाब दिला. अखेर त्यांनींच उपनिषदोक्त ज्ञेयपुरुषाविषयीं शाकल्याला हुकमी प्रश्न टाकून एक झणझणीत इशारा दिला कीं, शाकल्यमुनें हा जो मी तुम्हांस औपनिषदिक पुरुषाविषयीं प्रश्न विचारला आहे, त्याचें उत्तर सांगतां न आलें तर तुमचें मस्तक तुटून पडेल.

दुर्दैवाची गोष्ट ही की हें ज्ञान शाकल्यास नव्हतें. मौन धारण करून खालीं मान घालून ते असतात तोंच त्यांचें मस्तक तुटून खालीं पडलें ! हा जो चमत्कार झाला तो सूर्यनारायणानें याज्ञवल्क्यांस दिलेल्या वराचा प्रभाव होय. तो वर असा ' जो कोणी याज्ञवल्क्यांचा अपमान करील त्याचें मस्तक तुटून पडेल. या वराची येथें योग्य अम्मलबजावणी झाली. (बृ. दा. अ. ३ ब्रा. १ व आन्हिक सूत्रावलि पृ. ३५७)

हा अद्‌भुत व अनपेक्षित चमत्कार पाहून ती सभा भीतीनें हादरून गेली. जो तो मनांतल्या मनांत चरकल्या व चपापल्यासारखा झाला. ऋग्वेदाचार्य शाकल्यमुनींची ही स्थिति झालेली पाहून याज्ञवल्क्यांपुढें येऊन वादविवाद करून त्यांस जिंकण्याची कल्पना देखील करण्यास कोणीही धजेना. ब्रम्हिष्ठ म्हणवून घेणेंहि नको, याज्ञवल्क्यांशीं सामना देणेंहि नको, अशी ज्याची त्याची मनोभावना झाली. अर्थात् ब्रम्हिष्ठ म्हणवून घेण्याची त्यांची हौस जिरली. याज्ञवल्क्य हे कांही वेळ वाट पाहुन पुढें कोणीही येत नाहीं, असें पाहून म्हणाले, ब्राह्मणहो, तुम्ही सर्वजण मिळून अगर तुमच्यांत जो कोणी तसा समर्थ असेल त्यानें मला वाटेल तो प्रश्न

करावा. मी त्यांस सरळ जबाब देईन. आणि मीही तुम्हां सर्वांना मिळून अगर तुमच्यांतील माझ्या मर्जीस येईल त्यांस वाटेल तो प्रश्न विचारीन. त्याचें उत्तर मात्र मिळालें पाहिजे. कबूल असेल तर हो म्हणा 'असे बोलून ते उत्तराची वाट पहात बसले. (बृ.अ.३ब्रा.९)

सगळी सभा चित्रासारखी तटस्थ झाली. वादविवादाला पुढें येण्यास कोणीहि धजलें नाहीं. अर्थात्‌च याज्ञवल्क्य विजयी झाले. यांचा जयजयकार झाला नि विजयश्रीने त्यांना माळ घातली, सूर्य-देवाला धन्यता वाटली आणि सरस्वतीला परमानंद झाला. जन-कराजे आनंदानें डोलूं लागले व याज्ञवल्क्य त्या भूदेवसभेंत ब्रम्हिष्ठ ठरले. याज्ञवल्क्यांच्या सूचनेवरून त्यांचा शिष्य सामश्रव उठला व त्या जनक राजाच्या हजार गायी सर्वांदेखत त्यानें आश्रमाकडे वळविल्या. (श. प. १४, अ. ६ ब्रा.९)

याज्ञवल्क्यांच्या या दिग्विजयाची नौबत जिकडे तिकडे झडूं लागली. जनकांनीं याज्ञवल्क्यांचें त्या सभेतील अगाध व अमर्याद ज्ञानभांडार व हुकमी वादकौशल्य पाहून आनंदा-श्चर्यानें चकित होऊन त्यांस ब्रम्हिष्ठ म्हणून नमस्कार केला व पुढे ते त्याचे परम शिष्य झाले. वरील सभेची सविस्तर हकीकत शतपथांत वर्णिलेली आहे. बृहदारण्यकांतहि ती पाहावयास मिळेल. या जगविख्यात जनकयज्ञांतील या विव्दत्सभेचा संस्म-रणीय इतिहास आचंद्रार्क विसरला जाणार नाहीं.

याज्ञवल्क्यांचा प्रथितयश विद्वानांशी व तत्त्ववेत्त्यांशीं झालेला चुरशीचा सामना, त्यांचा विजय व ब्राम्हणश्रेष्ठत्वाचा त्यास मिळालेला बहुमान म्हणजे तत्वज्ञान नैपुण्याचा व

विचारकौशल्याचा सुंदर संस्मरणीय महाकळसच होय. त्यांनीं यापावेतो किती तरी लोकांबरोबर झुंज घेतली व प्रतिपक्षावर अप्रतिम मात करून अद्वितीय व दुर्दमनीय कर्मवीर व ज्ञानवीर अशीं दिगंत कीर्ती मिळवली. एकेकाळी गुरुस्थानी असलेलें वैशंपायन, उद्दालक,, शाकल्य, यासारख्या धुरंधर, महारथी, अतिरथींशीं धैर्यानें झुंज देऊन सर्वांवर मात करून अखेर जिकली. याच प्रमाणें पुढें त्यांची उत्तरोत्तर भरभराट होऊन त्यांचा यशोनिधि शेवटपर्यंत सारखा उचंबळतच राहिला. त्याला ओहटी अशी कधींच लागली नाहीं. जसे ते कर्मकांडांत व तत्त्वज्ञानांत अखंड विजयी ठरले, तसेंच योगशास्त्रांतहि अत्यंत निष्णात असल्यामुळें त्यांना पुढें योगीश्वर हा बहुमान कसा मिळाला, ती कथा पुढें येणारच आहे.

याज्ञवल्क्य व जनक

या प्रकरणांत याज्ञवल्क्य व जनक यांच्या संबंधानें थोडीफार चर्चा केली आहे. कारण ही जी गुरुशिष्याची जोडी आहे ती व्यक्तिशः कोण असावी याबद्दल अनेक विद्वानांची दिशाभूल झाली असून ते मोठ्या गोंधळांत पडल्यासारखे दिसून येतात.

सकृद्दर्शनीं येथें हें सांगितलें पाहिजे कीं योगीश्वर याज्ञवल्क्यांचें चरित्र समजून घ्यावयाचें झाल्यास तें एकाच ठिकाणीं व एकाच ग्रंथांत साद्यंत सांपडणें शक्य नाहीं. मात्र ज्यांना याज्ञवल्क्य कोण व काय हें समजून घ्यावयाचें असेल, त्यांनीं प्रथम शतपथ ब्राह्मणाकडेच वळलें पाहिजे. त्यांत त्यांचा इतर कोणकोणत्या व्यक्तींशी संबंध आला आहे व इतर कोणत्या ऐतिहासिक गोष्टींचा त्यांत उल्लेख सांपडतो याची खातरजमा करून घेऊन, मग त्या रोखानें उपनिषदें, भारत, विष्णु, वायु, मत्स्य, स्कंद, भागवत वगैरे पुराणें व इतर अनेक प्राचीन ग्रंथांचें निरीक्षण व परीक्षण करून त्यांतून मिळालेली उपयुक्त व उपकारक माहिती घेऊन सुसंगत मांडणी केली तरच हा उलगडा होईल. नुसता एखाद दुसरा ग्रंथ चाळून तेवढ्यावरून याज्ञवल्क्यांवर बोलूं पाहणें हें समंजसपणाचें होणार नाहीं. आणि हाच दोष, आमच्या उथळ आक्षेपकांच्या बाबतींत नेमका आढळून आला आहे.

जनक, याज्ञवल्क्य, जनमेजय, वसिष्ठ, विश्वामित्र इत्यादि नांवांवरून लोकांचा फार मोठा गैरसमज होण्याचा संभव आहे आणि तो तसा आमच्या आक्षेपकांच्या बाबतींत झालाहि आहे. जनक म्हटला कीं श्रीरामचंद्राचा सासरा—सीतेचा बाप—ही व्यक्ति चटकन् डोळ्यांसमोर उभी राहते. आणि याज्ञवल्क्यांचें नांव

निघतांच वाजसनेय याज्ञवल्क्य यांची अचूक आठवण होते. बृहदारण्यकांतील जनक–याज्ञवल्क्य यांची दुक्कल पाहून अधिक विचार न करतां सामान्य लोक एकदम वाजसनेय याज्ञवल्क्यांचा संबंध जानकीच्या बापाशीं लावून पार मोकळे होतात ! पुष्कळ संशोधकांची देखील अशीच दिशाभूल झाली आहे. जनक हे व्यक्तीचें नांव नसून कुलाचें आहे आणि त्यांत निमीपासून कृतिपर्यंत एकंदर एकूणसाठ (५९) राजे होऊन गेले असून त्यांत सीतेचा बाप–त्याचें नांव सीरध्वज असें आहे. हा निमीपासून दहावा वंशज ठरतो आणि कृति जनक हा शेवटचा म्हणजे ५९ वा ठरतो. पुराणांत मुख्य नांवाचा उल्लेख बहुतेक न करतां वंश नामाचा उल्लेखच सर्वत्र करण्यांत आला आहे. आणि यामुळे समजुतींत असा घोटाळा होणें शक्य आहे.

अशीच गोष्ट याज्ञवल्क्य नांवासंबंधानें झालेली दृष्टोत्पत्तीस येते. याज्ञवल्क्य नांवाच्या पुराणांत चार व्यक्ति असून, याज्ञवल्क्य म्हणतांच जो तो वाजसनेय याज्ञवल्क्य घेऊन बसतो. तेव्हां बृहदारण्यकांत याज्ञवल्क्य–जनक या जोडीचा एकत्र उल्लेख आला असला तरी त्यांत जनक व्यक्ति कोण व त्या व्यक्तीचा याज्ञवल्क्यांशीं संबंध आलेला खरा याज्ञवल्क्य कोण याचा करावा तितका विचार महाराष्ट्रांत अद्यापपर्यंत कोणी केलेला दिसत नाही.

प्रारंभी बृहदारण्यकांत जनक –याज्ञवल्क्य यांची जी जोडी दृष्टोत्पत्तीस येते त्यांतील याज्ञवल्क्य कोण याची थोडक्यांत शहानिशा करून मग तो जनक कोण हें दाखविण्याच्या भरीस पडू. बृहदारण्यकांतील जनकाला उपदेश करणारे याज्ञवल्क्य हे वाजसनेय याज्ञवल्क्यच होत, याविषयीं संशयाला मुळींच जागा

नाहीं कारण बृहदारण्यक हें शतपथांतील चौदाव्या कांडांतील एक भाग असून त्या ग्रंथाच्या शेवटीं 'आदित्यानीमानि शुक्लानि यजूंषि वाजसनेयेन याज्ञवल्क्येनाख्यायन्ते' असा स्पष्ट शेरा असून, त्यावरून शतपथांतार्गत बृहदारण्यकांतील जनकाचे गुरु याज्ञवल्क्य हे वाजसनेयच होत याविषयीं संशयच राहात नाहीं. हे वाजसनेय याज्ञवल्क्य ब्रह्मराताचे चिरंजीव असून ते वैशंपायनाचे भाचे लागतात हा इतिहास ग्रंथारंभीं आम्ही दिलाच आहे. ब्रह्मराताला वाजसनि म्हणजे अन्नदाता असें टोपण नांव होतें. त्या वाजसनीचा मुलगा तो वाजसनेय होय 'वाजसनिः' याचा अर्थ सूर्य असा असून, त्या सूर्याचा शिष्य तो वाजसनेय असाहि अर्थ लावता येतो आणि याज्ञवल्क्यांनीं सूर्याची उपासना करून शुक्ल यजुर्वेद मिळविला ही गोष्ट इतिहास पुराणांत ठिकठिकाणी नमूद आहे. त्याविषयीं येथें निराळा पुरावा देण्याचें कारण नाही. शिवाय महाभारतांतील शांतिपर्वात ज्या याज्ञवल्क्यांनीं जनकाला उपदेश केला आहे, तेच याज्ञवल्क्य खुद्द आपल्या तोंडानेंच आपला थोड्क्यांत इतिहास सांगून आपण शतपथ हें रहस्यसहित सूर्यापासून मिळविलें व माझ्या मामाशीं भांडून यज्ञांत अर्धी दक्षिणा घेतली असें स्पष्ट व स्वच्छ सांगतात.

(महाभारत, शांतिपर्व अ. ३२३, कुंभकोणं प्रत)

हा इतिहास प्रत्यक्ष वाजसनेय याज्ञवल्क्यांच्या वाणींतूनच बाहेर आला आहे. मग आतां आणखी काय पाहिजे ? त्यांत मातुलाचा–म्हणजे वैशंपायनाचा उल्लेख असून, जनमेजयांच्या सर्पसत्रांतील सदस्यत्वाचा मान मिळविलेले व जनक यज्ञांतील मामा–भाच्याचे दक्षिणाविषयक भांडण मिटवणारे देवल महर्षिचाहि निर्देश आहे ! सूर्यापासून वेद मिळविलेली हकीकत प्रथमच

सांगितली असल्यानें एकंदर संदर्भावरून ब्रह्मराति उर्फ वाजसनेय याज्ञवल्क्यांचाच अचूक बोध होतो.

जनकवंशांत शेवटचा जनक कृति होय. याबद्दल विष्णुपुराणांत उल्लेख आढळतो तो असा, 'ऋतात्सनयस्ततां वीतहव्यस्तस्मात् धृति धृतेर्बहुलाश्वस्तस्य पुत्रः कृतिः कृतौ संतिष्ठतेऽयं जनक-वंशः,' (अं. ४, अ. ६, श्लो. १२) अदतापासून सुनय, सुनयापासून वीतहव्य, वीतहव्यापासून धृति, धृतीपासून बहूलाश्व व बहुलाश्वापासून कृति होय. कृति नंतर जनक वंश संपुष्टांत येतो. या वचनावरून कृति हा जनकवंशज ठरतो हें निर्विवाद आहे. सीरध्वजाला रामायणांत जसें जनक या नांवानेंच संबोधिले आहे तद्वत कृतीला देखील बृहदारण्यकांत फक्त जनक या नांवानेंच उल्लेखिलें आहे, पण त्या वंशवाचक नांवावरून सर्व ठिकाणी व सर्व काळीं एकाच व्यक्तीचा बोध होतो, असे धरून चालणें व्यवहाराला धरून होणार नाहीं.

हा कृति हिरण्यनाभाचा शिष्य होता हेंही दाखविता येतें. हिरण्यनाभशिष्यश्च चतुर्विंशति संहितः। प्रोवाच कृति नामासौ शिष्येभ्यः सुमहामतिः॥ असे विष्णुपुराणांत चक्क म्हटले आहे. येथें कृति हा हिरण्यनाभाचा शिष्य होता असा स्पष्ट उल्लेख आला आहे. आणि ज्याअर्थी तो हिरण्यनाभाचा शिष्य ठरतो, त्याअर्थी तो याज्ञवल्क्यांचा गुरुबंधूहि ठरतो, हें निराळें सांगावयास पाहिजे असें नाहीं. याज्ञवल्क्यांनीं हिरण्यनाभांच्या जवळ राहून योगाभ्यास चालू केला व हा हिरण्यानाभ व्यासाचा सामवेदी शिष्य जो जैमिनी त्याच्या नातूचा म्हणजे सुकर्माचा शिष्य होता, हे आम्ही मागें दाखविलेंच आहे. पारिक्षित जनमेजय, वैशंपायन, वाजसनेय याज्ञवल्क्य, हिरण्यनाभ,

कृति जनक व उद्दालक आरुणि हे सर्व समकालीनच ठरतात. या विषयीं वाद मुळींच राहत नाहीं. विशेषत: वरील सर्व विवेचनाचे सार खाली दिलेल्या आकृतीवरून सूज्ञ वाचकांच्या सहज ध्यानात येणार आहे.



या वरील आकृतीवरून पारिक्षित जनमेजय, वाजसनेय, याज्ञवाल्क्य व कृतिजनक यांचा मेळ बसतो व त्या प्राचीन ग्रंथांतून इतिहासाची कशी सुंदर संगति लागते हे पटते व रामाचा सासरा सीरध्वज जनक हा वाजसनेय याज्ञवल्क्याच्या काळी हयात असणे शक्यच नसल्यामुळें त्याचा संबंध जोडूं पाहणे हे ऐतिहासिक दृष्टया निव्वळ वेडेपणाचें आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

मैत्रेयीची मनःस्थिति

भारतीय तत्त्वज्ञानाच्या इतिहासांत जनक दरबारांतील विद्वत् परिषद ही एक अजरामर, अविस्मरणीय अशी गोष्ट आहे. झालेल्या चर्चात्मक वादक्षेत्रांत आपल्या अपूर्व व अलौकीक बुद्धि-सामर्थ्यानें याज्ञवल्क्यांनीं मिळविलेला प्रचंड विजय पाहून जनक राजे विस्मयचकित व आनंद-भरीत झाले,इतकेंच नव्हे तर ते त्या योगीश्वराचें परमशिष्य व अनुयायी बनले. तेव्हांपासून याज्ञ-वल्क्यांचा यशोदुंदुभी जगभर सतत गाजत राहिला आहे व भरतखंडभर जगद्गुरूची महनीय प्रतिष्ठा त्यांना लाभली आहे.

या जनकसभेमध्यें मैत्रेयी ही हजर असून आपल्या मावशी-जवळ बसून तेथील सर्व वादसंवाद ऐकत होती व घडलेला सर्व प्रकार तिनें संपूर्ण पाहिला. याज्ञल्क्यांचें दिव्य ज्ञान, तेज, विद्वत्ता, वादपटुता इत्यादि पाहून त्या सभेंत जमलेला सगळा श्रोतृवृंद भांबावून भाबडाव दिङ्मूढ होऊन गेला होता.मग तरुण व भाबड्या मैत्रेयीचे मन कसें ठिकाणावर राहील ? तें आश्चर्यानें डवळून व आनंदानें उसळून निघालें होतें. मी मी म्हणविणारे ज्ञानवीर याज्ञवल्क्यांशीं वाग्युद्ध करण्यास मोठ्या हिरीहिरीनें वादक्षेत्रांत पदार्पण करीत. पण पुढें क्षणार्धातच दीपावरील पतंगाप्रमाणें त्यांच्या ज्ञानतेजानें दिपून जाऊन पटापट पतन पावत. उद्दालक आरुणि – याज्ञवल्क्यांचे मंत्रविद्येचे गुरु, महाविदुषी गार्गी वाचक्नवी, वेदमित्र शाकल्य यांसारखे प्रथितयश पंडीतकुलशेखर देखील गुरु देवाच्या देदीप्यमान प्रतिभा तेजानें दिपून हतप्रभ होऊन मान खालीं घातल्याशिवाय राहिले नाहींत. हा प्रकार पाहून खरो-

खर,मैत्रयी स्तभीतच झाली. आणि कां नाही होणार? एवढे मोठे जनकराजे. ते देखील याज्ञवल्क्याचें ज्ञानसामर्थ्य नि वादकौशल्य पाहून विस्मयचकित होऊन गेले होते.. मग या अल्लड तरूण-तरुणीची तर काय कथा ?

याज्ञवल्क्य या वेळीं जवळ जवळ पचेचाळीशीच्या घरांत आले असतील नसतील. त्यावेळीं हें वय म्हणजे वैदिक आर्यांचें भर तारुण्य. आज सुधारणेची प्रौढी मारणाऱ्या सुधारलेल्या युगांत मनुष्य पन्नाशीच्या घरीं आला म्हणजे कृतांतकटकध्वजाकडे दृष्टि लावून बसल्यासारखा दिसतो. पण त्या काळीं पन्नाशीचें वय म्हणजे भर तारुण्याचा ऐन बहर. 'शतं जीवेम शरद:'चा तो चालता काळ. शंभरच का, अधिक जगण्याचा 'भूयश्च शरद: शतम्'चा – तो तेजस्वी काळ होता. त्यावेळची वयोमर्यादा कमीत कमी शंभर वर्षांची असून जास्तीत जास्त म्हणजे दीडशें पावणेदोनशे पर्यंत होती.

उदाहरण देऊनच सांगायचें म्हणजे भीम, अर्जुन, धर्म, श्रीकृष्ण, भीष्म, व्यास वगैरे सर्व दीर्घजीवी होते. भीम, अर्जुन धर्मराज यांचें आयुष्य ११५ ते १३० वर्षांचें, भगवान श्रीकृष्णाचें १३५ वर्षांचें, वसुदेव-देवकी ही १५० वर्षांचीं, व महर्षि व्यास याचे आयुष्य १७५ हून पुढें गेलेलें होतें. आज लोकांना हे खरे सुद्धा वाटणार नाही. पाचव्या वर्षी ज्यांच्या डोळ्यालाआरशी लागते, पंचवीसाव्या वर्षी ज्यांच्या डोक्यावर रुपेरी छत्र छळकूं लागतें,आणि चाळीसाव्या वर्षी ज्यांच्या तोंडाचें बोळकें होते त्यांच्यावर पन्नास-साठीच्या आंतच जरठपणाचीं सारीं लक्षणें डोकावूं लागतात, अशा अल्पायु व दुर्बल युगांत पन्नाशीचे वयमान म्हणजे जवळजवळ तो आयुष्याचा संध्याकालच. पण अशी शोककथा भारत काळीं नव्हती, 'शतायुर्वै पुरुष:'चा

तो चालता काळ होता. तात्पर्य याज्ञवल्क्य पंचेचळीशीच्या घरीं आले होते तरी ते आजच्या पहिल्या पंचवीशीच्या तरण्याबांडाप्रमाणेंच तेजस्वी, तरतरीत व उत्साहभरित दिसत होते. त्यावेळीं त्यांचा चेहरा सूर्याप्रमाणें सुतेजस्वी व चंद्राप्रमाणें प्रफुल व प्रसन्न दिसे.

त्यांचीं मनोहर शरीरकांति, प्रसन्न चेहरा, अगाध विद्वत्ता, अलोट ज्ञानवैभव, सूक्ष्म व सखोल शास्त्राध्ययन, अप्रतिम वादकौशल्य, अलौकिक बहुश्रुतपणा, हुकमी वर्चस्व हें सर्व पाहून या नवतरुण मैत्रेयीला काय बरें वाटलें असेल ? अविवाहित राहण्याची तिची इच्छा आता ठिकाण धरून राहिली असेल काय ? याज्ञवल्क्यांचें दिव्यगुणैश्वर्य व जनकसभेतील त्यांचा महापराक्रम पाहून खरोखर ती दिपूनच गेली होती आणि तिच्या मनांत कांहीं तारुण्यसुलभ आकांक्षा उत्पन्न झाल्या असल्यास त्यांत नवल नाहीं. तशांत गार्गी, उद्दालक यांच्याशी झालेलें तें अभूतपूर्व वाग्युद्ध पाहून तर ती भानच विसरल्यासारखी झाली होती. तिचें मन डळमळून ती चलबिचल झाली नसेल असें कोणी सांगावें ? त्या दिवसापासून तिच्या मनांत प्रेमभावनेचा नवोदय झाला असला तर त्यांत अस्वाभाविक असें काय आहे ? वयांत आलेल्या तरुण स्त्रीमनाचा तो सहज स्वभावच नाही काय ? थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे याज्ञवल्क्यांनीं त्या सभेत वाग्युद्ध खेळून जसा ज्ञानवीरांवर दणदणीत विजय मिळविला, तसाच त्यांनीं त्या तरुण कुमारीच्या प्रेममुग्ध अंतःकरणावरहि हुकमी प्रभाव पाडला असें म्हटलें तर ती अतिशयोक्ति होणार नाहीं.

वरीन तर याज्ञवल्क्यच वरीन

मैत्रेयी ही तरुण व विद्यामंडित होती. ती जरी ज्ञानसंपन्न व विद्यामंडित असली तरी निसर्ग नियमाप्रमाणें तिच्या अंतःकरणांत तारुण्यसुलभ भावनेचा उदय व्हावयाचा तो झालाच होता. फक्त एवढेंच कीं, तिचें प्रेम आंधळें व उल्लू नव्हतें. त्याला विवेकाचें भरभक्कम कोंदण होतें. ती सुंदर व दुसऱ्याचें चित्त वेधून घेणारी होती. तरी तिच्यांत सात्विक वृत्तीची व विनयशीलतेची मधुर झाक मारत होती. तिला संसारसुखाची इच्छा व आवड होती. तिला पती पाहिजे होता पण तिचें लक्ष केवळ इंद्रियसुख व देहार्पण यांवर केंद्रित झालें नव्हतें. आधुनिक नवनीतीच्या भडक कल्पनेमुळें बहकून गेलेल्या नवशिक्षित तरुणीप्रमाणें हृदयाच्या हांकेला ओ देऊन, बंधनाच्या पलीकडे जाऊन केवळ क्षणभंगुर विषयलालसा भागविणें हेंच इतिकर्तव्य असें ती मानीत नव्हती. तिच्या मधुर भावना क्षणिक विकारतंत्र नसून त्या सभोंवती नीतीचें व विवेकाचें सुंदर कोंदण विलसत होतें. तिच्या सर्व आशाआकांक्षा हृदयस्थ विवेक देवतेला कौल लावूनच पुरवून घेण्याचा तिचा पवित्रा होता.

मैत्रेयीच्या प्रेममंदिरांत याज्ञवल्क्यांची तेजस्वी मूर्ति विराजमान झाली होती हे आतां लपवून ठेवण्यांत स्वारस्य नाहीं. अर्थात् ती मनोमय होती. प्रत्यक्ष याज्ञवल्क्यांची प्राप्ति होणें हें दैवाधीन होतें. कारण विष्णूला जशी लक्ष्मी, अथवा शंकराला जशी पार्वती तशी याज्ञवल्क्यांना कात्यायनी होती. मग मैत्रेयीचें मनोराज्य सत्यसृष्टींत उतरण्याची आशा कशी शक्य असणार ?

याज्ञवल्क्याचे सांसारिक आयुष्य दृष्ट लागण्यासारखें होतें. प्रत्यक्ष स्वर्गहि तेथे लाजावा. मग मैत्रेयीनें तिची सवत होण्याची

इच्छा करणें म्हणजे त्या सोन्यासारख्या सुंदर संसारांत जाणून बुजून माती कालविण्यासारखें होणार नव्हते का? आणि याज्ञवल्क्य तरी ती गोष्ट कशी कबूल करतील ? आणि तशी सूचना त्यांना करण्याचें धाडस तरी कोण व कसें करील ?

मित्र प्रधानजी हे चांगले विचारी व व्यवहारतज्ञ होते. त्यांचा व याज्ञवल्क्यांचा स्नेह व घरोबा होता. शुक्लयजुर्वेद तयार करण्यांत त्यांची याज्ञवल्क्यांस मदतहि होती. शिवाय अरण्यांत त्यांनीं त्यांचे वाघापासून प्राण वांचविले होते, हेंहि तितकेंच खरें. पण मैत्रेयीच्या लग्नाची बाब अशी कांहीं नाजूक व विलक्षण होती कीं, तिचा याज्ञवल्क्यांपुढें उच्चार करणें म्हणजे तें देखील एक मोठें पापच. मित्र प्रधानजीला तर तें कसेसेंच दिसलें. कात्यायनीचा सुखद व सुदर संसार ते नित्य डोळ्यांनीं पाहत असतां आपल्या लाडक्या मुलीचा स्वीकार करावा म्हणून योगीश्वराजवळ त्यांनीं कोणत्या तोंडानें म्हणावें ?

मैत्रेयीची मनीषा सफल होण्याची मित्रांना फारशी आशा दिसली नाहीं. म्हणून ही बाब तिला नीट समजावून द्यावी आणि तिचें मन त्या हट्टापासून परावृत्त करावें असा विचार करून त्यांनीं एक दिवस तिला जवळ बोलावून सर्व परिस्थिती समजावून सांगितली. बापाचें अंतःकरण तें. मुलगी उपवर झाली म्हणजे तिचे दोन्हीचे चार हात होईतोपर्यंत रात्रंदिवस तें कसें चिंताग्रस्त असतें हें 'जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे.' ते म्हणाले," मुली याज्ञवल्क्यांची पत्नी होण्याचा नाद सोड ! ही तुझी इच्छा सफल होण्यासारखी नाही. तुझी आशा व्यर्थ आहे. हा आग्रह सोड, तुजकरतां दुसरे उत्तम स्थळ पाहीन."

पण मैत्रेयी ती मैत्रयीच. तिने मनांत जो निश्चय केला तो केलाच. त्यांत बदल करणें कालत्रयींहि शक्य नव्हतें. तिची महत्वाकांक्षा पूर्ण होणें कठीण होतें हें तिला समजत नव्हतें असें

नव्हे. तें ती पूर्ण ओळखून होती. पण कांहीं झालें तरी तिनें मनांत पूर्ण निश्चयच केला होता कीं, लग्न करावयाचें तें फक्त याज्ञवल्क्यांशींच. नाहींतर आपल्या मावशीप्रमाणें कडकडीत कौमार्य पत्करून ज्ञानार्जनांत सगळा जन्म काढायचा. मग याला तुम्ही दुरा ग्रह म्हणा किंवा आणखी कांही म्हणा. थिल्लर हृदयाच्या चंचल लहरींवर मोकाट वाहवत जाण्यापेक्षां शांत व स्थिर विवेकाच्या गूढ व मंगल कूजनावरच तिच्यासारख्या दृढ निश्चयाच्या सुशील महिला अधिक लुब्ध असतात. त्यांची दृष्टि भावनातृप्तीवर नसून, ती शाश्वत परिणामावर असते. या दिव्य आणि पवित्र भावनेच्या जोरावरच सीता, सावित्री, द्रौपदी, सुकन्या, इत्यादि चारित्र्यसंपन्न आर्यमहिला प्रसंगविशेषीं लोकोत्तर दिव्य करून इतिहासांत अजरामर झाल्या आहेत.

कुमारी मैत्रेयीनें आपला निश्चय मेरुप्रमाणें अढळ ठेविला. मग तिची महत्वाकांक्षा सफल होवो अगर न होवो, त्याची तिला परवा नव्हती. त्यांत तिला कात्यायनीशीं चुरस अगर हेवादेवा करून तिच्या सुखी संसारांत आडकाठी घालून आपली सुखलालसा तृप्त करून घ्यावयाची इच्छा नव्हती. फक्त याज्ञवल्क्याची सेवाचाकरी करून कात्यायनीच्या सहानुभूतीनें आपली जिज्ञासा व जीविताची सफलता पूर्ण करून घ्यावयाची होती. कात्यायनीचा स्वभाव व मन तिला पूर्ण अवगत असल्यामुळें त्या सतीची दासी होऊनहि तिच्या सानिध्यांत रहावयास ती विदुषी तयार होती बापाच्या म्हणण्याला रुकार देऊन इंद्राचें साम्राज्य मिळालें तरी तें तिला नको होतें. म्हणून तिनें बापास चक्क व स्पष्ट सांगून टाकलें, " पिताजी वरीन तर याज्ञवल्क्यच वरीन, नाही तर अशीच कुमारी राहीन " तिची ही स्पष्टोक्ति ऐकून बिचारे मित्र बर्फाप्रमाणें गारेगार झाले नि पुढें कांहीं एक न बोलतां त्यांनीं तेथून पाय काढला.

मैत्रिणींचें हितगुज

आतां कात्यायनी व मैत्रेयी यांचा एकमेकांकडे जाण्यायेण्याचा सराव सर्रास वाढला होता. अशाच एका प्रसंगीं कात्यायनी मैत्रेयी-कडे आली होती.

तेथें आल्यावर इकडच्या तिकडच्या कांहीं गप्पागोष्टी झाल्यावर कात्यायनी तिला म्हणाली :- आतां गडे तुझं लग्न झालं म्हणजे मग तूं कसली इथं राहूचला. सासुरवाशिण होशील. तुझं ते ठीक आहे. पण मला मात्र चुकल्या चुकल्या सारखं होईल. तुझा वियोग मला जाणवल्याशिवाय राहणार नाहीं. खरंच गडे आपलं प्रेम आहेच तसं.

मैत्रेयी म्हणाली-कात्यायनि किती कोमल ग मन तुझं प्रेम वेडं म्हणतात तें असं पण एक गोष्ट लक्षांत ठेव.

कात्यायनी-ती काय ?

मैत्रेयी-आपला वियोग होणार नाहीं.

कात्यायनी-तो होणार नाहीं. काय वियोग होणार नाही ? हें तू कांहीं तरीच म्हणतेस गडे. कुठलं स्थळ मिळेल तुला कोण जाणे !

मैत्रेयी-लग्न झाल्यावरची ती गोष्ट ना ?

कात्यायनी-कांहीं तरीच तुझं हें आपलं. लग्नं झाल्याशिवाय कां राहील ? आज ना उद्यां तें होईलच आणि होणारच. इथलं आसपास जवळच स्थळ जुळलं तर एक गोष्ट वेगळी. पण समज, दूरचं लाभलं तर मग कसं ? आम्हां स्त्रियांना सासरीं जावंच लागतं. कर्मधर्मसंयोगानं तूं दूर गेलीस तर मग आपल्या भेटीचा योग केव्हां येईल कोण जाणें. मला तर वाई सारखी हुरहुर लागून राहील बघ !

मैत्रेयी—अग मी लग्न करून घेईन तर.

कात्यायनी—म्हणजे ? तुझं कांहीं तरी भलतंच गडे. संसार थाटावासा नाहीं कां वाटत तुला ? आतां हे तुझे दिवसच आहेत. उपवर झाल्यावर स्त्रियांनीं अविवाहित राहणं चांगलं नाही. तें लोकांत बरं दिसत नाहीं. तुझी अविवाहित राहण्याची कल्पना मला बाई कशीशीच दिसते. रूप, विद्या, गुण यांत काय कमी आहे म्हणून तूं अविवाहित राहणार? मी खरखुरं सांगते तुझ्यावर चांगल्या चांगल्या स्थळांच्या उड्यावर उड्या पडतील.

मैत्रेयी—तें सगळं खरं. पण माझ्या मनास येईल तेव्हांची ती गोष्ट.

कात्यायनी—मग अशीच कुवार कां राहणार शेवटपर्यंत ? संसार हाच स्त्रियांचा खरा आनंद. स्त्रीहृदयांच सुखनिधान, तें. स्त्रीजन्माचं सार्थकच म्हण. निदान मला तरी तसं वाटतं.

मैत्रेयी—कात्यायनी तुझं म्हणणं सगळं पटतंय मला. तें नाहीं म्हणत नाहीं मी. कुवारीण राहणं ही कांहीं सोपी गोष्ट नव्हे. आणि तें लोकांत बरंहि दिसत नाहीं हेंहि कबूल. म्हणूनच स्त्रिया लग्न करून मोकळ्या होतात. कुवारपणांत जन्म काढणाऱ्या फार विरळ्या. कात्यायनि, फारच विरळ्या. पण त्या असतात हें कांहीं खोटं नाहीं. मात्र संसार हेंच स्त्रियांचं जीवनध्येय हें तुझं म्हणणं मात्र मला तितकसं पटत नाहीं. गृहकृत्यासाठींच स्त्रियांचा जन्म असं पुरुष धरून चालतात पण तें मला मान्य नाहीं. गृहकृत्याशिवाय त्यांना दुसरी इतिकर्तव्यता नाहीं, असं कसं म्हणतां येईल. तुझं म्हणणं मला पटत नाहीं.

कात्यायनी—पण गडे खरं सांग. आम्हां स्त्रियांना गृहकृत्याशिवाय दुसरं काय आहे ? आम्हांला दुसरं काय करतां येण्या-

सारखं आहे ? आमचा आनंद काय तो सगळा एका संसारांत. मुलबाळं झालीं म्हणजे तोच आमचा स्वर्ग आहे.

मैत्रेयी–असं कां म्हणत आहेस? परमार्थविचार नाहींत कां? त्या आनंदासारखा दुसरा आनंदच नाहीं.

कात्यायनी–पण संसारांतही परमार्थ आहे. नित्याचे होमहवन, पूजापुरस्कार आणि यज्ञयाग, अतिथिसत्कार यांत आम्हां स्त्रियांचें पुरुषाप्रमाणेंच अंग असतेंच कीं नाहीं ? प्रपंचाबरोबरच परमार्थहि आम्ही साधू शकतो. पतीशी प्रपंच–परमार्थांत सहकार्य करण्यांतच सतीचें कल्याण आहे असं मला वाटतं. तुझं काय म्हणणं आहे ?

मैत्रेयी–तुझं म्हणणं एका दृष्टीनं खरं. पण त्याशिवाय स्त्रियांना दुसरं कर्तव्य नाहींच असा त्याचा अर्थ होत नाहीं. आत्मज्ञान करून घेणं, स्वस्वरूप ओळखणं हें सुद्धां पुरुषांप्रमाणेंच स्त्रियांचें देखील कर्तव्यच आहे, असं माझं मत आहे. मनुष्य जन्मल्यावर स्वरुपज्ञान–आत्मज्ञान ही गोष्ट स्त्रीपुरुष या दोघांनाहि सारखीच महत्वाची बाब आहे. असं नाहीं कां वाटत तुला ?

कात्यायनी–त्याला कोण नाहीं म्हणेल ? पण तें किती स्त्रियांना शक्य आहे ? तें म्हणजे ज्ञानी लोकाचं काम. आमच्यासारख्या सामान्य प्रापंचिकांना तें साध्य नाहीं. आतांपर्यन्त आमच्यांत अशा किती विदुषी झाल्या आहेत ? तुझ्या मावशीची गोष्ट सोड. ती अपवाद म्हणून धरूं. गार्गीसारखी विदुषी म्हणजे एकटी गार्गीच ! तशा स्त्रिया हाताच्या बोटावर मोजण्या-इतक्या तरी निघतील कीं नाहीं याची वानवाच आहे. हें काम खरं म्हणशील तर पुरुषांचें असून त्यांनाच तें साध्य आहे. बाय-कांचा तो उद्योग नव्हे.

मैत्रेयी–तुम्हा बायकांना–गृहिणींना, तो एक भ्रम झालेला आहे. त्यांना आत्मस्वरूपाची विस्मृति झालेली आहे. ती मग कोणी केव्हां, कशी केली हें भगवंतच जाणे. पण तसा ग्रह तुमचा झाला आहे हें मात्र खरें. तुझे हे विचार ऐकून मला एका गोष्टीची आठवण झाली. माझ्या मावशीनं ती मला सांगितली आहे. मोठी गमतीदार नि बोधप्रद गोष्ट आहे ती.

कात्यायनी–मग मला सांग ना. मला ऐकूं तरी दे. गोष्टी ऐकण्याची मला हौसच आहे. आणि तशांत तुझ्या मावशीची गोष्ट ती. त्यांत कांहीं तरी नवल विशेष असणारच.

मैत्रेयी–ऐक सांगते. ती तुम्हा सारख्यांना फार महत्वाची आहे; मनोरंजन म्हणून नव्हें तर त्यांतील तत्व मननीय म्हणून

कात्यायनी–मग सांग तर गडे, ऐकूं दे मला ती.

मैत्रेयी–एका अरण्यांत एक गरोदर सिंहीण राहात होती. एके दिवशी तिला फार भूक लागली. म्हणून आहार शोधार्थ म्हणून ती गुहेतुन बाहेर पडली आणि सावज पकडण्यासाठीं इकडं तिकडं फिरू लागली. बराच वेळ फिरली, पण सावज कांहीं तिला सांपडेना. तिचा जीव भुकेनं फार व्याकुळ झाला तशा स्थितीतच इकडे तिकडे भक्ष शोधीत असतां सुदैवानें तिला एक दुरून मेंढरांचा कळप दिसल्यानें केवढा आनंद तिला झाला. हळूंच लपत छपत ती त्या कळपाजवळ आली. आपल्या टप्यांत सावज आलें असें जेव्हां तिला वाटलें, तेव्हां त्यांतील एका मेंढरावर नेम साधून तिनें त्यांवर मोठ्या आवेशानें झडप घातली. पण दुर्दैव हे कीं, तिची झडप चुकली आणि त्यामुळें जोरानें जमीनीवर तिनें आपटी खाल्ली. त्यासरशी तिच्या गर्भाला धक्का लागून, पोटातील पिलूं बाहेर

आले व ती सिंहीण जेथल्या तेथें पडली व गतप्राण झाली. लवकरच त्या कळपाचा मेंढपाळ तेथें आला. त्यानें तें छोटेसे गोजिरवाणें तिचं पोर पाहिलं. त्याला त्याची दया आली. म्हणून त्यानें तें उचलून घरीं आणून त्याचा सांभाळ केला.त्या मेंढरांच्या कळपांतच तें सिंहाचें पोर वाढूं लागलें. त्याला तेथील कोंकरांची संगत लागून, त्याच्या बरोबरच ते खाऊं,–पिऊं, नाचूं–बागडूं आणि हिंडूं–फिरूं लागलं. त्याकळपाबरोबरच तें रानांत येऊं जाऊं लागलं. असं होतां होतां कांहीं दिवस निघून गेले.

पुढं त्या कोंकरांच्या संगतीनं त्याची अशी समजूत झाली कीं, आपण कोंकरूच आहोंत. आपण सिंह आहो हें त्यास कळलेंच नाहीं. संगतीचा परिणाम म्हणतात तो हा असा. कोठें कांहीं श्वापद पाहतांच बकऱ्यांप्रमाणें व बरोबरच तेहि भिऊन पळ काढी.

कात्यायनी -सिंहाचा छावा ना तो ?

मैत्रेयी–पण उपयोग काय ? त्याला ती स्मृति कुठं होती ? आपण कोंकरू आहों असा भ्रम त्याला झाला होता.

कात्यायनी–शेवटपर्यंत तो भ्रम तसाच टिकला काय ?

मैत्रेयी–नाहीं. कांहीं काळ लोटला. तें पोर जरा मोठ झालं पुढें एके दिवशीं योगायोगानें तो मेंढरांचा कळप पाणी पिण्यास म्हणून एका ओढ्यावर गेला, त्यांत तो सिंहाचा छावाहि होता. त्याच वेळेस कांहीं अंतरावर एक सिंह पाणी पिण्यास म्हणून ओढ्यावर आला होता. त्यानें तो बकऱ्यांचा कळप पाहिला. त्यांत सिंहाचा तो छावाहि त्यास दिसला. तें पाहून त्यास मोठें आश्चर्य वाटलें. हा काय प्रकार आहे हें पहावें म्हणून तो जरा पुढें पुढें येऊं लागला. पण त्या कळपाला त्या सिंहाचा लांबून वास आल्यानें मुळें तो सैरावैरा धांवत सुटला. त्या कळपाबरोबरच तें सिंहापोरहि त्या सिंहाला घाबरून धूम ठोकीत सुटलें.

कात्यायनी–सिंहानें त्यास अडविले नाहीं काय ?

मैत्रेयी–नाहीं. ते त्याच्या हातीं लागलेंच नाहीं. त्या कळपा-बरोबर तेहि धूम ठोकीत पळालें. मात्र त्या सिंहाला हें खपलें नाही. सिंहाचा छावा अन् तो बकऱ्यांच्या कळपांत जाऊन राहतो म्हणजे काय ? हें त्यास चमत्कारिकच वाटलें. पण करणार काय ? त्याचा तेथें कांही इलाज नव्हता. वीरवृत्ति टाकून मेषवृत्ति धारण करणाऱ्या त्या स्वकीय पोराला पाहून त्याला फार वाईट वाटलें. तो निरूपायानें तेथून निघून गेला.

कात्यायनी–मग पुढं काय झालं ?

मैत्रेयी–तो तेथून निघून गेला खरा. पण त्याच्या जिवाला चैन पडेना. म्हणून पुन: संधि साधून तो त्या पूर्वीच्या स्थळीं आला. त्यावेळी तें सिंहाचें पोर खेळत खेळत कळपापासून दूर आलें होतें. तें तेथें आतां एकटेंच होतें. कळप दूर राहिला होता. त्या सिंहानें ती वेळ साधली आणि चटकन् धांवत येऊन तो त्याच्यापुढे अचानक उभा राहिला. त्यापोरानें त्याला पाहिलें मात्र त्याचे अवसानच गेलें नि घाबरून मटकन् तें खालीं बसलें. आणि बकऱ्यांच्या दीन स्वरांत त्या वनराजास म्हणालें, मृगराज ! आपण फार थोर महानुभाव आहा. मजसारख्या क्षुद्र प्राण्याला मारून आपला लाभ तरी काय ? मी गरीब कोंकरूं आहे. कृपा करा नि मला जिवानिशीं जाऊं द्या. हें त्या छाव्याचें दैन्यवाणें भाषण ऐकून सिंहाला फार वाईट वाटलें.

कात्यायनी–पुढं काय झालं, गडे ?

मैत्रेयी–तो सिंह त्या छाव्याला म्हणाला, अरे असा भिऊं-नकोस. मी तुला इजा करणार नाहीं. पण तू जातीने कोण आहेस, हें तूं ओळखलेस काय ? तें पोर म्हणालें, होय महाराज मी जातीनें

कोंकरू आहे. आमचीं जात मेंढयाची आणि मी त्यांतले एक कोंकरूं.

कात्यायनी–काय बाई चमत्कार तरी हा.

मैत्रेयी–त्या कोंकरांची स्थिति लक्षांत घे. तें वस्तुतः कोंकरू नव्हतें. सिंहाचें पोर होतें. पण त्याला आत्मस्वरूपाची विस्मृति झाली होती. अर्थात् कोणत्याहि जीवाला आत्मस्वरूपाची विस्मृति झाली म्हणजे तो नादान व हीनदीन होतो, त्याच्या उद्धाराचा प्रश्न कसा बिकट होतो ही गोष्ट आत्मस्मृतिभ्रष्ट झालेल्या या सिंहाच्या पोराच्या उदाहरणावरून लक्षांत घेण्यासारखी आहे. आतां पहा. पुढं काय चमत्कार झाला तो प्रसंग नीट लक्ष देऊन ऐक.

कात्यायनी–माझं लक्ष आहेच तिकडं. सांग तूं आपली.

मैत्रेयी–तें सिंहाचं पोर त्या सिंहाला पाहून चळचळ कांपू लागलें. त्यानें जमीन धरली व दीनस्वर काढून ओरडण्यास सुरवात केली. हें पाहून त्या मृगराजास त्या छाव्याची मोठी कींव आली, तो सिंह त्याला म्हणाला ‘ बेटा ! घाबरूं नकोस. मी तुला खाणार नाहीं ! पण तूं माझं ऐकशील कां ? या प्रश्नाला त्या पोरानें मान हलवून होकार दर्शविला. तेव्हा तो सिंह त्यास म्हणाला–गड्या खरंखरं सांग. तूं पाणी पीत असतां तुझं प्रतिबिंब पाण्यांत पडलं होत ना ? तें तूं पाहिलस कां ? तें प्रतिबिंब कोकरासारखे होत कां ? कां आणखी कशासारख होत ? तें सिंहाचें पोर म्हणालें–महाराज ! माझं प्रतिबिंब बकऱ्यासारखं नव्हतं. तें कांही निराळंच होतं. ‘ तर मग ’ तो सिंह पुनः त्याला म्हणाला, “ तुझं प्रतिबिंब जर कोकरासारखं नव्हतं तर तूं बकरा कसा ? ” त्याला त्या सिंहाच्या पोरानें उत्तर दिलें कीं, दोन व्यक्तींच्या स्वरूपांत फरक हा असायचाच. तेव्हां सिंह म्हणाला “ वेड्या ! तूं खुळा आहेस. खरोखर तूं कोण आहेस. याची

स्मृति तुला नाहीं आणि म्हणून तूं असं बोलत आहेस. माझ्या-बरोबर ये म्हणजे तूं कोण आहेस हें तुझं तुलाच कळून येईल. असें म्हणून तो त्या छाव्यास बरोबर घेऊन पुनः त्या ओढ्यावर आला.

कात्यायनी–तिथं कशासाठीं ?

मैत्रेयी–आतां इथंच तर गम्मत आहे. तो सिंह मोठा हुशार होता. पुढं त्यानं काय खुबी केली हें ऐकण्यासारखं आहे.

कात्यायनी–खुबी कसली ! त्यानं त्याला ओढ्यांत लोटून दिलं असेल. हेच ना ?

मैत्रेयी–छे ग तसं कांहीं नाहीं.

कात्यायनी–मग काय तर ?

मैत्रेयी–तिथं आल्यावर त्या सिंहानें त्या छाव्यास कांठावरून पुनः पाण्यांत पहावयास सांगितलं आणि आपण त्याच्या शेजारी जाऊन उभा राहिला. याचा परिणाम असा झाला कीं, त्या दोघांचें प्रतिबिंब त्या पाण्यांत शेजारी शेजारीं उमटलें. तेव्हां तो त्यास म्हणाला–बेटा, तुझ्या शेजारीं माझें प्रतिबिंब आहे ते पहा. आणि कोणासारखं आहे मला सांग. त्या सिंहाच्या पोरानं पाण्यां-तली ती दोन्ही प्रतिबिंबें पाहून आनंदानें ओरडून म्हटलें कीं, तें माझ्या सारखंच आहे. दोन्ही एकच आहेत. ‘ तर मग ’ तो सिंह म्हणाला, ‘आतां सांग तूं कोकरूं कीं सिंह आहेस ? तें सिंहाचं प्रति-बिंब पाहतांच त्या छाव्याचा सगळा भ्रम एकदम विरून जाऊन तेथें आत्मस्मृतीचा दिव्य प्रकाश उजळला मग आतां काय ? त्या छाव्यानें एकदम सिंहाप्रमाणें गर्जत म्हटलं कीं, मी सिंह आहे. कोंकरूं नव्हे. त्याच्यांत आतां आत्मस्मृति जागृत झाली व त्याची सगळी भीति व भ्रम नष्ट होऊन तो सिंहाप्रमाणेंच निर्भय झाला. या कथेचा तात्पर्यार्थ सांगावयाचा म्हणजे असा कीं, जोपर्यंत

या सिंहाच्या छाव्याला आत्मस्मृति नव्हती—स्वरूपज्ञान नव्हतें—तोपर्यंत स्वत:ला तो कोंकरूच समजत होता. पण आत्मस्मृति जागृत होतांच त्या सिंहाप्रमाणंच निर्भय बनून तो गर्जना करूं लागला. भ्रमाचा केवढा परिणाम हा. त्या सिंहाच्या छाव्याप्रमाणेंच तुझीहि आत्मविस्मृति झाली आहे. आणि म्हणून तूं स्वत.ला दुर्बल समजतेस. अग हें जें आत्मतत्त्व ते पुरुषांत काय नि स्त्रियांत काय दोघांतहि सारखंच आहे आणि तें पुरुष जर ओळखूं शकतात, तर स्त्रियांना तें कां ओळखतां येऊं नये ? हा तुमचा भ्रम व निव्वळ अज्ञान आहे.

कात्यायनी—काय ? अज्ञान ?

मैत्रेयी—होय. अज्ञान. स्त्री प्रयत्न करील तर तिलाहि आत्मज्ञान-खात्रीनं होईलच होईल. येथें स्त्रीपुरुष हा प्रश्नच नाहीं. ' त्वं स्त्री त्वं पुमान् ' असं जिवाला उद्देशून श्रुतीत म्हटलं आहे, तें स्त्रियांनी का म्हणून विसरावं ? मला या आत्मज्ञानाची उत्कंठा आहे. संसारसुखापेक्षां मला यांत आनंद अधिक दिसतो. म्हणून म्हणते की, मला मनाजोगतें स्थळ मिळेल तर सुवासिनी होईन. नाहीतर अशीच कुमारी राहून माझ्या मावशीप्रमाणंच आत्मज्ञानात आयुष्य वेचीन पण कात्यायनी. तूं मात्र धन्य आहेस हो. मनांत आणशील तर तुझ्या पतिदेवाकडून त्या दिव्य ज्ञानाचा तुला सहज लाभ घडूं शकेल आणि तूं कृतकृत्य होशील. तुझ्यासारखा पतिदेव मिळायला जन्मजन्मांतरीचं पुण्य लागतं. पण तसं भाग्य इतरांचं कुठं आहे. म्हणून म्हणते, गडे कात्यायनी. तुझ्यासारखी भाग्यवान तुझी तूंच. खरी नशीबवान तूं आहेस.

इतक्यांत कात्यायनीला घरांकडून निरोप आल्यामुळें तें त्यांचें संभाषण तेवढ्यावरच संपलें.

कात्यायनीचें अपूर्व दिव्य

मागील संभाषण प्रसंगानंतर एके दिवशीं कात्यायनी घरांतील आवराआवर करून व बाळ चंद्रकांतास निजवून आश्रमाबाहेर अंगणात योगीश्वर बसले होते तेथें जवळ येऊन बसली.

कात्यायनी – काय सुंदर देखावा आहे !

याज्ञवल्क्य – चांदणें किति पिठूळ पडलें आहे. जिकडे तिकडे प्रसन्न वातावरण असून बाजूच्या वेली कशा आनंदात डुलत आहेत. उद्यानांत जिकडं तिकडं चैतन्य उधळत आहे.

याज्ञवल्क्य – तशीच ती पलिकडची जाई जणू नाचत आहे. किती रम्य नि गोड हा रात्रीचा देखावा आहे. तें रम्य आकाश मंडळ ! कात्यायनी, तुला मौज नाहीं का वाटत? वर आकाशांतील शोभा तरी पहा.

कात्यायनी – चांदण्या रात्रींची मौज फारच मनोहर आहे नुसतं डोळ्यांनं पहात रहावं, वारा तरी किती गोड आहे.

याज्ञवल्क्य बराच वेळ त्या निरभ्र आकाशाकडे व चंद्राकडे पहाण्यात दंग होऊन गेले. कात्यायनी हळूच ती स्तब्धता मोडून म्हणाली :–एक गोष्ट विचारीन म्हणते, विचारूं कां ?

याज्ञवल्क्य – त्याला ज्योतिषी कां हवा ?

कात्यायनी (स्मितहास्य करून) थट्टा नाहीना करायची ?

याज्ञवल्क्य – हं विचार. संकोच कसला ?

कात्यायनी – मागाहून अस्सं नि तस्सं म्हणणं होईल. म्हणून आधीच विचारलेलं बरं. ऐकून घ्यायचं आणि मग थट्टेवारी न्यायचं असं होऊं नये.

याज्ञवल्क्य – आजचा रंग कांही निराळाच दिसतोय.

कात्यायनी – आधींच सांगते हा विषय नाजूक आहे. थट्टेवारी न्यायचा नाहीं. पुरुषांचं हें नेहमी अस्सं असतं. प्रथम विचार म्हणायचं अन् मग सरबत्ती झोडायची.

याज्ञवल्क्य – तुझी ही प्रस्तावना लांबतच चालली आहे. आमच्यावर कांही गदा आणण्याचा विचार तर नाहीं ना ?

कात्यायनी – शीः भलतंच.

याज्ञवल्क्य – (हंसून) काय विचारतां बायकांचा कावा ? तुमच्यासारख्या धूर्त तुम्हींच. प्रथम हळूच गोड बोलायचं, तोंडावर साखर पेरायची अन् मग डोक्यावर चढायचं. स्त्रीकौशल्य तें हेंच. पुरुषांना कसं बनवाव यांत त्यांचा हातखंडा असतो.

कात्यायनी –अस्सं काय हे अगदीच. थट्टा नको बाई ! (हंसत) विचारूं ? नाही ना चिडवणार.

याज्ञवल्क्य – किती वेळा सांगूं ? विचार, विचार, विचार. काय तुला विचारायचं तें खुशाल विचार,

कात्यायनी – ती !

याज्ञवल्क्य – ती ? ती कोण ?

कात्यायनी – आपले मित्र प्रधानजी आहेत ना ? त्यांच्या घरची गोष्ट. आतां आलं लक्षांत ?

याज्ञवल्क्य – नाहीं.

कात्यायनी – विचित्रच आहे हे तुमचं बोलणं ! अहो ती प्रधानजींची मुलगी.

याज्ञवल्क्य – मैत्रेयी ? तुझी मैत्रीण तीच ना.

कात्यायनी –तीच.

याज्ञवल्क्य – बरं. पुढं काय ?

कात्यायनी – तेंच मी विचारणार आहे, आपल्या इथं येण्याची तिची इच्छा आहे. समजलं का ?

याज्ञवल्क्य – नाही.

कात्यायनी – (हंसून) हेंच तें मुद्दाम वेड पांघरायचं.

याज्ञवल्क्य – खरंच, कात्यायनी. मला नाहीं समजलं तूं काय म्हणतेस तें. अग ती नेहमीच इथं येते. मग आतांच माझी परवानगी कशाला पाहिजे ?

कात्यायनी – स्पष्टच सांगू ? तिच्या मनांत आमच्या इथं कायमचं रहावयास येण्याचं आहे. आतातरी समजलं कां ?

याज्ञवल्क्य – खरं सांगतो. तुझा अर्थच मला कळेना. आड पडदा न ठेवतां सरळच सांग ना काय तें.

कात्यायनी – तिला माझ्याप्रमाणेंच पदरांत घेऊन धन्य करायची. आणि कायमची घरीं आणायची.

याज्ञवल्क्य – म्हणजे काय म्हणतेस हें तूं ? तिला पदरांत घेऊन इथं कायमची आणायची. तूं काय बोलतेस हें तुझं तुलाच समजलं आहे कां ?

कात्यायनी – हो नीट समजूनच बोलते आहें. मी आतां अगदी ते स्पष्टच बोलते. तिला माझी सवत करायची.

याज्ञवल्क्य – काय ? सवत ? तुला स-व-त ?

कात्यायनी – हं हं. मला सवत.

याज्ञवल्क्यय – अन् मग मी कुठं राहू ? हिमालयांत कां नैमिषारण्यांत !

कात्यायनी – (जरा रागावल्यासारखें करून) मी नाहीं जा बाई. थट्टाच करायची असेल तर मी ही निघाले आपली इथून.

ती चटकन् उभी राहिली. पण याज्ञवल्क्यांनीं तिचा हात धरून तिला जवळ बसवून घेतली. आणि प्रेमानें ते तिला म्हणाले, तूं वेडीतर नाहींस, तूं अशी भोळी कशी ?

कात्यायनी – तें कांहीं नाहीं. माझं ऐकायचं. आपण तिला पदरांत घेतलीच पाहिजे.

याज्ञवल्क्य – तूं नीट शुद्धीवरून बोलत आहेस कां ? सवत म्हणजे काय समजलीस, तो कांहीं दागिना कां आहे ?

कात्यायनी – येवढी कां खुळी आहे मी हें न समजण्याइतकी.. कांहीं असो, ही माझी विनंती मान्य केलीच पाहिजे.

याज्ञवल्क्य – समज मी तुझ्या म्हणण्याप्रमाणं केलं आणि पुढं ती तुझ्या संसारावर . . . .

कात्यायनी – काय करील ?

याज्ञवल्क्य – काय करील ? निखारा ठेवील निखारा.

कात्यायनी – इश्श इतकी कां दुष्ट आहे ती ? छे नाथ. तशी नाही ती. फार सालस आहे.

याज्ञवल्क्य – तू भोळी आहेस. हा तुझा आग्रह म्हणजे विस्तवाशी खेळणं आहे. कात्यायनी, तूं पूर्ण विचार केलेला दिसत नाही.

कात्यायनी – (मान हलवून) हो पूर्ण विचार केलेला आहे. म्हणूनच ही गोष्ट विचारली आहे इकडं. मग करायची ना माझी येवढी इच्छा पूर्ण ?

याज्ञवल्क्य – मला तुझी खरोखर कींव येते. तिला घरीं आणून आपल्या संसाराची माती करू म्हणतेस, होय ? तुझ्या विनंतीचा सरळ तोच अर्थ होतो. तुला दुःखांत लोटण्यास माझं मन घेत नाहीं.

कात्यायनी –कां बरं नाथ असं म्हणतां अन् लक्ष्मीला सवत नाही कीं काय ? मी इथं घरांत लक्ष्मी एकटीच आहे. त्यामुळं

घराला शोभा नाहीं. म्हणून म्हणते कीं, ह्या लक्ष्मीच्या जोडीला श्रीहि पाहिजेच म्हणजे इथं वैकुंठ रंगेल. असें म्हणून तिनें आपला हात पुढें केला.

याज्ञवल्क्य – हा आग्रह सोड. हा विषाचा प्याला हातांत घेऊ नकोस. आज हें तुला गोड वाटेल पण पुढें तुला पश्चात्तापाची पाळी येईल. ही भुरळ तुला कुणी घातली देव जाणें. अग, वाटेल तें माग–सांग, तुला काय सोन्याचा पर्वत हवा कां, रत्नाची खाण हवी, कां अमृताचा समुद्र हवा ? सांग तुला काय पाहिजे. हा याज्ञवल्क्य तें हातांत घेऊन उभा आहे.

कात्यायनी–(निर्धारानें)–नाहीं, नाहीं–मला तें कांहीं एक नको. ही ऐवढी माझी इच्छा पूर्ण झाली म्हणजे मला सर्व कांही मिळालं. एवढी भिक्षा माझे देव मला घालणार नाहींत काय ? (काकुळतीस येऊन) आतां नका गडे आणखी अंत पाहूं. कात्याय-नीचा जीव कासावीस होत आहे.

याज्ञवल्क्य–(डोके खाजवीत) आतां मात्र पंचाईत आली बुआ. कात्यायनी, या तुझ्या हट्टानं मला तूं पेचांत घालीत आहेस. तुझ्या या आग्रहान मी बुचकळ्यांत पडल्यासारखा झालो आहे. कात्यायनी पुन. एकदा विचार कर.

कात्यायनी–येऊन जाऊन आम्ही घरांत भांडत बसूं, हीच ना आपली भीति ? पण ही कात्यायनी एवढी खुळी नाही. महाराज, मला तुमचा वेदांत समजत नसला तरी मी अगदीच कांहीं सामान्य स्त्री नाहीं. तेवढं मला समजतं. आणि मैत्रेयीसद्धां शाहाणी सालस, सात्विक, नम्र, प्रेमळ, नि शांत आहे. आपल्या सुखांत, ती मुळीच माती कालविणार नाहीं. घालील तर उलट भरच

घालील. शिवाय ती माझी जिवाभावाची मैत्रीण आहे. तिला सुखांत पाहणं माझं कर्तव्य आहे. तिचा निश्चय आपणांस माहीत आहे काय ?

याज्ञवल्क्य–मला कसा कळणार तो ?

कात्यायनी– केलाच तर आपल्याशीच ती विवाह करणार आहे.

याज्ञवल्क्य–नाहीं तर.

कात्यायनी–तशीच कुमारी राहील. तसा तिचा निर्धारच झालेला आहे. तिला सौभाग्यवती करणं हें माझं कर्तव्य मी समजते. आणि म्हणूनच मी एवढी जीव तोडून आपली मनधरणी करीत आहे. आपल्यामुळं ही गोष्ट काढायला तिचे वडिल आणि इतर कोणीहि धजत नाहीत. म्हणून मला ही शिष्टाई पत्करावी लागली. आतां आलं कां सर्व लक्षांत ?

याज्ञवल्क्य–समज, मी तुझ्या मनाप्रमाणं केलं. ती तुझी सवत झाली आणि मग तुझ्याशीं भांडू लागली नि तुझा हेवादावा करूं लागली तर मग ?

कात्यायनी–जोपर्यंत आपण माझ्यावर अन्याय करणार नाहीत तोपर्यंत मी कोणालाहि भीक घालणार नाहीं.

याज्ञवल्क्य (हंसून) अन् मीहि फिरलों तर ?

कात्यायनी–मग दैवच फिरलं म्हणून स्वस्थ बसेन. अशी भलती सलती शका काढून मला भेडसू नका. सूर्य कधीकाळीं पश्चिमेकडे उगवेल, पण आपण मला कधीहि अंतरणार नाही. म्हणूनच मी येवढं धाडस करण्यास तयार झाले आहे.

याज्ञवल्क्य –तुला कधींहि अंतरणार नाहीं. तूं माझी गृहलक्ष्मी असून शेवटपर्यंत गृहलक्ष्मीच राहशील. तूं सामान्य स्त्री नाहीस. असलं धाडस मागं कुणी केलं नाहीं व पुढं कुणी करणार नाहीं. तुझा स्वार्थत्याग दांडगा आहे. मन अत्यंत थोर आहे. पण–हा

विषाचा प्याला माझ्या हातानं माझ्या गृहदेवतेला देण्याला माझं मन धजत नाही मी काय बरं करूं ?"

कात्यायनी– तो विषाचा प्याला असला तरी तो जर आपल्या हातातून मिळाला तर त्या विषाच गोड अमृत होईल. राजवाडयांत शुष्कखांबाचा क्षणार्धांत पुष्पपल्लवांनीं सुशोभित असा सुंदर वृक्ष बनविणाऱ्याचे हात काय मला विष देतील ? आणि तें जरी प्रत्यक्ष काळकूट असल तरी आपली दिव्यदृष्टि त्यावर पडतांच ते स्वर्गातील मधुर अमृतच होईल.

त्यामुळें मला विषाची कसली भीति ! जगाला जाळणारं विष--भयकर कालकूट—भोलानाथ शंकरानं घेतलं आणि तें पचवून तो नीलकंठ झाला. तोच गौरीहर मीहि पुजला आहे. सामान्य स्त्रियांना भयभीत करणारं सवतीचं हें जहर विष ही कात्यायनी आपल्या हातानं व आपखुषीनं पिऊन, त्या गौरीहराच्या प्रसादान व आपल्या चरणसेवेच्या प्रभावानं अमृतच होईल. गंगायमुना जरी वेगवेगळया असल्या तरी समुद्राजवळ जाताना जशा त्या एकरूप होऊनच जातात, तद्वत् कात्यायनी--मैत्रेयी या दोघी दिसावयास भिन्न असल्या तरी गंगायमुनाप्रमाणें एकरूप होऊनच जातील. तेथें कात्यायनी व मैत्रेयी असा भेद राहणार नाही. कृपा करून मी मागत असलेली भिक्षा घालाच. असे म्हणून तिने त्यांच्यापुढें आपला पदर पसरला.

याज्ञवल्क्य आतां निरुत्तर झाले. तिचा स्वार्थ-त्याग, मैत्रेणीवरचे प्रेम व कुशल शिष्टाई पाहून ते मनांत आनंदले व तिचनिर्धार पाहून नरमले. अर्थात् प्रेमळ पत्नीच्या आग्रहाला वश होऊन व मैत्रेयीचा निर्धार लक्षांत घेऊन त्यांनी तिला विजय पत्र दिले. सती कात्यायनीचा विजय झाला. आणि पुढें मैत्रेयी तिची सवत झाली. सती कात्यायनीचें केवढें हें अपूर्व दिव्यदान! या स्वार्थत्यागाचें कौतुक करावें तितके थोडेच होणार आहे.

दीर्घायु रहस्य

यो हैवं विद्वान् सायंप्रातराशी भवति सर्व हैवायुरेति

(श. प. २-४-२ ते ६)

याज्ञवल्क्यांच्या आश्रमांत एका चर्चेच्या प्रसंगीं मनुष्यानें कसें राहिले असतां तो पूर्णायुषी होईल हा प्रश्न निघाला त्यावेळीं त्यांनीं पुढील उद्बोधक गोष्ट सांगितली.

'जगांतील सर्व प्राणी एकदां प्रजापतीजवळ जमून त्याला म्हणाले, 'देवा आम्ही कशा तऱ्हेनें रहावें याचें एकदां कथन करा.'

त्यांपैकीं जे देव होते, ते यज्ञोपवीती होऊन आणि उजवा गुडघा वांकवून त्यांच्या जवळ गेलें तेव्हां त्यांना उद्देशून प्रजापति म्हणाले, "यज्ञ हेंच तुमचें अन्न आहे. अमृत हें पान असून सूर्य हा तुमचा प्रकाश आहे."

नंतर पितर हे प्राचीनावीती होऊन व डावा गुडघा वांकवून त्याच्या जवळ गेले तेव्हां तो त्यांना म्हणाला, "तुम्ही फक्त महिन्यांतून एकदाच जेवावयाचें. तुमचें अन्न म्हणजे स्वधा हे होय आणि चंद्र हा तुमचा प्रकाश आहे."

मनुष्य अंगावर वस्त्र घेऊन व शरीर नमवून त्याच्या जवळ गले तेव्हां ते त्यांना म्हणाले, 'मनुष्य हो! तुमचें खाणें सकाळीं एकदां व संध्याकाळीं एकदां असें दिवसांतून दोनच वेळां असावें. तुमची प्रजा म्हणजेच तुमचा मृत्यु आणि अग्नि तुमचा प्रकाश आहे.

पशु त्याच्यापुढे आले. त्यांना पाहून ते म्हणाले, "तुम्हांस तुमच्या मनास येईल, तेव्हां खाण्याची परवानगी आहे. जेव्हां जेव्हां तुम्हांला खावेसें वाटेल व खाण्याचा पदार्थ डोळ्यास दिसेल,

तेव्हां तेव्हां तुम्ही यथेच्छ खात जा. तुमच्या खाण्यापिण्यास धरबंद नाही."

म्हणून पशू जेव्हां त्यांना खावयाचा पदार्थ दिसेल व मिळेल तेव्हां तेव्हां ते खात असतात. असूराला प्रजापति म्हणाले," असुरहो तुम्हांस माया व अंधकार मी दिला आहे. म्हणूनच असुर मायामय आहेत असें म्हणतात. सध्यां हे असुर कोठें दिसत नाहींत हें खरें असलें तरी त्यांच्या करतां म्हणून जो नियम घालून देण्यांत आलेला आहे, त्या नियमाने वागणारे असे लोक मनुष्यांत आढळतातच.

देव,पितर व पशु हे प्रजापतींचे हे नियम कसोशीनें पाळतात. त्यांचे तें कदापिहि उल्लघन करीत नाहींत. मनुष्यांची गोष्ट मात्र अशातली राहिली नाही त्यांनीं या नियमांना धाब्यावर बसविले असून पशूप्रमाणेंच रात्रंदिवस रवंथच करणारे असे बकासुर त्यांत आहेत, त्यामुळें शरीरात मेदवृद्धि होऊन गेंड्याप्रमाणे लठ्ठ व बोजड बनलेलें जणु हें नरपशुच होत. हें प्रजापतीनें घालून दिलेल्या आहार नियमांचे उल्लंघन करीत असत्यामुळे त्यांचें शरीर अवजड होऊन, चालतांना लंगडत लंगडत चालतात. आणि लवकरच थकून भागून धापा टाकीत असतात. नियमाचे उल्लंघन केल्याचा हा परिणाम आहे.

म्हणूनच मनुष्यानें सकाळीं व संध्याकाळीं या प्रमाणे फक्त दोनच वेळां खावें आणि जो कोणी मनुष्य या प्रमाणें चालतो तो पूर्णायुषी होतो. त्याचें आयुरारोग्य दीर्घकाल टिकते व तो जन्माचा सुखी होतो. आणि हें नियम पाळणारा ब्रह्मतेजानें चमकूं लागतो व त्याचें वाणींत सत्य राहते.

पिंपळाच्या झाडाखालीं

घोर व घनदाट अरण्यांत वड, साग, पिंपळ, आंबे, चिंच इत्यादि उंच व विशाल वृक्षांची गर्दी उडालेली होती. मधुन मधून बांबूची निबिड बेटें, करवंद व इतर वन्य वेली यांच्या अनेक जाळ्यांनीं अरण्य भरले होते. तसेंच इतर विविध झाड झुडपांनी तें अरण्य अगदी गच्च भरून गेलें होतें.

अशा निबिडतर कांतार जठरांत अगदीं पहाटेच्या प्रशांत वेळीं एक स्त्री वस्त्रात काहीसे गुंडाळून ते छातीवर घट्ट धरून हलके हलके एक एक पाऊल टाकीत टाकीत फार जपून चाललेली होती. येता येता ती आता एका पिंपळाच्या झाडाजवळ आली आणि काय वाटलें कोणास ठाऊक तेथेच एकदम थबकली. इकडे तिकडे वळून पाहिलें. वरखालीं दृष्टि फिरविली. मागें पुढें न्याहाळून बघितले. चोहोकडे नीट तपास केला. जवळपास कोणी नाही असें पाहून तिला हायसे वाटलें.

ती जागा तिला त्यांतल्या त्यांत अधिक सुरक्षित व निवाऱ्याची दिसली. म्हणून ती तेथेंच खाली बसली आणि वस्त्रांतून गुंडाळून आणलेली ती वस्तु त्या झाडाच्या बुंध्याजवळ हलक्या हातानें हळूच ठेवून इकडे तिकडे एकवार पाहिलें. पुन: काय वाटलें कोण जाणें, तिनं ती वस्तु हळूच उचलून घेऊन उराशीं घट्ट आवळून धरली नि पुन: खालीं ठेविली. क्षणार्धांत पुन: उचलून घेतली. असें दोन तीन वेळां केलें शेवटीं मनांत कसला तरी निश्चय करून ती वस्तु पुन: खाली ठेविली आणि आपण उठून उभी राहिली.

त्या वस्त्रांत कांहीं वस्तु नसून एक बाळ होतें. तें जन्मलेलें कोवळें बाळ सुदर नि गोडस होते. खाली निजविल्या बरोबर चिमुकल्या मुठी वळवीत व गुलाबी पाय नाचवीत रडूं लागलें. जणुं, "आई मला एकट्याला टाकून तू चाललीस! थांब बरं मी काय अपराध केला आहे कीं, माझ्या. वर तूं रागावलीस? असें म्हणण्याचा त्याचा एकंदरीत भाव होता-

माय माउलीचें मायाळु अंतःकरण ते ? तो भाव ताडला त्या कोमल मातृहृदयाला कडकडून पीळ बसला. डोळ्यांतून अश्रु धारा वाहूं लागल्या. कंठ सद्गदित झाला. वात्सल्यानें अंग शहारलें. पुढें क्षणार्धांत भयानें हादरलें आणि दुःखानें व्याकुळ झालें, केवढा तो कठीण प्रसंग त्या माय–माऊलीवर होता !

त्या गोजिरवाण्या बाळाला पुनः तिनें उचलून पोटाशीं धरलें मायेच्या प्रेमळ हातानें कुरवाळिले आणि त्या सुकुमार बालकाचे मुके घेतले. पण अंतःकरणांत चाललेली ती केवढी प्रचंड खळबळ नि तळमळ ! आता तिच्या डोळ्यासभोंवती बह्माडाचें बह्मांड सगळे गरगर फिरू लागले. तिला वाटलें हा जणू प्रळयकाळच आपणावर कोसळला आहे.

काही वेळ तिचें मातृहृदय त्या अपत्यप्रेमांत घुटमळत राहिलें. पण तें फार वेळ टिकलें नाहीं. स्त्रीपावित्र्याचा तो नाजूक प्रश्न होता. तो टिकविण्यासाठीं तिला मन कठोर करणें भागच होते. तो मायेचा बुरखा तिनें आतां बाजूस सारला आणि तें गोंडस बालक–पोटचा कोमल गोळा–जिवाचा जीव–कंपित हातानें पुनः त्या झाडाच्या पोखरींत ठेवून त्या विशाल अश्वत्थ नारायणाकडे सजल नेत्राने पाहिलें व हात जोडून दीन स्वरांत त्याची करुणा भाकली की ' हे अश्वत्थ नारायणा, तू साक्षात विष्णुरूप आहेस. देवामध्ये श्रेष्ठ देव आहेस तर हें अनाथवत्सला करुणानिधे या माझ्या राजहसाचें आता तूच रक्षण कर. त्याची माता, पिता, बंधु आतां सर्व कांहीं तूच आहेस.

' अश्वत्थ विष्णुरूपोऽसि त्व देवेषु प्रतिष्ठितः। तस्माद्रक्षस्व मे पुत्रं सर्वतस्त्वं वनस्पते ।।' (स्कंद६-१७४-१८१) अशी प्रार्थना करून

पुनः एकवार त्या राजहंसाकडे अश्रुपूर्ण नजरेनें पाहून दुःखित व भग्न अंतःकरणानें ती तेथून मागें फिरली.

ती माउली आपले पंचप्राण त्या झाडाखालीं ठेवून तेथून परत फिरली. तिला तेथें फार वेळ राहणें शक्यच नव्हतें. तो सगळा अतर्क्य व्यवहार होता. न जाणो ! कुणी पाहिलें तर ! केवढा लोकापवाद ! केवढा कलंक ! केवढी बेअब्रु नि काय फजीती ! हा सर्व घोटाळा नि फजीति टाळण्यासाठीं तिला तेथून पाय काढणें भागच होतें. म्हणून सगळा मायामोह आवरून त्या भग्नहृदयी माउलीनें तेथून पाय काढला.

जाता जातां तिच्या मनांत विचारांचे नाना विविध भावनांचें एकच काहूर माजले. " देवा हें कसें झालें ? नि काय झालें ? मीं अगदी निष्पाप व गंगेसारखी शुद्ध व पवित्र असतांना हा चमत्कार कसा घडला ? मला पुरुषाचा स्पर्श-नव्हे सावलीहि-पडली नाहीं, मग हें कसें झालें ? आतां काय करूं व कुठं जाऊं ? तिला कांहीं सुचेना कीं समजेना. अशा विमनस्क स्थितींत ती पुढे पुढें पावलें टाकीत वाट चालू लागली.

इतक्यांत वर आकाशांत गडगडूं लागलें आणि त्यांतून स्वच्छ व स्पष्ट वाणी निघाली कीं," कंसारी! तूं शोक करूं नकोस! रडूं नकोस ! दुःख करूं नकोस ! तू निष्पाप आहेस. निष्कलंक आहेस. धुतलेल्या तांदळाप्रमाणें शुद्ध व निर्मल आहेस. निर्दोष आहेस. तुझा कांहीं अपराध नाहीं. पुरुषाचा तुला स्पर्श नाही हें अगदी खरें पण विधिलीला विचित्र आहे. ती समजण्यास अगम्य आहे. अजाणतां पुरुषाचें दूषित झालेलें पारोसें वस्त्र तूं ऋतुस्नात काळीं नेसलीस. त्याचा विचित्र परिणाम हा असा झाला ! उतथ्य ऋषी-

च्या शापानें प्रत्यक्ष देवगुरु बृहस्पतिच तुझ्या पवित्र उदरीं जन्मास आला आहे. तो मोठा ज्ञानी, महायोगी, थोर तपस्वी आणि मोठा सिद्धपुरुष होईल. तो पिंपळाच्या संरक्षणाखालीं वाढत असल्यामुळें त्याला पिप्पलाद या अन्वर्थक नांवानें प्रसिद्धि लाभेल. पुरुषाचा स्पर्श नसतांना हा तुला झाला याचा तुला विस्मय वाटला असेल, तुझें मन तुला खात असेल पण हें सत्य, त्रिवार सत्य आहे कीं, या बालकाला जन्म देण्यांत तुझा कांही दोष नाही. विधिलीला मोठी विचित्र आहे. ती समजण्याला अगम्य आहे. तिचा हा सारा खेळ आहे. पुनः सांगते कीं, तू निर्दोष, निष्कलंक व निष्पाप आहेस. तुला झालेले बालक पुढें महा तेजस्वी निघणार असून जगावर ज्ञानाचा प्रकाश पाडून लोकोद्धार करील. तूं आतां दुःख व शोक टाकून दे नि खुशाल घरी जा.

ही आकाशवाणी ऐकून ती धायधाय रडूं लागली. तिच्यावर हा जणू विद्युत्पातच झाला. ती विचारमूढ बनली. शून्य दृष्टीनें व भग्नहृदयानें वाट सांपडेल तिकडे, पाय नेतील तिकडे, पावलें टाकीत ती चालूं लागली. जाता जातां दुःखातिशयानें मूर्च्छित होऊन धपकन् जमिनीवर आपटली, आणि दुर्दैवाची गोष्टही कीं, तेथेच तिचा आत्मा तिला सोडून परलोकी निघून गेला. (स्कंद ४–१०६)

याज्ञवल्क्यांची बहीण कंसारी

याज्ञवल्क्याची कंसारी नांवाची ती बहीण होती. भर वयांतच तिचें मंगळसूत्र निष्ठुर काळानें हिरावून नेले होतें. अर्थात् ती आतां वैधव्यस्थितींत कालक्रमणा करीत होती. माहेरी भावाजवळ राहून तिची-जीवन यात्रा चालली होती. ती मोठी कर्मनिष्ठ व व्रतस्थ असे. काय नेम पाळावयाचे व व्रत–उपोषणें करावयाचीं तीं सर्व तेथें राहूनच ती पाळीत असे.

निसर्ग–नियमाप्रमाणें ती एकदां ऋतुमती झाली. चवथा दिवस होता तो. तिला स्नानासाठी एक निराळें आडवस्त्र पाहिजें होतें त्यासाठी तिनें घरांत शोध चालविला. शोध करतां करतां कोपऱ्यांत एक वस्त्र तिला दिसलें. चटकन् तिनें तें ओढून घेतलें आणि अंगावरचें सोडून तें वस्त्र लावून घेऊन पुढें स्नान, धुणें, वगैरे करून आंत जाऊन ती पुढच्या उद्योगास लागली.

दैवयोग तरी किती विचित्र असतो, पहा. हें सर्व कंसारीनें शुद्ध व सरळ मनानें केलें. पण त्याचा परिणाम मात्र भलताच झाला. पुढें तिला दिवस गेले आणि गरोदर असल्याचीं लक्षणे दिसूं लागलीं. भर तारुण्य आणि हा असा विलक्षण प्रकार. ती फारच भेदरून गेली. तिचा तोल सुटला आणि मुकाट्यानें घरांतून निघून आश्रमांतील कोपऱ्यांतील एका पर्णकुटीत जाऊन राहिली. हा तिचा नेहमींचा रिवाज असे. महिन्याचे महिने ती तेथें एकांतांत जाऊन राहत असे व दीर्घ व्रतानुष्ठान करीत असे त्यामुळें तिकडे फारसें कोणाचें लक्ष जात नसे. वैदिकधर्मात व्रतोपोषणाचें, शुचितेचें व सद्वृत्ताचें महत्त्व फार प्रतिपादण्यांत आलें आहे. तेथें अंतर्बाह्य शुचितेवर अत्यंत कटाक्ष दिला आहे.

ती पाळणें हें अत्यंत महत्त्वाचें असून प्रसंगविशेषीं त्यासाठीं प्राणहि पणास लावण्यास धर्मनिष्ठ लोक कमी करीत नसत. म्हणून स्वत्त्व पाळण्यासाठीं तिला वरील सारखे दिव्य करणें भाग पडलें. पुढें पुढें लवकर नवमास भरले व एक दिवशीं ती आश्रमांतून नाहींशी झाली. मागें वर्णन केल्याप्रमाणें ती माता झाली !

कंसारी त्या चिमुकल्या अर्भकास त्या अश्वत्थनारायणाच्या पदरांत टाकून निघून गेली. तिचें प्राणोत्क्रमण झालें. त्या बालकाचें पालन-पोषण कोण करणार असा स्वाभाविक प्रश्न उपस्थित होतो. पण परमेश्वराची लीला अगाध व विचित्र आहे त्या अचिंत्य शक्तीचा ठाव मात्र आजपर्यंत कोणालाहि लागलेला नाही. आधुनिक विज्ञान शास्त्राला तर मुळीच तिचा शोध लागत नाही आणि लागणें शक्य दिसत नाहीं. या विश्वाचें कोडें जोपर्यंत शास्त्रीय दृष्टीला उलगडतां आलें नाहीं व भौतिकवाद्यांना सोडवितां आलें नाही, तोंपर्यंत त्या अचिंत्य शक्तीच्या अस्तित्वाबद्दल वाद उपस्थित करण्यात अर्थ काय आहे ? सर जेम्स जीन्ससारखे प्रथितयश विज्ञानशास्त्रनिपुण पंडित देखील विश्वाचा ठाव घेतां घेतां ' यतोवाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह ' अशी स्पष्ट शरणचिठ्ठी लिहून द्यावयास तयार झाले, तेथे सामान्य माणसाची ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं शंका घेण्यांत शहाणापणा तों काय ?

त्या अरण्यांत विविध जातीचे असंख्य वृक्ष होते. त्यांतून कंसारीनें अश्वत्थवृक्षाचीच निवड केली, यात तिचा शहाणपणा व समयसूचकता दिसून येते. कारण या आपल्या भरतखंडांत अश्वत्थ वृक्षास फार महत्त्वाचें स्थान देण्यांत आलें असून, सर्व वृक्षांत तो अत्यंत पूज्य व पवित्र वृक्षराज मानण्यांत आलेला आहे. त्यास देवतास्वरूपहि प्राप्त झालें आहे.

याचें कारण असें कीं, देव तेथें वास करून असतात, अशी वैदिक कल्पना आहे. त्याच्या बुंध्यात ब्रह्मा, मध्यांत विष्णु व शेंडयांत शंकर राहतो, अशी वैदिक समजूत आहे. याची खूण म्हणूत श्रीकृष्णांनी अर्जुनाला आपल्या विभूति सांगतांना 'अश्वत्थश्चामि वृक्षाणाम्' या वचनांत ती गोष्ट नमूद करून ठेविली आहे. भगवान बुद्धाला संबोधीचें दिव्यज्ञान प्राप्त झालें, तें या अश्वत्थच्या पवित्र छायेखालींच. म्हणून या वृक्षाला बौद्धधर्मात 'बोधिवृक्ष' म्हणून पूज्य व पवित्र मानण्यांत आले आहे. प्रत्यक्ष अग्निनारायण या झाडामध्ये गुप्तरीतीनें वास करून असतो अशी प्राचीन ऋषींची भावना असून अग्निमंथन करण्याची अरणि या झाडाची करतात. व त्याच्या बारीक डाहळया समिधा म्हणून अग्नि कुंडांत अर्पण करण्यांत येतात. स्त्रियांना मूलबाळ होत नसलें तर अश्वत्थनारायणास लक्ष प्रदक्षिणा घातल्यास त्याचा हेतु सफल होतो, असे पुराणांतरी सांगण्यांत आलेले आहे. तात्पर्य, कंसारीनें अश्वत्थवृक्षाच्या पदरी आपल्या तान्हुल्या बाळास घातले या वरून तिनें आपले बाळ अरण्यांत अनाथ म्हणून सोडलें नाहीं. तर विष्णु देवाच्या पदरांत घालून त्या अनाथ बालकाला अनाथरक्षक करुणावत्सल परमेश्वराच्या दिव्य संरक्षण छत्राखालीं दिलें, हें अगदी उघड आहे.

अलीकडची विज्ञानशास्त्रे कांहींहि म्हणोत, प्राचीन वैदिक आर्यांचा इतिहास इतका विलक्षण व अद्‌भुतरम्य आहे की आज आम्ही कितीहि जीव तोडून सांगितलें तरी तो साहेबाळलेंल्या जड-वादी नवशिक्षितांस पटणार नाहीं. भौतिक शास्त्राच्या चष्म्यांतून पाहणारे त्याला हंसतील, नाक मुरडतील, थट्टा हेटाळणी करतील

हें आम्ही ओळखून आहोंत. ईश्वरीलीला मानव बुद्धीला अतर्क्य व विज्ञानशास्त्राला अगम्य आहे हें विसरतां कामा नये.

भौतिक शास्त्रांना आतांपर्यंत अगम्य अशा कित्येक गोष्टी प्राचीन भारतीयांच्या पूर्ण परिचयाच्या होत्या. उदाहरणार्थ रामायणांतील पुष्पक विमानाची गोष्ट घ्या. ५०।६० वर्षापूर्वी ती कोणाला तरी खरी वाटत होती काय? त्या वेळी आपण त्यास हंसत होतो. पण तेंच धाडस आज करण्यास कोणी तयार होईल काय? आकाशवाणी झाली असें पुराणिकबुवानीं सांगितले तर लोक त्यांना वेड्यांत काढीत असत. जीव व जीभ नसतां आकाश बोलतें म्हणजे काय? निव्वळ थाप आहे ती! पण आजचा रेडियो म्हणजे ही काय चीज आहे? या सर्व गोष्टी आज प्रत्यक्ष सृष्टींत उतरल्या नाहीत काय? म्हणून प्राचीन काळी ज्या अगम्य व अद्‌भुत गोष्टी घडल्या, त्यांच्यावर जडशास्त्रांध दृष्टीनें गैरविश्वास ठेवणे हें सूज्ञपणाचें होणार नाही.

हे सर्व येथे सांगण्याचे कारण कीं तें एक दोन दिवसांचे कोवळे अर्भक त्या निर्जन रानांत एकटेच पडलें होतें, तरी त्याला अपाय झाला नाही. अश्वत्थवृक्षावरील सर्व देवतांनी आपलें मंगल कृपा-छत्र धरलें होते व त्यांची प्रेमदृष्टि त्याच्यावर अहोरात्र पारख घालीत होती. तशांत तें बाळ पिप्पलाद म्हणजे कांहीं सामान्य व्यक्ति नव्हती. प्रत्यक्ष देवगुरु बृहस्पति, मग त्याची देवाला माया व काळजी नसेल तर कोणाला असणार? मानव जातीच्या उद्धारार्थ व उत्कर्षार्थ पवित्र ज्ञान राशीचा सुंदर कैलास बनविण्यासाठीं त्याचा येथे अवतार झालेला. मग बाळ पिप्पलादाचें बरें वाईट कसें होणार?

बालकानें कृत्या सोडली!

कुमार पिप्पलाद वाढतां वाढतां आतां चांगला दहाबारा वर्षांचा झाला होता. दिवसा तो एकटाच झाडाच्या आसपास हिंडे फिरे. झाडा फुलांशीं व माती दगडाशी खेळे. तेथील मिळ-तील ती फळफळावळ खाई. शेजारच्या झऱ्यांतील पाणी पिई. आणि हिंडून-फिरून खेळून-नाचून भागला म्हणजे अश्वत्थाच्या कोटऱ्यांत येऊन विश्रांति घेई. आणि सांज झाली कीं तेथेंच येऊन सकाळपर्यंत स्वस्थ झोंपून राही. तें अश्वत्थाचें कोटर प्रशस्त व सुरक्षित होतें आणि तें त्याला घराप्रमाणेंच वाटे.

एके दिवशीं नारदांची स्वारी सहज फिरत फिरत तेथें आली. तेथें येतांच ती सूर्यासारखी तेजस्वी सुंदर बालमूर्ति पाहून आणि जवळपास कोणी माणूस नसलेलें अवलोकन करून ते जरा चकित झाले. त्याच्याजवळ जाऊन त्यांनीं त्यास विचारलें कीं " बाळ ! तूं एकटाच इथं कसा ? जवळपास तर कोणी दिसत नाहीं. मग तूं इथं कसा आलास ? कुठून आलास ? तुझे आई-बाप कोण व ते कुठं आहेत " ? नारदांना पाहून त्या बालकाला विस्मय वाटलें. आतांपर्यंत त्यानें मनुष्य असा पाहिलाच नव्हता. तेव्हां नारदांकडे त्यानें एकवार आपादमस्तक नीट न्याहा-ळून पाहिलें आणि शेवटीं त्यास उत्तर दिलें कीं "नाहं जानामि पितरं मातरं नच बांधवम् " मला बाप माहीत नाहीं ! आई माहीत नाहीं, बंधु माहीत नाहीं.

नारदांना तें पाहून मोठें आश्चर्य वाटलें. मुलगा पहावा तर असा तेजस्वी, आणि त्याचें भाषण ऐकावें तर तें विस्मयजनक. ते

अंतर्ज्ञानी असल्यामुळें अंतर्दृष्टीनें त्यांनीं हें सगळें जाणलें आणि तो कोण, कसा जन्मला, त्याची आई कोण, वगैरे सर्व हकीकत त्यास जवळ घेऊन साद्यंत सांगितली.

ती सर्व हकीकत कळल्यावर पिप्पलाद फार दुःखित झाला. तो रडूं लागला. आपण असे पापी कसे जन्मलों म्हणून शोक करूं लागला. प्राणत्याग करणार म्हणून हट्ट धरून बसला नार. दांनीं चार गोष्टी सांगून त्याचें सांत्वन केले व समजूत पाडली. यांत तुझा अगर कोणाचा दोष नसून, तू निष्पाप व निष्कलंक आहेस. हा दैवाचा खेळ असून, तुझी अशी दशा व्हावयास शनि कारण आहे असें सांगून ते तेथून निघून गेले.

आपल्या या अनर्थ परंपरेस शनि कारण आहे, हें समजतांच त्यास शनीचा मोठा राग आला व त्या क्रोधभरांत त्यानें आकाशाकडे दृष्टि वळवून त्या सूर्यपुत्राकडे पाहिलें आणि शाप देऊन त्यास खालीं पाडलें. शनिदेवानें त्याची क्षमा मागितली म्हणून बारा वर्षा खालच्या कोणत्याहि मुलास या उप्पर छळणार नाहीं असे त्याजकडून वचन घेऊन पिप्पलादानें त्यास सोडून दिलें. (स्कंद ६–१७४)

आपला पापी जन्म याज्ञवल्क्यांच्या आश्रमांत झाला व आपण याज्ञवल्क्यांच्या बहीणीचा मुलगा असूनही आपल्याकडे त्यांनीं अवधान दिलें नाही म्हणून त्याला याज्ञवल्क्यांचाहि राग आला. चटकन् स्वारी उठली आणि अग्नि पेटवून हात जोडून ध्यानस्थ होऊन बसली.

त्या अग्नींतून एक कृत्या निर्माण झाली! अक्राळविक्राळ स्वरूपाची, गळ्यांत धगधगीत ज्वालेच्या लांबचे लांब माळा घातलेल्या आणि प्रज्वलित अग्नीप्रमाणें प्रखर व तेजस्वी दिसणारीं

ती अग्नीतून बाहेर येतांच पि प्पलादास म्हणाली," बाळा ! मला कां बोलावलेस ? समुद्र शोषूं कां पर्वताचें पीठ करूं ? पृथ्वीला पालथी घालूं कीं, नभोमंडळ खालीं पाडूं ? काय करूं तें सांग !

हें तिचें भाषण ऐकून पिप्पलादानें डोळे उघडले. तो तिला म्हणाला, '' कृत्ये! आलीस ? मी तुझेच चिंतन करीत होतो. आतां मिथिलेंत जा आणि तेथें याज्ञवल्क्य आहे त्याचा प्राण घेऊन ये. ''

बोलून चालून कृत्याच ती ! चटकन् वाऱ्याप्रमाणें तेथून निसटलीच आणि नभोमंडळ थरथर कांपवीत मिथिलेकडे निघाली.
(स्कंद, ५, ३–४२.)

भगवान शंकरांचा वरदहस्त

आपल्यावर कृत्या येत आहे हें याज्ञवल्क्यांनीं योगदृष्टीनें पाहताच ते भयचकित झाले आणि धांवतच जनकाकडे गेले. पण जनकांनी त्या कृत्येपासून त्यांचा बचाव करण्यास आपण अगदींच असमर्थ आहोंत असें स्पष्ट सांगितल्यामुळें त्यांची निराशा झाली ! नंतर ते ब्रह्मदेवाकडे गेले. तेथेंहि त्यांना आश्रय मिळाला नाही. कृत्येपुढे आपलें कांही चालत नाहीं असा त्यांनीहि कबुली जबाब दिला. मग मात्र याज्ञवल्क्य घाबरले. पुढें काय करावें नि कोठें जावें याविषयीं त्यांची मति गुंग झाली. कृत्या-तर पाठीस लागलेली आणि उपाय तर सुचेना. शेवटी त्यांनी विष्णूकडे धांव मारली पण दुर्दैवाने त्याचाहि कांहीं उपयोग झाला नाही. वैकुंठांतहि त्याना वाटाण्याच्या अक्षताच लावल्या गेल्या.

याप्रमाणे सर्व बाजूंनी निराशेनें घेरल्यामुळे त्यांचा जीव खालींवर होऊ लागला. ते अगदीं हताश झाले. त्यांना पुढें कांही मार्ग दिसेना. कृत्येचा प्रभाव देवांनाहि भारी होता ! तिला अड-विण्याचें धैर्य व सामर्थ्य कोणांतहि नव्हतें. प्रत्यक्ष अग्नीच्या पोटातून निघालेली महामाया अग्नीसारखीच मोठी प्रखर व महा जाज्वल्य होती. तिच्या वाटेस जाण्याचें धाडस व साहस करून सुखाचा जीव धोक्यांत घालण्यास कोण तयार होईल ? देव झाले म्हणून काय झालें, त्यानाहि भीति ही होतीच कीं.

त्यांचे आतांपर्यंतचे सर्व प्रयत्न विफल ठरले. ते हताश आणि किंकर्तव्यमूढ झाले नि त्याची जीवनाशा सर्वस्वी खुंटली ! तथापि सुदैव त्यांच्या पाठीस होतें ! सर्वांनी हात सोडला होता, तरी सुदैवानें तेवढा सोडला नव्हता. तें आतां उभे राहिले आणि त्यांना

दीनवत्सल भगवान शंकरांची आठवण झाली आणि ते लागलेच कैलासाच्या वाटेला लागले.

खरोखर देवांत देव म्हणजे महादेवच. केवढा त्यांचा महिमा. व कोण त्यांची भक्तवत्सलता ? त्यांनीं शरणागताला अभय दिलें नाहीं, असें कधीं झालें नाहीं व पुढे केव्हांहि होणार नाहीं. सुष्टाचे परिपालन हें त्यांचे ब्रीदच आहे.याज्ञवल्क्य आतां त्यांच्याजवळ येऊन पोंचले व त्यांना नमस्कार करून कृत्या आपल्यावर झडप घालणार हें पाहून योग सामर्थ्यानें सूक्ष्मरूप धारण करून ते शंकरांच्या नखांत शिरून तेथें लपून बसले.

कृत्येचा निरुपाय झाला. हातची शिकार गेली हें पाहून ती आतां चरफडूं लागली. दुसरें कोणी असतें तर त्याच्यावर तुटून पडून तिनें दोघांचाहि फन्ना उडविला असता. पण येथें प्रसंग पडला प्रत्यक्ष शंकराशीं–कैलासनाथ महामृत्युंजयाशी. मग तेथें दांडगाई करून कसें चालेल ? दूर उभी राहूनच तिनें त्यांना विनंति केली कीं, 'देवा सोडा त्याला इकडे. तो पहा तुमच्या हाताच्या नखात एक प्राणी चोरून शिरून लपून बसला आहे काढा त्याला बाहेर नि द्या इकडे लोटून.'

हें त्या कृत्येचे भाषण ऐकून शंकरांनी सहज आपल्या नखाकडे पाहिलें, तों याज्ञवल्क्य सूक्ष्म रूपांत लपून बसलेले त्यांना दिसले. याज्ञवल्क्यांनीं तेथूनच देवांस नमस्कार केला आणि आपले कृत्येपासून रक्षण करण्याविषयीं नम्र होऊन त्यांना विनंति केली भोलानाथ भक्तवत्सल महायोगीश्वर क्षणभर ध्यानस्थ झाले आणि सर्व कांहीं त्याना समजून आले हा सर्व प्रकार समजुतीच्या घोटाळ्यामुळें घडून आलेला आहे अशी

त्यांची खात्री झाली, याज्ञवल्क्य पूर्ण निर्दोषी आहेत, पिप्पलादाचा राग अनाठायीं आहे, कृत्येची मागणी दुराग्रहाची आहे असा विचार करून त्यांनी याज्ञवल्क्यावर कृपादृष्टि केली. त्याचे योगकौशल्य पाहून त्यांना मोठें कौतुक वाटलें आणि संतोषून पार्वतीरमण प्रसन्न झाले. त्यांनी याज्ञवल्क्यांवर आपला वरदहस्त ठेविला.

कैलासनाथ महादेव प्रसन्न झाले. याज्ञवल्क्यांना आपल्या सुदिव्य नेत्रानें सुदीप्त करून त्यांचा देह सुरक्षित केला आणि त्याना आता बाहेर यावयास सांगितलें. याज्ञवल्क्य बाहेर आले. कृत्येने तो सूर्या सारखा तळपणारा दिव्य देह पाहिला. आणि त्यासरशी ती कोळशाप्रमाणे काळी ठिक्कर पडून हतवीर्य बनली. याज्ञवल्क्यांवर आतां आपली मात्रा चालणे शक्य नाही असा विचार करून मनांतल्या मनात ती खिन्न झाली. आणि निराश होऊन चडाडत आल्या वाटेने मुकाट्यानें चालती झाली.

धनुर्धारी अर्जुनाच्या अलौकिक पराक्रमानें परम संतुष्ट होऊन त्यास दिव्य गांडीव धनुष्य देऊन 'पिनाकी' हा किताब बहाल करून ज्या शंकरानीं त्याचा गौरव केला त्याच पार्वतीरमणानीं याज्ञवल्क्यांचे लोकोत्तर योगकौशल्य पाहून त्यांजवर अनुग्रह केला. आणि त्यास 'योगीश्वर' हा बहुमानाचा किताब देऊन, त्याचे यश शाश्वत केले. ' योगीश्वरेति विप्रस्य कृत्वा नाम युधिष्ठिर विसर्जयित्वा देवेशस्तत्रैवान्तरधीयत ॥ '(स्कंद, ५-३-४२ते६१)

याज्ञवाल्क्यांनीं देवाधिदेव महादेवास नमस्कार केला आणि या वेळे पासून याज्ञवल्क्य हे योगीश्वर या नांवानें प्रसिद्ध पावले.

याज्ञवल्क्य–पिप्पलाद भेट

ती कृत्या परत येऊन झालेली हकीकत पिप्पलादास निवेदन करून तेथून निघून गेली. पिप्पलादास हें सर्व ऐकून आश्चर्य वाटलें.

तो मनांत एक प्रकारें खिन्न झाला. त्यानें शंकरांची उपासना चालविली. इतक्यांत नारद तेथें आले व त्यांनीं त्याची समजूत घालून राहण्यास याज्ञवल्क्याकडे घेऊन गेले.

त्या बालकास याज्ञवल्क्यांपुढें उभें करून ते म्हणाले, "हा कंसारीचा मुलगा बाळ पिप्पलाद. आतांपर्यंत तो अरण्यांत वाढला. देवांनीं त्याचें रक्षण केलें आहे. हा मोठा तेजस्वी आहे. आपल्या आश्रमांतच त्याचा जन्म झालेला आहे. तो आपला भाचा असून त्याचा आपण स्वीकार करावा व पुत्रवत् पालन करून त्याचें कल्याण करावें."

याज्ञवल्क्यांना त्याच्या संबंधी आतांपर्यंत कांहीच कल्पना नव्हती. नारदाच्या तोंडून ही सर्व हकीकत ऐकून घेतल्यावर त्यांच्या मनांत प्रकाश पडला व त्यास सखेदाश्चर्य वाटलें. त्यांनीं त्या मुलाकडे नीट निरखून पाहिलें. त्याचें विलक्षण तेज, सुंदर व मोहक चेहरा पाहून कंसारीची जणु प्रतिमूर्तीच त्याला ती भासली. नारदाचें सांगणें त्यांना पटलें व त्यांनी त्याचा स्वीकार करून पोटाशीं धरलें आणि त्याचें पुढें पुत्रवत् पालन केलें त्याचा यथाविधि उपनयन संस्कार करून त्याला सर्व विद्या शिकविल्या. अथर्ववेदांत त्याला उत्तम पारंगत करून त्याची कीर्ति अजरामर करून ठेविली.

नारद काय अथवा इतर कोणी काय यांनी कितीही समाधान व सारवासारव केली असली तरी ह्या सर्व विचित्र परिस्थितीच्या मागें आपलाच दोष असावा या कल्पनेनें याज्ञवल्क्यांचें मन त्यांना मधुन मधुन खाऊं लागलें. याबद्दल कांहीतरी प्रायश्चित्त घेणें हें जरूरच होतें. प्रायश्चित्त म्हणून तो प्रसंग साधून हाटकेश्वर येथें गेले व एक यज्ञ करून तेथें याज्ञवल्केश्वर नावाच्या लिंगाची स्थापना केली. त्याचप्रमाणें पिप्पलादानेंहि आपल्या मातेच्या उद्धारार्थ तेथेंच 'कंसारीश्वर' लिंग स्थापून मातृऋणांतून मुक्तता करून घेतली.

धन्यो गृहस्थाश्रमः

याज्ञवल्क्यांचा संसार भरभराटीला आलेला होता. कात्यायनीला चंद्रकांत, महामेघ व विजय असे तीन मुलगे झाले होते. मैत्रेयीला मात्र मूलबाळ कांहीं झाले नव्हते. तथापि ती दुःखीकष्टी मात्र नव्हती. कात्यायनीचा संसार आपलाच असें समजून त्यांतच ती समाधान मानीत असे कात्यायनीपेक्षां मैत्रेयीलाच तिचीं मुलें अधिक बिलगून असत. सर्व दृष्टींनी विचार करता याज्ञवल्क्यांचा गृहस्थाश्रम म्हणजे आतां स्वर्गच होता. कात्यायनी-मैत्रेयी ही जोडी म्हणजे लक्ष्मी-सरस्वतीच जणूं एकत्र वास करीत होत्या. दोघीजणी गंगायमुनाप्रमाणें समरस होऊन योगीश्वरांची सेवा करीत. गृहकृत्यांत सदैव दक्ष व तत्पर असल्यामुळें त्यांच्या निवासस्थानांत नेहमीं सुखासमाधानाचे प्रसन्न वातावरण असे, म्हणूनच त्यांना बाहेरचें प्रचंड प्रचार कार्य सुरळीत व व्यवस्थित संभाळून तें तडीस नेणें शक्य झालें. कात्यायनीचें थोर अंतःकरण व मैत्रेयीचा मधुर मनमिळावूपणा या दोघींच्या दोन दिव्य सद्गुणांमुळे संसारांत अनिष्ट प्रकार व प्रसंग न डोकावतां तें मंगल निवासस्थान स्वर्गाप्रमाणे सदैव शांत व प्रसन्न होतें. तशांत मैत्रेयीचा स्वभाव व मनोवृत्ति अधिक उदार व उदात्त असल्यामुळें व त्याबरोबरच ती सुविद्य व सुविचारी असल्यामुळे योगीश्वराना तिची वेळोवेळी यथोचित मदत मिळत जाई. त्यामुळें त्यांना अंगीकृत कार्य नेटानें व सुसंघटितपणें तडीस नेणें सहज साध्य झालें. 'अस्मिन गृहे गार्हपत्याय जागृहि'—घरांत राहूनच गृहिणीधर्मात दक्ष रहा—हा स्त्रीजीवनाला पथ्यकर व हितकर असा श्रुतिमाउलीचा मंगल सदुपदेश

त्या विदुषी आर्य महिलेनें अक्षरशः पाळून गृहस्थाश्रमांतच तिनें स्वर्गातील नदनवन थाटले होतें. या प्राचीन अमरकीर्ति सुविद्य मैत्रेयीचें मंगल व उद्बोधक उदाहरण आधुनिक सुशिक्षित स्त्रीवर्गानें डोळयापुढें ठेवून तद्वत् वर्तन केल्यास स्त्रीजन्माचें खरोखर सार्थक होऊन 'धन्यो गृहस्थाश्रमः'चा मंगल घोष घरोघर ऐकण्याचें भाग्य भारतीय कुटुबांना खात्रीनें लाभेल.

याज्ञवल्क्यांनीं ' वीर्य वै द्वन्द्वं ' स्त्री–पुरुषांची जोडी–म्हणजे साहचर्य व सहकार्य–हे प्रभावशाली आहे असें शतपथांत सांगितलें आहे. तें स्वतःच्या अनुभवावरूनच असें म्हटल्याशिवाय राहवत नाहीं. वैदिक संस्कृति ही गृहसंस्थेवर आधारलेली असून, गृहसंस्थेला स्त्रीपुरुषांचें साहचर्य व सहकार्य हें अत्यावश्यक आहे. घर म्हणजेच गृहिणी 'जायेदस्तं'– 'जाया म्हणजे घर' असे ऋग्वेदांत म्हटले असून त्याचा अनुवाद मनूनें 'न गृहं गृहमित्याहुर्गृहिणी गृहमुच्यते ' या प्रसिद्ध वचनांत केला आहे. पुरुष काय अगर स्त्री काय त्यांचें स्वतंत्र जीवन हें खरोखर मानव जीवनच नव्हे. तें अल्प व अपूर्ण आहे. तेथें खरा आनंद नाहीं, खरे सूख नाहीं, खरी शांति नाहीं व खरें समाधान नाहीं. एकदर मानवजीवनाचा खरा इतिहास व खरें साफल्य तेथें नाहीं म्हणजे तें जवळ जवळ रखरखीत नीरस पशुजीवनच होय. संसारांत मतभेद व भांडणें ही असावयाचीच. पण विवाहानें बद्ध झालेल्या प्रेमळ स्त्री–पुरुषांच्या क्षणैक मतभेदांत, भांडण्यांत, रुसण्यांत, फुगण्यांत अबोल्यांत, असहकार्यात व बहिष्कारांत जी एक अनिर्वचनीय मधुरता असते ती स्वतंत्र जीवन कंठणाऱ्या स्वैर विहारी स्त्री–पुरुषांना–प्रेम विवाह करणाऱ्या हौसी फुलपाखरांना समजणे शक्य नाहीं. (यदेतत्

हृदयं मम तदस्तु हृदयं तव । यदेतत् हृदयं तव तदस्तु हृदयं मम-माझें मन तें तुझें असो व तुझें मन माझें असो-हें विवाहमंत्रांतील मननीय शुभवचन अखेर प्रभावी ठरतें, याचा गोड अनुभव भारतीय कुटुंबाशिवाय इतरत्र फारसा आढळत नाहीं. म्हणूनच स्वतंत्र स्त्री व स्वतंत्र पुरुष ही समान हक्कावर जगणारीं व उदोउदो करूं पाहणारीं अल्प व अर्धवटच असें याज्ञवल्क्यांनीं स्पष्ट म्हटलें आहे. जोंपर्यंत पुरुष हा विवाह करून स्वानुकूल गृहिणी मिळवीत नाहीं तोंपर्यंत तोअपूर्णच! अर्धवटच! 'अर्धो ह वा एष आत्मनो यज्जाया'-जाया ही पुरुषाची अर्धांगी आहे! पुरुष व स्त्री दोघांचें मिळून एक कुटुंब. अशी वैदिक आर्यांची स्त्री-पुरुष कल्पना आहे.

स्त्री हा पुरुषाचा अर्धा भाग आहे म्हणजे स्त्री व पुरुष हे समसमान भागीदारच हक्कदार आहेत, हें तत्त्व वैदिक धर्मांत फार प्राचीन काळींच अमलांत आणण्यांत आलें होतें. हें आधुनिकांनी काय म्हणून विसरावें? पाश्चात्यांचे पाशवी समान हक्काचें व वर्तनस्वातंत्र्याचें शुष्क व नीरस ढोलगें काय म्हणून बडवीत बसावें? असो.

याज्ञवल्क्यांनीं येथें जाया हा शब्द वापरला आहे. स्त्री शब्द नाहीं. याचें कारण असें कीं विवाहानें बद्ध झालेली स्त्री हीच जाया होऊं शकते. देहाची रुखरुख शमविण्यासाठीं केलेला पुरुषसंबंध हा विवाह म्हणवीत नाहीं. '**तज्जाया भवति यदस्यां जायते पुनः**' पत्नीच्या पोटीं पति हा पुनः पुत्ररूपानें जन्म पावतो म्हणून ती जाया होते. हा जाया शब्दाचा पारिभाषिक अर्थ आहे. **पतिपत्नीचें 'तदेकं मिथुनं'**-पति व पत्नी यांचें मिळून एक जोडपें होतें आणि विवाह संस्कारानें पुनीत झाल्याखेरीज स्त्री पुरुषां-

मध्यें जाया पतीचे नातें संभवत नाहीं व तो गृहस्थाश्रम म्हटला जात नाहीं. कदाचित स्वतंत्र स्त्री पुरुष कांही काळ एकत्र राहूं शकतील, पाशवी प्रेमलालसेने परस्परांना देह अर्पण करूं शकतील पण त्याला दाम्पत्य जीवनाचे मधुर व मंगल स्वरूप प्राप्त होणार नाहीं. कारण '**धर्मप्रजारत्यर्थो हि विवाहः**' -धर्म, प्रजा व रति या तिहींच्या लाभार्थ—केवळ रतिसुखार्थंच नव्हे—वैदिक विवाहाचा अवतार आहे, तो रमणीय नाहीं असे कोण म्हणेल? '**मिथुनेन ह प्रजायते**' व **मिथुनेन ह यजते**.' पति पत्नीच्या संयोगानेंच कायदेशीर प्रजा निर्माण होते व पतिपत्नी हें जोडपेंच देवोपासना करण्यास योग्य आहे असा अष्टपैलू भारतीय धर्माचा कटाक्ष आहे. केवळ देहेंद्रियतर्पणार्थच कांही वैदिक विवाह नाहीं. तर धर्म व प्रजा हेही त्या बरोबरच त्याचे दोन महत्त्वाचे उद्देश आहेत हें लक्षांत ठेविलें पाहिजे. ऐहिक व पारमार्थिक बाबतींत याज्ञवल्क्यांनी जें कार्य केलें व जें काय साधलें तें सर्व या गृहस्थाश्रमांतच. वैदिक धर्मात या गृहस्थाश्रमाला फार मोठें रमणीय व महत्त्वाचें स्थान आहे. जगाचा भला बुरा अनुभव घेण्याची व धडा शिकण्याची गृहस्थाश्रम ही एक शाळा आहे. जागतिक जीवन येथेंच खुलतें. विश्वाचें प्रत्यक्ष ज्ञान येथेंच होतें. देवोपासना येथेंच घडते. मनुष्याचा आत्मा येथेंच विकास पावतो आणि मानव जन्माचे खरें सुख, खरा आनंद व खरी शांति याच आश्रमांत लाभते. ती वसिष्ठाला, अत्रीला, विश्वामित्राला, भरद्वाजाला, भृगूला व्यासाला आणि याज्ञवल्क्यांना सर्व थोर थोर कुटुंबस्थ महात्म्यांना लाभली. ब्रह्मचारी, संन्यासी, देव, ऋषी, पितर, गंधर्व, व इतर जीवजात हे सर्व या गृहस्थाश्रमावरच अवलंबून आहेत व असतात. आणि म्हणून या आश्रमाचें महत्त्व ऋषींनी वर्णिलें आहे ते असें-

चतुर्णाआश्रमाणां च गार्हस्थं पुण्यदं स्मृतम् । तवसनार्द्भिक्तश्च मुक्तिश्च भवतीति मतिर्मम (ब्रम्ह. पु.८८-१५) चारहि आश्रमांत गृहस्थाश्रम हा पुण्यप्रद आहे कारण त्या आश्रमांतच मनुष्याला प्रपंच व परमार्थ-योग व मोक्ष साधतां येतो. गृहस्थाश्रमांतच येथे प्रपंचहि साधतो आणि धर्महि साधतो मात्र तेथें विवेक व जागृति पाहिजे.

असा हा सर्वोपकारी गृहस्थाश्रम जर सिद्ध झाला नाहीं तर वैदिक धर्माचा-अर्थात् मानवकुलविकासाचा-आत्माच गारठेल असें समजण्यास कसलीच हरकत नाहीं.

योगीश्वरांनीं जी प्रचंड कामगिरी केली आणि अलौकिक पौरुष गाजविलें आणि आपली कीर्ति अजरामर करून ठेविली त्या सर्वाचे श्रेय जर कशांत असेल तर तें या प्रभावी गृहस्थाश्रमांतच. शुक्ल यजुर्वेद संहिता तयार केली, त्या संहितेचें सुदर स्वरूप विशद करून सांगण्यासाठीं शतपथासारखा प्रचंड ग्रथ निर्माण केला, यज्ञसस्थेंत ठिकठिकाणीं ‘ तदु तथा न कुर्यात् ’ असें स्पष्ट वजावून महत्त्वाचे फरक करून त्यांत पथ्यकर सुधारणा केल्या. अनेक लहान मोठे यज्ञ व ठिकठिकाणीं विद्वानांशीं चर्चा करून वैदिक धर्माला स्पृहणीय उजळा दिला. मनुष्याच्या जन्मजात गुणस्वभावाकडे, मन.प्रवृत्तीकडे नजर देऊन त्या त्या व्यक्तीला अनुरूप व उपकारक असे आचारात्मक नियम तयार केले, वेळो-वेळीं देशसंचार करून वैदिक धर्माचें महत्त्व व मानवोत्कर्षाचें रहस्य जगास दाखवून दिलें. याशिवाय अनेक प्रासंगिक व स्थानिक गोष्टींचे प्रश्न सोडवून तेथें व्यवस्था लावून दिली, या सर्वाचें बीज त्यांच्या सुखमय गृहस्थाश्रमांतच आहे. नुसता त्याचा शतपथ ग्रंथराज पाहिला तर मनुष्य आश्चर्यानें थक्क होऊन

जातो ! अखंड कर्मयोगानें व उदंड तपश्चर्येनें त्यांनीं गृहस्था-श्रमातच ज्ञान मेरूचें अत्युच्च शिखर गांठलें. आणि त्या बरोबरच मुमुक्षु लोकांनाहि सुंदर व सरळ मार्ग दाखवून जगावर मोठे उपकार करून ठेवले आहेत, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

विशेषत: गृहस्थाश्रमाला नाक मुरडणाऱ्या व कमी लेखणाऱ्या बेगडी साधुसंतांनीं व भगव्या संन्याशांनीं योगीश्वरांचें उदाहरण मनन करण्यासारखें आहे. याज्ञवल्क्य कर्मनिष्ठ तर होतेच, पण त्याचा अर्थ नुसत्या धर्मकर्मातच त्यांनी आपलें सर्व आयुष्य गुंतविलें होतें असा मात्र नव्हे. कर्माच्या सहाय्यानें व कर्म करतां करतांच त्यांनीं ज्ञानाचा गौरीशंकर गांठला होता. याची साक्ष प्रत्यक्ष त्यांचा शतपथ ग्रंथच देत आहे ! कर्म श्रेष्ठ का ज्ञान श्रेष्ठ या विषयीं पोपटी वेदांत्यांमध्ये नेहमीं शुष्कवाद माजून राहिलेला असतो. पण कर्माच्या पोटांत ज्ञान व ज्ञानाच्या पोटांत कर्म गर्भित असतें हें मात्र हे बोलघेवडे वेदांती नेमके विसरतात ! ही मोठ्या खेदाची गोष्ट होय. वैदिक धर्माचा वेदांत हा कर्म-योगाच्या शेवटीं सांगितला आहे. कर्मप्रधान गृहस्थाश्रमाच्या नंतरच संन्यासाश्रमाचा अनुक्रम लागलेला आहे, याचाच अर्थ प्रपंच करून जगाचें वास्तव स्वरूप ओळखल्यानंतर पारलौकिक गोष्टीच्या—अध्यात्मज्ञानाच्या—नादी लागावें, असा अखिल वैदिक ऋषीचा स्पष्ट निर्वाळा आहे.

मैत्रेयीला आत्मोपदेश

गृहस्थाश्रमाचा म्हणजे प्रपंच सुखाचा व जागतिक कीर्तीचा यथार्थ उपभोग घेऊन कृतकृत्य झाल्यावर याज्ञवल्क्यांना गृहस्थाश्रमाचा पसारा आटोपून चतुर्थाश्रमांत शिरण्याची व संसार निवृत्त होण्याची इच्छा झाली. तो आश्रम घ्यावयाच्या अगोदर आपल्या मिळकतीची मैत्रेयी व कात्यायनी यांत वाटणी करून देऊन दोघींना विभक्त कराव्या, या इराद्यानें त्यांनीं मैत्रेयीला बोलावून म्हटलें मैत्रेयी ! आतां मला प्रपंचाचा कंटाळा आला आहे. मैत्रेयी—कंटाळा आला आहे ? पुढं मग ? याज्ञवल्क्य—अग, मग काय ? संन्यास घ्यावा म्हणतो. मैत्रेयी—संन्यास ? आम्हांला सोडून. मग आमची वाट काय? याज्ञवल्क्य—माझी जिंदगी तुझ्यांत व कात्यायनींत वाटणी करून देऊन, तुम्हां दोघांना वेगळ्या कराव्या म्हणतों.

मैत्रेयी—काय आम्हाला वेगळ्या ?

याज्ञवल्क्य—हो. वेगळ्या. म्हणजे पुढें भांडण होणार नाही. तुम्हीं उभयतांनी सुखानं रहावं अशी माझी इच्छा आहे.

मैत्रेयी—आतां मला वाटणी घेऊन काय करायचं आहे नि कुठं जायचं आहे ? मला पैशानें गच्च भरून ही सबंध पृथ्वी मिळाली अगर आपण दिलीत तर मग मी शाश्वत सुखी नि अमर होईन काय ?

याज्ञवल्क्य—नाहीं. मैत्रेयी ! नाहीं फार तर तूं सार्वभौम राजाप्रमाणें मोठ्या थाटांत व सुखांत राहशील, मोठी संपन्न होशील. यापलीकडे तुझी कांहीं प्रगति होणार नाहीं.

मैत्रेयी—द्रव्यानें मनुष्य अमर होतो काय ?

याज्ञवल्क्य—द्रव्यानें अमरत्व प्राप्त होईल, ही मुळी आशाच धरूं नकोस ! ती अगदीं निर्मूल आहे.

मैत्रेयी—तर मग मला आपली धन दौलतहि नको आणि जमीन जुमलाहि नको.

याज्ञवल्क्य—मग तुला काय पाहिजे नि तुझी इच्छा तरी काय ?

मैत्रेयी–मी अमर कशी होईन, नि शाश्वत सुखी कशी होईन याचें ज्ञान तेवढे द्या म्हणजे झालं. मला कांहीं एक नको. आपली सगळी धन दौलत कात्यायनीला द्या आणि मला फक्त अमरत्वाचा मार्ग दाखवा नि माझी आशा तृप्त करा.

मैत्रेयीची व आपली कायमची ताटातूट होणार ही जाणीव त्यांना पूर्ण होती आणि यामुळें तें तिचें शेवटचें व हृदयस्पर्शी भाषण ऐकून, त्यांचें अंतःकरण खरोखर हेलावलें. शिवाय तिच्या आत्मज्ञान–प्रवण शुभेच्छेचें त्यांना क्षणभर कौतुकहि वाटलें. तिचा स्वभाव त्यांना माहीत होता. ती कांहीं सामान्य प्रतीची बायको नव्हती. मोठी पंडिता होती. ऐहिक सुख अगर ऐहिक संपत्ति याचा तिला मोह नव्हता. तिला ज्ञानाची मोठी आवड होती. तिचा स्वभाव, योग्यता, आशा–आकांक्षा, वैराग्य वृत्ति याची त्याना यथार्थ जाणीव होती. अनुभवहि आलेला होता. या सर्व गोष्टींचा विचार करून व तिनें शेवटची अंतःकरणपूर्वक केलेली विनंती ऐकून त्यांना एक प्रकारचें समाधान वाटलें. ती आत्मोपदेशास सर्वस्वी योग्य आहे असें पाहून, तिची इच्छा पूर्ण करण्याचें त्यांनीं मनावर घेतलें आणि आपल्या मधुर वाणीनें तिच्यावर दिव्य आत्मज्ञानाचा अमृतवर्षाव करण्याचा निश्चय केला. (श. प. १४–७–३–१ ते ४)

अमृत तुषार

याज्ञवल्क्य–ऐक, मैत्रेयी ! मी सांगतों तें नीट मन लावून ऐक. पत्नीच्या सुखासाठीं म्हणून पति हा स्त्रीला कांहीं प्रिय नसतो. तर स्वतःच्याच सुखासाठीं पति हा स्त्रीला प्रिय वाटत असतो. हेंच दुसऱ्या तऱ्हेनें सांगावयाचें म्हणजे पतीवर स्त्री जें प्रेम करतें तें

कांही पतीसाठीं म्हणून नव्हे, तर आपलाच सुख-स्वार्थ साधण्यासाठीं, आपल्या अंतस्थ आत्म्याच्याच तृप्तीसाठीं.

मैत्रेयी–अस्सं होय ?

याज्ञवल्क्य – भार्येच्या सुखासाठीं म्हणून भार्या कांहीं पतीला प्रिय वाटत नाहीं. तर स्वतःच्या सुखासाठीं भार्या ही पतीला प्रिय वाटत असते. तंतोतंत तशीच गोष्ट पुत्राची आहे आणि तोच प्रकार पशु, ब्राह्मण, क्षत्रिय, देव, वेद, भूतजात वगैऱ्यांना लागू आहे. तें आपल्याच स्वार्थासाठीं –दुसऱ्यासाठीं नव्हे–एकमेकाला सर्वजण प्रिय असतात. तो आत्मा तो अंतस्थ–आत्मा आपण जाणला पाहिजे, त्याचें श्रवण, मनन, निदिध्यान केलें पाहिजे.

मैत्रेयी – म्हणजे काय होतं ?

याज्ञवल्क्य – मोठा चमत्कार होतो. त्या आत्म्याचें दर्शन, श्रवण, मनन व निदिध्यान झालें म्हणजे या सर्वांचें, या विश्वाचें संपूर्ण ज्ञान होतें. आपल्या अंतःकरणांतील आत्म्याचें ज्ञान झालें म्हणजे हें सर्व विश्व आपलाच आत्मा आहे याची पुढें जाणीव व प्रचिती येते. मग आपला आत्मा व विश्वात्मा यांत फरक व भेद राहात व दिसत नाही.

मैत्रेयी–तें ज्ञान नाही झालं तर ?

याज्ञवल्क्य–मोठा अनर्थ होईल !

मैत्रेयी–तो कसा ?

याज्ञवल्क्य–आपल्याहून म्हणजे आपल्या आत्म्याहून ब्राह्मण हें निराळे आहेत असें जो समजतो, त्यास ब्राह्मण दूर करतात.

त्याचप्रमाणें आपल्याहून क्षत्रिय निराळे असें जो समजतो, त्यास क्षत्रिय दूर करतात. आपण वेगळे आणि देव वेगळे असे जो समजतो त्यास देव दूर करतात. आपण वेगळे व वेद वेगळे असें

जो समजतो, त्यास वेद दूर करतात. आपण वेगळे व हें भूतजात वेगळे असें जो समजतो त्यास सर्व भूतजात दूर करते. आपण वेगळे आणि हें सर्व वेगळे असे जो समजतो त्यांस हें सगळे दूर करते.

मैत्रेयी–हें असं कां होतें ?

याज्ञवल्क्य–याला कारण आत्म्याच्या सत्य नि शुद्ध स्वरुपाचे अज्ञान होय. ब्राह्मण, क्षत्रिय, लोक, देव, वेद, हे यज्ञ व हें भूतजात थोडक्यांत हें विश्व काय तें सर्व हा आपला अंतर्यामी सूक्ष्मरूपानें असणारा आत्माच आहे '(इदं ब्रह्म इदं क्षत्र इमे लोका इमे देवा इमे वेदा इमे यज्ञा, इमानि भूतानि, इदं सर्व यदयमात्मा)' हे ब्राह्मण, हे क्षत्रिय, हे लोक, हे देव हे, वेद, हे यज्ञ, हीं भूतें, हें सर्व हा आत्माच आहे. ह्या सर्व विश्वांतील मूल वस्तु, चैतन्य वस्तु, आत्म वस्तु ही एकच आहे.' भिन्न नाहीं. आत्मा ओळखण्याची गुरुकिल्ली काय ती ही. दुंदुभी वाजूं लागली म्हणजे तिच्यांतून आवाज निघतो तो दुंदुभीहून निराळा समजणें हें जसें शक्य नाहीं, अर्थात् त्या दुंदुभीच्या अस्तित्वामुळेंच त्या शब्दाला जसें अस्तित्व येतें, त्याप्रमाणेंच या आत्म्या संबंधी देखील आहे

वीणा वाजूं लागली म्हणजे त्या वीणेंतून जो ध्वनि निघतो, नाद निघतो, तो त्या वीणेहून भिन्न असणें हें जसें शक्य नाहीं, अर्थात, त्या वीणेच्या अस्तित्वानेंच त्या नादाला अस्तित्व येतें तद्वतच या आत्म्यासंबंधी सुद्धां समज. स्पष्टच सांगावयाचें म्हणजे आत्म्यापासून विश्वाची उत्पत्ति आहे.

मैत्रेयी – हे जग–हें सर्व विश्वजात – त्या आत्म्यापासून कसें उत्पन्न होतें त्याची थोडी कल्पना द्यावी.

याज्ञवल्क्य – ओल्या लांकडांनीं अग्नि पेटविला म्हणजे त्या-पासून सर्वत्र धूरच धूर पसरतो त्याप्रमाणेंच हे ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्वांगिरस, इतिहास, पुराणें, सूत्रें, आख्यानें, हा लोक, परलोक, आणि हीं सर्व भूतें, अर्थात् हें सर्व विश्वचें विश्व त्या परमात्म्याचें निःश्वास आहेत. या पृथ्वीवर जितकें म्हणून उदक आहे त्या सर्वांचें समुद्र हें जसें एकच एक निवासस्थान आहे, तसेच सर्व गंधांचें नासिका, सर्व रसांचें जिव्हा, सर्व रूपांचें चक्षु, सर्व शब्दांचे श्रोत्र, सर्व संकल्पाचें मन, सर्व विद्यांचें हृदय, सर्व कर्मांचें हस्त, सर्व आनंदाचें उपस्थ, सर्व विसर्गाचे पायु (गूद), सर्व मार्गाचे पाय, सर्व वेदाचें वाणी हें जसें एकमेव निवासस्थान आहे, तद्वत् हा आत्मा या सर्व विश्वाचें एकमेव आश्रयस्थान आहे. या आत्म्याच्या आश्रयानेंच हें सर्व विश्व स्थित आहे. तो पहात नाहीं असें म्हणतात पण तें वास्तविक तो पहात असूनहि पहात नाहीं अर्थात् द्रष्ट्याच्या दृष्टीचा कांहीं लोप झालेला नसतो. कारण त्याला पाहण्यासारखे त्याहून निराळें असें कांहींच नसतें. दृष्टीचा नाश होत नाहीं. त्याचप्रमाणें तो बोलत नाहीं असें समजतात. तो बोलत असूनहि बोलत नाहीं. अर्थात त्या स्थितींत त्याच्या वक्तृत्वाचा कांहीं लोप झालेला नसतो. कारण त्याच्या वक्तृत्वाचा कांहीं लोप झालेला नसतो. तसेंच तो जें जाणत नाहीं तें वास्तविक जाणत असूनहि जाणत नाहीं. अर्थात् त्याच्या विज्ञातृत्वाचा– जाणिवेचा – कांहीं लोप झालेला नसतो. कारण विज्ञातृत्वाचा नाश होत नाहीं.

मैत्रेयी – हा मोठा चमत्कार आहे.

याज्ञवल्क्य – अग ! जर द्वैत असेल, भिन्नभाव असेल तर एक दुसऱ्याला पाहील, एक दुसऱ्याचा वास घेईल, एक दुसऱ्याचा आस्वाद

घेईल, एक दुसऱ्याला बोलेल, एक दुसऱ्याचें ऐकेल, एक दुसऱ्या संबंधीं मनन करील, एक दुसऱ्याला स्पर्श करील, एक दुसऱ्याला जाणील, पण हें सर्वच जेथें एक अखंड आत्मरूप बनले–जेथें आत्माच झालें– जेथें आत्माच आहे, तेथें काय कशानें पहाणार? कशानें कशाचा वास घेणार ? कशानें कशाचा आस्वाद घेणार ? कशानें कोणाला बोलणार ? कशानें काय श्रवण करणार ? कशानें कोणाचें मनन करणार ? कशानें कोणाला स्पर्श करणार ?आणि कशानें कोणाला जाणणार ?नेति नेति (असतांही तसा नाहीं)असा आत्मा तो हा. हा अगृह्य आहे. तो ग्रहण करतां येत नाहीं. अशीर्य आहे, फाडतां येत नाहीं. असित आहे व्यथा पावत नाहीं. विनाश पावत नाहीं. ज्याच्या योगानें हें सर्व जाणलें जातें त्या विज्ञात्याला मैत्रेयी ! कशानें बरें जाणावयाचें ? खरोखर अमृतत्व म्हणतात ते हेंच होय. हीच आत्मस्थिति हें तूं ओळख म्हणजे अमर होशील, असें म्हणून याज्ञवल्क्य उठून गेले.

धन्य झाली मैत्रेयी,धन्य तिचा जन्म आणि धन्य तिचा आत्मा. तीच तेवढी धन्य झाली असे नव्हें, तर तिच्या बरोबरच आणि तिच्याप्रमाणेंच जे जे मुमुक्षु हा आत्मोपदेश मनःपूर्वक वाचतील व जाणतील तेहि धन्य होत.आतांपर्यंत संसार तापत्रयानें तळमळणारे त्रस्त झालेले असे कितीतरी मुमुक्षु जीव या उपदेशामृत पानानें शांत, तृप्त व धन्य झाले आहेत आणि आत्मज्ञानेच्छु आर्त जीवांचें अखंड नि उदंड कल्याण व मंगल झालें आहे. केवढा सुंदर उपदेश, केवढी व्यापक व विशाल दृष्टि, किती खोल व सूक्ष्म विचार आहेत हे परमशांतीचे व अमरसौख्याचे. सुमधुर अमृत ज्ञानतुषार जगांतील सर्व संसारत्रस्त जीवांना व गहन तत्त्ववेत्त्यांना शांत, तृप्त व तुष्ट करून यावच्चंद्रदिवाकरौ असेंच जिज्ञासु जगाला सतत रिझवीत राहतील, यांत संदेह नाहीं (श. प. १४–७–५)

योगीश्वर याज्ञवल्क्यांचा हितोपदेश

दम–दान–दयाशील व्हा

देव, मनुष्य, असुर असे हे तिघे प्रजापतीचे पुत्र असून त्यांनीं आपल्या पित्याजवळ ब्रह्मचर्यनिष्ठ होऊन कांहीं काल तेथें त्यानीं वास केला. याप्रमाणें तेथें व्रतनिष्ठ होऊन राहिल्यावर त्यांपैकीं देवांनीं प्रजापतीजवळ येऊन म्हटले, पिताजी आम्हांस काहीं उपदेश करा.

तेव्हां प्रजापति त्यांना ‘ द ’ हें अक्षर उच्चारून म्हणाला–देवहो! तुम्हांला या ‘ द ’ चा अर्थ काय तो समजला काय ?

देव–होय. समजला.

प्रजापति–तो काय आहे ?

देव–‘ द ’ म्हणजे दमनयुक्त व्हा ! असा तुमचा सांगण्याचा अर्थ असावा.

प्रजापति–अगदीं बरोबर. तोच माझ्या सांगण्याचा अर्थ आहे. तुम्ही देव जे आहांत त्यांनीं दमनयुक्त होऊन रहावें हें तुम्हीं विसरावयाचें नाहीं.

देव–‘बरे आहे, पिताजी ! ’ असें म्हणून तेथून उठून गेले.

नतर मनुष्य त्यांच्याजवळ येऊन म्हणाले, ‘ भगवन् ! आम्हांस कांहीं उपदेश द्या.’

प्रजापतीनें त्यांनाहि ‘ द ’ हें अक्षर उच्चारून म्हटलें–या ‘ द ’ चा अर्थ तुम्हांस समजला काय ? तसें असल्यास सांगा.

मनुष्य–होय, भगवन् ! आम्हांस त्या ‘ द ’ चा अर्थ उमजला.

प्रजापति–काय उमजला ?

मनुष्य–'द्या! दान करा! असा त्याचा अर्थ.'

प्रजापति–अगदीं बरोबर. तुम्हांस माझा अर्थ बरोबर कळला.

नंतर असुर त्यांच्याजवळ आले आणि म्हणाले 'देवा! आम्हांला कांहीं उपदेश द्या!'

प्रजापति पुनः 'द' हेंच अक्षर उच्चारून त्यांस म्हणाला–असुर हो, तुम्हांस या 'द' चा अर्थ कळला काय?

असुर–होय, देवा? आम्ही तो ओळखला. दया दाखवा असा त्याचा आहे.

प्रजापति–तस्संच! अगदीं तस्सं! असुर हो! तुम्ही माझा अर्थ बरोबर ओळखलांत. इतके झाल्यावर असुर तेथून निघून गेले.

ती ही दैवी वाणी मेघगर्जनेच्या रूपानें 'द द द' अशी गर्जत असते. अर्थात् ती सांगत असते कीं दमनयुक्त व्हा! दान द्या! दया दाखवा! म्हणून मनुष्यानें दम, दान व दया या तीन गोष्टींचा अभ्यास करावयास शिकावें. अर्थात त्या त्या गुणांनीं संपन्न व्हावें.

बोध–तदेतत्त्रयं–शिक्षेद्दमं दानं दयाम्'

(श. प. १४–८ २ ते ४)

मोक्ष म्हणजे प्रत्येकाचे माहेरघर

पवित्र गंगेचें शुद्ध व निर्मल स्वरूप हरिद्वार क्षेत्रांत जसें पहावयास सांपडतें तसें तें पुढें पुढें म्हणजे काशीप्रयाग क्षेत्रांत दिसत नाहीं. त्याचप्रमाणें उदार वैदिक धर्माचें उज्ज्वल व उदार स्वरूप प्राचीन वैदिक वाङ्मयांत जसें प्रतीत होते, तसे तें आजच्या व्यावहारिक हिंदु धर्मात दिसून येत नाहीं. आजकालच्या हिंदु-धर्मावर इतर धर्मांचे आघात व संस्कार झाल्यामुळें तो सनातनी म्हणवीत असला तरी मूळ सनातनी धर्माचे तेज, चैतन्य व सामर्थ्य त्यांत चमकत नाहीं, जनकराजानें सहज प्रश्न टाकला कीं, गुरुदेव मोक्षाचा अधिकार सर्वांनाच आहे का ? की, विविक्षित वर्णाला, अगर व्यक्तीला आहे.

याज्ञवल्क्य म्हणाले, राजा हें काय विचारतोस ? हा अधिकार प्रत्येक व्यक्तीचा आहे. म्हणजे प्रत्येकाचें माहेरघर, मग त्याला जन्माची अगर जातीची आडकाठी कोठून असणार ? मोक्षाचा दरवाजा गांठणें हें जातीवर अगर व्यक्तीवर अवलंबून नसून तें ज्ञानावर आहे, ज्याचें ज्ञान त्याचा मोक्ष. तेथें वर्ण, जात, संस्कार, लिंग, वय यांचा बिलकुल संबंध नाहीं. फक्त सत्यज्ञान असलें म्हणजे झालें. ज्ञानाचा मक्ता कोणत्याहि जातीला अगर कुणाहि व्यक्तीला देण्यांत आलेला नाहीं. मुमुक्षूने आत्मज्ञान मिळवावें आणि सरळ आपलें माहेर गांठावें. मोक्ष मिळविणें हा प्रत्येकाचा जन्मसिद्ध हक्कच आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य किंवा शूद्र एकाच महापुरुषाचे- एकाच विराट पुरुषाचे–निरनिराळे अवयव आहेत. सर्वांचे आश्रय-स्थान एकच. व्यवहारपरत्वें त्या त्या अवयवाला प्रसंग विशेषीं महत्व असलें तरी ते सर्व एकाच देहाचा आश्रय करून राहतात, हें

कसे विसरावयाचें ? मात्र एक गोष्ट मुख्यत्वानें लक्षांत ठेविली पाहिजे; ती ही कीं, मनुष्यांत पात्रता येण्याला संस्कार व आचार यांची आवश्यकता आहे. नुसत्या शाब्दिक अगर पोपटी ज्ञानानें मोक्ष मिळणार नाहीं. त्याला पवित्र आचाराची मंगल जोड पाहिजे: म्हणून जो मुमुक्षु आहे त्यानें आत्मज्ञानाबरोबर सदाचाराची जोड मिळवून मोक्षाचा रस्ता गांठावा, म्हणजे तो सरळ इष्ट स्थळीं जाऊन पोंचेल. मनुष्य हा अज्ञानामुळे जन्मतो व अज्ञानामुळेंच मरतो म्हणून या अज्ञानांतून सुटका करून घेऊन मुक्त होणें हा प्रत्येकाचा स्वभावसिद्ध धर्मच आहे. त्याला आडकाठी कोणी घालूं नये

थोडक्यांत सांगायचें म्हणजे ज्याला यथार्थ ब्रह्मज्ञान झालें तोच खरा ब्राह्मण झाला असे समजावें. तोच मोक्षाचा अधिकारी होय.

वर्ण अगर जातिव्यवस्था ही केवळ व्यावहारिक आहे. पारमार्थिक नाहीं. परमार्थ हा सर्वांना सारखाच आहे. तेथें वर्णादिकांची आडकांठी नाहीं. अर्थात मोक्षाचा दरवाजा हा सर्वांना खुला आहे पण आंत शिरण्याला तेवढी पात्रता पाहिजे, हें विसरून चालणार नाहीं.

शतपथाची उभारणी

याज्ञवल्क्यप्रणीत शुक्ल यजुर्वेदाची मांडणी स्वभावतःच सुसंगत, सुव्यवस्थित व सुटसुटीत असल्यामुळें तो वेद म्हणावयास सुलभ व ऐकण्यास गोड असल्यामुळें लोकांत तो अधिकाधिक प्रिय होत जाऊन समाज त्यास हळूंहळूं चिकटत चालला. हें स्वाभाविकच झालें. शिवाय तो भगवान श्री सूर्यनारायणाच्या कृपाप्रसादानें योगीश्वर याज्ञवल्क्यासारख्या दिव्य विभूतीकडून प्रकट झाला असल्यामुळें त्याला एक प्रकारचें अपूर्व महत्त्व प्राप्त होऊन विद्वन्मंडळांत तो एक प्रकारचा गौरवाचा मोठा विषय झाला होता. जेथें जेथें यज्ञसमारंभ होत तेथें तेथें बहुतेक ठिकाणीं वाजसनेय हे अध्वर्यु व शुक्लयजुर्वेद हा प्रयोग ग्रंथ असा संप्रदाय पडून त्या वेदाला प्रलोभनीय असें अग्र स्थान प्राप्त झालें होते. शिवाय त्या वेदाचा संबंध साक्षात् सूर्यनारायणाशी जाऊन भिडत असल्यामुळें सूर्यवंशीं क्षत्रियांना त्याविषयीं विशेष प्रेम व आत्मीयता वाटून त्यांनी त्याचा पुरस्कार करून त्याचा उदो उदो चालविला, ही त्यांतल्या त्यांत महनीय गोष्ट घडून आली.

तेव्हां त्या संहितेमध्यें सांगितलेल्या मंत्राचा विनियोग कसा करावा व कां करावा, कोठें करावा व केव्हां करावा, यज्ञ म्हणजे काय, त्याचे प्रकार किती व त्याच्या प्रयोगाची पद्धति कशी याविषयीं याज्ञिकांना बोध व्हावा आणि जगाला वैदिक धर्माची व तत्त्वज्ञानाची महती व माहिती कळावी म्हणून सरस्वती प्रसादानें सोपपत्तिक व सरहस्य असा एक विद्वत्ताप्रचूर अमरकीर्ति महाग्रंथ तयार केला. तोच शतपथ होय (भा. शां. प. अ. ३२३, २२–२३) हा ग्रंथ अखिल वैदिक वाङ्मयांत अत्यंत मोठा,

विचार परिप्लुत व भारदस्त असून, वैदिक देवोपासनेच्या विविध माहितीनें व गूढ व गहन तत्त्वज्ञान–विचारानें पूर्ण ओथंबलेला आहे. याज्ञवल्क्यानीं यांत आपलें कर्मकौशल्य, बुद्धिवैभव, रचना-चातुर्य व प्रतिभासौंदर्य पूर्ण ओतलें असून, त्यातील धार्मिक, याज्ञिक, तात्त्विक, जागतिक, सामाजिक व राजकीय विचार मोठे मार्मिक व बोधप्रद असेच आहेत. त्यांतल्यात्यांत शेवटच्या प्रकरणांत वैदिक तत्त्वज्ञानाचीं त्यांनीं केलेली मीमांसा म्हणजे या तत्त्वज्ञानाचा सुंदर कळसच होय.

अशा या महाग्रंथाची रूपरेषा थोडक्यांत पुढें दिली आहे. या ग्रंथाविषयी विशेष माहिती ' याज्ञवल्क्य दर्शन (पूर्वार्ध)या ग्रंथांत दिली असून, त्यांत एकदर शंभर अध्याय आहेत म्हणून त्याला शतपथ हे नांव प्राप्त झालें आहे. हे शंभर अध्याय चौदा काडांत विभागलेले असून, त्यांत ७६२४ कांडिका आहेत. त्याची मांडणी अशी :–

काड	नांव	अध्याय	प्रपाठक	ब्राह्मण	कांडिका.
१	हविर्यज्ञ	९	७	३७	८३७
२	एकपादिका	६	५	२४	५४९
३	अध्वर	९	७	३७	८५९
४	ग्रह	६	५	३९	६४८
५	सव	५	४	२५	४७१
६	उखासंभरण	८	५	२७	५३०
७	हस्तिघट	५	४	१२	३९८
८	चिति	७	४	२७	४३७
९	संचिति	५	४	१५	४०२

१०	अग्निरहस्य	६	४	३१	३६९
११	अष्टाध्यायीं	८	४	४२	४३७
१२	मध्यम	९	४	२९	४५९
१३	अश्वमेध	८	४	४३	४३२
१४	उपनिषत्	९	७	५०	७९६
		१००	६८	४३८	७६२४

अशी ही थोडक्यांत शतपथाची बहिरंग उभारणी आहे. येणे-प्रमाणें या ग्रंथांत एकंदर १०० अध्याय, ६८ प्रपाठक (अनुवाक), ४३८ ब्राह्मण व ७६२४ कांडिका (ब्राह्मणमंत्र) आहेत. शंभर मार्ग म्हणजे अध्याय या ग्रथांत असल्यामुळें त्याला शतपथ हें नांव प्राप्त झालें आहे. शतपथाची व्याख्या करण्यांत आली आहे, ती अशी:—

'शत पंथानो मार्गा नाम अध्याया यस्य सः शतपथः' अशी त्याची व्याख्या करण्यांत आली असून 'शतपथः शताध्यायैः' असेहि त्यास म्हणतां येईल.

या चौदा कांडांची विषयवारीनें मांडणी पुढीलप्रमाणें सामान्यतः देतां येईल. पहिल्या कांडांत 'ओं व्रतमुपैष्यन्' या मंत्रानें ग्रंथारंभ होऊन, त्यांत दर्शपौर्णिमासेष्टीचें विवेचन केलें आहे. दुसऱ्यांत अग्न्याधान, पुनराधान, अग्निहोत्र, उपस्थान, पिंडपितृयज्ञ, अग्रयणेष्टि, दाक्षायण व चातुर्मास्य हे विषय सांगितले आहेत. तीन व चार या कांडांत सोम-अध्वर वर्णिला असून पांचव्यांत वाजपेय, राजसूय, दशपेश, सौत्रामणि इत्यादि महत्त्वाच्या यज्ञांचे अनुष्ठान आलें आहे. सहावें कांड उखासंभरण, विष्णुक्रम, दीक्षा, वनीवाहन

इत्यादि विषयांसाठीं उपयोगिलें असून, सातव्यांत चयन, अग्निक्षेत्रसंस्कार, दर्भस्तंब, यांचा ऊहापोह करण्यांत येऊन, पुढें आठव्यांत अग्निचिति म्हणजे चयनकर्म परामर्शिलें आहे. नवव्यांत शतरूद्रीय होम, पुनश्चिति व चित्युपस्थान हे विषय सांगून दहाव्यांत अग्निरहस्य सांगितलें आहे. याच कांडांत चयनयागस्तुति,चयनकाल विचार, अग्नि उपासना, मनःसृष्टि इत्यादि महत्त्वाच्या विषयांचा विमर्श केला असून अखेर ऋषिवंश कथन केला आहे. अकरावें कांड आधानकाल, दाक्षायण यज्ञ, दर्शपूर्णमासासंबंधीं अर्थवाद, ब्रह्मचर्य, हविःसमृद्धि, पंचमहायज्ञ, स्वाध्यायप्रशंसा, प्रायश्चित्त, अध्यात्म विद्या, पशुबंध, षड्होतारहोम इत्यादि विषयांसाठी उपयोगिलें असून, बाराव्यांत दीक्षाक्रम, सत्र, पृष्ठ्याभिप्लव, स्वरसाम, गवामयन अग्निहोत्र प्रायश्चित, मृतकाग्निहोत्र, मृतकदाह या विषयाचें विवेचन आहे. तेरावें कांड अश्वमेध, पुरुषमेध, सर्वमेध, दशरात्र, पितृमेध या विषयाकरतां उपयोगून चौदाव्यांत प्रवर्ग्य, महावीर, बृहदारण्यक, पुत्रमंथ, काम्यश्रीमंथ यांचा परामर्श घेऊन अखेर वंशब्राह्मण देऊन 'आदित्यांनीमानि शुक्लानि यजूंषि वाजसनेयेन याज्ञवल्क्येनाख्यायन्ते' या मंत्रानें ग्रंथ समाप्ति केली आहे.

वैदिक आर्यसंस्कृति ही जगांतील अत्यंत प्राचीन व प्रभावी संस्कृति असून तिचे शुद्ध व निर्मल स्वरूप पहावयाचे झाल्यास, तिचे अंतरंग समजून घ्यावयाचें असल्यास आपणास वैदिकांच्या ब्राह्मण-ग्रंथाकडेच धाव मारली पाहिजे. त्याशिवाय गत्यंतर नाहीं. इतिहास-पुराणांत अगर स्मृति–काव्य ग्रंथांत तें प्रतीत व्हावयाचें नाहीं. कारण त्या ग्रंथात बौद्ध-जैनादि इतर उथळ व अर्धवट धर्मविचाराची सरमिसळ

झालेली असून कोठें कोठें त्या ग्रंथावर भावना प्रधान अवैदिक विचारांची दाट छाया पसरली आहे. शुद्ध गंगेचें पवित्र उदक पाहिजे असल्यास तुम्हास गंगोत्रीकडे धांव मारली पाहिजे. काशी प्रयागांत जाऊन तें लाभावयाचें नाहीं. काशी-प्रयागांतील गंगा ही गंगा खरी पण ती शुद्ध व निर्मळ गंगा नव्हे! तेथें तिच्यांत इतर नद्यांची व ओहळ ओढ्यांची भेसळ झालेली आहे. म्हणून तेथील गंगोदक हें पूजार्ह मानण्यांत येत नाहीं. याकरितां हरिद्वारची गंगाच पाहिजे! तद्वत् वैदिक आर्य संस्कृतीचें म्हणजे तिच्या आचारविचाराचें, आहार विहाराचें, प्रपंच-परमार्थाचें, नीती-व्यवहाराचे तसेंच समाजकारण, राजकारण, तत्त्वज्ञान व सृष्टिज्ञान या सर्वांचें यथार्थ व सुटसुटीत चित्र पहावयाचें झालें तर तेजस्वी ब्राह्मणग्रंथाकडे-तशांत विशेषतः अष्टपैलू व अष्टावधानी शतपथ ग्रंथाकडे– धांव मारली पाहिजे, याविषयीं मुळींच शंका नाहीं.

शतपथाच्या अंतरंगात शिरून तेथील ज्ञानभांडार हें किती रमणीय व मनोहर आहे आणि विचारसरणी किती ओजस्वी, प्रभावी व प्रसादपूर्ण आहे हें सांगण्याचें हें स्थळ नव्हे. ज्यांना त्याची हौस व आवड आहे अशा सूज्ञ वाचकांनी आमच्या याज्ञवल्क्य-दर्शन या ग्रंथावरून नजर फिरविल्यास त्यांची कांहींशी कल्पना येईल. वैदिक आर्य लोक हे स्वभावतःच मोठे तेजस्वी व बाणेदार वृत्तीचे लोक असल्यामुळें 'वीर्य वै कर्म' हें शतपथ वचन त्यांचें मुख्य पालूपद होतें. ते पौरुषाचे मोठे चाहते असून यज्ञोपासनेचे एकनिष्ठ उपासक होते. त्यांची यज्ञकल्पना विश्वव्यापक व सर्वंकष होती व त्या ग्रंथावरून जर कोणी दृष्टि फिरवील तर ती त्याला आजहि तशी दिसून येईल. 'यज्ञे सर्वं प्रतिष्ठितम्' अशी त्यांची दृढ भावना असून, मनुष्याच्या आशाआकांक्षा, वासना

व इच्छा सुपूर्त करणारी ती एक दिव्य कामधेनु आहे अशी त्यांची दृढ भावना होती. म्हणून वैदिकांचा कोणताहि धर्मग्रंथ उघडल्यास– विशेषतः ब्राह्मण ग्रंथावरून दृष्टि फिरविल्यास–तेथें मुख्यतः यज्ञविषयावर विवेचन केलेलेंच प्रायः आढळून येईल.

आणि शतपथाची झाली तरी हीच गोष्ट आहे. त्यांतही ब्राह्मण ग्रंथाप्रमाणें यज्ञविषयक रुक्ष व नीरस असे रखरखीत प्रदेश आहेतच. तरी पण मधून मधून अनेक बोधपर कथागोष्टी, आख्यानें, उपाख्यानें यांची सुंदर हिरवळ तेथें विखुरलेली असल्यामुळें व ठिकठिकाणीं तत्त्वज्ञान सुमनांचें सुंदर गुच्छ प्रफुल्ल फुललेले असल्यामुळें त्या दिव्य व मनोहर देखाव्यानें रुक्ष प्रदेशांत फिरून फिरून त्रस्त व श्रांत झालेलें मन शांत व प्रसन्न होऊन, पुढील वाटचाल पुनः नव्या दमानें व उत्साहानें करूं लागते, असा वेदप्रेमी लोकांचा सुखद अनुभव आहे. आणखी तशांतच पुढें येतां येतां अखेर बृहदारण्यकाच्या दिव्योद्यानांत शिरल्यावर काय मग पुसूंच नका ! जिकडे तिकडे सुंदर तत्त्वज्ञानाचे सुरम्य ताटवेच ताटवे ! एकापेक्षां एक सुंदर नि एकापेक्षां एक मनोहर ! आणि ज्ञानानंदाचे फवारेच फवारे ! खरोखर बृहदारण्यक म्हणजे दिव्य ज्ञानाचें एक नंदनवनच ! व स्वर्गीय आनंदाचा एक महासागर ! !

या शतपथांतच वैदिक आर्यांच्या विविध भावना, आकांक्षा, आचार, विचार, नीति, व्यवहारज्ञान व विज्ञान या सर्वांचें सुंदर शब्दचित्र बीजरूपानेंच कां होईना, पण अगदीं स्पष्ट व सुटसुटीत उमटलेलें जसें पहावयास मिळेल, तसें इतरत्र कोठेंहि मिळणार नाहीं. वाचकहो ! या शतपथ ग्रंथराजाचें विचारसौंदर्य व अर्थमाधुर्य किती म्हणून सांगावें ? त्याचा विस्तार, त्याची रचना, त्याची प्रतिभा, त्याचे विचार, त्याची शैली त्याचा उपदेश, त्याचें

सौंदर्य, त्याचें वैभव सर्व कांहीं अगदीं और आहे. वैदिकांचा हा विचारप्रधान व ज्ञानगर्भ ग्रंथराज विविध विषयांच्या सुमनोहर विचारालंकारांनीं नखशिखांत नटला असल्यामुळें त्याचे तें स्वर्गीय ऐश्वर्य व लोकोत्तर सौंदर्य पाहून आम्हीच काय, जगांतील मोठेमोठे विद्वान पंडित सुद्धां मंत्रमुग्ध व आश्चर्यचकित झाले आहेत, हें आज आम्ही नव्यानेंच सांगितलें पाहिजे अशांतला कांहीं भाग नाहीं !

या शतपथ ग्रंथाबद्दल पंडितांना काय वाटतें याबद्दल ऋग्यजुःसामवेदावर भाष्य लिहून त्यांतील अर्थ स्पष्ट व सुगम केल्यावर विजनगरच्या बुक्कसम्राटांच्या विनंतीवरून 'वेदार्थ प्रकाशन' या भाष्याच्या आरंभीं सायणाचार्य म्हणतात, 'वेदांतील-मंत्रार्थाचें स्पष्टीकरण व विशदीकरण ज्या एकाच ग्रंथांत झालें आहे आणि ज्यांत अध्वर्यूचें कर्म इतर ग्रंथाचें सहाय न घेतां पूर्णत्वानें विवरण्यांत आलें आहे व ज्यांत परमतत्व करतलामलकवत् सुस्पष्ट झालें आहे, असा ग्रंथ म्हणजे माध्यंदिन शतपथ ब्राह्मण हाच आपणास आढळून आला असून त्यावर भाष्य लिहिण्यास आपण प्रवृत्त झालों.'

सर्वतः सायणाचार्यो विस्मृश्योदीरितान्गुणान् ।
माध्यंदिने शतपथे ब्राह्मणे व्याकरोति तत् '

असा सायणाचार्यांनीं आपला स्पष्ट अभिप्राय दिला आहे.

प्रो. म्याकडोनेल्ड साहेब या ग्रंथांविषयीं आपला अभिप्राय थोडक्यांत देतात तो असा –The Satapatha Brahman of Yajnavalkya is next to Rigveda, the most important production in the whole range of Vedic Literature.

प्रो. मोक्षमुल्लरसाहेबांनीं असें म्हटलें आहे :– There are passages in the Brahmanas full of genuine thought and

feeling and most valuable as pictures of life and as regards early struggles which have left no trace in the literature of other nations

प्रो. ग्रिफिथ हे असें लिहितात :- The Satapatha Brahman is admittedly on the whole the most recent of the great Brahmana texts. Yajnavalkya is a leader bordering on the upanishad period and there is little doubt that the Brahmana with its clear distinction from Sanhita is the product of a distinct attempt to mprove on the confused form of the black Yajurved texts. (.... the treament of the matter in tha Taittiriya must be regarded as artficial and unnatural)

यावरून शतपथग्रंथाची योग्यता काय आहे. यांची कल्पना येईल. याज्ञवल्क्याना जी अमर कीर्ति प्राप्त झाली, त्यास कारण हा ग्रंथराज होय.

कर्मयोग

शतपथाची शिकवण प्रामुख्यानें गृहस्थाश्रमासाठीं– प्रापंचिक लोकांसाठी– जागतिक जीवनोत्कर्ष व पारमार्थिक निःश्रेयस या दोहोंचें साधन वैदिक पद्धतीनें कसें करावें हें सांगण्यासाठीं आहे. या बाबतींत ध्यानांत ठेवण्यासारखी मुख्य मुद्द्याची गोष्ट म्हणजे ' यथाचारी तथा भवति ' हें वैदिकांचें व्यावहारिक सूत्र असून ' यथोपासते तदेव भवति ' हें त्यांचें पारमार्थिक सूत्र आहे.

अर्थात व्यावहारिक व पारमार्थिक क्षेत्रांत कर्माचें महत्त्व व आवश्यकता सारखीच असून त्याशिवाय कोणतीहि गोष्ट सिद्धि पावत नाहीं. हेंच दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे ' कर्म तसें फल ' व ' भाव तसा देव ' हा कर्मसिद्धांत पुढे करतां येईल. सत्कर्म केलें तर सद्‌गति आणि दुष्कर्म केलें तर दुर्गति–' **पुण्यो वै पुण्येन कर्मणा भवति पापः पापेन** ' (बृ. ४–४–५)– हे सर्व मानव आचार विचाराचे आद्य सूत्र आहे. या जगांत मनुष्यामनुष्यामध्ये जें स्वभाववैचित्र्य आढळून येतें त्याच्या मुळाशी कर्माचे हे प्राबल्यच दिसून येतें. हें उघड सांगावें असें नाहीं.

वैदिक धर्मात कर्माचें दोन प्रकार सांगण्यांत आले. एक सकाम कर्म व दुसरें निष्काम कर्म. आर्यांचें वेदग्रंथ हे प्रापंचिकांची कामधेनु असल्यामुळें व तदुक्त इष्ट प्राप्त्यर्थ व अनिष्ट निवारणार्थ कर्माची आवश्यकता प्रतिपादिली असल्यामुळें साहजिकच कर्माला महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे. तें कर्म सकाम असेल तर त्यापासून जागतिक जीवनाचा–म्हणजे प्रापंचिक अभ्युदयांचा-उच्चांक गांठतां येतो. त्याला मानवी सुखसमाधानाची सर्व साधनें कर्माच्या आधारावर प्राप्त होऊं शकतात आणि मरणोत्तर सत्यलोकापर्यंत –ब्रह्मलोकापर्यंत– मजल मारतां येते, असें याज्ञवल्क्यानीं स्पष्ट सांगितलें आहे. ही सकाम कर्माची पारमार्थिक सर्वश्रेष्ठ स्थिति होय. यापुढें सकाम कर्माची गति कुंठित होते व त्याचा अवतार

संपुष्टांत येतो. येथपर्यंतचें विवेचन हें वेदोक्त कर्मानुष्ठानाचें, सकाम कर्मानुष्ठाचें -झालें.

आतां वेदांतोक्त– उपनिषदोक्त– ज्ञानमार्गांत वेदोक्त कर्ममार्गाचें जशाचें तसें अनुकरण करण्यांत आलें नसून त्याला मुरड घालण्यांत आली आहे. याचें कारण असें कीं, सकाम कर्मानें जे लोक प्राप्त होतात, ते शाश्वत नसून अंतवंत असतात. नित्य नसून अनित्य नि अशाश्वत असतात. जोंपर्यंत त्या कर्माची पुण्याई आहे तोंपर्यंतच त्या लोकाची प्राप्ति. पुण्य क्षय पावल्यावर पुनः तेथून गचांडी मिळणार. ‘ क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति ’ अशी या सकाम कर्माची कुळकथा आहे.

या विषयी शतपथानें स्पष्ट इशारा दिला आहे कीं ‘ यदिह वा अप्यनेवविन्महत्पुण्य करोतित्यु तद्धास्यान्ततः क्षीयते’ मनुष्यानें मनांत इच्छा धरून किती जरी सत्कर्म केलेले असलें–पुण्याचरण केलेलें असलें–तरी ते शेवटी क्षय पावणारच आणि तें पुण्य संपल्यावर पुनः या मृत्युलोकाशीच गांठ म्हणून सकाम कर्माला छाट मारून वेदांतोक्त निष्काम कर्माचा स्वीकार केलेला आहे. कर्म तेथेंहि आवश्यक आहेच. पण तें सकाम नसून निष्काम असतें याचें कारण असें कीं निष्काम कर्म हें, चित्तशुद्धीस उपकारक होतें. चित्तशुद्धि झाली म्हणजे मन स्थिरावते बुद्धि उजळते आत्म्यांत जागृति अंकुरतें आणि अखेर वेदान्त श्रवणानें सत्यज्ञानाचा उदय होऊन निरंतर सुखनिधान अशा मोक्षाचा लाभ होतो अर्थात अक्षय आनंद व शाश्वत शांति प्राप्त होऊन पुनः जन्ममृत्यूची भगभग व दगदग रहात नाहीं. निष्काम कर्म म्हणजे कसल्याहि कर्मफलाची इच्छा न धरतां तें निरीच्छ बुद्धीनें परमेश्वरार्पण करणें हें कर्म बाधक न होता उलट आत्मज्ञानास–आत्मसाक्षात्कारास–पोषक व उपकारक होतें. हाच कर्मयोग होय, हें कर्मकौशल्य ज्यास साधलें–मग तो प्रपचांत असो वा परमार्थांत असो–त्याला इष्ट सिद्धि ठेवलेलीच. अशी ही थोडक्यांत वेदोक्त कर्मयोगाची याज्ञवल्क्यांनी शतपथांत मांडणी करून दाखविली आहे.

सूर्य तो सूर्यच

याज्ञवल्क्यांचें चरित्र म्हणजे पौरुषानें पूर्ण ओथंबलेलें आहे. त्यांच्या जीवनांत किती विघ्नें, किती विविध प्रसंग, केवढा विरोध. त्यांच्या प्रचंड उद्योगास, साहसास नि प्रयत्नास तर सीमाच नाहीं. सर्व विघ्नांना व संकटांना न जुमानतां एकटयांनींच सिंहाच्या छातीनें सर्व प्रतिस्पर्ध्यांशीं सामना देऊन सर्वांवर त्यांनीं मात केली आणि आपलें यश सूर्याप्रमाणें तेजस्वी व अजरामर करून ठेविलें. नवीन वेद रचला, नवीन पंथ स्थापिला, कार्याची नवीन दिशा आखली, नवीन परंपरा रूढ केली आणि सर्व क्षेत्रांत सर्वच कांहीं नवीन व अपूर्व करून दाखविलें. तत्त्वज्ञान क्षेत्रांत तर जगाच्या इतिहासांत 'योगीश्वर याज्ञवल्क्य' हें त्यांचें पवित्र व पूज्य नांव गौरीशंकराप्रमाणें अग्रस्थानीं विराजमान झालें असून आज देखील जग त्यांना ' हिंदु तत्त्वज्ञानाचा जनक The Father of Hindu philosophy, या बहुमानानें ओळखीत आहे.

पण अशा श्रेष्ठ विभूतीलाहि वारंवार किती हिसके व टक्के टोणपे खावे लागले व त्या सर्वांना टक्कर देऊन अखेर ते त्यांतून सहीसलामात कसे निभावले हें पाहिलें म्हणजे कोणालाहि आश्चर्य वाटल्यावांचून व त्यांचें कौतुक करून त्यांना धन्यवाद दिल्यावांचून राहवणार नाहीं. वैशंपायनांनीं तर त्यांना सळो का पळो करून सोडलें होतें. यःकश्चित कारणाकरितां शाप काय दिला, शिकविलेल्या विद्या परत काय घेतल्या, यज्ञांतील दक्षिणेसाठी भांडण काय काढलें, जनमेजयाच्या यज्ञांत बहिष्कार काय घातला, त्यांच्याविरुद्ध कट काय उभारला, बंड काय माजविलें, एक कां दोन अडीअडचणी निर्माण केल्या? पण हिऱ्याला जसजसे पैलू पाडावे तसतसा

तो अधिकच तेजस्वी व चमकदार दिसूं लागतो. तशीच गोष्ट त्याच्या बाबतीतहि झाली. वैशंपायनांनीं जसजसा त्यांचा छळ मांडला तसतसें त्यांचें तेज वृद्धिंगतच झालें. एकामागून एक अशा विजयश्रींनी माळा घातल्यानें त्यांचा कंठ विभूषित झाला आणि त्यांचें नांव पूज्य व शाश्वत बनलें.

रागाच्या भरांत वैशंपायन भाच्याला तसा शाप न देते तर योगीश्वरांचें आत्मतेज इतक्या ज्वाज्वल्यतेनें झळकलें असतें कीं नाहीं, हें सागतां येणार नाहीं. थोर माणसांतील कर्तृत्व-शक्तीचें विस्फुलिंग प्रज्वलीत होऊन प्रकाशमय होण्यास तसेंच कांहींतरी जबरदस्त कारण हवें असतें आणि तें वैशंपायनांनीं पुर-विलें. तुकारामाची भगवद्भक्ति प्रज्वलित होण्याला त्याच्या बाय-कोचा कर्कशपणाच कारण झाला आणि प्रत्यक्ष लोकमान्यांची व महात्मा गांधीजींची गोष्ट झाली तरी काय ? त्यांच्यामध्यें अस-लेल्या लोकोत्तर कर्तृत्वशक्तीचें जें एवढें धगधगीत आत्मतेज चम-कलें, त्याला कारण फिरंगी सरकारची तापट व तामस वृत्तीच नव्हे तर काय ? शिवाजी महाराजांना हिंदुपदपादशाही स्थापन करण्याचें स्फुरण चढलें, त्याला कारण मोंगली सुलतानांचा अफाट नि आसुरी छळ म्हणूं नये तर आणखी काय म्हणावें ?

विद्येच्या, सत्तेच्या व सामर्थ्याच्या आसुरी लोभानें पिसाळ-लेल्या माणसांची अगर राष्ट्रांची खोडच अशी असते. कांहीं वेळ त्यांचा जय झालासा दिसला तरी अखेर **'सत्यमेव जयते'** ही देव-वाणीच प्रभावी व विजयी ठरते ! सर्व सत्वसंपन्न लोकांची अशीच कथा आहे.

रागाच्या भरांत वैशंपायनांनीं कांहींतरी बोलून कर्तृत्ववान शिष्यवराला आपल्या आश्रमांतून अर्धचंद्र दिला. पण त्याचा परि-

णाम म्हणजे नवा शुक्ल यजुर्वेद निर्माण झाला. आणि निराळी एक वेदवृक्षाची शाखा फोफावली. सज्जन, सत्त्वसंपन्न, कर्तृत्ववान् व्यक्तींशीं तामसी व मत्सरी लोकांचें घर्षण होऊन ठिणगी उडाल्यास विलक्षण परिणाम होतो आणि दिव्य चमत्कार घडतो यांत संशय नाही.

योगीश्वर याज्ञवल्क्य हे जगाच्या दृष्टीनें लोकापवादांतूनही सुटले नाहीत. हा लोकापवाद कोणालाहि सुटला नाहीं. श्रीराम, श्रीकृष्ण, राजा धर्म, छत्रपति शिवाजी, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी इतकेंच नव्हे तर प्रत्येक थोर माणसामागें सावली-प्रमाणें तो पाठ धरून आहेच आहे. श्रीरामचंद्राला स्त्रीलंपट म्हणणें, श्रीकृष्णाला चोर कपटी म्हणणें, धर्माला भितरा भागूबाई म्हणणे, शिवाजीला चोर लुटारू म्हणणें, लो. टिळकांना राजद्रोही म्हणणें, महात्मा गांधींना बंडखोर व सैतान म्हणणें, तशांतलाच याज्ञव-ल्क्यांना गुरुद्रोही म्हणण्याचा हा वैशंपायनांचा तामसी प्रकार होय. सूर्यालासुद्धां नांव ठेवणारे लोक जगांत आहेतच कीं नाहींत? कुटाळ जगाचे हे असले आसुरी चाळे चालावयाचेच.

शिवाय आम्ही म्हणतों विनाकारण प्रजेला छळणारा तो राजा कसला, मुलाला निष्कारण वडविणारा तो बाप कसला, विश्वास-घात करणारा तो मित्र कसला आणि शिकवलेली विद्या परत मागणारा तो गुरु कसला? वैशंपायन गुरुजीला तरी हें शोभलें काय? असा काय अक्षम्य अपराध केला होता म्हणून त्यांनीं भाच्याचा असा सूड घ्यावा व दिलेलें विद्यादान परत घ्यावें. टीकाकारांना गुरुद्रोह तेवढा दिसावा आणि शिष्यद्रोह मात्र दिसूं नये, हें आश्चर्य आहे. जगाची रीतच अशी होऊन बसली आहे कीं लहानाच्या डोळ्यांतील कुसळ तेवढें दिसावें आणि मोठ्यांच्या

डोळ्यांतील मुसळ मात्र दिसूं नये! मोठ्यांचे पर्वतप्राय दोष झांकले जातात आणि गरिबागुरिबांचें बारीक सारीक दोष देखील वेशीवर लटकविण्यांत येतात! जगाची ही उलटी रीतच आहे.

ज्याअर्थी भगवान श्रीसूर्यनारायणानें याज्ञवल्क्यांवर अनुग्रह केला, वाग्देवी सरस्वतीनें वरदहस्त ठेवला आणि श्रीशंकरांनीं 'योगीश्वर' हा बहुमानाचा किताब दिला व ज्यावर जनमेजयजनकासारखे पुण्यश्लोक राजे प्रेमादरभाव दाखवू शकले त्याअर्थी याज्ञवल्क्य हे स्फटीकाप्रमाणें आचारविचारानें स्वच्छ व गंगेप्रमाणें निर्मळ होते व असावेत याविषयीं पापी व मत्सरी लोकांशिवाय इतरांस शंका येणार नाहीं. सूर्य, शंकर व सरस्वती यांच्या कृपाकटाक्षास ते पात्र झाले ही एवढीच गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे त्यांच्या असामान्य कर्तृत्वाबद्दल, निर्मलतेबद्दल, आणखी पुरावा हवा कशाला?

सूर्य तो सूर्यच. त्याचा दिव्य प्रकाश त्रैलोक्यांत भरून राहणार. यदाकदाचित् मनुष्य स्वभावास अनुसरून कांहीं किंचित् दोष त्यांच्यांत कोणाला, दिसले तरी योगीश्वर ते योगीश्वरच! त्यांच्या तेजोमय असाधारण चारित्र्यांतच त्यांचें वैशिष्ट्य आहे.

ज्ञान–कर्म–सहयोग

भारतीयांचा प्राचीन इतिहास पाहिला तर तेथें प्रपंचांत आणि परमार्थात कर्माचें महत्त्व नि प्राबल्य प्रामुख्यानें दृष्टोत्पत्तीस येतें. वैदिक धर्माची मुख्य इमारत कर्मावरच उभारण्यांत आलेली असून मानवी जागतिक जीवनोत्कर्षाचें रहस्य त्या कर्मांतच गर्भित आहे. मनुष्याचे मनोरथ सत्यसृष्टींत अभिव्यक्त व्हावयाचे झाले तर कर्माला सोडून इतर कोणत्याहि मार्गानें तें शक्य नाहीं. म्हणून **'कर्मणैव हि संसिद्धि'** असें भगवंतांनीं कर्माचें माहात्म्य गाइलें आहे. याज्ञवल्क्यांनीं **'कुर्वन्नेवह कर्माणि जिजीविषेच्छतं समाः'**। कर्म करीतच शंभर वर्षे जगण्याची इच्छा धरावी असा चकचकीत निर्वाळा दिलेला आहे. 'वीर्य वै कर्म' हें त्यांचे पालुपद आहे. थोडक्यांत सांगावयाचे म्हणजे कर्माशिवाय मनुष्याला या जगांत दुसरा खरा हितकर्ता व उद्धारकर्ता नाही.

वेदांत कर्म याला पारिभाषिक अर्थ असून त्याचा भावार्थ देवोपासना-यज्ञोपासना असा आहे. त्याचप्रमाणें ज्ञान म्हणजे आत्मज्ञान–तत्त्वज्ञान–ब्रह्मचिंतन या अर्थी त्याचा उपयोग करण्यांत आलेला आहे. ज्याला परम पुरुषार्थ साधावयाचा आहे त्याला देवोपासना व आत्मोपासना या दोहोंचीहि आवश्यकता आहे. ज्याप्रमाणें पक्षी हा दोन्ही पंखांच्या सहाय्यानें आकाशांत उडी मारतो तद्वत कर्म व ज्ञान या दोहोंच्या मदतीनें परम-पुरुषार्थ'-स्वावत सुखनिधान प्राप्त करून घेतां येतें, असा याज्ञवल्क्यांचा कटाक्ष आहे. ज्ञानरहित केवळ कर्मानें अगर कर्मरहित केवळ ज्ञानानें परम पुरुषार्थ साध्य होणें शक्य नाहीं. म्हणून मुमुक्षूनें दोन्ही बाजूंहि सांभाळल्या पाहिजेत. याचें कारण असें कीं, कर्माच्या पोटांत

ज्ञान व ज्ञानाच्या पोटांत कर्म अशी वस्तुस्थिति असून दोन्हींचा सहयोग हाच परमसुखाचा राजमार्ग आहे.

कर्म श्रेष्ठ कां ज्ञान श्रेष्ठ याविषयीं कोरड्या व पोपटी पंडितांमध्यें एक मोठा वादाचा विषय होऊन बसलेला आपण पाहतों. एक पक्ष असा आहे कीं, तो कर्माला प्राधान्य देऊन ज्ञानाला गौणत्व देतो. अर्थात् ज्ञानाच्या डोक्यावर तो कर्माला बसवूं पाहतो. दुसरा पक्ष आहे तो ज्ञानाचा उदोउदो करून कर्माला वाळींत टाकूं पाहतो. पण हे दोघेहि याज्ञवल्क्यांच्या मतें अर्धवटच ठरतात. त्यांचा शुक्ल यजुर्वेद चकचकीत या बाबतींत कौल देतो तो असा— **अन्धंतमः प्रविशन्ति येऽविद्यामुपासते । ततो भूय एव ते तमो य विद्यायां रता ॥** ' शु. य. ४०–१२ ॥ जे केवळ कर्मांतच गुटमळून बसतात ते कट्टर कर्मठ लोक अज्ञानांधःकारानें गुरफटलेल्या लोकांत जाऊन पडतात व जे कर्म टाकून केवळ कोरड्या ज्ञानांतच मोक्ष मानतात ते तर त्याहूनहि निबिड अशा घोरतर लोकांत प्रवेश करतात. हें वचन ज्ञानशून्य जहाल कर्मठ व कर्महीन पोपटी पंडित या दोघांनाहि सारखेच दोषी ठरविण्यास कमी करीत नाहीं.

वैदिक धर्मांत कर्माचा प्रांत वेगळा आणि आणि ज्ञानाचा मार्ग वेगळा अशी वस्तुस्थिति असली तरी कर्माला ज्ञानाची व ज्ञानाला कर्माची अपेक्षा व आवश्यकता असल्यामुळें दोहोंचे यथार्थज्ञान असणें हें पुरुषाच्या परम कल्याणार्थ अपरिहार्यच ठरतें आणि याज्ञवल्क्य झाले तरी हेंच सांगतात. ईशावास्यांत त्याचा उल्लेख सांपडतो तो असा.—' **विद्यां चाविद्यांच यस्तद्वेदोभयं सह । अविद्याया मृत्युं तीर्त्वा विद्ययाऽमृतमश्नुते ॥** (शु. य. ४०–१४) अविद्या म्हणजे कर्म व विद्या म्हणजे ज्ञान ही दोन्ही जो जाणतो

तो कर्मोपासनेनें दुःखस्वरूप मृत्यूचे अतिक्रमण करून आत्मज्ञानानें अमृतरूपी मोक्ष प्राप्त करून घेतो. यास ज्ञानकर्म समुच्चय वाद असें म्हणतात. ही परम कल्याणकारक शिकवण जेव्हां आर्य विसरले—कर्म व ज्ञान यांची फारकत झाली, तेव्हा त्यांचें सगळेंच पारडें फिरलें आणि कोरड्या ज्ञानाचा उदोउदो होऊन सर्वत्र गोंधळ माजून राहिला. तेव्हां ज्ञान व कर्म यांचें हृदयंगम दृश्य याज्ञवल्क्यांनीं कसें रेखाटलें आहे याचें येथें थोडक्यांत तात्पर्य रूपाने दाखविण्यांत आलें आहे.

जनक–याज्ञवल्क्य--संवाद

जनक याज्ञवल्क्य संबंध शतपथांत अनेक ठिकाणीं व अनेक प्रसंगी निरनिराळ्या स्वरूपांत आलेला दाखविला आहे. याज्ञवल्क्य विद्यार्थीदशेंत असतांना श्वेतकेतु, सोमशुष्म व सात्ययज्ञ याच्याबरोबर त्याचा जनकाशीं पहिला संबंध आला. त्या पहिल्या भेटीतच राजाने यज्ञवल्क्यांचें अग्निहोत्रासंबंधींचें अपूर्व ज्ञान पाहून त्यांच्यावर खूप होऊन, त्यांच्याकडून '**कामप्रश्न एव मे त्वयि याज्ञवल्क्यासत्**।' (श. प. ११–६–२–१०)——मला यथेच्छ आपणास प्रश्न विचारण्याची परवानगी असो, असा वर मागून घेतला. त्यानंतर जनकाच्या वडिलाच्या यज्ञात यज्ञसाफल्य करण्याच्या बाबतींत याज्ञवल्क्याशी दुसरा संबंध आला. तिसरा संबंध जनकाला अग्निहोत्राचें कांही बाबतीत अडत होते त्याविषयीं शंका निरसन करून घेण्यासाठी म्हणून आला असून त्यावेळीं याज्ञवल्क्यांनीं त्यांचें संपूर्ण समाधान केल्यावर आनंदित होऊन '**वेत्थाग्निहोत्रं याज्ञवल्क्य धेनुशतं ददामि**' (श. प. ११–३–१–४) याज्ञवल्क्य महाराज! आपण खरोखर अग्निहोत्र पूर्ण जाणतां आणि म्हणून मी आपणांस शंभर गाई बक्षीस देतों' असें म्हणून त्यांस शंभर गाई दान दिल्या. त्यानंतर त्यांचा संबंध अमरस्मृति अशा जनक सभेत येऊन, तेथें एक हजार गाई त्यांनीं जनकांकडून बक्षीस मिळविल्या. शिवाय शतपथांत पुढें अनेक वेळीं त्या दोघांत आत्मविद्येवर गहन व गंभीर चर्चा झालेली आहे. (श. प. १४–६ – १० व ११; १४–७–१ व २) शेवटच्या व्याख्यानाच्या प्रसंगीं जनक राजे इतके खूप झाले कीं, अखेर त्यांनीं त्यांना एक हजार गाई तर दिल्याच. पण तेवढ्यावरच न थांबतां शेवटीं '**सोऽहं भगवते विदेहान्ददामि**

मां चापि सह दास्याय – हे भगवन् गुरुदेव, माझे विदेहांतील सर्व प्रजाजन व त्याबरोबरच मीहि पण आपलें दास्यत्व करण्यासाठी आपल्या सन्निध सिद्ध झालों आहों अशी गंभीर गर्जना केली. याला म्हणावा गुरु–शिष्य भाव. वैदिक राजे व वैदिक ऋषि यांचा हा प्रेमळ व उदात्त संबंध पाहून कोणाहि भाविक भारतीयाचें अंतःकरण आदरानें व कृतज्ञतेनें भरून येईल ! हीच गोष्ट महाराष्ट्रांत **छत्रपति शिवाजी राजे व श्रीसमर्थ रामदास गुरुदेव** यांच्यामधी पहावयास मिळते. ते पुण्य महात्मे व तो तेजस्वी काळ आतां गूढ भूतकाळांत जमा झालेला आहे. तो याज्ञवल्क्यांनीं जनकास केलेला शेवटचा उपदेश मार्मिक, विचारसंपन्न व सुंदर अशा व्याख्यान रूपात दिलेला आहे. आम्ही तो संवादरूपांत देत आहोत

एके समयीं याज्ञवल्क्य व जनक यांच्यांत तात्त्विक व पारमार्थिक विषयावर चर्चा चालली असतां ओघावरून गोष्ट निघून जनकांनीं सहज प्रश्न केला की, गुरुदेव ! मनुष्य मरतो म्हणजे काय होतें ?

याज्ञवल्क्य–हा देह जरेनें अगर रोगानें जर्जर झाला, कृश व बलहीन बनला म्हणजे तो जीवात्म्याच्या व्यवहाराला निरुपयोगी होतो, अर्थात् तो सोडून देऊन जीवात्म्याला दुसरा नवीन धारण करणें भाग पडतें नि तो तेथून निघून जातो

जनक – म्हणजे काय ?

याज्ञवाल्क्य – राजा बाहेर जावयास निघाला म्हणजे शिपाई, सेवक, अधिकारी हे जसें प्रथम त्याच्यापुढे चालू लागतात, तद्वत हा शरीरांतला राजा – म्हणजे जीवात्मा – देह सोडून बाहेर जाण्यास निघाला म्हणजे इंद्रियें, मन, बुद्धि इत्यादि परिवार पुढे चालू लागतो. हा सर्व लवाजमा बरोबर घेऊन तो हृदयाच्या

ठिकाणीं येतो. या वेळीं चक्षुरादि इंद्रियसमुदाय जीवात्म्याशीं तादात्म्य पावलेल्या असतो.

जनक – मला याचा नीट उमज पडत नाही, अधिक फोड करून सांगा.

याज्ञवल्क्य -- हा चाक्षुष पुरुष जेव्हा परत आदित्याकडे जावयास निघतो, तेव्हां सर्व इंद्रियशक्ति त्याच्यात लीन झालेल्या असतात आणि म्हणून देहाला बाहेरचें ज्ञान होऊं शकत नाहीं. उदाहरणार्थ, डोळ्याला रूप ओळखूं येत नाहीं, कानाला शब्द ऐकूं येत नाहीत, जिभला रुचि समजत नाही, नाकाला वास कळत नाही, मनाला मनन करता येत नाही, त्वचेला स्पर्श उमगत नाहीं. कारण ती ती इंद्रियशक्ति आत्म्याने आपल्यात आकर्षून घेतलेली असते म्हणजेच लोक बोलतात की, याला दिसत नाहीं, वास समजत नाही, रुचि कळत नाही, बोलता येत नाही, ऐकूं येत नाहीं, कांही कळत नाही की वळत नाहीं.

जनक – हे असे का होते ?

याज्ञवल्क्य – मरण काळीं जीवात्मा हे शरीर सोडून कायमचा निघून जातो. म्हणून तो आपला परिवारही सगळा बरोबर नेतो. अंतकाळ आला–जीवात्मा देहाला सोडून जाण्याचा क्षण आला–म्हणजे बाहेर पडण्याचें हृदयद्वार प्रकाशित होते. त्यांतून हा आत्मा बाहेर पडतो. याप्रमाणें तो बाहेर जाऊं लागला म्हणजे त्याच्या मागोमाग प्राण जातो. प्राणाच्या मागोमाग सर्व इंद्रियेंहि निघून जातात. एक गोष्ट मात्र विशेष असते.

जनक – ती कोणती ?

याज्ञवल्क्य – या वेळी जीवात्मा विशेष ज्ञानाने युक्त असतो. म्हणजे बुद्धि, कर्म व वासना ही सर्व त्याबरोबरच असतात.

जनक - याला कांहीं दृष्टान्त ?

याज्ञवल्क्य-आहे. गवतावरची जळू गवताच्या शेड्यापर्यन्त जाऊन पोंचली म्हणजे पुढे जाण्यास आधार नसल्यामुळें पुनः जशी दुसऱ्या मार्गाचा-त्याच तृणावरून परत जाण्याच्या मार्गाचा-आश्रय करून आपल्या इंद्रिय-समुदायांचा उपसंहार करते, त्याचप्रमाणें हा आत्मा देखील या शरीराचा व अविद्येचा त्याग करून - नाश करून-दुसऱ्या मार्गाचा अवलंब करण्याकरितां इंद्रियादिकांचा उपसंहार करतो

जनक - पुढे काय होतें ?

याज्ञवल्क्य-सोनार हा जसा सोन्याचा तुकडा घेऊन त्याचा आपणास हवा तसा अलंकार बनवितो, त्याला वाटेल तसलें रूप देऊं शकतो, तद्वत् हा जीवात्मा आपल्या सुकृताप्रमाणे-सत्कर्मा-प्रमाणे - पितराचें, गंधर्वाचें, देवाचें अथवा प्रजापतीचें किंवा ब्रह्मदेवाचें अगर आपणास हवें तसें रूप धारण करूं शकतो.

जनक-एवढें जर त्याचें सामर्थ्य आहे तर मग तो आहे तरी कसा ?

याज्ञवल्क्य-काय सांगू जनकराया ह्या आत्म्याचा प्रभाव नि महिमा ? हा आत्मा विज्ञानमय आहे, मनोमय आहे, प्राणमय आहे, चक्षुर्मय आहे, श्रोत्रमय आहे, पृथ्वीमय आहे. तो आपोमय-वायुमय-तेजोमय-आकाशमय आहे तो काममय - अकाम-मय; क्रोधमय-अक्रोधमय, धर्ममय-अधर्ममय, प्रत्यक्षमय-परो-क्षमय आहे आणि असें सांगत गेलों तर सबंध आयुष्यहि पुरणार नाहीं. म्हणून एकाच शब्दांत सांगून मोकळे व्हावयाचें तर तो सर्वमय आहे.

जनक-मग तो जवळ जवळ ब्रह्मच आहे असे का म्हणाना ?

याज्ञवल्क्य–जवळ जवळ कां, प्रत्यक्ष ब्रह्मच आहे ना.

जनक–मग मरणोत्तर ब्रह्मच होतो कीं काय?

याज्ञवल्क्य–नाहीं. तसा प्रकार नाहीं.

जनक–मग त्याची स्थितिगति कोणती ?

याज्ञवल्क्य–तें कर्मावर अवलंबून आहे. जसें त्याचें कर्म, तशी त्याची गति !

जनक–म्हणजे ?

याज्ञवल्क्य–इथें, या लोकीं जसें तो कर्म करील । जसे त्याचे आचार–विचार असतील, तसें त्यास मरणोत्तर फल मिळतें–म्हणजे गति प्राप्त होते. चांगलें कर्म करणारा साधु होतो व वाईट कर्म करणारा दुष्ट होतो. पुण्यकर्म करणारा पुण्यवान होतो आणि पाप करणारा पापी होतो. अर्थात् हें सर्व कर्मावर अवलंबून आहे.

जनक–हें कर्म कसें घडतें ?

याज्ञवल्क्य–कर्माला कारण वासना, इच्छा वा काम होय. मनुष्य हा स्वभावत. काममय आहे, वासनामय आहे. त्याची वासना–इच्छा असेल तसा त्याचा निश्चय, जसा निश्चय तसें कर्म व जसें कर्म तसें फळ. कर्म चांगलें असल्यास फळहि चांगलेंच आणि तें वाईट असल्यास फळहि वाईट असतें हा कर्मसिद्धान्त आहे. मनुष्य या लोकीं जसें बरेंवाईट कर्म करील तशी त्याला मरणोत्तर गति प्राप्त होते. या माझ्या म्हणण्याचा अर्थच असा कीं, मनुष्याचें कर्म जसें असेल, तसें त्यास फल मिळतें. अर्थात् तशी त्याला गति प्राप्त होते. आणि तें भोगावयास म्हणून तो त्या लोकीं जातो. तेथें गेल्यावर कृतकर्माचा फलभोग भोगून तें संपल्यावर, पुनः या लोकीं कर्म करावयास म्हणून तो परत येतो.

असें हें कर्मचक्र सतत चालू असतें. संसारचक्र म्हणतात तें हेंच. ही सकाम कर्माची गोष्ट झाली.

जनक– म्हणजे काय ?

याज्ञवल्क्य– फलाची मनांत इच्छा धरून कर्म करणें याला सकाम कर्म म्हणतात.

जनक– मग निष्काम कर्माची कथा निराळी आहे कीं काय ?

याज्ञवल्क्य– निष्काम कर्माचें स्थान वेगळें आहे. जे निरिच्छ राहून कर्म करतात, जे निष्काम होऊन ईश्वरार्पण बुद्धीनें कर्म करतात अशांची गोष्ट निराळी आहे. जे निष्काम झाले आहेत, निरिच्छ झाले आहेत, फक्त आत्मलोकाची तेवढीच ज्यांना इच्छा असते, अशांचें प्राण उत्क्रमण पावत नाहींत. ते ब्रह्मरूप होऊन ब्रह्यामध्यें विलीन होतात. ' हृदयांतील सर्व कामना अगर वासना जेव्हां नाहींशा होतील तेव्हां मनुष्य हा मृत्युरहित होतो आणि या लोकीं याच देहीं तो ब्रह्मत्व पावतो. शरीराहून भिन्न असा हा प्राण असून तो अमर आहे, तोच ब्रह्म नि तोच तेज होय.

जनक– आपल्या या सदुपदेशाबद्दल मी आपणांस हजार गाई देतों.

याज्ञवल्क्य– जनकराया जरा थांबा. मला तुझ्या गाई नकोत. तुला पूर्ण ज्ञान झालें, तुझा सर्व संशय फिटला म्हणजे त्या गाई घेण्याचा मला अधिकार पोहोंचेल. तुझ्या मनांतील सर्व संशय दूर करून घे. तूं निःशंक होऊन पूर्ण ज्ञानी झालास म्हणजे मी त्या गाई घेईन. हा ब्रह्मप्राप्तीचा–मोक्षाचा–मार्ग फार सूक्ष्म आहे. तसाच तो विस्तृत आणि फार प्राचीनहि आहे. जे खरोखर ब्रह्मज्ञानी झाले आहेत ते शरीरपातानंतर मुक्त होऊन या मार्गानें वर स्वर्गास जातात व मोक्ष मिळवितात. हाच एक मार्ग पूर्ण आहे.

जनक– ज्ञानी लोकांचा हाच मार्ग असाच ना आपला अभिप्राय ?

याज्ञवल्क्य– होय. मोक्षमार्ग तो हाच होय.

जनक– मग कर्मठ लोकांचा मार्ग कोणता? त्यांची गति काय?

याज्ञवल्क्य– जे केवळ कर्मठ असतात म्हणजे कर्मातच अखंड लुडबुडत असतात ते अत्यंत गाढ अशा अंधःकारांत प्रवेश करतात. ज्ञानी लोकांचे स्थान जसे प्रकाशमय असते तसे या कर्मठांचे स्थान अंधःकारमय असते. शिवाय येथें हेंहि सांगितले पाहिजे की, जे कर्माचा त्याग करून केवळ ज्ञानांतच रंगलेले असतात ते तर त्याहिपेक्षा निबिडतर अशा गडद अंधःकारात जाऊन पडतात ! आणि जे विद्याहीन व कर्मठ असतात त्यांची दशा तर सांगाय-लाच नको. हे विद्याकर्महीन पापी लोक अंधःकारानें गुरफटलेल्या अशा सुखरहित व दुःखमय अधोलोकाप्रत जातात नरकलोक तो हाच होय.

जनक– आत्मज्ञानी लोकांसाठी ब्रह्मलोक, पुण्यवानासाठीं स्वर्गलोक व पापीजनासाठीं नरकलोक असतात ना या सांगण्याचा अर्थ ?

याज्ञवल्क्य– अगदीं बरोबर ! जनकराया ! माझ्या म्हणण्याचा रोख तू अगदी बरोबर ताडलास.

जनक– मरणकाळी मनुष्याला दुःख होत असतें, ज्ञान्यालाहि तें होत असेल काय ?

याज्ञवल्क्य– येथें तू चुकत आहेस ! हा मी आहे असे जर पुरु-षाला आत्म्याविषयी ज्ञान होईल अर्थात जीवात्मा जो मी तो विश्वात्मा ब्रह्मच आहे अशी ज्याची खात्री पटेल तो शरीर-दुःखानें काय म्हणून कष्टी होईल ? ज्याला या आत्म्याचें सत्यज्ञान

झालें, साक्षात्कार झाला तो प्रत्यक्ष विश्वकर्ताच म्हणून समजावा. तो सर्वांचा आत्मा आणि सर्व त्याचा आत्मा होय. हेंच दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे तर या विश्वाचा तो आत्मा व हे विश्व त्याचा आत्मा आहे.

जनक–केवढा हा आत्मज्ञानाचा–ब्रह्मज्ञानाचा–प्रभाव आहे. पण तें ब्रह्म आपल्याला कोठे प्राप्त होईल आणि कसे प्राप्त होईल ?

याज्ञवल्क्य–ते ब्रह्म येथेच जाणलें पाहिजे. आणि आम्ही तें येथेच जाणतो. आम्ही जर हे येथेच–या देहीच–जाणलें नसतें तर मोठा घात, मोठा अनर्थ झाला असता. हे ब्रह्म जे जाणतात फक्त तेच अमर होतात आणि जे जाणत नाहीत त्यांचे दुःख केव्हांही सरत नाही. या श्रेष्ठज्योतिरूप अमर आत्म्याचीच सर्व देव उपासना करतात हे पंचजनहि त्याची पूजा करतात. हा आत्मा म्हणजे तू काय समजलास ? हा प्राणांचा प्राण, चक्षूचा चक्षु, श्रोत्रांचे श्रोत्र आणि मनाचे मन आहे. हें जे जाणतात त्यांनाच त्या प्राचीन व आद्य परब्रह्माचें ज्ञान झालें असें समजावें. या जगांत वस्तुत विविध असे काहीच नाही पण हे (दुसऱ्यानें) सांगून समजावयाचें नाही. ज्याने त्याने ते फक्त आपल्या मनानेच जाणलें पाहिजे.

जनक–जगांत विविधत्व नाही असें का आपलें म्हणणें आहे ? पण मला ते पटत नाही.

याज्ञवल्क्य–बाह्यदृष्टीनें तू पहातोस म्हणून तुला जग तसें दिसते आणि म्हणून तुला माझे म्हणणे पटत नाही. पण वस्तुतः ज्ञानी मनुष्याला जगात विविधत्व–अनेकत्व–दिसत नाहीं. पण जोपर्यंत मनुष्य जगांत विविधत्व पाहतो तोंपर्यंत त्याच्या मागचें

संसारचक्र–जन्ममृत्यूचा फेरा–कांही केल्या चुकत नाहीं. त्याला पुनः पुनः संसारांत यावेंच लागते आणि संसारदुःख भोगावेंच लागतें. मी सांगतो तो हा आत्मा सर्वांत एकजिनसी असून तो मल-रहित आहे. तो आकाशाहून सूक्ष्म आहे आणि तसाच ब्रह्मांडा-हूनहि मोठा आहे. तो जन्मरहित आहे आणि शाश्वतहि आहे. ब्राह्म-णानें म्हणजे ब्रह्म जाणू इच्छिणारानें याचें ज्ञान–यथार्थ ज्ञान–करून घ्यावयास पाहिजे.

जनक–हा आत्मा आहे तरी कसा ? त्याचे थोडक्यांत लक्षण सांगून माझें समाधान करा ना ?

याज्ञवल्क्य– हा आत्मा अज आहे. म्हणजे जन्मरहित आहे तो सर्वाहून मोठा आहे, तो विज्ञानघन असून सर्वांच्या अंतर्यामी आहे. हे सर्व विश्वजात त्याच्याच स्वाधीन आहे; तो सर्वांचा ईश्वर आहे; भूतांचा अधिपति आहे, भूपाल आहे. आणि तो लोकांना धारण करणारा सेतु आहे.

जनक– केवढा महिमा त्याचा ? आपलें म्हणणे विचाराला पटतें. आतां मला प्रश्न येऊन पडला आहे कीं, हा जाणावयाचा कसा नि तो मार्ग कोणता ?

याज्ञवल्क्य–तेंहि तुला सांगतों ऐक. तो मार्ग म्हणजे हा. ज्याला हें ब्रह्म जाणण्याची इच्छा आहे अशा ब्रह्मजिज्ञासूला वेदाध्ययन अवश्य हवें. त्याबरोबरच यज्ञ, दान, तप, उपवास, व्रत या गोष्टी हि अवश्य आहेत. वरील विधीनें जो यथार्थतः याला जाणतो तो मुनि होय. या आत्मलोकाची प्राप्ति व्हावी म्हणूनच संन्यासी संन्यास घेतात. हें आत्मतत्त्व– हें ब्रह्म–ज्यांनीं ओळखलें, ते संत-तीची इच्छा करीत नाहींत. हा आत्माच तो आपला लोक असें ते समजतात आणि म्हणून पुत्रेच्छा, धनेच्छा व लौकिकेच्छा या

सर्वांचा त्याग करून केवळ भिक्षेवर ते आपला चरितार्थ चालवूं पाहतात. नेति नेति म्हणतात तो हाच आत्मा.

जनक– म्हणजे ?

याज्ञवल्क्य– हा अगृह्य आहे. याला धरतां येत नाहीं. अशीर्य आहे, फाडतां येत नाहीं. असंग आहे, जोडतां येत नाहीं. असित आहे, व्यथा पावत नाहीं किंवा नाश पावत नाहीं. मी पापकर्म केलें म्हणून त्याला ताप होत नाहीं वा पुण्यकर्म केलें म्हणून हर्ष शिवत नाहीं. अर्थात् तो हर्षशोक या पलीकडला आहे. म्हणून जो ब्रह्मज्ञ असतो तो पाप व पुण्य अर्थात् शोक व हर्ष दोन्हीं तरून पलीकडे जातो. कृताकृताची त्याला बाधा होत नाहीं. आणि हें जो जाणतो तो शांत, दांत, उपरत, सहनशील, समाधानयुक्त होऊन आपल्यामध्येंच आत्मरूप पहातो. सर्व पाप भस्म करून टाकतो. असा ब्रह्मज्ञ पापरहित व वासनारहित होतो. ब्रह्मलोक तो हाच होय.

जनक– गुरुदेव ! या हजार गाई घ्या. ही माझी विदेहप्रजा व त्याबरोबरच मीहि आपले दास आहोंत.

याज्ञवाल्क्य– जास्त काय सांगूं ? हा आत्मा महान, जन्मरहित, नाशरहित, भयरहित असा असून तो प्रत्यक्ष ब्रह्मच आहे. अभय हेंच ब्रह्म नि हें आत्मज्ञान जो जाणतो तो अभयरूपी प्रत्यक्ष ब्रह्मच होतो. जनका ! तूं ब्रह्म झाला आहेस.

वाचकहो ! याज्ञवल्क्यांच्या तोंडांतून निघालेला हा अमृतबोध ऐकून त्या मुमुक्षु राजर्षि मनाची काय स्थिति झाली असेल ? हें काय सांगितलें पाहिजे ? त्याचा हा अमृतबोध वाचून संतृप्त झालेले तुम्हीच कल्पना करा म्हणजे झालें.

(ग. प १४-७-२-१ ते ३१)

अहं ब्रह्मास्मि

आतां जातां जातां योगीश्वरांची एक महत्त्वाची मुख्य गोष्ट सांगावयाची राहिली. ती तेवढी सांगून ग्रंथ आटोपता घेतों. ती गोष्ट म्हणजे तत्त्वज्ञान क्षेत्रांत 'अहं ब्रह्मास्मि'ची घोषणा करून ज्ञानमेरूचा सर्वोत्कृष्ट व सर्वोच्च गौरिशंकर गाठला ! हा पराक्रम त्यांच्या जगविख्यात शतपथ ग्रंथराजांत आढळून येतो. खरोखर त्या ग्रंथाचें वैशिष्टय़ हें कांहीं औरच आहे. येथें म्हणजे त्यांच्या विचारवैभवाचा, प्रतिभासौन्दर्याचा, कर्मकौशल्याचा, भाषा-प्रभुत्वाचा, विवेचनपद्धतीचा, निरीक्षण व परीक्षण पद्धतीचा मनोहर कळसच झाला आहे. त्याच्या बृहदारण्यकाच्या तत्त्वज्ञानप्रचुर नंदनवनांत शिरल्यावर तेथील दिव्य नि अमर ज्ञानभांडार पाहून मनुष्य आश्चर्यानें थक्क होऊन जातो. वैदिक तत्त्वज्ञानाच्या अत्युच्च शिखराचे मंगल दर्शन घडते तें येथेच. 'अहं ब्रह्मास्मि' या महावाक्याची जाहीर घोषणा करण्यात आली ती याच ग्रंथांत या विश्वकोशांत विविध नामरूपाचा देखावा नि पसारा दृष्टीस पडत असला तरी तो वस्तुतः खरा नसून ज्ञानदृष्टीनें तेथें एकच एक सद्वस्तु–ब्रह्मवस्तु–अखंड नांदत असून ती ब्रह्मांडांत सर्वत्र घन-दाट व ओतप्रोत भरून राहिली आहे. तीच एक सत्य व शाश्वत असून बाकीचे सगळे सांत व विनाशी आहे. 'आत्मैव सत्यं, अन्य-दार्तं' ही घोषणा त्यांनी स्पष्ट करून ठेविली आहे. ब्रह्म व जीव व्यवहारतः भिन्न दिसलीं तरी वस्तुत. व परमार्थतः एकच आहेत. हें अद्वैतात्त्व विस्तव व ठिणगीचा दृष्टान्त देऊन समर्पक सिद्ध करून दाखविण्यांत आलें आहे. 'अहं ब्रह्मास्मि' याचें सुंदर स्पष्टीकरण श्रीमत्शंकराचार्यांनीं 'जीवो ब्रह्मैव नापरः' या सूत्रवचनांत सविस्तर व समर्पक सिद्ध करून दाखविलें आहे. असो. योगीश्वर आजपर्यंत जगाच्या स्मृतिमंदिरांत कीर्तिरूपानें जिवंत राहिले आहेत, ते त्यांचें दिव्य चरित्र व अमर शिकवण यामुळेंच होय.

ज्योत निमाली !

याज्ञवल्क्यांचें अवतारकार्य आतां जवळ जवळ संपल्यासारखेच झालें होतें. त्यांच्या सर्व आशाआकांक्षा पूर्ण सिद्धीस गेल्या होत्या. एकंदर अंगीकृत कार्याला व प्रयत्नाला महद्यश लाभले होतें. मन सर्वस्वीं शांत झालें असून बुद्धीला स्थैर्य प्राप्त झाले होतें. मनुष्यानें जगांत जन्मून काय करावयाचें आणि काय पाहावयाचें तें सर्व करून व पाहून त्यांचा अंतरात्मा सुखरूप व तृप्त झाला होता. त्यांचा मानवजन्म धन्य व कृतकृत्य झाला होता.

चंद्रकांत - त्यांचा वडील मुलगा- हा आतां मोठा व कर्ता झाला असल्यामुळें व कात्यायनी ही संसारदक्ष असल्यामुळें त्यांना मागची कशाची म्हणून काळजी राहिली नव्हती. शुक्ल यजुर्वेदाचा पुरस्कार व प्रचार करणारे असे त्यांचे प्रथितयश असे पंधरा शिष्य असून त्यांत कण्व व मध्यंदिन यांनी जनसामान्यावर चांगलीच पकड बसवून स्वीकृत कार्यांत बरेंच यश मिळविलें होतें. तत्कालीन राजवृन्दांतील बहुतेक नृपतींनी योगीश्वरांचे अनुयायी होऊन त्यांच्या वेदाचा स्वीकार केला होता. त्यांचे सर्व हेतु सिद्धीस जाऊन आता करावयाचें असें कांहींच उरलें नसल्यामुळें संसाराचा सर्व पसारा कात्यायनीवर व शुक्लयजुर्वेदाचा प्रचार व प्रसार शिष्यवृंदांवर सोपवून उर्वरित आयुष्य आत्मचिंतनांत गुंतविण्यासाठीं म्हणून ते गृहस्थाश्रमांतून निवृत्त झाले व पुढें योगसाधन व ब्रह्मचिंतनांत ते अखंड रंगून व रमून गेले. इहलोकीची याप्रमाणें यात्रा करून कालक्रमण करीत असतां सृष्टिनियमाप्रमाणें यथाकाळ देहविसर्जन करून, नदी जशी समुद्रांत विराम पावते तद्वत त्यांची दिव्य आत्मज्योति त्या सच्चिदानंद परमात्म स्वरूपांत विलीन झाली.

चंदनाची राख होऊन गेली तरी त्याचा परिमळ जसा आसमंतांत दरवळून असतो तद्वत योगीश्वर जरी आज पांच हजार वर्षांपूर्वीच इहलोकांतून अंतर्धान पावले असले तरी त्यांच्या सुमंगल तत्त्वज्ञानाचा स्वर्गीय परिमळ शारदादेवीच्या पवित्र मंदिरांत आजमितीसहि जशाचा तसाच खुलून व दरवळून आहे ! याला आश्चर्य म्हणूं नये तर काय म्हणावें ? इतकेंच काय, पण जोंपर्यंत चंद्रसूर्य या भूमंडळावर चमकत आहेत तोंपर्यंत या गुरुदेवांचें गंभीर तत्त्वज्ञान व त्याबरोबरच त्यांची पुण्यस्मृति मेरुप्रमाणें अभंग व अखंड राहील, या विषयीं संदेहच नको.

नश्वर जडसृष्टीच्या अंतरंगाचा ठाव घेण्यात रंगलेलीं व दंगलेलीं ही आधुनिक विज्ञानशास्त्रें कांहींहि म्हणोत व देहसुखाला हपापलेलीं व चटावलेलीं राष्ट्रें कितीहि नाक मुरडोत, पण या गुरुदेवाच्या सुमधुर उपदेशामृताला त्यापासून किमपिहि बाध येणार नाहीं किंवा कडवट अगर बुरसट वास येणार नाहीं. इतकेंच नव्हे, तर प्रगत पावलेला विज्ञान शास्त्राचा नाजूक काटा आतां आस्ते आस्ते या गुरुमाउलीच्या तत्त्वज्ञानाकडे झुकत चालला असून, त्याप्रमाणें प्रथितयश पाश्चात्य विज्ञान शास्त्रज्ञ सर जेम्स जीन्स मारखे जगत्प्रसिद्ध शास्त्रज्ञ 'अगृह्यो, नहि गृह्यते' या दिव्य घोषणेचा

The river of knowledge has too often turned back on itself

या शब्दांनी अनुवाद करण्यास तयार झाले आहेत. एकंदरीत तात्पर्य काय कीं या गुरुदेवाची त्रिकालबाधित शिकवण सूर्याप्रमाणेंच अमर आहे ! दिवा गेला तर त्या बरोबरच प्रकाशहि जातो, पण चमत्कार हा कीं हा ज्ञानदीप शांत झाला असला तरी त्याचा ज्ञानोपदेशाचा दिव्य प्रकाश अद्याप आहे तसाच प्रकाशत असून तो लोपला नाहीं ! श्री योगीश्वर गुरुदेवाचे हें इतके पुण्यस्मरण करून भागलेल्या लेखणीला आतां विश्रांति देतो. इति शम्.

समाप्त